# आशय २०१७

## महाराष्ट्रातील निवडक विचारवंत



# द्वितीय वर्ष कला


अभ्यासपत्रिका क्रमांक ३ च्या अभ्यासक्रमात महाराष्ट्रातील
विविध विचारवंतांच्या लेखांचा समावेश केला आहे.
नरेंद्र दाभोलकर, वसंत बापट, यशवंत सुमंत,
शांता किर्लोस्कर, मिलिंद बोकील अशा विविध
विचारवंतांच्या समाज, संस्कृती, भाषा, स्त्रीजीवन,
इत्यादी विविध विषयांवरील विचारमंथनाचा या
संकलनात समावेश आहे. मराठी विभागाने मराठी
साहित्यातील वैचारिक लेखनाचा सर्वसमावेशक आलेख
घेतला आहे. त्यापन्न
'विचारवेध' या पुस्तकान केलेले 'विचारवेध' हे
अभ्यासक्रमाअंतर्गत विभागाने अ. पत्रिका ३, अंतर्गत
स्वतंत्र संकलन आहे आणि विविध विचारवंतांच्या
मूल्यमापनाकरता विभागाने प्रवृत्त केले
कार्याचा आढावा घेण्यास विद्यार्थ्यांना
२०१६-१७ मधील दुसऱ्या सत्रातील 'आशय' हे
हस्तलिखित 'महाराष्ट्रातील निवडक विचारवंत' या
विषयावर तयार केले आहे. 'आशय' हस्तलिखिताची
विद्यार्थ्यांनी अखंड जपलेली आहे.
परंपरा

— डॉ. वीणा सानेकर
मराठी विभागप्रमुख.

इतिहासाचार्य

# वि. का. राजवाडे

सुरेश देशपांडे



# अनुक्रमणिका

| अ. नु | दिनांक | विषय | गुण | सही |
|---|---|---|---|---|
| १ | | जन्म व जीवन | | |
| २ | | राजवाड्यांच्या दप्तरा | | |
| ३ | | राजवाड्यांचे कार्य आणि प्रस्तावना | | |
| ४ | | प्रतिभाशक्ती आणि आत्मविश्वास | | |
| ५ | | प्रकाशित साहित्य | | |
| ६ | | चरित्र रूपरेखा | | |
| ७ | | ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरीचे व्याकरण | | |
| ८ | | महाराष्ट्र धर्म एक संकल्पना | | |
| ९ | | समाहार | | |

# विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

## वि. का. राजवाडे

### जन्म व जीवन :-

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे [जुलै १२, १८६३ - डिसेंबर ३१, १९२६] हे मराठी इतिहास-संशोधक होते. त्यांनी संपादित केलेले 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' ह्या ग्रंथाचे २२ खंड हे मराठा साम्राज्याच्या इतिहासाच्या अभ्यासासाठीचे महत्त्वाचे साधन मानले जाते.

राजवाड्यांचा जन्म जुलै १२, १८६३ रोजी महाराष्ट्रात पुण्यात झाला. बी.ए. पर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर करून ते प्रकाशात आणण्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक सुरू केले होते.

१८९८ साली यांनी लिहिलेल्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. जुलै ७, १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना त्यांच्या पुढाकाराने झाली.

डिसेंबर ३१, १९२६ रोजी राजवाड्यांचे निधन झाले. राजवाडे म्हणायचे - ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्य लोक शिकतील; माझ्या ग्रंथांची पूजा करतील. मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीर्तिला हपापलेला नाही.

## राजवाड्यांचा दरारा :-

महाराष्ट्राच्या विचारविश्वात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचा मोठा दरारा, दबदबा आणि धाक होता. राजवाडे आपल्या हयातीतच एक आख्यायिका बनून गेले होते राजवाडे यांच्यावर भरपूर टीका झाली. त्यांच्या हयातीतच प्रबोधनकार के. सी. ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, जिवाजी मंगेश तेलंग यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले होते. नंतरही इतिहास-संशोधक दं. शं. शेजवलकर यांनी राजवाडे यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या. तथापि, या सर्व गोष्टी एकत्र केल्या तरी राजवाडे यांचे वाक्य न वाक्य ब्रह्मवाक्य मानणारा एक वर्ग अस्तित्वात राहिलाच आणि विशेष म्हणजे मराठी विचारविश्वात याच वर्गाचे वर्चस्व असल्यामुळे राजवाडे यांचे स्थान अबाधित राहिले.

## राजवाड्यांचे लेखन आणि प्रस्तावना :-

राजवाडे यांच्या नावावर स्वतंत्र असा एकही ग्रंथ नाही त्यांनी नियतकालिकांमधून किरकोळ स्वरूपाचे लेख लिहिले. 'महिकावतीची बखर', आणि 'राधामाधवविलास चंपू' या प्राचीन ग्रंथांचे संपादन केले आणि मुख्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती तब्बल बावीस खंडांमध्ये छापली. त्यांच्यापैकी काही खंडांना प्रस्तावना लिहिल्या. राजवाडे संपादनांपेक्षा अधिक गाजले ते या प्रस्तावनांमुळे. ज्यांना या प्रस्तावना आवडल्या नाहीत, त्यांनाही राजवाडे यांनी अविश्रांत कष्ट घेऊन, प्रचंड भ्रमंती करून जमा केलेल्या इतिहासाच्या

साधनसामग्रीसाठी त्यांच्या तऊणात शहण्यावाचून पर्याय नव्हता.
राजवाडे यांनी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण' या पुस्तकाची प्रस्तावना मूळ पुस्तकापेक्षा अधिक वाचनीय आहे असेच त्यांच्या बहुतेक पुस्तकाबद्दल म्हणता येईल.

## प्रतिभाशक्ती आणि आत्मविश्वास :-

राजवाडे बुद्धीमान तर होतेच; पण त्यांना प्रतिभाशक्तीचीही देणगी लाभली होती. जबरदस्त आत्मविश्वास हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य होते त्यामुळे साधा अंदाज किंवा कयाससुद्धा ते अशा पद्धतीने व अशा आक्रमकपणाने मांडत, की जणू काही तो त्रिकालाबाधित सत्य असलेला महासिद्धान्तच आहे.

## प्रकाशित साहित्य :-

★ इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य खंड
१ मराठी भाषा व व्याकरण

★ इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य खंड
२ मराठी ग्रंथ व ग्रंथकर

★ इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य खंड
३ संस्कृत भाषा विषयक

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
४ अभिलेख संशोधन

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
५ मराठी धातुकोष

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
६ व्युत्पत्ती कोष

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
७ समाजकारण व राजकारण

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
८ समाजकारण व राजकरण

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
९ आत्मवृत्त व लेख

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
१० प्रस्तावना खंड

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
११ इतिहास

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
१२ संपादक राजवाडे

* इतिहासाचार्य वि.का. राजवाडे समग्र साहित्य खंड
१३ समग्र संत साहित्य

१

## चरित्र रूपरेखा :-

इतिहाससंशोधन या एका आणि एकाच कार्यास आपले आयुष्य निश्चयपूर्वक वाहणारे आणि हाच आपला प्रपंच मानून आपली सर्वगामी बुद्धीमत्ता आणि सर्व श्रम कामी लावणारे विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांना इतिहाससंशोधकांमधील एका प्रचंड वादळाचीच उपमा देणे योग्य ठरेल.

राजवाडे यांचे मूळ आडनाव जोशी. शिवकालात राजवाड्यांशी त्यांचा संबंध आला असावा म्हणून ते राजवाडे आले, अशी एक आख्यायिका दिली जाते. तर काही जण कोकणातील राजवाडीवरून ते राजवाडे आले असावे, असे मानतात. उत्तर पेशवाईत, राजवाडे यांच्या वडिलांचे चुलते लोहगडचे किल्लेदार होते. पण पेशवाई बुडाल्यानंतर (१८१८) किल्लेदाराचे वैभव गेले. सर्वत्र ब्रिटिश राज्य आले आणि राजवाडे मंडळींना साहेबांच्या राज्यात शेतीत आणि पडतीत असे व्यवसाय करण्याची वेळ आली. राजवाडे यांचे वडील काशीनाथपंत पुण्यास वकिली करू लागले आणि त्यांचे भाऊ जगन्नाथ बापूजी राजवाडे पुणे जिल्ह्यामध्ये वडगावला मराठी वकील आले. राजवाडे यांच्या आईचे नाव यमुनाबाई. तिचे माहेर कोकणात रायगड जिल्ह्यात वरसई येथे महाड तालुक्यात होते. काशीनाथ यमुनाबाई या दांपत्यास दोन मुले झाली. राजवाडेंच्या मोठ्या मुलाचे नाव वैजनाथ होते. धाकट्याचा म्हणजेच विश्वनाथांच्या जन्मानंतर तीनच वर्षांनी निधन आले. तेव्हा आई वैजनाथ आणि विश्वनाथ या आपल्या दोन्ही मुलांना बरोबर घेऊन आपल्या वडिलांकडे वरसईस गेली.

# ज्ञानेश्वरी आणि ज्ञानेश्वरीचे व्याकरण :-

एकनाथपूर्वकालीन ज्ञानेश्वरीचे राजवाडे यांनी संशोधन केले. तिचा अभ्यास करण्याच्या निमित्ताने त्यांनी यादवकालीन मराठीची भाषाकडे आणि व्याकरणाकडे यांची चिकित्सा केली. एकूणच मराठी भाषेची विकासधारा नोंदवून वाङ्मयाच्या वाटचालीचा मागोवा घेतला.

राजवाडे यांनी संशोधित किंवा संपादित केलेल्या साहित्यामध्ये हे वैशिष्ट्ये आहे की, ते केवळ त्या साहित्यकृतीचा परिचय करून देऊन थांबत नाहीत, तर इतिहास आणि समाजशास्त्राच्या दृष्टीनेही त्या वाङ्मयकृतीची विचारपूस करतात. तिच्यामधील भाषाशास्त्र आणि व्याकरणही तपासतात आणि समग्र राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन इतिहासाच्या परिप्रेक्ष्यामध्ये त्या वाङ्मयकृतीचे स्थान निश्चित करतात. जणू ती वाङ्मयकृती निमित्तमात्रच असते. मराठी ग्रंथकर्तृत्वाच्या इतिहासाच्या दृष्टीने राजवाडे यांची फार मोठी कामगिरी म्हणजे त्यांचे ज्ञानेश्वरीवरील संशोधन मानावे लागेल. राजवाडे यांना या 'ज्ञानेश्वरी' ची प्रत बीड शहरातील पाटांगण नावाच्या देवस्थानात (मठात) मिळाली. ती एका कोनाड्यात धूळ खात पडलेली होती. इतर 'प्रती' मध्ये कोनाड्यात पडलेली ही प्रत मठाधिपती मथुरानाथ गोसावी याने १९०३ मध्ये राजवाडे यांना दिली. राजवाडे यांनी ती चिकित्सक दृष्टीकोनातून अभ्यासून आणि संपादून आपल्या मर्मग्राही विलक्षण दीर्घ प्रस्तावनेसह धुळ्यातून १९०७ मध्ये प्रसिद्ध केली.

## महाराष्ट्र धर्म - एक संकल्पना :-


राजवाडे यांच्या एकूण लेखनामधून 'महाराष्ट्र धर्म' ही संकल्पना आणि त्याचे मध्ययुगीन काळातील प्रत्येक श्रीसमर्थ रामदासस्वामी हे सूत्र वारंवार प्रारंभापासून अखेरपर्यंत आढळते. महाराष्ट्र धर्माची विस्तृत मांडणी प्रथम रामदासांनीच केली, अशी राजवाडे यांची प्रथम खातरजमा झाली होती आणि बहुतेक विद्वानांचे मतही तसेच होते. मात्र 'महिकावतीची बखर' जेव्हा पुढे राजवाडे यांना उपलब्ध झाली तेव्हा या संकल्पनेच्या काळाविषयी त्यांच्या निर्णयात परिवर्तन झाले. तत्पूर्वी त्यांनी या संकल्पनेची सांगोपांग चर्चा करून काही निष्कर्ष प्रस्थापित केले होते. हिंदू धर्म, स्वराज्यस्थापना, गोब्राम्हण प्रतिपालन, एकीकरण व पुढारीपण ही महाराष्ट्र धर्माची प्रमुख अंगे होत. कोणत्याही देशाच्या इतिहासात आत्मा म्हणजे त्या युगाचे माहात्म्य - स्पिरिट ऑफ द एज - होय. हे प्रामुख्याने विचारप्रधान असून, मात्र याच विचाराने भारावून प्रचंड कार्ये होत असतात. मराठी अमलातील काळात झालेल्या प्रत्येक तहात स्वराज्याचे व स्वधर्माचे कलम मुख्यत्वे दिसून येते. याच विचारांची चर्चा पुन्हा प्रस्तावना खंडाच्या चौथ्या भागात करताना, राजवाडे एकदा महाराष्ट्र धर्माकडे वळले आहेत त्यामध्ये न्यायमूर्ती रानडे रामकृष्णपंत भागवत यांनी केलेल्या या शब्दाच्या अर्थाची त्यांनी सविस्तर चर्चा करून त्यात भर घातली आहे. धर्म म्हणजे गुण, धर्म म्हणजे कर्तव्य, धर्म म्हणजे दान, धर्म म्हणजे आत्यंतिक दुःखध्वंसाचा मार्ग वगैरे अर्थ देऊन राजवाडे चौथा अर्थ महाराष्ट्र धर्मात अभिप्रेत आहे, असे सांगतात.

## समारोप :-

राजवाडे व इतर काही विद्वान आणि अन्य पंडितांनी देश आणि आपली भाषा यांचा अभिमान बाळगून आणि परिश्रमाने भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाची प्रमाणभूत साधनसामग्री उजेडात आणून ती भावी पिढीतील संशोधक आणि अभ्यासकांना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून ठेवली. त्यामुळे अनेक वादग्रस्त वाटणाऱ्या आणि अंधारात असलेल्या गोष्टींवर आपातत: प्रकाश पडला. इतिहास संशोधनात लक्षणीय प्रगती झाली. राजवाडे यांच्यापूर्वी कीर्तने, साने, रानडे, प्रभृती विद्वानांनी संशोधनास लक्षणीय प्रगती झाली. राजवाडे यांच्यापूर्वी कीर्तने तसेच वासुदेवशास्त्री खरे द. ब. पारसनीस, गो. स. सरदेसाई या समकालीनांचेही इतिहाससंशोधन आणि लेखनाचे प्रयत्न सुरू होते, पण या सर्व मंडळींमध्ये एक न्यायमूर्ती रानडे सोडले तर राजवाडे यांच्याएवढा प्रतिभाशाली व्यक्ती सापडणे दुर्मीळ होते. द. वा. पोतदार म्हणतात, "शिवाजी महाराजांनी देशासाठी फकिरी घेतली आणि राजवाडे यांनी राष्ट्रीय स्मृतिसंचलनासाठी तशीच फकिरी घेतली." तर प्राध्यापक भानूंच्या मते "राजवाडे यांनी समर्थ पदवी नव्याने शोभविली. श्रीसमर्थांच्या चरित्राच्या उपेक्षित अंगांचे रहस्य यथार्थ जाणून आचरणात आणणारा राजवाडेसारखा माणूस एकंदरीत विरळाच!" समर्थ पदवीचे हे रहस्य विद्या वैभवाचे स्थापन झालेल्या मंडळीकरणात आहे.

रत्ना मगरे
द्वितीय वर्ष कला.

# साने गुरुजी



# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय |
| --- | --- |
| १) | साने गुरुजी |
| २) | साने गुरुजीचा जन्म |
| ३) | जीवन परिचय |
| ४) | शालेय शिक्षण |
| ५) | भारतीय संस्कृती |
| ६) | शेतकरी व कामगार |
| ७) | त्रिचनापल्ली सेंट्रल जेल. |
| ८) | छात्रालय दैनिक |
| ९) | साहित्य |
| १०) | चरित्र |



Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# साने गुरुजी

| | |
|---|---|
| पूर्ण नाव | पांडुरंग सदाशिव साने (साने गुरुजी) |
| जन्म व जन्म ठीकाण | डिसेंबर २४ इ.स १८९९<br>पालगड, रत्नागिरी जिल्हा |
| मृत्यू | जून ११, इ.स. १९५० |
| चळवळ | भारतीय स्वातंत्र्यलढा |
| पत्रकारिता/लेखन | छात्रालय दैनिक, साधना, साप्ताहिक |
| प्रमुख स्मारके | वाडघर-गोरेगाव, माणगाव तालुका, रायगड जिल्हा, महाराष्ट्र, भारत |
| धर्म | हिंदु |
| वडील | सदाशिव |
| आई | यशोदाबाई |

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# साने गुरुजींचा जन्म

पांडुरंग सदाशिव साने यांचा जन्म २४ डिसेंबर, १८९९ मध्ये झाला. हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक होते. साधी, सरळ, ओघवती भाषा, भावपूर्ण संस्कारक्षम निवेदनशैली हे त्यांच्या लेखनाचे विशेष गुण होते. "श्यामची आई," 'नवा प्रयोग,' 'सुंदर पत्रे', 'हिमालयाची शिखरे,' 'क्रांती', 'समाजधर्म,' 'आपण सारे भाऊ' इत्यादी त्यांचे विपुल साहित्य प्रसिद्ध आहे


Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# जीवन परिचय

साने गुरुजींचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. त्या ठिकाणी खोताचे काम ते करीत असत. खोताचे घराणे साधारणत: वैभवसंपन्न व श्रीमंत समजले जावे व त्यांच्या आजोबांच्या वेळची परिस्थिती तशी होती ही पण सदाशिवरावांच्या वेळेपासून मात्र घराण्याची आर्थिक स्थिती घसरत गेली. ती इतकी की, सदाशिवरावांचे घरदारही जप्तीने नाहिसे झाले अशा रितीने बडे घर पण पोकळ वासा झालेल्या या घराण्यात २४ डिसेंबर, इ.स १८९९ रोजी पांडुरंग सदाशिवांचा जन्म झाला. त्यांच्या- वर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार त्यातूनच गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यांनी इंग्रजी साहित्यामध्ये एम. ए. ही उच्च पदवी मिळवली होती. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अंमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे नोकरी केली प्रताप हायस्कूलच्या वसतीगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विदयार्थ्यांना स्वत:च्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली.

अंमळनेर येथील 'प्रताप तत्त्वज्ञान केंद्र' येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला.

# साने गुरुजी



इ. स १९२८ साली त्यांनी 'विद्यार्थी' हे मासिक सुरू केले. त्यांच्यावर महात्मा गांधीच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत असत. इ. स १९३० साली त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी 'काँग्रेस' नावाचे साप्ताहिक काढणे, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न करणे, जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन यशस्वी होण्यासाठी कार्य करणे, इ. स १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार या या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचारसरणीस अनुसरुन त्यांनी 'मैला वाहणे' व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली. त्यांनी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली. 'पत्री' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून त्यांनी देशभक्तिपर कविता प्रसिद्ध केल्या होत्या.

समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रुढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी १९४६ च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला, अखेर त्यांनी या मुद्द्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले 'एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले' असे त्या वेळी म्हटले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यांतील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून

Sundaram FOR EDUCATIONAL USE

घ्यावी. ते स्वत: तमिळ, बंगाली भाषा शिकले होते. १९४८ मध्ये त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. त्यांनी त्यांचे लेखन बहुतांश तुरुंगात असतानाच केले. 'श्यामची आई' ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. आचार्य विनोबा भावे- रचित गीता प्रवचनेसुद्धा विनोबा भावे यांनी धुळे येथील तुरुंगात (१९३२) सांगितली व साने गुरुजींनी लिहिली. याच धुळ्यातील तुरुंगात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागा-बद्दल सुमारे १५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. तसेच पुढे बंगलोर येथील तुरुंगात असताना त्यांनी तिरुवल्लि-वर नावाच्या कवीच्या 'कुरल' नावाच्या तमिळ महाका-व्याचे मराठीत भाषांतर केले. त्यांनी अनेक भाषेतील पुस्तके मराठीत भाषांतर केली. करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' हे गुरुजींच्या जीवना-चे सार होते. मनोरंजनातून मुलांवर सुसंस्कार करण्या-साठी गुरुजींनी अनेक पुस्तके लिहिली. साने गुरुजींचे भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्मावर निरतिशय प्रेम होते. त्यांनी भारतीय संस्कृती हा लेख लिहिला. तसेच भारतीय संस्कृतीतील अनेक महापुरुषांची चरित्रे लिहिली. त्यांचे 'गोडी गाय' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. मातृहृदयी गुरुजींनी आई वडिलांच्या प्रेमावर नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली ज्यावर पुढे जाऊन मराठी चित्रपट निघाला. गुरुजींनी 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' ही कविता लिहिली. ही कविता भारतीय संस्कृतीची द्योतक आहे.

undaram®
FOR EDUCATIONAL USE

# शालेय शिक्षण

१० जून १९९२ या दिवशी साने गुरुजी यांचे नाव दापोलीच्या मिशन हायस्कूल मध्ये घातले गेले दापोलीची ही इंग्रजी शाळा एका टेकडीवर आहे तीन-चार गावांच्या मध्यभागात ही शाळा आहे शाळेची सुंदर इमारत आहे त्या वेळेच्या प्रिन्सिपलचे नाव 'गॅडनी' होते या शाळेला पुढे 'ऑल्फ्रेड गॅडनी हायस्कूल' असे नाव मिळाले आणि नंतर ते बदलून 'दापोली शिक्षण मंडळाचे लोकमान्य हायस्कूल' असे नाव ठेवण्यात आले या शाळेत 'महर्षी कर्वे', 'रँगलर. र. पु परांजपे', 'म. म. पां. वा. काणे' यासारख्या नामवंत व्यक्तीने शिक्षण घेतले होते.

या शाळेत साने गुरुजी यांच्यावर चांगले संस्कार झाले. ते म्हणतात, "माझे बालहृदय तेथे फुलले माझ्या बुद्धीचा तेथे विकास होऊ लागला भावना, कल्पना, विचार यांची चांगलीच वाढ या शाळेत झाली. या शाळेत कवी राधारमण हे संस्कृत शिकवत असत. संस्कृत साहित्याची गोडी त्यांनी मला लावली" असे गुरुजी म्हणतात

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# श्यामची आई



# भारतीय संस्कृती

गुरुजींची धुळे तरुंगातून जून, १९३४ मध्ये सुटका झाली. गुरुजी अमळनेरला आले आणि काही दिवस वरिष्ठ कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या प्रचारकार्यात गेले. या प्रचारकार्यानंतर विनोबांनी गुरुजींना (पूर्व व पश्चिम खानदेशाच्या सीमेवर असलेल्या) नवरा-नवरी येथे आश्रम काढून दिला. पण तिथे ते रमले नाहीत.

१९३५ साली साने गुरुजींचा 'पत्री' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला तो अमळनेरच्या तरुण सेवक संघा ने प्रकाशित केला होता. जूनै महिन्यात 'पत्री' वर जप्ती झाली त्यापूर्वी 'तरुण सेवक संघा' च्या कार्यकर्त्यांनी तो संग्रह गावोगावी पोचवला होता. यानंतर 'श्यामची आई' (१९३६) धडपडणारी मुले- खंड-१', 'श्याम खंड-१' (१९३७) आणि 'श्याम खंड-२ (१९३८) ही पुस्तके प्रकाशित झाली.

याच काळात गुरुजींनी 'भारतीय संस्कृती' हे पुस्तक लिहिले. ते ऑगस्ट १९३७ मध्ये प्रकाशित झाले या पुस्तकात गुरुजींनी २३ प्रकरणांमधून अद्वैत, बुद्धी, वर्ण, कर्म, भक्ती, ज्ञान, संयम, चार पुरुषार्थ, चार आश्रम, स्त्री स्वरुप मानवता सृष्टीशी प्रेमाचे संबंध, मूर्तिपूजा, प्रतीके, मृत्यूचे काव्य इ. विषयावर सुबोध निबंध लिहिलेले आहेत.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# शेतकरी व कामगार

शेतकरी परिषदांच्या निमित्ताने गुरुजी खानदेशात हिंडत असत. १९३७ साली ११ ते १३ ऑगस्ट या काळात त्यांनी पूर्ण खानदेशातील नांदेड, अंधेरी, ओरंगव्हाण, हरगाव, इत्यादी गावांचा दौरा केला.

१९३७ च्या ऑक्टोबरमध्ये चाळीसगाव येथे त्या तालुक्यातील शेतकऱ्यांची परिषद भरवण्यात आली. या परिषदेच्या अध्यक्षपदी गुरुजी होते.

कामगारांच्या प्रश्नाला संयुक्त शेतीने संघटित होऊन वाचा फोडावी या उद्देशाने 'संयुक्त खानदेश मजूर फ्रंड' फेडरेशन' नावाची संघटना स्थापन करण्यात आली. डॉ. नथूभाऊ फरोळेकर हे फेडरेशन अध्यक्ष होते. या फेडरेशनचे पहिले अध्यक्ष ४ व ५ ऑक्टोबर रोजी गुरुजींच्या प्रेरणेने धुळे येथे अधिवेशन भरले.

या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. खेडगीकर हे होते. या अधिवेशनासाठी रावसाहेब पटवर्धन, रानडे, डॉ. भुतेकर, एम. एस. जोशी. डॉ. डांगे, सरदेसाई, लालजी पेंडसे, नांदेडकर, गोरे, कार्णिक बंधू इत्यादी नेते आलेले होते.

परिषदेच्या अखेरीस आभार मानण्याचे काम गुरुजींनी केले. याच सुमारास गुरुजी अमळनेरच्या गिरणी कामगार युनियनचे अध्यक्ष बनले. ज. गो. शोखले गुरुजी हे खजिनदार झाले.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# त्रिचनापल्ली सेंट्रल जेल

धुळे कारागृहातील गुरुजींच्या बराकीत भरयाजी कुलकर्णी, आचार्य रवडे, शंकरराव ठकार इ. सत्याग्रही होते. या तुरुंगात असताना आषाढी एकादशी आली सत्याग्रहींना फराळाचे पदार्थ हवे होते. तुरुंगाधिकाऱ्याने ही मागणी धुडकावुन लावली. गुरुजींच्या नेतृत्वाखाली कैद्यांनी सत्याग्रह केला. रोजचे अन्न घेण्यास त्यांनी नकार दिला. शेवटी तुरुंगाधिकाऱ्यांनी सत्याग्रहाची मागणी मान्य केली.

गुरुजींना धुळ्याच्या तुरुंगातून हलवण्यात आले आणि त्रिचनापल्ली सेंट्रल जेलमध्ये त्या वेळी तीन हजार कैदी होते. केरळ, तमिळनाडु, आंध्र आणि कर्नाटक या भागातील कैदी अधिक होते याशिवाय बंगाल, महाराष्ट्र या भागातलेही अनेक कैदी तिथे होते. या कारावासात गुरुजींना दक्षिणेतील भाषेचा परिचय झाला. एका कन्नड मित्रांकडुन त्यांनी कन्नड भाषेचे धडे घेतले. एका तमिळ मित्राकडुन 'बेबी सरोजा' चे कथानक त्यांना मिळाले

येथे गुरुजींनी बरेच लेखन केले. 'व्हिक्टर' या फ्रेंच कादंबरीकाराच्या मते 'ले मिझराब्ल' या कादंबरीवर आधारित 'दुःखी' ही कादंबरी त्यांनी येथेच लिहिली. तसेच 'शबरी' ही गोष्टही तिरुवल्लुवर

FOR EDUCATIONAL USE

या तमिळ पंडिताच्या 'कुरळ' या ग्रंथाचा अनुवाद त्यांनी येथेच केला.

या काळात गुरुजींनी काव्यलेखनही बरेच केले इतर काही अनुवाद व नाटक याच काळात लिहिली. त्रिचनापल्लीच्या तुरुंगातच आचार्य स. ख भागवत यांचा सहवास त्यांना मिळाला.

# छात्रालय दैनिक

'खानदेश एज्युकेशन सोसायटी' च्या हायस्कूलमध्ये असताना १९ जुलै १९२७ पासून गुरुजींनी 'छात्रालय' हे दैनिक भित्तिपत्रक सुरु केले. १९३० साली शाळेचा निरोप घेईपर्यंत हे दैनिक सुरु होते. गुरुजी पहाटे चार वाजता उठत आणि दैनिकाचा मजकूर लिहीत पाच ते सहा पाने पाठपोट एवढा मजकूर लिहीत वहीच्या आकाराचे हे दैनिक अल्पावधीतच विद्यार्थीप्रिय झाले. 'छात्रालय' दैनिकांत विविध विषय असत.

दैनिकाच्या १८ ऑक्टोबर १९२७ च्या अंकात गुरुजींनी त्रैमासिक आढावा घेतलेला आहे दैनिक सुरु झाल्यापासून तोपर्यंत ८९ अंक झाले होते या ८९ अंकामध्ये १५ चरित्रात्मक निबंध, ३० चरित्रात्मक गोष्ट १६ मोठ्या व सुंदर गोष्ट, ४१ निबंध, ८ सणांची माहिती, १४ टीकात्मक निबंध, ११ कविता, ५० च्या वर सुभाषिते एवढे साहित्य आले होते याशिवाय विविध वार्ता इत्यादि, हिंदुस्थानातील व जगातील महत्त्वाच्या घडामोडी तसेच काही स्थानिक गोष्ट देण्यात आल्या होत्या.

FOR EDUCATIONAL USE

# साहित्य

गुरुजींनी विपुल साहित्य लिहिले. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद इत्यादी साहित्याच्या विविध क्षेत्रात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांची एकूण ७३ पुस्तके आहेत. वरदा प्रकाशनाने ती ३६ खंडात पुन: प्रकाशित केली आहेत त्यांच्या साहित्यातून कळकळ, स्नेह, प्रेम गोष्टींवर भर आढळतो. त्यांची साधीसुधी भाषा लोकांना आवडली. त्यांच्या मनात राजकीय, सामाजिक व शैक्षणिक विषयासंबंधी जे विचारांचे, भावनांचे कल्लोळ उठले, ते सर्व त्यांनी आपल्या लेखणीद्वारे प्रकट केले. किती तरी घरगुती साधे प्रसंग त्यांनी हृदय रितीने वर्णन केले आहेत. कुमारांच्यासाठी ध्येय दर्शविणारे मार्गदर्शकपर साहित्य, चरित्रे आदी लिहिली, प्रौढांसाठी लेख, निबंध लिहिले, माता भगिनींना स्त्री जीवन व पत्री अर्पण केली. त्यांची 'श्यामची आई' व 'श्याम' ही पुस्तके विशेषत्वाने गाजली.

## साने गुरुजी यांचे प्रकाशित साहित्य

* अमोल गोष्टी
* आपण सारे भाऊ भाऊ
* आस्तिक
* इस्लामी संस्कृति
* ईश्वरचंद्र विद्यासागर (चरित्र)
* कर्तव्याची हाक
* कला आणि इतर निबंध

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# पुस्तक आणि चित्रपट

## श्यामची आई

लेखक - साने गुरुजी



* कला म्हणजे काय?
* कल्की अर्थात संस्कृतीचे भविष्य
* 'कुरल' नावाच्या तामिळ महाकाव्याचे मराठी भाषांतर
* क्रांती, गीताहृदय, गुरुजींच्या गोष्टी
* गोड गोष्टी (कथामाला), भाग १ ते १०

| | |
|---|---|
| भाग १: खरा मित्र | भाग ६: सोराब आणि रुस्तुम |
| भाग २: घामाची फुले | भाग ७: बेबी सरोजा |
| भाग ३: मनूबाबा | भाग ८: करुणादेवी |
| भाग ४: फुलाचा प्रयोग | भाग ९: यती की पती |
| भाग ५: दु:खी | भाग १०: चित्रा नि चारु |

* गोड निबंध भाग १, २
* गोड शेवट, गोष्टीरूप विनोबाजी, जीवनप्रकाश, तीन मुले, ते आपले घर, त्रिवेणी, दिल्ली डायरी, नवा प्रयोग
* देशबंधु दास, नामदार गोखले (चरित्र), बेंजामिन फ्रँकलिन, भगवान श्रीकृष्ण (चरित्र, ८ भाग)
* भारतीय संस्कृती (मराठीसह इंग्रजी & अन्य भारतीय भाषांत)
* मानवजातीचा इतिहास, मोरी गाय, मृगाजिन, इतिहासाचार्य राजवाडे (चरित्र)
* रामाचा शेला
* राष्ट्रीय हिंदुधर्म
* विनोबाजी भावे
* विश्राम
* श्याम खंड १, २
* श्यामची आई
* श्यामची पत्रे
* श्री शिवराय (चरित्र, ८ भाग)

Sundaram FOR EDUCATIONAL USE

* संती, संध्या, समाजधर्म
* साधना (साप्ताहिक) (संस्थापक, संपादक)
* सुंदर पत्रे
* सोनसाखळी व इतर कथा
* सोन्या मारुती
* स्त्री जीवन
* स्वप्न आणि सत्य
* स्वर्गातील माळ
* हिमालयाची शिखरे व इतर चरित्रे

## चरित्रे

साने गुरुजींवर अनेक लेखकांनी लिहिली आहे त्यांतल्या काही पुस्तकांची आणि लेखकांची नावे -

| लेखक | पुस्तक |
| --- | --- |
| * डॉ विश्वास पाटील | आपले साने गुरुजी |
| * डॉ रामचंद्र देखणे | जीवयोगी साने गुरुजी |
| * रा. ग. जाधव | निवडक साने गुरुजी |
| * वि. दा पिंपळे | महाराष्ट्राची आई साने गुरुजी |
| * यदुनाथ थत्ते | साने गुरुजी |
| * आत्माराम वळिंजकर | साने गुरुजी आणि पंढरपूर मंदिर-प्रवेश चळवळीचे अध्यात्म. |
| * रा. कृ. भगत | साने गुरुजी गौरव ग्रंथ |
| * यदुनाथ थत्ते | साने गुरुजी जीवन परिचय |
| * भालचंद्र नेमाडे | साने गुरुजी पुनर्मूल्यांकन |
| * राजा मंगळवेढेकर | सेनानी साने गुरुजी |
| * प्रेम सिंह | साने गुरुजी साहित्य संकलन |
| * वि. गो. दुर्गे | साने गुरुजी यांची सुविचार संपदा. |

रुपाली शिंदे
द्वितीय वर्ष कला.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

जन्म- १९०५ - १९७० मृत्यू



इरावती कर्वे

FOR EDUCATIONAL USE

| क्र. | अनुक्रमणिका |
| --- | --- |
| १) | इरावती कर्वे याची ग्रंथसंपदा<br>• मराठी व इंग्रजी पुस्तके<br>• संदर्भसूची (ग्रंथसूची) |
| २) | इरावती कर्वे एक आगळे व्यक्तिमत्त्व |
| ३) | भारतातील जातीयव्यवस्था |
| ४) | समाजशास्त्रीय संशोधन |
| ५) | समारोप |


Sundaram

FOR EDUCATIONAL USE

# इरावती कर्वे

## मानववंशशास्त्रज्ञ

## समाजशास्त्रीय संशोधक

इरावती कर्वे - जन्म :- १९०५, ब्रह्मदेश
मृत्यू :- ११ ऑगस्ट १९७०

अमुलाग्र लेखनसंपादन

इरावती कर्वे यांची निवडक ग्रंथसंपदा

### मराठी

१) भोवरा, ५ वी आवृत्ती, २००५, पुणे
२) परिपूर्ती, १५ वी आवृत्ती, २००९, पुणे
३) गंगाजल, ४ थी आवृत्ती, २००९, पुणे
४) युगान्त, १८ वी आवृत्ती, २०१०, पुणे
५) मराठी लोकांची संस्कृती, १९५१.

हे सर्व देशमुख प्रकाशनच्या (पुणे) आवृत्ती आहेत..

## इंग्रजी

1) Anthropometric Measurements of the Marathas. Deccan College, Monograph Series No. 2, 1948

2) Kinship Organisation in India. Poona : Deccan College Monograph Series No. 11, 1935

3) The Bhils of West Khandesh. Bombay : The Anthropological Society of Bombay. 1958.

4) Hindu Society - An Interpretation (2nd Edition). Deshmukh Prakashan, Pune, 1968a/1961

5) Karve, I. and Y. B. Damle 1963 Group Relations in Village Community. Deccan college Monograph : 24

6) Karve. I. and Jai Nimbkar 1969 A Survey of the people displaced through the Koyna Dam. Deccan college building Centenary, Series No. 61

7) Karve, I. and Hemlata Acharya, Poona: Series. 70

8) Karve, I. and J. S. Randive, 1965 : Deccan college Postgradute and Research Institute.

9) Karve, I. Maharashtra Land and its people, Bombay, Government of Maharashtra. 1968.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# संदर्भ- ग्रंथ- सूची

## मराठी पुस्तके


१) आत्रे, त्रि. ना. गावगाडा
२) कर्वे इरावती, परिपूर्ती, १०९६ - पंधरावी आवृत्ती, पुणे.
३) कर्वे इरावती, भोवरा, २००५ - ५ वी आवृत्ती, पुणे.
४) कर्वे इरावती, गंगाजल, २००९ - ४ थी आवृत्ती, पुणे
५) कोटबागी उषा, इरावती कर्वे - २००५ पुणे.
६) छत्रे लता, डॉ. इरावती कर्वे यांचे 'परिपूर्ती' मधील स्त्रीविचार, 'हाकारा' त्रैमासिक, - २००६ जाने-जून.
७) पुंडलिक विद्याधर, चैतन्याचा एक स्रोत, १९७० 'माणूस' चा दिवाळी अंक.


## इंग्रजी पुस्तके


1) Basham, Groover Press, 1954.
2) Dube S.C. Indian Village Routlege and kegan paul.
3) Herskovits, Inc New York, 1948, 6th Print 1956.
4) karve Irawati : kinship organization in India, Deccon college Post graduate and Research Institute, Pune 1953.
5) kroebar A.L. : Anthropology, Harcourt Brace & Co. New York, New revised edition, 1948
6) kroebar A.L. (ed) Anthropology Today, 1953, University of chicago, sisxth impression, 1959.



Sundaram

FOR EDUCATIONAL USE

# इरावती कर्वे - एक आगळे व्यक्तिमत्व

इरावती बाईंचा जन्म ब्रह्मदेशात १५ डिसेंबर १९०५ मध्ये झाला म्हणून तेथील नदीवरुन 'इरावती' असे नामकरण झाले. त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण ७ व्या वर्षापासून पुणे येथे रँग्लर र. पु. परांजपे यांच्या घरी त्यांना समवयस्क असणाऱ्या शकुंतला परांजपे यांच्याबरोबर झाले. १९२६ मध्ये त्या फर्ग्युसन महाविदयालयातून तत्वज्ञान ऑनर्स विषयात बी. ए. झाल्या व त्याच वर्षी थोर समाजसेवक महर्षी अण्णासाहेब (धोंडो केशव) कर्वे यांचे पुत्र डॉ. दिनकरराव कर्वे यांच्याशी विवाह झाला.

तो स्वातंत्र्यचळवळीचा, समाजसुधारणेची धुरा वाहणाऱ्या समाजसुधारकांचा काळ होता. वाङ्मयात स्त्रियांच्या सुधारणाविषयक, स्वतंत्र व्यक्तिमत्व टिपणाऱ्या कथा- कादंबऱ्या- नाटकांचा काळ होता. इरावतीबाईंची महाराष्ट्रातील त्या काळात ओळख म्हणजे, प्रसिद्ध कर्वे घराण्यातील आधुनिक विदुषी, नवऱ्याला एकेरी नावाने दिनू म्हणणाऱ्या सुशिक्षित विद्वान स्त्री, उंचपुऱ्या, गोऱ्यापान, नाकेल्या चित्पावन, स्कूटर चालवणाऱ्या एकमेव महिला अशी होती.

इरावतीबाई या स्त्री- स्वातंत्र्यवादी होत्या. कदाचित त्यांनी बालविधवांचे हाल बघितले असतील म्हणून त्या सौभाग्यलंकार, मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या वापरत नसत. त्या सर्व गोष्टींचा त्यांनी त्याग केला होता. इरावतीबाईंनी त्रयस्थ भूमिकेतून अवघड काम केले. स्वतःच्या भारतीय व मराठी संस्कृतीचा अभ्यास करून, समर्थपणे केले.

FOR EDUCATIONAL USE

मानवशास्त्राच्या अभ्यासक्रमात मानव व संस्कृतीचा अभ्यास करावयाचा असतो. संस्कृती ही समाजाशी निगडित असते. त्या मानवशास्त्राच्या संशोधक-अभ्यासक होत्या. तो अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनातून, तटस्थपणे करण्याची सवय लागावी म्हणून विदयार्थ्यांना स्वतःच्या अनुभवास अपरिचित अशा आदिवासी क्षेत्रात, आदिवासी समाजात नेण्यात येते. इरावतीबाई समाजसंस्कृतीच्या अभ्यासक. वैधव्यात कुंकू, मंगळसूत्राची निषेधात्मक परंपरा वेगळी. देवासमोर किंवा देवासारख्या मातृभूमी देशाच्या प्रतिकात्मक झेंड्यासमोर जाणे वेगळे. हा स्वभावातील विरोधाभास नव्हे. ही योग्य व्यावहारिकता स्तुत्य आहे. संस्कृती, परंपरा कुठे जपायची; अत्याचारी वाईट चालीरीतींबाबत कुठे बंड करावयाचे या सर्वांचे भान त्यांनी राखले.

करडे दिसणारे, करड्या आवाजात बोलणारे, अशा नवऱ्यास फुकेरी (दिनू) नावाने हाक मारणाऱ्या इरावतीबाईंनी त्यांच्या जीवनात दिनकररावांचे छत्र मोकळ्या मनाने मान्य केले. त्याप्रमाणे आपल्या पतीबद्दलची कृतज्ञता त्यांनी नातेदारी संघटनेच्या पुस्तकामध्ये अर्पणपत्रिका म्हणून व्यक्त केली, त्याचप्रमाणे रँग्लर परांजपे यांच्याकडे लहानाच्या मोठ्या झालेल्या इरावतीबाईंनी अप्पासाहेब परांजपे यांना 'मराठी लोकांची संस्कृती' या पुस्तकाची अर्पणपत्रिका लिहिली आहे. इरावतीबाई हाडाच्या अभ्यासक-संशोधक होत्या; परंतु त्या व्यवस्थापनात व प्रशासनात अनभिज्ञ होत्या. डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था स्थापनेच्या पहिल्या दिवशी १७ ऑगस्ट १९३९ मध्ये रुजू होण्यापूर्वी त्यांनी काही वर्षे श्रीमती

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या रजिस्ट्रर पदाची धुरा सांभाळली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्या काळात प्रशासनात अनभिज्ञ ज्या गफलती झाल्या त्या अजूनही, म्हणजे २०-२५ वर्षानंतरही, पूर्णपणे सोडवल्या झाल्या नाहीत. डॉ. सांकलिया व डॉ. कत्रे यांनी आपापले अभ्यास विभाग, म्हणजे पुरातत्वविज्ञान व भाषाविज्ञान, भारतामध्ये उच्च प्रतीस आणले, तसे समाजशास्त्र-मानवशास्त्र विभागाचे झाले नाही. मात्र इरावतीबाईंचे स्वतःचे नाव एक अत्युत्तम मानवशास्त्रज्ञ म्हणून जगात नावाजले.

आजतागायत, महाराष्ट्रात केवळ पुणे विद्यापीठातच मानवशास्त्र विभाग आहे. ईरावतीबाईंनी आपल्या तरुण सहकाऱ्यांना प्रशासनाची मोकळीक दिली, त्यामुळे त्यांनी मानवशास्त्र विभागाची उभारणी केली. परंतु ते ईरावतीबाईंच्या मानवशास्त्राच्या सर्व अंगांच्या संशोधनाची उंची गाठू शकले नाहीत.

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

# भारतातील जातिव्यवस्था

डॉ. इरावती कर्वे यांनी समाजशास्त्र, शारीर मानवशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र या तिन्ही विषयांवर अनेक संशोधनात्मक प्रबंध लिहून आपले या विषयावरील प्रभुत्व सिद्ध केले. त्यांनी पीएच. डी. जरी शारीर मानवशास्त्राच्या क्षेत्रात घेतलेली असली तरी त्या जगप्रसिद्ध झाल्या त्यांच्या सांस्कृतिक मानवशास्त्रातील प्रबंधामुळे. त्यांचा भारतातील नातेदारी संघटनाबाबत ग्रंथ (Kinship Organization in India) अमेरिकेतील कॉलेजात व विद्यापीठात मानवशास्त्राच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून नेमलेला आहे.

संयुक्त कुटुंबसंस्था, ग्रामसंस्था व जातिसंस्था ही भारतीय समाजरचनेची वैशिष्ट्ये आहेत. यातील एकत्र कुटुंबसंस्था व जातिसंस्थाविषयक डॉ. कर्वे यांचे संशोधन मौलिक स्वरूपाचे आहे. भारतीय समाज परंपराबद्ध व शेतकीप्रधान समाज असल्याने इतर परंपराबद्ध समाजाप्रमाणे यातील प्रमुख सामाजिक गट नातेदारी पद्धतीवर आधारलेले आहेत. अखिल जगात समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञांनी भारतीय जातिसंस्थेवर जेवढे ग्रंथ लिहिले तेवढे इतर कुठल्याही विषयावर लिहिले नाहीत. जात हा सामाजिक गट दुसरे-तिसरे काही नसून एक नाते-समूह आहे हा सिद्धान्त मांडणाऱ्या डॉ. इरावती कर्वे या पहिल्याच संशोधक आहेत. जातिविषयक संशोधनात जात म्हणजे एक विस्तारित नाते-समूह हा नवीन विचार डॉ. कर्वे यांनी प्रथम मांडला.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

डॉ. कर्वे प्रत्येक पोटजातीस म्हणजेच सर्वात लहान अंतर्विवाही गटास जात म्हणतात. मोठ्या अंतर्विवाही गटांची संस्कृती कमी-अधिक प्रमाणात भिन्न असते, असे त्यांनी सिद्ध केले. जातीच्या उत्पत्ती-बाबतही डॉ. इरावती कर्वे यांचा सिद्धान्त वैशिष्ट्य-पूर्ण आहे. एका जाती-समुच्चयात अनेक जाती असतात. त्या जाती कशा निर्माण झाल्या याबाबत अनेक सिद्धान्त आहेत. एका जातीचे विभाजन होऊन अनेक उपजाती निर्माण झाल्या असा जवळजवळ सर्वमान्य सिद्धान्त आहे. परंतु डॉ. इरावती कर्वे यांनी मानवशास्त्राच्या आधारे शरीराची मापने घेऊन व रक्तगटांचे विश्लेषण करून तसेच एका- जातीसमुच्चयातील वेगवेगळ्या जातींचे सांस्कृतिक जीवनाचे विश्लेषण करून जाती-विभाजन याच्या सिद्धान्त मोडून काढला. त्यांचे याबाबतच संशोधन अजून चालूच होते. कुंभार व ब्राह्मणांच्या अभ्यास केल्यानंतर त्यांनी धनगर जाती- समुच्चय बाबत संशोधन केले.

एका जातीचे लोक आपल्या गोत्राबाहेर, परंतु आपल्याच जातीत दीर्घ काळापासून विवाह करत आल्याने 'जात म्हणजे विस्तारित नातेसमूह' हे प्रमेय इरावती यांनी प्रथमच मांडले. इरावतीबाईंच्या जात म्हणजे विस्तारित नाते समूह या संकल्पनेस आक्षेप घेणाऱ्यांचे म्हणणे व्यावहारिक पातळीवर योग्य नाही. समाजशास्त्रज्ञांनी जात व उपजात अशा दोन संज्ञा मांडल्या आहेत. पण प्रत्यक्षात इरावतीबाईंच्या प्रमेयाप्रमाणे अंतर्विवाही गटास जात म्हटल्यास उप जात असतच नाही. इरावतीबाईंनी बऱ्याच जातींच्या, संस्कृतीमधील बऱ्याच समान बाबींमुळे जातीसमूह ही संकल्पना मांडली आहे.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

इरावतीबाईंनी महाराष्ट्राचे उदाहरण समोर ठेवून जातीची काही वैशिष्ट्ये नमूद केली आहेत.

१) जाती अंतर्विवाही गट असतात.
२) एका विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात जातींचा विस्तार असतो.
३) जातीतील व्यक्तींची परंपरेने ठरवून दिलेली वागणूक असते. बऱ्याचदा जातीतील वयस्कर मंडळींची जात-पंचायत या वागणुकीचे नियंत्रण करते.
४) वेगवेगळ्या जाती एका ठिकाणी राहतात. पण ते एकमेकांच्या व्यवहारात ढवळाढवळ करीत नाहीत. क्वचित प्रसंगी ते एकमेकात मिसळतात.
५) प्रत्येक जातीस साधारणतः एक पारंपारिक व्यवसाय असतो पण तो केवळ त्यांचाच व्यवसाय असू शकत नाही.
६) जातींना सामाजिक उतरंडीवर विशिष्ट स्थान असते.

इरावती कर्वे यांच्या 'हिंदू सोसायटी- एन इंटरप्रिटेशन' या पुस्तकात जातीविषयी चर्चा करताना मानवशास्त्राच्या सर्व अंगांनी विचार झालेला आहे. शरीर मानवशास्त्र, समाज, संस्कृती, भाषाशास्त्र, प्रागैतिहास या सर्वांचे दाखले घेत त्यांनी नातेदारी, व्यवसाय, अंतर्विवाही जात, जातीसमूह व वर्ण यांचे परस्पर संबंध समर्थपणे मांडले आहेत.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# समाजशास्त्रीय संशोधन

समाजशास्त्र व मानवशास्त्र असे अध्यापनाचे, संशोधनाचे दोन स्वतंत्र विषय असू शकतात का? असावे का? हा चर्चेचा विषय आहे. भारतातील ग्रामीण, जातीनिहाय, नातेदारी व्यवस्थेत बांधलेल्या पारंपारिक भारतीय समाजाचे अध्ययन करताना समाजशास्त्रीय व मानवशास्त्रीय असे स्वतंत्र प्रश्न असू शकत नाहीत असे बऱ्याच समाजशास्त्रज्ञ मानवशास्त्रीयांचे म्हणणे आहे. इरावतीबाईंनी पुरातत्वविज्ञान, भाषाशास्त्र, शरीरमानवशास्त्र यांचा त्यांच्या संशोधनात जो मेळ घातला, त्यास पारंपरिक, सर्वांगीण मानवशास्त्र म्हणतात. इरावतीबाईंनी आपल्या मराठी लेखनात, ललित-लेखनात संवाद किंवा स्वतःच्या मनातले विचार त्या-त्या शब्दांत मांडले आहेत.

इरावतीबाई पारंपारिक मानवशास्त्राच्या, मानवजाती-विज्ञानाच्या संशोधनात गुंतलेल्या असताना संशोधना-साठी निधीचे स्रोत नव्हते. भारत स्वतंत्र्य झाल्यावर योजना आयोगाच्या माध्यमातून विकास योजनांची नीट आखणी करता यावी म्हणून समाजशास्त्रांतर्गत संशोधन यास निधी मिळावयास लागला. विदयापीठ अनुदान आयोगाची स्थापना नंतर झाली. भारतीय सामाजिक विज्ञान परिषदेची स्थापना डॉ. धनंजयराव गाडगीळ व डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या प्रयत्नाने नंतर झाली. पुणे विदयापीठाची स्थापनाही स्वातंत्र्योत्तर आहे. त्यापूर्वीच 'डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था' या नावाने १९३९ मध्ये स्थापन झाली.

ही पार्श्वभूमी लक्षात घेता, इरावतीबाईंनी

ndaram

FOR EDUCATIONAL USE

आपल्या सहकाऱ्यांच्या व विदयार्थ्यांच्या मदतीने योजना आयोगाच्या निधीतून काही संशोधन प्रकल्प हाती घेतले. या प्रकल्पात विकासाच्या प्रक्रियांच्या अभ्यास आहे व तो सांख्यिकी पध्दतीने केला आहे. यापूर्वी निव्वळ सांख्यिकी अभ्यास त्यांनी संख्याशास्त्रज्ञ डॉ. वि. म. दांडेकर यांच्याबरोबर महाराष्ट्रातील जनतेच्या मानवमितीच्या पध्दतीतून केला.

साधारण शेवटचा समाजशास्त्रीय अभ्यास इरावतीबाईंनी प्रा. हेमलता आचार्य यांच्याबरोबर केला. हेमलताबाई पूर्वी नाशिकला समाजशास्त्र शिकवायच्या. डॉ. य. भा. दामले दोन वर्षे रजेवर असताना त्या डेक्कन कॉलेजात प्रपाठक म्हणून रूजू झाल्या. त्यांनी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुका व फलटणमधील आठवडे बाजारांच्या अभ्यास केला. ग्रामीण आदिवासी भागात आठवडे बाजारास खूप महत्त्व आहे. या बाजारात लोक खरेदी-विक्री-साठी मोठ्या प्रमाणावर येतात. बऱ्याचदा बाजार देवळांच्या आसपास किंवा छोट्या धार्मिक जगांच्या ठिकाणी भरतात. पुण्यातील चतुःश्रृंगीची जत्रा २००९ पासून औपचारिकरित्या भरत नाही. त्याचे कारण २००९ साली स्वाइन फ्ल्यू चा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाला व अलीकडे परदेशी आतंकवादयांचे हल्ले होण्याच्या भीतीने या जत्रेस ग्रहण लागले.

अलीकडे केवळ धरणे नाहीत, तर विमानतळ, स्पेशल इकॉनॉमिक झोन उदयोगांच्या उभारणीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येतात. शेतजमिनीसाठी योग्य मोबदला देण्यात येईल, या घोषणा राज्य-कर्त्यांतर्फे करण्यात येतात. परंतु पुनर्वसनाच्या बाबतीत लोक भरडले जातात. त्यांचे जीवन, सांस्कृतिक

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

मूल्ये उद्ध्वस्त होतात. पुनर्वसित गावाबद्दल 'गंगाजल' च्या सुरुवातीलाच एक लघुनिबंध आहे. नव्या वस्तीला देऊळ बांधले गेले. देवळाविना गावात घर असू नये अशी तामीळ म्हण इरावतीबाईंनी सांगितली आहे. "देऊळ हे एक श्रद्धास्थान आहे. आशा आकांक्षांचे प्रतीक आहे. ज्या गावात ते नसेल, ते एक श्रद्धा नसलेले, कोणत्याही तऱ्हेच्या सामुदायिक आकांक्षा नसलेले ठिकाण असते, म्हणून तेथे राहू नये." असे इरावतींचे म्हणणे होते.

अशा रितीने योजना आयोगाच्या कार्यक्रम मूल्यमापन संघटनेच्या माध्यमातून संशोधन प्रकल्प इरावतीबाईंनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर शेवटच्या दहा वर्षांत घेतले. इरावतीबाईंना हृदयविकाराचा तीव्र त्रास शेवटच्या दहा वर्षांत झाला. त्यावेळी त्यांना प्रवास करून संशोधन करणे शक्य नव्हते. तेव्हा सहाय्यक म्हणून सहकाऱ्यांबरोबर त्यांनी संशोधन प्रकल्प पूर्ण केले. या संशोधन लेखनात मानवशास्त्रीय गुणात्मक लेखन नसून समाजशास्त्रीय सांख्यिकीवर आधारित लेखन आहे. प्रकल्पांचे विषय योजना आयोजनाला योजना तयार करण्यासाठी उपयुक्त असे होते. इरावतीबाईंच्या परीक्षणाचे विषय आता संशोधनाचे प्रमुख विषय झाले आहेत. नियोजनबद्ध सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या शासकीय योजनांमुळे नवीन नवीन समस्या पुढे येत आहे व त्याबाबत संशोधन करणे अगत्याचे आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# समारोप

आधुनिक महाराष्ट्र समाज व संस्कृती घडवणाऱ्या या चरित्र ग्रंथमालेत केवळ चार महिलांची नावे आहेत. त्यात इरावती कर्वे यांच्या अंतर्भाव आहे यातच त्यांची थोरवी लक्षात येते. महाराष्ट्रातील नामवंत संशोधन संस्था व पुण्याचे वैभव असणाऱ्या, विद्वतेच्या परिमाण ठरवणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था इत्यादी अनेक संस्था होत. ब्रिटिशांनी १९३१ साली डेक्कन कॉलेज बंद केले. परंतु माजी विद्यार्थ्यांच्या खटपटीने त्यास संशोधन संस्था या रुपाने पुनर्जीवीत करावयाचे ठरले. डेक्कन कॉलेज हे मूळ नाव कायम ठेवून त्याचे नामकरण 'डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था' असे नामकरण आले. या संस्थेच्या स्थापनेच्या पहिल्याच दिवशी इरावतीबाई, डॉ. कत्रे, डॉ. सांकलीया, डॉ. शंकरन यांच्या बरोबर १७ ऑगस्ट १९३९ रोजी प्रपाठक या पदावर रुजू झाल्या.

मानवशास्त्र हा एक इतिहास असतो या उक्तीप्रमाणे आजच्या जीवनाच्या, घडामोडींच्या संबंध इतिहासकाळातून कोणताही विचार, आचार कसा जोडलेला आहे याबाबत इरावतीबाई पटकन विश्लेषण करत असत. महिला असल्यामुळे त्या काळात व आजही जे संघर्ष करावे लागत व लागतात म्हणून इरावतीबाईंना मुक्ती होती. भारतातील मानवशास्त्रज्ञांत त्यांच्याशी महिला म्हणून कोणी वागले नाही. चेष्टेने बरेच मानवशास्त्रज्ञ त्यांना पुरुषच आहेत असे म्हणायचे, ते त्यांच्या उंच देहयष्टीमुळे असावे;

परंतु सर्वंकष विद्वत्ता, कायम नवीन शिकण्याच्या, संशोधन करण्याच्या हव्यास ह्यामुळे त्या चमकून दिसायच्या. त्या काळात पुरुषांच्या विद्वत् सभेत स्त्रिया दबकत, बिचकत असत त्या काळात इरावती बाई मोकळेपणाने वावरत व आपल्या विद्वत्तेच्या प्रभाव पाडत असत. त्यांच्या फटकळपणामुळे पुरुष त्यांना बिचकून असत.

इरावतीबाईंनी भारतासारख्या खंडप्राय देशाच्या संस्कृतीसमाजाच्या संरचनेबाबत, संघटनेबाबत, समाजसंस्था, जातिव्यवस्था यांचा अर्थ उलगडून दाखवला संस्कृती ऐतिहासिक प्रक्रियेतून घडत असते. पुराणकथा, लोककथा यांना काही आधार असतो. त्या संपूर्णपणे कपोलकल्पित नसतात. त्यात ललित लेखन करणाऱ्यांनी त्यास आपापल्या अनुभवाप्रमाणे व भावविश्वते-नुसार रोचक केलेले असते. बाली बेटांवरील रामायण- महाभारत नृत्यांमध्ये स्थानिक राक्षसांना स्थान मिळणे नैसर्गिक आहे. पांडव पाच कि तीन असाही फरक होऊ शकतो परंतु मूळ मूल्ये बदलत नाहीत.

इरावतीबाईंनी समाज- संस्कृतीने घडवलेल्या व्यक्तिमत्वांचे 'युगान्त' मध्ये विश्लेषण करून महाभारताची प्रमाणित कथा समोर ठेवून नीती, स्त्री- पुरुष संबंध, धर्माचरण, मैत्री, सगेसोयरे, राजा व राज्य यातील फरक अशा अनेक विषयांवर भाष्य केले, त्यास तोड नाही.

कोणत्याही प्रश्नाची चर्चा करताना, उकल करताना, समग्र, तटस्थ भूमिकेतून विचार केल्यास व त्यास व्यवहाराची जोड दिल्यास लोकाभिमुख धोरणे व अंमलबजावणी शक्य आहे हा संदेश

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

इरावतीबाईंच्या अध्ययन संयोजन विभागातून स्वच्छपणे पुढे येतो. प. बंगालमध्ये कोलकता येथे मानवशास्त्राचा पहिला विदयापीठ विभाग १९२० मध्ये सुरु झाला. तसेच सगळे शासकीय सर्वेक्षण विभाग कोलकाता येथे आहेत. मानव सर्वेक्षण विभागाचे मुख्य कार्यालय, तसेच २२६ वर्षे जुनी एशियाटिक सोसायटी कोलकाता येथे आहे. या माध्यमांतून, चर्चासत्रांतून बंगाली विद्वानांच्या थोरवीची चर्चा होत असते.

इरावती कर्वे यांचे नाव त्या चर्चेत येत असते. इरावतीबाईंची थोरवी सर्वसमावेशक विद्वान म्हणून फार मोठी आहे. अलीकडे कम्प्युटर, टेलिफोन, मोबाईल फोनच्या तंत्रज्ञानामुळे गहन अभ्यासाचे व इतिहासाचे महत्व कमी झाल्यासारखे वाटते. समाज-संस्कृतीवर पाश्चात्त्य संस्कृतीचा, मूल्यांचा पगडा बसत आहे असा अभ्यास निर्माण होतो. त्यांच्या मानवशास्त्राच्या सिद्धान्तांप्रमाणे वस्तुरूप संस्कृती ही मशीन तंत्राने व्यापली तरी त्याच्या शाश्वत मूल्यांवर आमुलाग्र फरक होत नाही.

इरावतीबाईंनी सर्वकष, पारंपारिक मानवशास्त्राच्या भूमिकेतून पांडित्य केले. त्याची आजही नितांत गरज आहे. ही परंपरा महाराष्ट्रात जोपावयास हवी.

अखेर ११ ऑगस्ट १९७० रोजी त्यांचे निधन झाले.

कोमल ढवणे

द्वितीय वर्ष कला

# दुर्गाबाई भागवत



Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# जडणघडण

विसाव्या शतकातील जवळजवळ पन्नास वर्षे दुर्गाबाई भागवतांच्या प्रगल्भ विचारांच्या आणि त्यांच्या मनोहरी ललित लेखनाचा ठसा महाराष्ट्रावर उमटलेला होता. तो आमिट असा आहे. दुर्गाबाई विशेषत्वाने ओळखल्या गेल्या त्या मानववंशशास्त्रज्ञ, बुद्धचरित्र, बौद्ध धर्माचे कायदे कानून यांच्या जाणकार व आदिवासी जीवनाच्या भाष्यकार म्हणून. पण त्याचबरोबर त्यांनी मानवी जीवनातील भावभावनांचा, निसर्गातील सुरूप-कुरुपतेचा वेध अत्यंत सहानुभूतीने व ललितपूर्णतेने घेताना, त्यातील अंतिम सत्य शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. निसर्ग व लोकसंस्कृतीचे अतूट नाते उलगडून दाखवले. इंग्रजी, मराठी, संस्कृत, पाली, अर्धमागधी, बंगाली अशा विविध भाषांमधील प्राविण्यामुळे त्यांच्या संशोधनाचा पाया मजबूत आणि सखोल होता. त्यांच्या ज्ञानसाधनेच्या क्षेत्रामध्ये पाकशास्त्र, शिवणकाम आणि कशिदाकारी यांसारख्या 'बायकी' समजल्या जाणाऱ्या कलाकौशल्यांमध्ये त्यांनी निव्वळ प्राविण्यच मिळवले नाही, तर त्या कलांमध्येही त्यांनी संशोधन करून लोकसंस्कृती, धर्म, आर्थिक स्थीती व निसर्गाशी त्या कलांचे निकटचे नाते उलगडून दाखवले. त्यांचे ललितलेखन, शोधनिबंध व त्यांची ग्रंथसंपदा यामध्ये दिसून येणारी विषयांची व्याप्ती, त्यातील गहनता आणि पांडित्य, चित्तवेधकतेला विलक्षणच म्हणावी लागेल. त्यांच्या इंग्रजी शोधनिबंधाचे आणि ग्रंथांचे तर जगभराच्या जाणकारांनी कौतुक केले होते.

बाईंचा जन्म १० फेब्रुवारी १९१० रोजी इंदूर येथे झाला. बाईंना दोन लहान बहिणी आणि एक लहान भाऊ. भारतातील पहिल्या महिला शास्त्रज्ञ कमलाबाई सोहोनी या बाईंची पाठची बहीण. बाईंचे आजोबा बाळाजी आबाजी भागवत मूळचे

पंढरपूरचे. त्यांच्या वडिलांनी त्यांच्या आईच्या पुढ्या छळ केला होता की त्यातच त्यांच्या आईच्या मृत्यू ओढवला होता. तेव्हा संतापलेले बाळाजी बापाचे घर सोडून, निष्कांचन अवस्थेत पुण्याला आले. आपल्या वडिलांचे खरे नावही त्यांनी आपल्या नावासमोर लावले नाही. त्याऐवजी आबाजी हे सर्वसामान्य नाव लावले. पुण्याला स्वतःच्या हिंमतीवर, कष्ट करून ते वकील झाले.

बाईंच्या माघारी मुलांचे लालन-पालन आजी-आजोबांनीच केले. कारण वडील पुडनला होते. आजोबा पूर्णपणे विवेकवादी, निस्पृह वृत्तीचे शिस्तप्रिय आणि प्रसंगी अत्यंत हळवे होणारे होते. बाई लहानपणी अत्यंत हूड, दांडगाई करणाऱ्या होत्या. त्यासाठी त्यांनी आजोबांच्या हातचा मारही खाल्ला होता. पण बाई आजारी पडल्या होत्या तेव्हा दुर्गीने एक घासभर अन्न खावे म्हणून त्यांनी तिच्या मिनतवाऱ्याही केल्या, तिला राजाराणीच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आजोबांची अट होती की, शिकलेल्या मुलाशीच विवाह करेन. त्यांची आजी ही आर्य समाजाच्या संस्थापक सभासदाची मुलगी. राजारामशास्त्री भागवत यांची चुलत बहीण. आजीच्या माहेरचे वातावरण असे सुधारकाचेच. बाईंच्या आजी प्रीमॅट्रिक-पर्यंत शिकलेली असून त्यांचा स्वतःचा असा पुस्तकांचा मोठा संग्रह होता. आजीने पसंत केलेली पुस्तके बाईंनी वाचावी असा आजोबांचा दंडक होता. एखादया बाईने विवाह न करता आपल्या आवडत्या पुरुषापासून स्वतःला मूल होऊ दयावे की नाही यासारख्या विषयावरही ~~बाईंश~~ बाईशी चर्चा केली होती. त्याचप्रमाणे मुलींनी भरपूर शिकावे आणि विवाह करण्यापूर्वी पाच वर्षे तरी नोकरी करावी आणि अर्थार्जन करून, स्वातंत्र्याचे सुख भोगावे असे त्यांनी सांगितले होते. त्या काळात हा विचार एका आजीने नातीला सांगावा ही गोष्ट ~~क्रांतीकारकच~~ क्रांतीकारकच म्हणायला हवी. बाईंचे वडील हे रसायनशास्त्रातील एम.ए. होते. उत्कृष्ट टेनिसपटू म्हणून त्यांची ख्याती होती.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

## संशोधक विदुषी

बाईंचा साहित्यिक आवाका आणि विषयांचे वैविध्य एवढे मोठे आहे की त्यांच्या साहित्याने अमुक एकच वैशिष्ट्य असे सांगता येत नाही. कोणताही विषय – एक गणित आणि शास्त्र सोडता – त्यांना वर्ज्य नव्हता. मानवी जीवनाच्या अंतिम सत्याच्या शोधापासून ते हातावरच्या भाकरी करणाऱ्या हातांचे कौशल्य, त्यातील सौंदर्य, त्या भाकरीची चव, अशी त्यांच्या लेखनाची व्याप्ती हेच वैशिष्ट्य. लेखनाची मांडणी, कस्तान भाषा व शब्दयोजना अभिजात, सौष्ठवपूर्ण आणि चित्ताकर्षक. ढोबळमानाने दोन प्रवाह मात्र दिसतात. सुरुवात झाली ती संशोधनात्मक अभ्यासावर आधारित लेखनाने आणि मग सुरु झाले ललितलेखन. त्यांच्या संपूर्ण लेखनाचा निव्वळ आढावा घेणेही खूप मोठे काम, म्हणून ज्या लेखकाने वाचकांना वैचारिक आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध केले, ज्याला पुरेपूर लोकप्रियता मिळाली आणि जे लेखन वादग्रस्तही ठरले अशा लेखनाचाच आढावा घेण्याचे ठरवले आहे.

## बौद्ध कायदे आणि जीवन

विद्यार्थिदशेत असतानाच प्रसिद्ध झालेले बाईंचे हे पहिले पुस्तक. या पुस्तकातील बराच भाग लैंगिक आचरणाच्या वर्णनांनी व्यापलेला आहे. या ग्रंथात बाईंनी बौद्ध संघाची रचना, कार्यपद्धती, तेथील भिक्षु-भिक्षुणींचे जीवन, गुन्ह्यांचे स्वरुप, आचारविचारांसाठी गौतम बुद्धाने घालून दिलेले नियम, कायदे, शिक्षा या सगळ्यांची सविस्तर चर्चा केली आहे. शिवाय हिंदू, जैन आणि बौद्ध धर्म यांचा तत्संबंधी तौलनिक अभ्यास करुन म्हटले

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

आहे की, बुद्दाने मुळात केलेले कायदे, कायदेभंग, शिक्षा यांचा आवाका आणि काटेकोरपणा हिंदू-जैन धर्मांच्या स्मृती, धर्मसूत्रांमध्येही आढळत नाहीत. परंतु कालांतराने संघाचे आणि व्यक्तीचे महात्म्य वाढत गेले आणि मुळातला कसदारपणा कमी झाला. बाई असेही सांगतात की, मुळात गौतम बुद्धाला स्त्रीयांना धर्मदीक्षा देण्याची इच्छाच नव्हती. पट्टशीष्य आनंद याच्या आग्रहावरून स्त्रीयांना बौद्द धर्मात प्रवेश मिळाला. पण संघांमध्ये भिक्षुणींची परिस्थीती अत्यंत कनिष्ठ प्रतीची होती. अनेक वर्षे तपस्या केलेल्या, विदवान वयोवृद्द भिक्षुणींनादेखील तरूण, शिकाऊ भिक्षु अनादराने वागवीत. कायदाही भिक्षुणींच्या बाबतीत अत्यंत कठोर होता. गौतम बुध्दाची दया, करूणेची शिकवण समाजमानसावरच्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या पगडा कमी करू शकली नाही

मूळ पाली भाषेतील ग्रंथ अभ्यासून, अत्यंत परिश्रमपूर्वक, सखोल अभ्यास करून लिहिलेल्या आपल्या या प्रबंधाचे कौतुक झाले तरी बाईंच्या मनातील मूळ शंकांचे निरसन झालेच नव्हते. नंतर अनेक वर्षांच्या अभ्यासानंतर, विचारांनी प्रौढ झाल्यानंतर बाईंना शंकराचार्यांचे म्हणणे पटले की, सर्वसामान्यांच्या पातळीवर त्यांचा देव हेच त्यांचे सत्य असते, तर परमार्थाच्या मार्गाने आणग्र जाणाऱ्यांसाठी ~~ब्रह्म ब्रह्म त्यांचा देव~~ ब्रह्म हेच सत्य असते. शिवाय बाईंच्या हेदेखील ध्यानात आले की, गौतम बुध्दानेही वेगळ्या शब्दात हेच सांगितले आहे. मी त्यांची मुलाखत घेतल्या तेव्हा बाईंनी मला हे सांगितले होते. (असे प्रतिभा रानडे यांच्या ऐसपैस गप्पा दुर्गाबाईंशी या पुस्तकात पृ. १३६ वर आहे.)

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# लोकसाहित्य

बाईंच्या साहित्यातही रस होता. बाईंच्या संशोधनाचा दुसरा महत्त्वाचा विषय होता तो लोकसाहित्याचा. १९५३ मध्ये मुंबई मराठी संग्रहालयाच्या गजेंद्रगडकर व्याख्यानमालेमध्ये बाईंनी या विषयावर चार व्याख्याने दिली होती. त्या व्याख्यानांचा विस्तार करून १९५६ 'लोकसाहित्याची रूपरेषा' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. यामध्ये बाई म्हणतात, वेदकाळापासून आत्तापर्यंतचे जे जे कथा-गाणी असे लोकवाङ्मय मिळते. त्यावरून भारतीय संस्कृतीचे जे अंतरंग कळते ते एकरूपतेचे आहे, कालमानाचे अंतर हे रूप बदलू शकले नाही. तिचे स्वरूप अविभाज्य आहे, कालमानाचे अंतर हे रूप बदलू शकले नाही. निरनिराळी धर्ममतेही ते रूप भंग करू शकली नाहीत. प्रांतीय आचार, भाषाभेद हे केवळ नावापुरतेच निराळे आहेत. बाई म्हणतात की, युरोपमध्ये ख्रिस्ती धर्माचे आक्रमण झाल्यावर जुन्या ग्रीक, केल्टिक, ट्यूटॉनिक धार्मिक परंपरा, संस्कृतीचे समूळ उच्चाटन झाले. तेथील प्राचीन लोकसाहित्य हे केवळ अवशेषरूपच राहिले भारतातील अतिप्राचीन संस्कृतीने बौद्ध धर्माच्या आणि रामकथेच्या आधारे आशियावर आपला प्रभाव पाडला. वैदिक, अवैदिक, ~~साम~~ जैन, बौद्ध प्रथा या सर्वांचा एकमेकांशी संघर्ष आणि समन्वय अहर्निश चालू होता. त्यात भर पडली ती ख्रिस्ती, इस्लामी, बेने इस्त्रायली, पारशी धर्ममतांची; त्यांच्या प्रथा-परंपरांची, शिवाय मुळातल्या विविध आदिवासी परंपरा, चालीरीती आहेतच. भारताचे लोकसाहित्य हे निव्वळ अवशेषरूप राहिले नाही, केवळ अगम्य वारणाऱ्या भारतीय संस्कृतीच्या, तिच्यातील सनातन, बहुरंगी व बहुढंगी अतीविशालता असा हा महत्त्वाचा पैलू आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# संघर्षाची वाटचाल

## स्त्रीमुक्तीच्या अनुषंगाने

"गप्पांच्या" निमित्ताने मी प्रतिभा रानडे यांनी बाईंच्या मुलाखती घेतल्या तेव्हा स्त्रीवादी चळवळीला त्यांचा विरोध असल्याचे बाईंनी सांगितले होते. त्या मुदद्यावरून त्यांची बरीच चर्चा झाली होती. बाईंचे म्हणणे होते की, स्त्रीमुक्तीवाल्या बायका एक प्रकारे पुरुषांशी स्पर्धा करतात, आपणही पुरुषांसारख्याच आहोत, हे दाखवण्यात धन्यता मानतात. पुरुषांनी बायकांना घरकामात मदत केली पाहिजे असाही त्यांचा अट्टहास असतो. या गोष्टी बाईंना पटत नव्हत्या. त्याचबरोबर ऋजुता, मार्दव, वात्सल्य फक्त स्त्रीयांमध्येच असते आणि पुरुष सगळे आक्रमक वृत्तीचे असतात. हेदेखील बाईंना मान्य नव्हते. कारण स्त्रीयांमधले पराकोटीचे क्रौर्य, विकृती त्यांनी पाहिली होती व त्याबददल लिहिलेली होती, तसेच पुरुषांमधले वात्सल्य व मार्दवही त्यांनी पाहिले होते. मुळात कोणत्याही गोष्टीचा पंथ असणे हेच त्यांना मान्य नव्हते. स्त्रीयांना तीस टक्के आरक्षण कायदयाने देण्याच्या मागणीला त्यांचा विरोध होता. निव्वळ बाई आहे म्हणून फक्त तिला कोणतीही अधिकाराची जागा मिळावी हे त्यांना पटत नव्हते. प्रत्येक व्यक्तीला ज्याची त्याची कुवत, शिक्षण, कर्तुत्व, बुध्दिमत्तेनुसारच स्थान मिळायला हवे, असे त्या म्हणाल्या. मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, प्रमिला दंडवते यांसारख्या स्त्रीयांचा बाईंनी खास उल्लेख केला. त्या म्हणाल्या, "सुखवस्तू घरातील सुशिक्षित अशा या बायका, सुखवस्तू, सुशीक्षित पुरुषाशी लग्न करून सुखाचे आयुष्य जगू

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

शकल्या असत्या. पण समाजासाठी काहीतरी हितकारक केले पाहिजे या विचाराने त्यांनी स्थिर, सुखासीन आयुष्य नाकारले. कष्ट घेतले, स्वकर्तुत्वाने त्यांनी समाजमान्यता मिळवली. स्वतःचे विशेष स्थान मिळवले."

पण याच पिढीच्या स्त्रीवादी चळवळीला आधार वाटतो, त्यांनाही चळवळीबद्दल आस्था - आवश्यकता वाटते, ही गोष्ट बाईंनी लक्षात घेतली नव्हती. एकूण स्त्रीवादी चळवळीबद्दल बाईंना मुळीच आस्था वाटत नव्हती. माझे विचार वेगळे. त्यामुळे चर्चा झाली. प्रतिभा रानडे यांचे म्हणणे त्यांनी ऐकून घेतले; पण त्यांचा विचार ठाम होता. पण त्या दोघींमध्ये कडवटपणा न येता त्यांची काही मतभेदांची चर्चा संपली, हे विशेष.

याचा अर्थ असा नाही की, स्त्रीजातीला भोगावी लागणारी दुःखे, त्यांच्यावर होणारे अन्याय यांची जाणच त्यांना नव्हती. त्यांच्या लिखाणातून ती जाण ठायी ठायी दिसते. स्त्रियांच्या आर्थिक परावलंबीपणाच्या बाबतीमध्ये बाईंनी 'स्त्रीमुक्तीच्या अनुषंगाने' (दुपानी) या लेखात त्यांच्या आजीची आठवण दिली. आहे. आजी सुधारक घरातील, सव्वाशे वर्षांपूर्वी प्रीमॅट्रिकपर्यंत शिकलेली. इंग्रजी मराठी पुस्तकांचे भरपूर वाचन असलेली. विवाह न करता आपल्या आवडत्या पुरुषापासून मुलाला जन्म द्यावा की नाही अशासारख्या विषयावर ऐंशी- नव्वद वर्षांपूर्वी दुर्गाबाईंशी चर्चा करणाऱ्या या आजीने बाईंना सांगितले होते की, नवरा कितीही श्रीमंत असला तरी त्याच्या पैशावर बायकोचा अधिकार नसतो. आजीचा स्वतःचाच तो अनुभव होता! आजी म्हणते, "आम्ही सोसले, पण तुम्हाला हा अनुभव यायला नको म्हणून सांगते. एक- चांगले शीक. पाच वर्षे तरी मिळवती होऊन स्वातंत्र्याचे सुख भोग नि मग संसारात पड. पुढे हे स्वातंत्र्य कधीही मिळणार नाही!"

Sundaram®

## फुले - आंबेडकरांबद्दल

बाईंचे सर्वाधीक वादग्रस्त ठरलेले लेखन होते. ते डॉ. आंबेडकर यांच्या संबंधीचे. एक गाढे विद्वान, ग्रंथप्रेमी, उत्कृष्ट प्रतीचे खंदे लेखक म्हणून बाईंना आंबेडकर यांच्याबद्दल अतिशय आदर. ग्रंथाचे महत्व ओळखणाऱ्या अशा माणसाने मनुस्मृतीसारख्या प्राचीन, महत्वाच्या ग्रंथ जाळावा याचे बाईंना अतीव दुःख झाले. आणि रागही आला.

बाईंचे म्हणणे होते की, आपल्याला पटत नाही त्याचे खंडन करावे, पण पुस्तक कशाला जाळायचे? मुख्य म्हणजे मनुस्मृतीमधला पुष्कळसा मजकूर बौद्धांच्या पाली वाङ्मयातही आढळतो. आंबेडकरांना पाली भाषेचे ज्ञान नव्हते. ज्या भाषेत संपूर्ण बौद्ध वाङ्मय आहे ती पाली भाषा आंबेडकरांना येत नव्हती. म्हणजेच मूळातून काही वाचलेले नाही, हे स्पष्टच आहे. बाई पुढे म्हणाल्या होत्या की, आंबेडकरांनी कोसंबींच्या लिखाणाकडेही लक्ष दिले नाही. एवढेच नव्हे तर आपल्याकडच्या बौद्धांनी दलाई लामांचेही महत्व ओळखले नाही की कोणी त्यांना भेटले नाही. याचा अर्थ त्यांना बौद्धधर्माचे प्रेम फक्त राजकारणापुरतेच आहे. पण त्यांनी स्वतःचाच घात करून घेतलाय. त्यांना धड अध्यात्म जमले नाही की राजकारणही जमले नाही. याच गोष्टींचा राग बाईंना आला होता.

आंबेडकर यांच्याप्रमाणेच बाईंना फुले यांच्याबद्दलही खूप आदर होता; पण त्याच वेळी त्यांच्या काही विचारांशी मतभेदही होते. २ एप्रिल १९८८ च्या महाराष्ट्र टाइम्सच्या अंकामध्ये बाईंनी 'महात्मा फुले - एक निरीक्षण' हा लेख लिहीला होता. त्या लेखाच्या विरोधात दलित समाजाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्याला उत्तर म्हणून बाईंनी

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

१८ जून १९८८ रोजी 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये दुसरा लेख लिहिला. या दोन्ही लेखांवरून बाईंचे फुले यांच्याबद्दलचे समग्र विचार कळतात. बाई म्हणतात की, "फुले यांच्यासारखे लोक म्हणजे समाजातल्या दोषांवर टीका करणारे, धर्माची समीक्षा करणारे म्हणून आवश्यक आहेच; परंतु त्यांचा प्रत्येक शब्द प्रमाण मानायचा काय?" त्याला बाईंची हरकत आहे. बाई म्हणतात की, मिथकांच्या टीकांचा विचार करणे आवश्यक ठरते. कारण त्याबद्दलचे संशोधन अभ्यासपूर्ण नसल्याने त्यावर चुकीची भाष्ये केली जातात. फुले हिंदू धर्मावर टीका करताना ब्रह्मदेव आणि त्यांची मुलगी यांच्यामधील संबंधाचा दाखला देतात, बाई म्हणतात की आदिम स्त्री- पुरुष हे बहिण भाऊच होते. ॲडमच्या बरगडीपासून ईव्ह जन्मली याचा अर्थ ती ॲडमची मुलगीच ठरते. हे फुले यांनी लक्षात घेतलेले दिसत नाही. मानवाच्या उत्क्रांतीच्या इतिहासातील तो चुक टाळता येणार नाही असा भाग होता. बाईंचे म्हणणे होते की धार्मिक मिथक कथा वैगेरेंच्या बाबतीत फुले हे विशेषज्ञ नव्हते, त्या बाबतीतल्या फुले यांच्या विश्लेषणात त्रुटी राहण्याची, चुका होण्याची शक्यता होती, म्हणूनच त्यांच्या विचारांची फेर तपासणी आवश्यक ठरते

बाईंच्या मांडणीवर तीव्र आक्षेप घेतले गेले. बाईंवर आरोप केला गेला की, बाई फुले यांच्यासारखी माणसे हवीत असे म्हणतात, आणि त्यांच्या चुकाही दाखवून देतात, हे मानभावीपणाचे लक्षण आहे. त्यावर बाई म्हणाल्या की, असे म्हणणे हे बौद्धिक दुर्दैव आहे.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

शेवटी महाराष्ट्राच्या ~~महाराष्ट्राच्या~~ सदसद्विवेकबुद्धीला सतत जागे ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या, निसर्गातील उत्पत्ती, स्थिती आणि लय या साखळीतले क्लेश आणि सौंदर्य टिपणाऱ्या आणि मानवी संस्कृतीच्या सातत्याची रहस्ये उलगडून दाखवणाऱ्या बाईंच्या उर्जेचा शेवट ७ मे 2002 रोजी झाला. जगण्याचे सुख वाटते म्हणणाऱ्या दुर्गाबाई भागवत शांतपणाने मृत्यूला सामोरे गेल्या.

दूरदर्शनच्या मराठी वाहिन्यांनी बाईंच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून देणाऱ्या जाणकारांच्या चर्चेचा कार्यक्रम सादर केला. एशियाटिक लायब्ररीच्या मॅनेजिंग कमिटीने बाईंच्या मृत्यूच्या दुखवट्याचा ठराव केला. इंग्रजी, मराठी वृत्तपत्रांनी बाईंवर स्फुटे लिहिली.

मुलाखतीच्या वेळी प्रतिभा रानडे यांनी विचारले होते, "जीवनाचे अंतिम सत्य सापडते का?" त्याला बाईंनी उत्तर दिले होते, "अमुक एक सत्य असे काही नसतेच. पण या सृष्टिचक्रातील मीदेखील एक कडी आहे, त्या विश्वचैतन्याशी मी जोडलेली आहे. याचे पूर्ण भान मला आले!" बाईंचे हे उत्तर प्रतिभा रानडे यांच्या कायम लक्षात राहिले. म्हणून बाईंच्या निधनानंतर त्यांना श्रद्धांजली वाहताना, बाईंचा जीवनपट कसलीही आडवळणे नसलेल्या अभिजात कहाणी-सारखा होता म्हणून ~~मी~~ त्यांनी लिहिलेल्या स्फुटाला शीर्षक दिले होते 'कहाणी सफळ संपूर्ण'.

तेजस्वी कुशीळ

द्वितीय वर्ष कला

Sundaram©

FOR EDUCATIONAL USE

# ना. जगन्नाथ शंकरशेट ऊर्फ नाना शंकरशेट

## जन्मापूर्वी

जगन्नाथ शंकरशेट यांचे मुळ आडनाव वा उपनाव मुर्कुटे. त्यामुळे त्यांचे संपूर्ण नाव जगन्नाथ शंकरशेट मुर्कुटे.

त्या काळी महाराष्ट्रात वा दक्षिणेत आडनावे लावण्याची प्रथा नसल्यामुळे, केवळ स्वतःचे प्रथम नाव आणि वडिलांचे नाव इतकेच लावत असत. (टिकेकर, २००७, पृ० २३, ३२) घराण्यातील एखादा कर्तबगार व्यक्तीचे नाव आडनावासारखे वापरण्याचाही प्रघात होता.

जगन्नाथ शंकरशेट यांच्या घराण्याचे मुळ पुरुष नारायणशेट. त्यांचे पुत्र उद्धवशेट, उद्धवशेटांचे पुत्र, खापर पणजोबा माणिकशेट, पणजोबा गणबाशेट, तर आजोबा बाबुलशेट. (शिरोडकर, २००५, खंड १ पृ० ४१-४३, खंड २ पृ० १८११) जगन्नाथ शंकरशेटांचे घराणे व्यापारी होते. त्यामुळे घराण्यात पिढीजात श्रीमंती होती. घराण्याचे मुळ गाव महाराष्ट्रात. कोकण प्रदेशातील ठाणे जिल्ह्यातील कल्याणजवळचे मुरबाड आणि घराण्याचा पारंपारिक, पिढीजात व्यवसाय पोतदारी होता. जातीने मुर्कुटे दैवज्ञ वा सोनार होते.

सुवर्णमुद्रा व गावकीतल्या महसुल परीक्षण पोतदारीच्या व्यवसायामुळे मुरबाड गावात मुर्कुटे यांचे मानमरातब व वजन दांडगे होते. दागिने घडवणे, तयार करुन विक्री व कारागिरी मुर्कुटे करत नसत.

घोडबंधर व्यापारधंदाच्या दृष्टीने भरभराटीला आलेले सुरक्षित बंदर समजले जाई. तेथुन बाबुलशेटांनी मोठ्या प्रमाणावर विविध वस्तुंचा व्यापार सुरू केला. त्यांनी काही जहाजे आणि मचवेही घेतले. शिवाय समुद्रकिनाऱ्यालगत सोयीस्कर जागा घेऊन बंगला बांधला.

## बालपण

जगन्नाथाच्या जन्मानंतर अल्पावधीतच शंकरशेटजी व भवानीबाई यांना दोन मुलगे झाले. परशुराम आणि माधव. परंतु १८०६ च्या सुमारास माधवरावाच्या जन्मानंतर काही काळातच भवानीबाईंचा मृत्यु झाला.

मातृछत्र हरपले, तेव्हा नाना केवळ तीन-साडेतीन वर्षांचे होते आणि त्यांचे वडिल शंकरशेटजी हे वयाने साठीच्या पुढे होते. या परिस्थितीत शंकरशेटजींनी आई आणि वडिल या दोन्ही भूमिकांतुन नानांचे संगोपन केले. नानांच्या बुद्धिमत्तेची विशालता आणि दीन-दुबळ्यांबद्दलची सहृदयता फार लहानपणीच आजुबाजुच्या सर्वांच्या लक्षात आली होती.

त्या तुलनेत धाकट्या दोन्ही बंधूंची प्रगती शंकरशेटजींना आणि कुटुंबातील सर्वांना आश्वासक व समाधानकारक वाटत नव्हती. बंधूंपैकी सर्वात धाकट्या माधवरावाचा खेळत असताना बागेतील पुष्करणीत पडुन मृत्यु झाला. दुसऱ्या बंधुला शिक्षणाची आवडही नव्हती. आणि त्यामध्ये त्याची फारशी प्रगतीही नव्हती.

त्यामुळे आपल्यानंतर नानांना व्यापार - व्यवसाय आणी कुटुंबाची फार मोठी जबाबदारी आयुष्यात पार पाडावी लागणार आहे, हे शंकरशेटजी जाणुन होते. त्यासाठी नानांनी आरोग्य, विद्या व शीलसंपन्न व्हावे, त्यांना दैनंदिन जीवनात शिस्त असावी, यावर शंकरशेटजींचा कटाक्ष होता. संपत्ती व ऐशोआराम सभोवती असल्यामुळे मुलगा भलत्यांची संगत लागुन वाया जाऊ नये, याकरता जगन्नाथाने कोणाच्या सहवासात रहावे आणि कोणाशी मित्रत्वाचे संबंध जोडावे, याबाबत शंकरशेटजी अतिशय दक्ष असत.

विद्याभ्यास सांभाळुन नानांना व्यवसायाची गोडी लागावी व त्यांनी व्यापार-धंदा-व्यवसायात नैपुण्य मिळवावे यासाठी शंकरशेट त्यांना स्वतः मार्गदर्शन करु लागले. व्यापारातल्या खाच-खळग्यांची आणि व्यवहारांची माहिती, तसेच व्यापारी मंडळींच्या ओळखी, त्यांनी स्वतः करुन दिल्या.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# आधुनिक शिक्षणास प्रारंभ

१८१८ मध्ये जिंकलेल्या मराठी मुलखावर ईस्ट इंडिया कंपनीकडुन माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनची 'दख्खनचा कमिशनर' म्हणुन नेमणुक झाली. प्रशासकीय कौशल्य सिद्ध केल्यामुळे पुढच्याच वर्षी १८१९ मध्ये तो संपुर्ण मुंबई इलाख्याचा गव्हर्नर झाला. १८२७ पर्यंत एल्फिन्स्टन या पदावर राहिला.

या सुमारे आठ वर्षांच्या कारकिर्दीत एल्फिन्स्टनने मुंबई प्रांतातील एकुण सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवुन आणला. त्यामुळे तत्कालीन ब्रिटिश राज्यात मुंबई प्रांताला एक पुढारलेला प्रांत म्हणुन नावलौकिक प्राप्त झाला.

ज्ञान आणि मुल्याधिष्ठीत समाज हे एकत्र चालतात, याबद्दल त्याच्या मनात तिळमात्रही शंका नव्हती. अज्ञान हे दारिद्र्य व नैतिक अधःपतनाचे मुळ आहे आणि भारतीय समाजाला आधुनिक ज्ञान-संकल्पना, वैज्ञानिक प्रगती यांचा स्पर्शही झालेला नाही, असे त्याचे परखड मत होते आणि ते सत्यही होते.

एल्फिन्स्टनला युरोपमधील आधुनिक ज्ञानाविषयी आणि विज्ञानातील प्रगतीविषयी सार्थ अभिमान होता. त्या मुल्यांचा हिंदुस्थानात, विशेषतः त्याच्या आधिपत्याखाली असणाऱ्या मुंबई प्रांतातल्या सर्व समाजात व जनतेत प्रसार व्हावा, यासाठी जाणीवपुर्वक पावले उचलण्याचे त्याने ठरवले. (प्रियोळकर, १९४७, पृ० 34-35)

हे मुलभुत निर्मितीकार्य एकीकडे सुरु असताना, जनतेतील ज्या अनेक गैरसमजांमुळे शाळेत मुले पाठवायला कोणी तयार नव्हते, ते दुर करण्यासाठी प्रयत्न करावे लागले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते

### स्टुडंस्टस लिटररी व सायन्टिफिक सोसायटी

नांना शंकरशेट यांच्या सबळ पाठिंब्याने एल्फिन्स्टन इन्स्टि-ट्युशनच्या हॉलमध्ये तरुण व लढाऊ एल्फिन्स्टोनियन्स दादाभाई नवरोजी, डॉ० भाऊ दाजी, नवरोजी फर्दुनजी व इतर मित्रवर्यांनी ६ जुन १८४८ रोजी 'स्टुडंट्स लिटररी व सायन्टिफिक सोसायटी' स्थापना केली.

संस्थेचे संस्थापक कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे होते.

अध्यक्ष – प्रो० ए० एम० पटन, खजिनदार – प्रो० दादाभाई नवरोजी, सेक्रेटरी – प्रो० रीड. (मसानी, १९३९, पृ ४३-५१) संस्थेत राजकीय व धार्मिक सोडुन इतर विषयांवर निबंध वाचले जात. त्यामध्ये बेहरामजी खर्शेदजी गांधी यांनी ४ ऑगस्ट १८४९ रोजी त्यांच्या कॉलेजच्या तिसऱ्या वर्षात स्त्री-शिक्षणावर लिहिलेला निबंध वाचला. स्त्रियांची व त्यांच्या शिक्षणाअभावी घरातल्या पुरुषांची स्थिती वर्णन केल्यावर निबंधाच्या शेवटी बेहरामजी म्हणाले की, आता चर्चा खुप झाली. शब्द नकोत, कृतीची आवश्यकता आहे. तेव्हा कोण कोण तयार आहे ते सांगा. मात्र खरोखरच त्याप्रमाणे वागावे लागेल. यावर प्रार्थना म्हणुन आम्ही आमच्या घरातील मुलींना व बायकांना शिकवु आणि स्वतःच्या घरातुन व कुटुंबात एकातरी विद्यार्थिनीला शिक्षणासाठी तयार करु म्हणुन विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, तेव्हा हिंदु व पारशी समाजात बालविवाहाची पद्धत असल्यामुळे दादाभाईंपासुन बहुतेकांची बालपणीच लग्ने झाली होती; परंतु घरातील स्त्रियांना व मुलींना शिक्षण नव्हते. आचार, विचार, आहार, विहाराचे कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. स्त्री-शिक्षणाबद्दल बोलणे वा लिहिणे निषिद्ध होते व सुधारक हा शब्दही हेटाळणीसमान वापरला जात असे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# बॉम्बे युनिव्हर्सिटी (मुंबई विद्यापीठ)

नानांच्या नेतृत्त्वाखालील 'बॉम्बे असोसिएशन'ने पार्लमेंट-कडे केलेल्या अर्जात २८ नोव्हेंबर १८५२ मध्ये व नंतर मे १८५३ मध्ये प्रत्येक इलाख्यात युनिव्हर्सिटी स्थापन करण्याची मागणी केली होती. त्यानंतर इंग्लंडमधून सर चार्ल्स वुड यांच्या अध्यक्षतेखालील 'बोर्ड ऑफ कंट्रोल' कडून १९ जुलै १८५४ मध्ये कोर्ट ऑफ डायरेक्टरांतर्फे हिंदुस्थानातील इंग्रजी शिक्षणाचा खलिता धाडण्यात आला. हिंदुस्थानात २६ फेब्रुवारी १८५५ मध्ये समिती नेमली जाऊन कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीनही इलाख्यात विद्यापीठे स्थापन करण्यासाठी योजना तयार केली. समितीने ७ ऑगस्ट १८५६ रोजी गव्हर्नर जनरलला त्यांचा अहवाल सादर केला. गव्हर्नर जनरलनी लगेचच पावले उचलली व २७ फेब्रुवारी १८५७ मध्ये मुंबई सरकारने अधिसुचना जारी केली. १८ जुन १८५७ रोजी हिंदुस्थानच्या कायदे कौन्सिलमध्ये बिल समंत होऊन गव्हर्नर लॉर्ड जॉन एल्फिन्स्टन यांच्या चॅन्सेलर कौन्सिलमध्ये शिपच्याली बॉम्बे युनिव्हर्सिटीची स्थापना झाली.

नानांनी मुंबई इलाख्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेली कामगिरी लक्षात घेऊन बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या स्थापनेच्या अधिसुचनेच्याच दिवसापासून फेलो होण्याचा व सीनेटमध्ये बसण्याचा बहुमान त्यांना दिला गेला.

सोमवार, दिनांक २८ एप्रिल १८६२ रोजी टाऊन हॉलमध्ये संध्याकाळी पाच वाजता गव्हर्नर आणि चॅन्सेलर सर बार्टल फ्रिअर आणि मुंबई शहरातील सर्व महनीय व्यक्तींच्या उपस्थितीत बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या पहिल्या पदवी प्रदान समारंभ झाला. नानांच्या मृत्यूनंतर ५ एप्रिल १८६६ रोजी 'बॉम्बे युनिव्हर्सिटी'च्या पाचव्या पदवीदान समारंभात गव्हर्नर सर बार्टल फ्रिअर यांनी त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील बहुमोल योगदानाचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे.

## सामाजिक बदलाचे कार्य

### सतीच्या चालीचे निर्मुलन

सतराव्या शतकापासुन जसे जसे युरोपीय संघटनीतरित्या येथे येऊन, व्यापारासाठी स्थायीक होऊ लागले, तसे तसे त्यांना येथील चालीरिती आणि समाजव्यवस्था यांची माहिती होऊ लागली.

त्यातही नरबळी, स्त्री भ्रुणहत्या, बालहत्या, सती, विधवांचे केशवपन, अस्पृश्यता, बहुजनांचीशिक्षणबंदी, विधवाविवाहबंदी, बालविवाह आणि स्त्रीशिक्षणबंदी यांसारख्या अत्यंत अमानुष व क्रौर्याची परिसीमा गाठणाऱ्या रुढी कोठेही कदापि नसाव्यात.

वैचारिक क्रांतीनंतरच्या युरोपीयांना या प्रथांची अमानुषता सुरुवातीपासुनच जाणवली होती. जशी जशी ब्रिटिश सत्ता विस्तारत गेली तसा तसा येथील अधिकाधिक सुशिक्षित आणि शिक्षित समाज युरोपातील वैचारिक क्रांतीच्या संकल्पनांच्या संपर्कात येऊ लागला. आणि या वर्गात हिंदु धर्मातील अमानुष व कालबाह्य रुढी आणि परंपरा नाकारण्याविषयी वा बंद करण्याविषयी जागृती निर्माण होऊ लागली.

१८१३ पासुन ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्यास येथे अधिकृतपणे सुरुवात झाल्यावर त्यांनी व ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सतीच्या अमानुष प्रथेविरुद्ध निश्चयपुर्वक प्रचार सुरु केला.

बंगालमध्ये प्रथेचा जोर अधिक जाणवत होता. परंतु कमी-अधिक प्रमाणात सर्वत्र ही चाल आढळुन येत असे. बंगालमध्येच, राजा राममोहन रॉय यांच्यावर त्यांच्या मोठ्या भावजयीच्या सती जाण्याच्या प्रसंगाचा कायमचा आणि खोल परिणाम झाला. १८११ मध्ये ज्या पध्दतीने त्यांनी परीपरीने विनवण्या करुनही भावजयीने सती जाण्याचा निर्णय घेतला, चितेत कोणाचेही न ऐकता उडी घेतली व नंतर घरातील राजा राममोहन रॉय यांचे विलक्षण प्रेम असणाऱ्या त्यांच्याच घरातील मंडळींनी तिला बाहेर येण्यास बांबुनी प्रतिबंध करुन चितेत ढकलेले व वहिनीच्या किंकाळ्यांनी आसमंत भरुन गेला आणि तिला सोडवण्यासाठी

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# सार्वजनिक आरोग्यसेवेची पायाभरणी

## बॉम्बे नेटिव्ह डिस्पेन्सरी आणि सर जे० जे० हॉस्पीटल, मुंबई

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात व विशेषतः मुंबईत प्रथमच आलेले अनेक युरोपीय व इंग्रज अधिकारी, येथील हवा, अन्न व परिस्थिती यांच्याशी जुळवून घेता न आल्यामुळे तसेच येथील उष्णकटिबंधीय रोगांना बळी पडत असत. या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या शुश्रुषेसाठी हॉस्पीटल बांधण्याचे १६७६ मध्ये सुरतेहून आदेश निघाले. ७० रुग्णांची शुश्रुषा होईल एवढी इमारत यासाठी व्याप्ती ठरले व २४ रुपये पगारावर एका डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली. तेव्हापासून सार्वजनिक आरोग्यसेवा संकल्पना मुंबईत अस्तित्वात आली. हे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा हिंदुस्थानवर एकछत्री अंमल सुरु झाल्यानंतर दोनच वर्षांत १८२० मध्ये बंगालमध्ये सुरु झालेली कॉलऱ्याची साथ संपूर्ण भारतभर पसरली व त्यात अगणित भारतीय व १०००० ब्रिटिश सैनिक मृत्युमुखी पडले. लक्षात घेतले पाहिजे की, १७३६ ते १८३४ या जवळजवळ शंभर वर्षांच्या काळात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे केवळ १०% अधिकारी ब्रिटनला सुखरुपपणे घरी परतु शकले. १८२५ मध्ये मुंबईतील युरोपीय डॉक्टरांमध्ये डॉ० विल्यम मॅकी यांचे मोठे नाव होते. स्थानिक हिंदी जनतेला आरोग्यसेवा उपलब्ध झाली पाहिजे, यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांना दोन अडचणी जाणवत होत्या. एक म्हणजे युरोपीय डॉक्टरांकडे जायला जनता तयार होत नसे. युरोपीय पद्धतीच्या (ॲलोपॅथिक) चिकित्सेवर येथील जनतेचा फारसा विश्वास नव्हता. इतकेच नव्हे तर इतके दारिद्र्य आणि रोगराई होती; परंतु खासगी देणग्यांच्या पाठिंब्यावर धर्मार्थ आरोग्यसेवेची व्यवस्था झाली नव्हती.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

मुलभुत सेवा कार्य

नानांच्या कारकिर्दीची कळसाची वर्षे

१८५०-५२ ते १८६०-६२ हे नानांच्या कारकिर्दीतले कळसाचे दशक होते. त्यातही १८५१ ते १८५७ ही सात वर्षे व १८५४ चे वर्ष हे सर्वोत्तम समजायला हरकत नाही. या काळात नानांनी मुलभुत आणि भव्य प्रकल्प साकारले.

एतद्देशीयांची मालकीत भागीदारी असणाऱ्या 'बॉम्बे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी' ने १ जानेवारी १८५३ रोजी वाफेच्या बोटीतुन टपालसेवा सुरु केली. तिचे नाना प्रभावशाली संस्थापक- संचालक होते.

'बॉम्बे असोशिएशन' तर्फे हिंदवासी नागरिकांचा पहिला विनंती-अर्ज पार्लमेंटच्या लॉर्डसभेसमोर लॉर्ड मॉंटिगल यांच्यातर्फे ४ मार्च १८५३ रोजी सादर केला गेला. तेव्हा नाना 'बॉम्बे असोसिएशन' चे अध्यक्ष तर होतेच; परंतु हा अर्ज सादर होण्यासाठी त्यांनी विलक्षण कष्टही घेतले होतेच. अध्यक्ष म्हणुन अर्जावरची सर्वात पहिली सहीही त्यांचीच होती.

९ मार्च १८५३ रोजी विष्णुदास भावे यांनी आधुनिक पद्धतीने यांनी सादर केलेल्या नाट्यप्रयोगाने 'बादशाही थिएटर' मध्ये आधुनिक मराठी रंगभुमीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. त्या एतद्देशीयांच्या मालकीच्या पहिल्या थिएटरचे सर्वेसर्वाही नानाच होते.

१६ एप्रिल १८५३ मध्ये आशियातही पहिली रेल्वे सुरु झाली. तिचेही नाना सर्वात प्रभावशाली संस्थापक-संचालक होते. याच काळात नानांनी नवीन बँकांच्या स्थापनेतही वाटा उचलला.

१६ मे १८५३ रोजी कला शिक्षणाची संस्था स्थापन करण्याबाबत सादर केल्या गेलेल्या जमशेटजींच्या योजनेमध्ये ते सहभागी झाले. डिसेंबरमध्ये सर्वांना खुल्या झालेल्या पुण्यातील संस्कृत इंग्रजी शाळेतील तपासणीतुन त्यांनी भाषा प्रभुत्व दाखवुन दिले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## भारतीय रेल्वेचा शुभारंभ: आशियातली पहिली रेल्वे

१६ एप्रिल १८५३ रोजी आशिया खंडातली पहिली रेल्वे मुंबई ते ठाणे या लोहमार्गावरून धावली. आधुनिक भारताच्या इतिहासात हा दिवस निश्चितच सोनेरी अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. भारतात व आशियात जरी रेल्वे सर्वप्रथम ब्रिटिश राजवटीत धावली असली, तरी या घटनेचे सर्व श्रेय मात्र ब्रिटिश राजकर्त्यांचे नाही. याच देशातल्या जगन्नाथ शंकरशेट, दुसरे बॅरोनेट जमशेटजी जीजीभाई, फ्रामजी कावसजी बानाजी, बम्मनजी होर्मसजी वाडिया यांच्यासारख्या तत्कालीन लोकाग्रणी व्यापारी-श्रेष्ठींनी आणि एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनशी निगडित शैक्षणिक चळवळीमधील तरुण विचारवंतांनी त्यासाठी दहा वर्षे चिकाटीने, अथक व अविरत मेहनत घेतली आणि त्यानंतर रेल्वे साकारली.

इंग्लंड व युरोपप्रमाणे याही देशात व प्रांतात सर्व सुधारणा याव्यात आणि अधिकाधिक हिंदवासीयांचे जीवनमान व राहणी उंचावली जावी, यासाठी ध्येयप्रेरित होऊन ज्यांनी जे जे प्रयत्न केले, त्यामुळे ब्रिटिश राजकर्त्यांना येथे रेल्वेसारखी सुविधा आणल्यावाचून आणि त्या सुधारण्यांच्या निर्मितीत काही प्रमाणात तरी येथील जनतेच्या पुढाऱ्यांना स्थान देण्यावाचून पर्याय उरला नाही.

वाफेच्या इंजिनांवर चालणाऱ्या प्रवासी वाहनांचे महत्त्व नाना शंकरशेट, जमशेटजी जीजीभाई, फ्रामजी कावसजी यांच्यासारख्या मुंबईतल्या व्यापारी पुढाऱ्यांना, तसेच दर्पणकार बाळ गंगाधरशास्त्री जांभेकरांसारख्या विचारवंतांना उमजले होते. १८३० ते १८३४ या कालातच किमान लांब पल्ल्याच्या वाफेच्या बोटी पश्चिम किनाऱ्यावर असाव्यात, यासाठी प्रयत्न सुरू केले.

केवळ दीड महिन्यात १५ सप्टेंबर १८४८ रोजी भारतातले सर्व प्रस्तावित शेअर्स विकले गेले आणि १८४९ मध्ये ५० लाख रुपयांच्या भांडवलासहित 'ग्रेट इंडियन पेनिन्सुलर रेल्वे" (GIP) अस्तित्वात आली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

राणीचा बाग व राणीच्या बागेतले वस्तुसंग्रहालय उर्फ

व्हिक्टोरिया गार्डन व अल्बर्ट म्युझियम

उठावाच्या समाप्तीनंतर १ नोव्हेंबर १८५८ मध्ये व्हिक्टोरिया राणीचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला. त्यानुसार ईस्ट इंडिया कंपनीचा हिंदुस्थानवरील अंमल संपुन ब्रिटिश सरकारचा थेट अंमल सुरु झाला. १ नोव्हेंबर १८५८ रोजी संध्याकाळी टाऊन हॉलमध्ये गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईच्या नागरिकांची जाहिर सभा भरवण्यात आली. राणी व्हिक्टोरियाने हिंदी जनतेला उद्देशुन काढलेल्या जाहिरनाम्याचे जाहिर वाचन आणि नागरिकांनी जाहीरनाम्याप्रती व्यक्त करायच्या आनंद व नंतर आनंदोत्सव, असे समारंभाचे स्वरुप होते. जनतेच्या मनात राणीसाहेबांबद्दल कायमस्वरुपी कृतज्ञता राहावी यासाठी काय करता येईल, याची टाऊन हॉलमध्ये भरलेल्या सभेत गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन यांनी चर्चा केली. मुंबईतील पहिले वस्तुसंग्रहालय व भव्य उद्यान उभारण्याच्या योजनेची तयारी व चर्चा सर्वत्र सुरु होतीच. त्यामुळे भव्य स्मारक योजनेतच वस्तुसंग्रहालय व उद्याने या दोन्ही गोष्टींचा समावेश करुन स्मारक करावे, हे नानांनी सुचवले, उत्सवी वातावरणात गव्हर्नरांनीही त्यास अनुकुलता दर्शविली.

जगन्नाथ शंकरशेट यांच्या अध्यक्षतेखाली २१ एप्रिल १८५८ रोजी व्हिक्टोरिया म्युझियम आणि गार्डन समितीची बैठक होऊन, त्यात शासकीय मध्यवर्ती वस्तुसंग्रहालय व्हिक्टोरिया म्युझियममध्ये विलीन करण्यात यावे, त्यासाठी इमारत पुर्ण झाल्यावर किंवा पुरेसे पैसे जमा झाल्यावर म्युझियम सरकारकडे हस्तांतरित करण्यात येईल, त्याबदल्यात सरकारने म्युझियम पुर्ण देखभाल करावी व म्युझियमवर क्युरेटर नेमावा, असे ठरले. ज्युलैमध्ये सरकारने समितीच्या प्रस्तावाचा अधिकृतरित्या स्वीकार केला.

## आर्थिक क्षेत्रातील सहभाग

### बँकांचे संस्थापक

मुंबई भारताची आर्थिक राजधानी होण्यामध्ये मुंबई बंदरातुन होणारा व्यापार, त्यासाठी उभे राहिलेले विविध उद्यम व उद्योग यांच्या-प्रमाणेच बँका व वित्तसंस्थांचा फार मोठा वाटा आहे. मुंबईत एकोणिसाव्या शतकात बँकींग उद्योगाची पायाभरणी झाली. त्यात जगन्नाथ शंकरशेटांचा मोठा सहभाग होता.

मुळात नानांच्या घराण्यात, विशेषतः त्यांचे वडिल शंकरशेट बाबुलशेटांपासुन सावकारीची आणि वित्तदारीची परंपरा होतीच. त्या व्यवहारांमध्ये व व्यवसायातल सचोटीमुळे त्यांचे नावही मोठे होते. खासगी सावकरीकडुन नाना पतपुरवठ्याच्या आधुनिक संकल्पनेचे मुंबईतील एक उद्गाते झाले.

१८३० पर्यंत मुंबईत बँक म्हणता येईल, अशी संस्था नव्हती. बँकांप्रमाणे व्यवहार चालणाऱ्या युरोपीय कंपन्या वा एजन्सीज होत्या. युद्ध वा पगारखर्च भागवण्यासाठी वा तात्पुरत्या उसनवारीसाठी फोर्बस, रेमिंग्टन यांसारख्या युरोपीय कंपन्या वा एजन्सी हाऊसेस, तसेच ठराविक हिंदी धनिक ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला वेळोवेळी पैसे देत असत. पुढे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानवरील सरकारच्या व गव्हर्नर जनरलच्या आश्रयाखाली प्रत्येक इलाख्यात एक याप्रमाणे तीन बँका सुरु झाल्या. एक कलकत्त्याला, एक मुंबईला व एक मद्रासला. त्यांना त्या त्या इलाख्याच्या मध्यवर्ती बँकेसारखा दर्जा होता. फेब्रुवारी १८४० रोजीच्या सनदेनुसार एप्रिल १८४० मध्ये 'बँक ऑफ बॉम्बे' ने व्यवहार सुरु केले. फ्रामजी कावसजी या बँकेच्या संस्थापैकी एक होते; परंतु नानांच्या भात सहभाग नव्हता.

दोनच वर्षांत १८४२ मध्ये 'बँक ऑफ वेस्टर्न इंडिया' स्थापन झाली. युरोपशी संबंध जोडणारी ही पहिली बँक होती. 'बँक ऑफ वेस्टर्न इंडिया' चे बहुसंख्य डायरेक्टर्स (संचालक) युरोपीय होते.

अमोल जाधव
द्वितीय वर्ष कला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## जडणघडण : मुक्त प्रबोधनकाराची

गुरुजी म्हणूनच नरहर कुरुंदकर मराठवाडाभर सर्वांना परिचित होते; ते शाळाचे शिक्षक होते. ते मुक्त उत्स्फुर्त अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. १५ जुलै १९३२ ला परभणी जिल्ह्यातील नांदापूरला, म्हणजेच त्यांच्या आजोळी, त्यांचा जन्म झाला. त्यांचे राहते गाव वसमत. तिथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले.

वसमत येथील शिक्षण पूर्ण झाल्यावर, १९४७ मध्ये त्यांच्या वडिलांनी पुढील शिक्षणासाठी त्यांना हैद्राबादला पाठवले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण सिटी हायस्कूलमधून पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांनी सिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला; पण कित्येकदा प्रयत्न करूनही ते इंटरमिडिएट सायन्सची परिक्षा पास होऊ शकले नाही. वर्गातील तासिकांना ते क्वचितच उपस्थित असत. खऱ्या अर्थाने अभ्यास करण्यासाठी तासन् तास बैठक मारून गांभीर्याने अशी त्यांनी परिक्षा दिलीच नाही. वाचनाच्या बाबतीत लंडन ग्रंथालयात बसून दिवसरात्र वाचन करणाऱ्या कार्ल मार्क्सचा आदर्श त्यांच्यासमोर होता. हैद्राबादच्या स्टेट लायब्ररीत ते दिवस-दिवस बसू लागले. आणि हाती पडेल ते पुस्तक अधाशीपणे वाचू लागले.

१९४८ मध्ये communist असल्याच्या आरोपाखाली कुरुंदकर यांना अटक झाली. काही दिवस त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. निजाम स्टेटमध्ये त्या काळी कम्युनिस्ट पक्षावर बंदी होती; पण हे सारे विनाकारण झाले. कुरुंदकर कम्युनिस्ट किंवा त्यांचे सहप्रवासी कधीच नव्हते. ते समाजवादी होते; विचाराने आणि कृतीने.

आपण काय करीत आहोत, कुठे चाललो आहोत, ह्याची त्यांना त्याकाळी तरी कल्पना नव्हती. नोकरी व उद्योगधंदा वा अन्य कोणता व्यवसाय नसतानादेखील, शेजारीच राहणाऱ्या प्रभा नावाच्या मुलीच्या प्रेमात ते पडले. शाखेचे बंधन असतानाही वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी तिच्याबरोबर आंतरशाखीय विवाह केला. हीच त्याकाळी रूढी-परंपरांच्या विरोधात त्यांनी केलेली छोटीशी बंडखोरी होती. अनासक्ती आणि अपरिग्रह होऊन ते मुक्त व्रतस्थ जीवन जगले.

DATE:

## स्वप्न : नवसमाजनिर्मितीचे

कुरुंदकर हे केवळ मराठीचे प्राध्यापक किंवा महाविद्यालयाचे प्राचार्य नव्हते. अनेक विषयांतील ज्ञान त्यांनी संपादन केले होते आणि वाङ्मय, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, धर्म, संस्कृती, कला इत्यादींशी निगडीत असलेल्या अनेक विषयांवर ते मराठवाड्यात आणि मराठवाड्याबाहेर व्याख्यान देत. त्यांचे अध्ययन एकाच वेळी चौफेर राहत असे.

* वर्ग-वर्ण- समन्वय आणि नवसमाजनिर्मिती

लोकशाहीच्या राजकरणाच्या अपरिहार्य परिणाम म्हणून एक गोष्ट आपल्या लक्षात येते. ती म्हणजे भारतीय राजकारणात निखळपणे ४० उजव्या मनोवृत्तीचा कोणताही पक्ष अस्तित्वात येऊ शकत नाही. जनतेचे कल्याण हे ध्येय साध्य करायचे असेल, तर राजकीय पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना निदान बोलण्याच्या पातळीवर तरी डाव्या विचारसरणीशी वा मध्यममार्गी राजकारणाशी स्वत:ला बांधून घ्यावे लागते.

कुरुंदकरांच्या मते, स्वातंत्र्याचा लढा आणि दारिद्र्यमुक्तीचा लढा समाजवादी पक्षांनी एकत्रितच लढला पाहिजे. दोन्ही लढे एकमेकांपासून भिन्न नाहीत, तर पूरक आहेत. हे समाजवादी मंडळींनी समजून घ्यायला हवे. विचाराच्या पातळीवर समाजवाद्यांना हे सारे मान्य आहे, पण व्यवहाराच्या पातळीवर ते कमी पडत आहेत. ही वस्तुस्थिती आहे.

* महात्मा फुले यांचा आदर्श :-

जगात कुठेही समाजवाद अस्तित्वात आला नव्हता, तेव्हा महात्मा जोतीराव फुले हे इथल्या समाज- परिवर्तनाच्या चळवळीचे जनक झालेले होते. 'सत्यशोधक समाज' म्हणून ती चळवळ ओळखली जात होती. ज्या हिंदू पुराणमतवादाने आणि परंपरावादाने समाजातील मागासलेल्या वर्गांवर गुलामगिरी लादली, त्याविरुद्ध त्यांनी शौर्याने लढा दिला. सामाजिक बदल घडवून आणून जिथे सर्व लोकांना समान मानले जाते. आणि सर्वांना समान अधिकार आहेत. अशा समाजाची निर्मिती करणे हे ह्या चळवळीचे ध्येय होते.

DATE:

समाजवादातून समाज परिवर्तनाकडे

समाजवादी असल्यामुळे 'सामाजिक व्यवस्थेचे मूळ हे अर्थात म्हणजे संपत्तीत आहे' असा कुरुंदकरांचा विश्वास आहे. ते म्हणतात, 'जडवादी वा भौतिक विचार हा अन्य कुणाही विचारांपेक्षा अधिक प्रभावी असतो.' 'सर्व संपत्ती ही शेवटी समाजाच्या मालकीची. 'व्यक्तीने करता येतील तेवढे श्रम करावे, गरजेइतके तिला निश्चितच मिळत राहील', ह्याची हमी समाजवाद देतो, असे मार्क्सनेच सांगून ठेवले आहे.

परंपरागत जातिव्यवस्था आणि तथाकथित भांडवलशाही ह्यांच्या प्रचारामुळे भारतीय राजकारण हे गुंतागुंतीचे बनले आहे. प्रत्येक जातीला सत्तेची लालसा निर्माण झालेली आहे. जाती-जातीतील सत्ता-स्पर्धा कळसाला पोहचली आहे. गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, अशा परस्परविरोधी वर्गात जातिव्यवस्था विभागली गेलेली आहे. व्यापक अर्थाने, आपण त्याचे वर्णन शोषक-शोषित असे करू शकतो.

आदर्शवादी समाजरचना, हे सुंदर स्वप्न वास्तवात आणण्याच्या दुष्कर कार्यातील अडचणींची कुरुंदकरांना पुरेपूर जाणीव होती. वैज्ञानिक ज्ञानसामर्थ्याने तथाकथित धर्मश्रद्धेला धक्का दिल्यास सामाजिक एकात्म समाजाच्या निर्मितीसाठी त्यातून मार्ग सापडू शकेल

दारिद्र्य आणि विषमता हे तिच्या मार्गातील प्रमुख अडथळे दूर होतील. असे त्यांचे मत आहे. समाजाच्या पुनर्रचनेसाठी सर्वसाधारण नीति-नियमांची आचार-संहिता, तसेच सक्तीचे स्वतंत्र सार्वत्रिक शिक्षण, मागासलेल्या वर्गांना संरक्षण, विषमता कमी करणे ह्या गोष्टींची सुरुवात झाली पाहिजे.

नव्या व्यवस्थेला जागा देण्यासाठी जुनी व्यवस्था बदलत जाते" ह्या टेनिसनच्या काव्यमय उक्तीतील सत्यावर कुरुंदकरांचा विश्वास होता.

DATE:

प्रवास : जडवादाकडून इहवादाकडे.

राष्ट्रीय एकात्मता ही केवळ राज्यशास्त्रीय संकल्पना नाही. स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणात, विशेषत: जातीय दंगलींच्या पार्श्वभूमीवर, तीस एक विवाद्य स्वरूप प्राप्त झालेले आढळते. कुरुंदकरांच्या मते, भारतीय दृष्टिकोनातून इहवादाचे खालील अर्थ आहेत.

१) धर्माचा अभाव २) धर्मातीतता ३) सर्वधर्मसमभाव ४) ऐहिकता इ.

भौतिक जीवनावरील, तशीच व्यवहारावरील धर्माची पकड पूर्णत: नाहीशी करता आली नाही, तरी ती काही प्रमाणात सैल करणे वा कमी करणे, हे इहवादी तत्त्वज्ञानाचे खरे स्वरूप व कार्य आहे.

* धर्मस्वातंत्र्य आणि व्याप्ती :-

कुरुंदकरांच्या मते, राजकिय संविधान बनवण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार असलेल्या संविधान समितीने धर्मस्वातंत्र्यावर चर्चा केलेली आहे. धर्मांना त्यांचे स्वत:चे जे वेगळे असे स्वातंत्र्य असते, त्यास भारतीय राज्यघटनेने नकार दिला आहे, पण देशाच्या नागरिकांना मात्र धर्मस्वातंत्र्य दिलेले आहे. ह्याचा मथितार्थ असा की, लोकांना स्वत:च्या निवडीच्या धर्माला अनुसरून नैतिक उपदेश करणे, त्याची शिकवण देणे, प्रचार, प्रसार व पालन करणे त्याचा अधिकार आहे.

* समान नागरी कायद्याची आवश्यकता.

भारताच्या साऱ्या नागरिकांना समान नागरी कायदा बंधनकारक असला पाहिजे, ह्या मागणीवर कुरुंदकरांनी विशेष भर दिला. हा समान नागरी कायदा केवळ इहवादाच्या नव्हे, तर लोकशाहीचाही पाया आहे. इहवाद कोणत्याही धर्माच्या-मग तो हिंदू असो, वा इस्लाम असो, वा ख्रिश्चन असो - अमानवी प्रथा, परंपरा प्रवृत्तींच्या विरोधात असतो. सार्वजनिक जीवनातून धर्म समूळ नष्ट करणे म्हणजे धर्मावर आधारित जातीयवाद राजकारण संपविणे होय. देखावा नव्हे, तर सचोटी आणि प्रामाणिकपणा ह्यांच्या प्रत्यक्ष उदा. द्वारे लढा देऊन जातीयवादाच्या असुरास नेस्तनाबूत/ नामोहरम करून गाडून टाकू शकतात.

DATE:

वाटचाल : साहित्यातील जीवनवादाकडे

सामाजिक क्षेत्र असो वा राजकिय क्षेत्र असो, वा साहित्यक्षेत्र, कुरुंदकर नेहमी सुसंगत आणि सदैव तोच, एकच म्हणजे वेळोवेळी न बदलणारा, पवित्रा घेत. तात्विकदृष्टया बोलायचे, तर 'स्वातंत्र्य' हे जीवनाचे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. असा त्यांचा गाढ विश्वास होता. आणि त्यासाठी ते खंबीरपणे उभे राहत.

कलावंताचे स्वातंत्र्य :

जीवनावर प्रेम असल्याशिवाय साहित्यावर आणि समीक्षेवर प्रेम शक्य नाही हा मुद्दा आमच्यातील काही समीक्षकांना, साहित्यिकांना मान्य नाही. असे कुरुंदकरांचे एकमत आहे. पुढे जाऊन ते म्हणतात, " जीवनावर प्रेम असल्याशिवाय साहित्यावर आणि समीक्षेवर प्रेम आहे, असे म्हणणे हा शुद्ध दांभिकतेचा व्यवहार होईल." जीवनाची प्रतिष्ठा मान्य केली, तरच लेखकाच्या आविष्कार स्वातंत्र्यावर बोलण्याचा अधिकार आहे.

राज्यघटनेने दिलेले प्रत्येक प्रकारचे स्वातंत्र्य असायला पाहिजे, तेवढे आहे, पण अनिर्बंध नाही. त्यावर विवेकाचा अंकुश असतो, पण विवेक म्हणजे विधिवत असलेला न्यायान्याय, लोकमत किंवा लोकमान्यता नव्हे. हेही लक्षात घ्यावे.

समीक्षेचे दोन संप्रदाय : साम्य आणि विरोध

बा. सी मर्ढेकर यांच्या कला-समीक्षेवर आधारित अशी स्वतःच्या जीवनवादी समीक्षेची दिशा निश्चित करताना कुरुंदकर एक नवी वाट चोखाळताना दिसतात. मर्ढेकरप्रणीत वाङ्मयीन महात्मतेचे स्वरुप सांगताना त्या संज्ञेचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देतात.

लेखकाला जीवनाचे तपशीलवार, लांबरुंद, व सहिष्णू निरीक्षण/अवलोकन, तसेच सखोल, गंभीर आकलनही करता आले पाहिजे. आपली जाणीव, विचार आणि भावना यांद्वारे लेखक आपल्या अनुभूतीशी तादात्म्य पावतो. इथपावेतो मर्ढेकर आणि कुरुंदकर ह्या समीक्षकद्वयांची वाटचाल एकाच मार्गावरुन होते; परंतु कला आणि जीवनवस्तुस्थिती परस्परांशी निगडित कसे आहेत?

DATE:

दलितत्वाचा शोध व बोध

दलित चळवळीवरील आणि दलित साहित्यावरील कुरुंदकरांच्या विचारांचा मुख्य स्रोत त्यांच्या काही सामाजिक, राजकीय प्रश्न, साहित्यविषयक परीक्षणे आणि प्रस्तावना ह्यांचा संग्रह असलेल्या 'भजन' ह्या पुस्तकातून आढळून येतो.

दलित चळवळीसंबंधीचे विचार

दलित चळवळीचे सामाजिक-राजकीय आणि साहित्यिक प्रकटीकरण हा कुरुंदकरांच्या सूक्ष्म निरीक्षणाच्या आणि अन्वेषणाच्या विषय राहत आलेला आहे. १९७२ मध्ये त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्य' ह्यावर एक प्रदीर्घ तपशिलवार समीक्षात्मक लेख लिहीला होता आणि तो 'साधना' साप्ताहिकात क्रमशः छापून आला होता. त्यांच्या मते, अमेरिकेचे सोळावे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकनप्रमाणे बाबासाहेबदेखील मानवजातीचे मुक्तिदाते होते. अतिशय निःसंदिग्ध शब्दांत त्यांनी बाबासाहेबांच्या अलौकिक बुद्धिमत्तेसंबंधी आदरभाव व्यक्त केला. ते शब्द असे- " डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लक्षावधी दलितांना प्रेरित केले; दारिद्र्य, अंधश्रद्धा, आणि गुलामगिरी ह्यांच्या विळख्यात सापडलेल्या दलितांना एकत्र आणले.

बौद्ध साहित्याकडे वाटचाल

बौद्ध धर्माच्या श्रद्धा आणि पुराणकथा यासंबंधी नव्याने विचार करण्याचा प्रयत्न चालू आहे, ह्याला विचार-स्वातंत्र्याच्या दृष्टिने कुणाच्या विरोध असण्याचे कारण नाही. बौद्ध विचार आणि तत्वज्ञान मराठीत आधी आलेलेच आहे; त्यात कुणी भर घालू इच्छित असतील, तर त्यांचे स्वागतच व्हायला हवे.
दोन वर्षांचा इतिहास साक्षी आहे हिंदू धर्म असो वा बौद्ध वा जैन त्यातील कथा वेगवेगळया पण धर्मश्रद्धा त्याच जवळपास सारख्याच आहेत, जीवनमूल्ये सारखीच आहेत. उदाहरणार्थ, प्रेम, शांती, सत्य, अहिंसा, त्याग, वैराग्य इत्यादी.

बौद्ध धर्माचा विचार करीत असताना केवळ गौतम बुद्ध डोळ्यांसमोर आणून चालणार नाही. ते खरोखरच वंदनीय आहेत.

DATE:

पण बौद्ध राजवटींचे काय? त्यांनी नेहमीच राजेशाही, सरदारशाही ह्यांना आपल्या पोटाशी घेतले आहे. विसाव्या शतकाच्या उदयापर्यंत बौद्ध धर्माखाली असणाऱ्या चीनसारख्या देशात विविध प्रकारची गुलामगिरीही वावरत होती. कुरुंदकरांचे प्रतिपादन आहे.

बौद्ध धर्माचा स्विकार करावा की नाही, हा निराळा प्रश्न आहे, त्याचे उत्तर 'करावा वाटेल त्याने करावा, करावा वाटणार नाही त्याने करू नये', असे आहे. पण बौद्ध धर्म स्वीकारामुळे जातिव्यवस्था मोडण्यास काही मदत होईल काय? ह्या प्रश्नाचे उत्तर मात्र 'काही मदत होणार नाही', असे आहे.

दलित साहित्य व नवसाहित्य : तुलना

दलित विद्रोहाची सामाजिक बाजू अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तशीच ती उचितही आहे. सामाजिक जाणिवेमुळेच ह्या चळवळीचा मुख्य हेतू सामाजिक, सांस्कृतिक आणि गुलामगिरीविरुद्धचा संघर्ष हा होता. ह्या कारणामुळेच अगदी अलीकडच्या काळात प्रचलित झालेल्या मराठी नवसाहित्यासमोरही दलित साहित्य आपले वेगळे आणि स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. प्रस्थापित तत्वे व मूल्ये ह्यांविरुद्धच्या बंडखोरीमधूनच नवसाहित्यही उदयास आले आहे. परंतु व्यक्तिगत गुणवैशिष्ट्यास ह्यात अवाजवी महत्व दिल्यामुळे त्याच्या सीमा मर्यादित झाल्या आहेत आणि पुढे पुढे त्यात सामाजिक जाणीव व जबाबदारी ह्यांच्या अभावही जाणवत गेला आहे.

कुरुंदकरांनी केवळ दलित साहित्याविषयी आदरभाव व्यक्त केला असे नाही, तर त्यावर त्यांनी टीकाटिप्पणीही केली आहे. दलित साहित्याच्या त्यांनी दर्शवलेल्या काही मर्यादा अशा आहेत.

self-introspection

self serutiny

aesthetic distance.

DATE:

इतिहासमीमांसा व सत्यशोधन :

आपण इतिहासकार नाही . त्याची कुरुंदकरांना जाणीव होती; पण मार्क्सवादी असल्याने, इतिहासाच्या अभ्यास आणि वर्तमानकाळाशी असलेली त्यांची सांगड किंवा ऐतिहासिक प्रक्रियेच्या शेवट अंतत: वर्तमानकालीन वास्तवात होत असतो. यांचे अवलोकन करण्यात त्यांना मनापासून रस होता.

इतिहास लेखनाची प्रेरणा : सत्यशोध

राष्ट्रीय जाणीव निर्माण करण्यात इतिहासाचे ज्ञान आणि आकलन महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात, ह्यावर कुरुंदकरांचा विश्वास होता. भविष्यनिश्चितीत आणि मार्गदर्शनात असलेल्या इतिहासाच्या भूमिकेबाबत ते अत्यंत साशंक होते; तथापि इतिहासाच्या प्रांजल आणि वास्तववादी आकलनाशिवाय वर्तमान स्थिती समजून घेणे कुणालाही शक्य नाही, असे त्यांना वाटत असे.

प्राच्यविद्या संशोधन

कुरुंदकरांनी इतिहासाची अतिशय काळजीपूर्वक तपासणी केली आणि हिंदू महाकाव्ये, संस्कृत नाटके, जैन, बौद्ध आणि वैदिक वाङ्मय, जुने मराठी वाङ्मय इत्यादींचे मूल्यमापन केले. 'महाभारत', 'भगवद्गीता', 'मनुस्मृती', 'नाट्य-शास्त्र' इत्यादी ग्रंथावरील त्यांचे लेख/ पुस्तके प्राचीन इतिहास, पुराणे आणि संस्कृती ह्यांचे अनोखे दर्शन घडवतात. त्यात कल्पना आणि वास्तव ह्या दोन

इतिहासाचा वारसा

"प्राचीन भारतात आपणास कालिदास मिळाला, तसेच आपणांस शंकराचार्य, कबीर आणि ज्ञानेश्वरही मिळाले. ह्याशिवाय, चंद्रगुप्त, शिवाजी, आणि राणाप्रताप ह्यासारखे ऐतिहासिक नायक, तर अजिंठा, वेरूळ आणि मीनाक्षीपूरम ह्यांसारखी ऐतिहासिक स्थळेही मिळाली.

DATE:

## स्मृती मनुस्मृतीची

कुलाबा जिल्ह्यातील महाड ह्या गावी २५ डिसेंबर १९२७ रोजी प्रथमतः 'मनुस्मृतीचे' विधिपूर्वक दहन झाले. आधुनिक भारताच्या इतिहासातील ही एक अतिशय महत्त्वाची घटना आहे, असे कुरुंदकर मानतात. ते ह्या घटनेचे मोकळ्या मनाने स्वागत करतात.

## आधुनिकांचे परंपरावादी समर्थन

आधुनिकांतही परंपरावादी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्याविषयी प्रचंड चीड होती. त्यांना हा गट जातीय हितसंबंधाचा संरक्षक म्हणून दांभिक वाटे. कुरुंदकर यांच्या मते, हे आधुनिक, नवशिक्षित लोक केवळ उपद्रवी नाहीत, तर भोंदूही आहेत. ह्याचे प्रतिनिधी म्हणून डॉ. भगवानदास, डॉ. मोरवानी, सर सी.पी. रामस्वामी अय्यर, आदी विद्वानांकडे पाहिले जाते. तसेच स्वातंत्र्य समता, बंधुता आणि न्याय ह्यांचा पुरस्कार करणारी आहेत. त्यांना मनू समता व न्यायाचा पुरस्कार वाटतो.

## मनुस्मृतीचे विरोधक :-

'मनुस्मृतीचे' दहन ही कल्पना फुले यांची. मनूची संहिता मतलबी आहे. तेव्हा हा माणसाला गुलाम करणारा अपवित्र ग्रंथ जाळला जावा, असे ते सुचवतात. पुढे जाऊन तर इंग्रज माऊली आली आणि मनू जळाला, असे ते सांगतात. पण बाबासाहेबांनी १९२७ साली मनुस्मृती जाळली; तेव्हा त्यांची प्रेरणा जोतीराव नव्हे तर फ्रेंच राज्यक्रांती होती, तरीही प्रत्यक्षात 'मनुस्मृती'चे दहन करून फुले यांची इच्छा आंबेडकरांनी पूर्ण केली. फुले ह्यांच्या ऐतिहासिक महत्त्व त्यांच्या क्रांतिच्या जाणिवेला आणि हितसंबंधी-यांविरुद्ध त्यांनी घेतलेल्या विद्रोही भूमिकेला आहे. त्यांचे महत्त्व त्यांच्या इतिहास-विवेचनात नाही, ते त्यांच्या समाज परिवर्तनाच्या ऐतिहासिक लढ्यात आहे, सामाजिक समतेच्या आंदोलनाचा आणि संघर्षाचा त्यांचा वैभवशाली वारसा पुढे चालून राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्याकडे आला.

DATE:

स्वातंत्र्य : कुणाचे ? कशासाठी ?

स्त्री-स्वातंत्र्य : एक संकल्पना

कुरुंदकरांच्या दृष्टीने, खरी समस्या आणखी वेगळीच आहे, जेव्हा आपण तिच्या व्यावहारिक बाजूचा विचार करतो, तेव्हा ती काहीशी मानसशास्त्रीय असल्यासारखी जाणवते. उदाहरणार्थ माणूस स्त्रीला आपल्या मालकी हक्काची वस्तू म्हणून वागवतो आणि आश्चर्याची बाब म्हणजे स्त्रीसुद्धा पुरुष हा तिच्यापेक्षा उच्च दर्जाचा आहे, तिचा मालक आहे असे समजते. स्त्रीची स्वेच्छाप्रेरित आज्ञाधारकता किंवा निष्ठा पातिव्रत्य नाही, तिने स्वतःच स्वतःवर लादून घेतलेल्या गुलामगिरीचे द्योतक आहे., असे कुरुंदकरांना वाटते.

दादा धर्माधिकारी ह्यांना स्त्रीविषयी असलेल्या काळजीतूनच स्त्री-मुक्तीचे विचार मांडलेले आहेत. बऱ्हंशी नरहर कुरुंदकर त्यांच्याशी सहमत आहेत; परंतु काही मुद्द्यांवर त्यांचे त्यांच्याशी असलेले मतभेद दर्शवताना काही वेगळे, नाविन्यपूर्ण, महत्त्वपूर्ण विचार त्यांनी मांडलेले आहेत.

स्त्री-चळवळीचे खंदे समर्थक म्हणून त्यांचे त्याविषयी स्वतःचे ही स्वतंत्र विचार आहेत. एका ठिकाणी ते म्हणतात. स्त्री एक स्त्री आहे. म्हणून ती मुक्त असली पाहिजे. असे नाही; तर ती माणूस आहे, म्हणून ती स्वतंत्र असली पाहिजे. स्वातंत्र्य हा मानवाचा - तो पुरुष असो वा स्त्री - जन्मसिद्ध हक्क आहे. निसर्गाने स्त्री आणि पुरुष ह्या दोहोंत भेद केला आहे; परंतु त्यामुळे स्त्री-स्वातंत्र्यात अडथळे येऊ नयेत. आपल्या साथीदाराची निवड, घटस्फोट, पुनर्विवाह ह्यांबाबत कशाचीही निवड करायची असल्यास स्त्रीला संपूर्ण स्वातंत्र्य असावे आणि वडिल किंवा पती ह्यांच्या संपत्तीवर अधिकार असावा.

आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचा तिला पूर्ण अधिकार असावा.

DATE:

राष्ट्रसेवादलाच्या छायेत :-

विचारप्रणालीने कुरुंदकर मार्क्सवादी होते. त्यांनी मार्क्सवादात अनुस्यूत असणारी ऐतिहासिक चिकित्सक वृत्ती आत्मसात केली आहे. मार्क्सवादात वास्तवाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची शिस्त असते आणि मार्क्सवाद ते वास्तव बदलण्याचीही हिंमत देतो. पण दुर्दैवाने भारतीय मार्क्सवादयांना , विशेषत: साम्यवादी नेत्यांना, भारतीय वास्तवाचे सम्यक आकलन झालेले नाही. तसेच वास्तवाच्या आकलनातच त्रुटी राहिल्यामुळे त्यांचे भविष्याबद्दलचे आडाखे आणि प्रश्नांच्या सोडवणूकीबद्दलचे उपायही चुकलेले आढळतात. त्याचे खरे कारण सांप्रदायिक मार्क्सवादयांतही एक प्रकारचा आंधळेपणा नकळत शिरलेला दिसतो; पण कुरुंदकर यांचे वास्तवाचे आकलन सांप्रदायिक मार्क्सवादयांकडून वेगळे होते आणि त्यामुळे त्यांचे निष्कर्षही वेगळे होते, असे यदुनाथ थत्ते यांचे मत आहे.

वाटचालीतील सखेसोबती :-

कुरुंदकरांचे 'वाटचाल' हे पुस्तक बरेचसे अनौपचारिक आत्मचरित्रात्मक असे आहे. त्यांचे आप्तस्वकिय आणि जवळचे लोक ह्यांच्या शब्दचित्रांचा तो जणू संग्रहच आहे म्हटले तरी चालेल. ह्या शब्दचित्रातल्या तपशिलांच्या बारकाव्यांतून कुरुंदकर यांचे स्वत:चे ही एक अदृश्य शब्दचित्र साकार होते. त्यांनी केलेल्या टीका-टिप्पणीतून एका प्रसन्न व्यक्तिमत्वाचा साक्षात्कार घडतो. सुरुवातीच्या शब्दचित्रांत त्यांच्या आईचे अगदी वास्तववादी दर्शन घडते. त्यानंतर त्यांच्या दोन्ही मामांचे आणि पत्नीचे आणि शेवटी त्यांच्या गुरुचे अशी विविध शब्दचित्रे येतात. त्यात येणारी सूक्ष्मता व आत्मीयता जागोजागी जाणवते. ललित लेखनाचा वस्तुपाठच जणू कुरुंदकरांनी इथे सादर केला,असे लक्षात येते.

त्यानंतर येणाऱ्या शब्दचित्रांत ते ज्यांच्या निकटच्या संपर्कात आले अशा ख्यातनाम विद्वान, स्वातंत्र्यसैनिक ,सामाजिक कार्यकर्ते ह्यांचा समावेश आहे.

संदेश जाधव
द्वि. व. कला.

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

| | |
|---|---|
| जन्म | मे २८, इ.स. १८८३<br>भगूर, नाशिक जिल्हा, महाराष्ट्र, भारत |
| मृत्यू | फेब्रुवारी २६, इ.स. १९६६<br>दादर, मुंबई, महाराष्ट्र, भारत |
| चळवळ | भारतीय स्वातंत्र्यलढा |
| संघटना | अभिनव भारत<br>अखिल भारतीय हिंदू महासभा |
| धर्म | हिंदू |
| वडील | दामोदर सावरकर |
| आई | राधा सावरकर |
| पत्नी | यमुनाबाई विनायक सावरकर |

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर (२८ मे, इ.स. १८८३ भगूर - २६ फेब्रुवारी, इ.स. १९६६) हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, मराठी आधेतीक कवी व लेखक होते.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका क्रांतिकारक चळवळीचे धुरीण, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे शिलेदार, हिंदुसंघटक व हिंदुत्वाचे एक विशिष्ट तत्त्वज्ञान मांडणारे तत्त्वज्ञ, विज्ञानाचा पुरस्कार व जातिभेदाला तीव्र विरोध करणारे समाज क्रांतिकारक भाषाशुद्धी व लिपिशुद्धी या चळवळींचे प्रणेते, प्रतिभावंत साहित्यिक आणि प्रचारक असे अनेक पैलू सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाला होते.

## एक भाकड महासंमेलन आणि दुसरे भाकड महासंमेलन :-

सावरकरांनी चालवलेल्या जात्युच्छेदन चळवळीने अस्वस्थ झालेल्या ब्राम्हणांनी काशी येथे भरलेल्या सनातनी परिषदेत सावरकरांना 'धर्मद्रोही' ठरवून त्यांना पेशवाई असती तर हत्तीच्या पायाखाली दिले गेले असते असा ठराव मांडला त्यावर ३००० ब्राम्हणांनी सह्या केल्या. सावरकरांनी त्यावर 'शिवशाहीत अथवा, पहिल्या बाजीरावाच्या पेशवाईत आमच्यासारख्या हिंदु संघटकांना हत्तीच्या पाठीवरील अंबारीत मिरवले जाण्याचाच संभव अधिक होता' असे सडेतोड उत्तर दिले. मायबोली २००८ च्या हितगुज दिवाळी अंकात डॉ. चिन्मय यांच्या मांडणीप्रमाणे, 'भटशाही' संपवण्यासाठी पूजा-पाठ, गौरी, गणपती, सोयरसुतक, संक्रांत, दिवाळी, दसरा, द्वादशी या धार्मिक कार्यक्रमांना भटांना बोलावणे बंद करून 'भटशाही' संपवावी असे मत मांडले

विनायक दामोदर सावरकर यांचे चरित्र :-

सावरकरांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर ह्या गावी झाला. त्यांचे वडील दामोदरपंत सावरकरांच्या तीन अपत्यांपैकी हे दुसरे होते. वि. दा. सावरकरांना बाबाराव हे मोठे आणि नारायणराव हे धाकटे भाऊ होते. सावरकरांची आई ते नऊ वर्षांचे असताना वारली. थोरल्या बंधूंच्या पत्नी येसूवहिनी यांनी त्यांचा सांभाळ केला. सावरकरांचे वडील इ.स. 1899 च्या प्लेगला बळी पडले.

सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या शिवाजी विद्यालयामध्ये झाले. ते लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान होते. वक्तृत्व, काव्यरचना ह्यांवर त्यांचे प्रभुत्व होते. जिव्हा आणि लेखणी ते सारख्याच ताकदीने चालवत. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिलेल्या स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र ह्या रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. चापेकर बंधूंना फाशी दिल्याचे वृत्त समजताच लहानग्या सावरकरांनी आपली कुलदेवता भगवती हिच्यापुढे "देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन" अशी शपथ घेतली.

मार्च, इ.स. 1901 मध्ये विनायकराव यमुनाबाई यांच्याशी विवाहबद्ध झाले. लग्नानंतर इ.स. 1902 साली फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला व इ.स. 1906 साली उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

राष्ट्रभक्तसमूह ही गुप्त संघटना

सावरकरांनी पागे आणि म्हसकर ह्या आपल्या साथीदारांच्या सहाय्याने स्थापन केली. मित्रमेळा ही संघटना ह्या गुप्त संस्थेची प्रकट शाखा होती. ह्याच संघटनेचे पुढे अभिनव भारत ह्या संघटनेत रूपांतर झाले इटालियन क्रांतीकारक आणि विचारवंत जोसेफ मॅझिनी त्यांच्या यंग इटली ह्या संस्थेच्या धर्तीवर हे नाव दिले गेले होते. सावरकरांनी पुण्यामध्ये इ.स. १९०५ साली विदेशी कापडांची होळी केली. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी ठेवलेली शिवाजी शिष्यवृत्ती मिळवून कायद्याच्या अभ्यासासाठी सावरकर लंडनला गेले. ही शिष्यवृत्ती त्यांना देण्यात यावी अशी सूचना स्वतः लोकमान्य टिळकांनी केली होती. लंडनमधील इंडिया हाऊसमध्ये राहात असताना सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे मराठी भाषांतर केले. ह्या भाषांतराला जोडलेल्या प्रस्तावनेत सावरकरांनी सशस्त्र क्रांतीचे तत्वज्ञान विषद केले होते. त्या काळातील अनेक युवकांना ही प्रस्तावना मुखोद्गत होती. लंडनमध्ये 'इंडिया हाऊस' मध्ये अभिनव भारताचे क्रांतीपर्व सुरू झाले. मदनलाल धिंग्रा हा सावरकरांचा पहिला हुतात्मा शिष्य! मदनलालने कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याचा वध करून, हसत-हसत फाशी स्वीकारली. त्याच काळात त्यांनी इतर देशांमधील क्रांतीकारकांशी संपर्क करून त्यांच्याकडून बॉम्ब तयार करण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले. ते तंत्रज्ञान व २२ ब्राऊनिंग पिस्तुले त्यांनी भारतात पाठवली. त्यापैकीच एका पिस्तुलाने नाशिकच्या कलेक्टर जॅकसन याचा वध अनंत कान्हेरे या १६ वर्षाच्या युवकाने केला. या प्रकरणात अनंत कान्हेरे, कृष्णाजी कर्वे व विनायक

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

देशपांडे या अभिनव भारताच्या ३ सदस्यांना फाशी झाली. कलेक्टर जॅक्सनचे जनतेवरील अन्याय वाढत होते, तसेच तो बाबाराव सावरकर (स्वातंत्र्यवीरांचे बंधू) यांच्या तुरुंगवासाला कारणीभूत ठरला होता म्हणूनच क्रांतीकारकांनी जॅक्सनला यमसदनास पाठवले.

इ.स. १८५७ मध्ये इंग्रजांविरुद्ध भारतात झालेल्या उठावाचा साधार इतिहास सावरकरांनी लिहिला. 'अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्यसमर' हा तो ग्रंथ होय. हा उठाव म्हणजे केवळ एक बंड होय. या इंग्रज इतिहासकाराचा निष्कर्ष सावरकरांनी साधार खोडून काढला. ब्रिटिश शासनाने हा ग्रंथ प्रकाशनापूर्वीच जप्त केला. पण सावरकरांच्या साथीदारांनी तो इंग्लंडच्या बाहेर प्रसिद्ध करण्यात यश मिळवले. ही त्या ग्रंथाची इंग्रजी आवृत्ती होती. मूळ मराठी ग्रंथाचे हस्तलिखित सावरकरांचे मित्र कुटिन्हो त्यांनी जपून ठेवले होते. ते भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रसिद्ध झाले.

राजद्रोहपर लिखाण प्रसिद्ध केल्याचा आरोप ठेऊन सावरकरांचे थोरले बंधू बाबाराव सावरकर यांना ब्रिटिश शासनाने जन्मठेपेची शिक्षा देऊन काळ्या पाण्यावर धाडले. ह्या घटनेचा प्रतिशोध म्हणून लंडनमध्ये मदनलाल धिंग्रा त्यांनी कर्झन वायलीला गोळ्या घातल्या तर नाशिक येथे अनंत कान्हेरे त्यांनी नाशिकचा जिल्हाधिकारी जॅक्सन ह्याला गोळ्या घालून ठार केले. नाशिकच्या ह्या प्रकरणात वापरण्यात आलेली ब्राउनिंग जातीची पिस्तुले सावरकरांनी चतुर्भुज अमीन ह्याच्याकरवी धाडली होती. ब्रिटिश सरकारला त्याबद्दल अटक केली. समुद्रमार्गाने त्यांना भारतात आणले जात असताना सावरकरांनी फ्रान्सच्या मार्सेलिस बंदराजवळ बोटीतून

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

उडी मारली (इ.स. १९१०) ब्रिटिशांच्या कैदेतून सुटून त्यांनी पोहत फ्रान्सच्या समुद्रकिनारा गाठला. पण किनाऱ्यावरील फ्रेंच रक्षकांना भाषेच्या समस्येमुळे सावरकरांचे म्हणणे कळले नाही. आणि ब्रिटिश सैनिकांनी त्यांना अटक करून भारतात आणले. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना दोन जन्मठेपांची - काळ्या - पाण्याची - शिक्षा (सुमारे ५० वर्षे अंदमानच्या तुरुंगात) ठोठावण्यात आली (इ.स. १९११) मार्सेलिस येथे उडी मारताना सावरकरांनी सखोल विचार केला होता. दोन देशांतील कैदी हस्तांतरण किंवा अन्य तत्सम करारांचा मुद्दा त्यांच्या मनात होता. फ्रान्सच्या भूमीवरून (त्या शासनाच्या परवानगीशिवाय) ब्रिटिश पोलीस त्यांना पकडू शकणार नाही. असा त्यांचा अंदाज होता. पण तसे घडले नाही.

## ग्रंथ आणि पुस्तक :-

वीर सावरकरांनी १०,००० पेक्षा जास्त पाने मराठी भाषेत तर १५०० हून जास्त पाने इंग्रजी भाषेत लिहिली आहेत. फारच थोड्या मराठी लेखकांनी इतके मौलिक लिखाण केले असेल. त्यांच्या "सागरा प्राण तळमळला", "हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा", "जयोस्तुते", "तानाजीचा पोवाडा" ह्या कविता प्रचंड लोकप्रिय आहेत.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

इतिहास :-

१८५७ चे स्वातंत्र्यसमर या ग्रंथाद्वारे (इ.स. १८५७ च्या युद्धाचा पहिले स्वातंत्र्यसमर असा उल्लेख करून तो लढा त्यांनी पहिल्यांदा भारतीय स्वातंत्र्य-लढ्यास) ला जोडला

* भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने
* हिंदुपदपादशाही

कथा :-

* सावरकरांच्या गोष्टी भाग-१
* सावरकरांच्या गोष्टी भाग-२

कादंबरी :-

* काळेपाणी
* मोपल्यांचे बंड अर्थात मला काय त्याचे मल्हार प्रॉडक्शन्सने या कादंबरीची ऑडियो आवृत्ती काढली आहे.

= आत्मचरित्रपर :-

FOR EDUCATIONAL USE

* माझी जन्मठेप
* शत्रूच्या शिबिरात
* अथांग (आत्मचरित्र पूर्वपीठिका)

हिंदुत्ववाद :-

* हिंदुत्व
* हिंदुराष्ट्र दर्शन
* हिंदुत्वाचे पंचप्राण

लेखसंग्रह :-

* गरमागरम चिवडा
* गांधी गोंधळ
* जात्युच्छेदक निबंध
* तेजस्वी तारे
* मॅझिनीच्या आत्मचरित्राची प्रस्तावना - अनुवादित
* लंडनची बातमीपत्रे
* विज्ञाननिष्ठ निबंध

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## हिंदू महासभेचे कार्य :-

रत्नागिरीत सावरकर सुमारे १३ वर्षे स्थानबद्धतेत होते. इ.स. १९३७ पासून सुमारे सात वर्षे, सावरकरांनी हिंदू महासभेचे अध्यक्षपद भूषविले असावाली दौरे, मोठमोठ्या सभा. हिंदूंची सैन्य भरती, रायफल क्लबची स्थापना अशा अनेक मार्गांनी त्यांनी हिंदू महासभेचे कार्य केले. त्यांनी आधुनिक विचारधाराप्रमाणे बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा यांची कास धरून हिंदू धर्मात सुधारणा करण्यासाठी लढा दिला।

## सावरकरांचे जात्युच्छेदन :-

अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानबद्ध केले [१९२४ जाने ६] हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत राहून कार्य केले. हिंदू समाजाच्या अधःपतनाला जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य [१९३० नोव्हें] जबाबदार आहे. हे सावरकरांनी लक्षात घेऊन त्या विरोधात काम केले. हिंदू धर्मात जातिव्यवस्थेचे, विषमतेचे समर्थन आहे. त्यामुळेच हिंदूसंघटन करण्यासाठी सावरकरांनी धर्मचिकित्सेची तलवार उपसली. आपल्या लेखनाने कोणी सनातनी दुखावेल याची चिंता न करता, अंधश्रद्धा, जातिभेद यांवर त्यांनी कडाडून टीका केली. स्वकीयांतील जातीयतवरपणा निर्भीड टीका केली.

FOR EDUCATIONAL USE

# सावरकर साहित्य :-

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या भाषाशैलीत प्रतिबिंबित झाले आहे. कवी, निबंधकार, जीवनदर्शन घडविणारा नाटककार, राजकीय व सामाजिक पार्श्वभूमीवर आधारित कादंबऱ्यांचे लेखक, ग्रंथकार, इतिहासकार भाषाशास्त्रज्ञ ही साहित्यिक सावरकरांची अनेकविध रूपे आहेत.

## गाय हा एक उपयुक्त पशु आहे.....

सावरकर

वीर सावरकरांचे या बाबतीत सणसणीत विचार आहेत. ते लिहितात... 'माणसृष्टीत जोवर मनुष्य आहे आणि गाय, बैल पशु आहे. तोवर माणसाने त्याच्याहून सर्व गुणांत हीन असलेल्या पशुस देव मानणे म्हणजे मनुष्यास पशुहून नीच मानण्यासारखे आहे. गाढवाने पाहिजे तर, त्याहून श्रेष्ठ पशु असलेल्या गाईस देव मानावे; मनुष्याने तसे मानण्याचा गाढवपणा करू नये. कोणत्याही गोष्टीत ती धर्म आहे असे पोथीत सांगितले आहे. म्हणूनच ती डोळे मिटून मानण्याची पोथीनिष्ठ आंधळी भावना आता सपाट्याने मावळत आहे आणि ती मावळत जावी हेच आता मनुष्याच्या प्रगतीस अत्यंत आवश्यक आहे.

अंजना कांबळे
द्वितीय वर्ष कला

Sundaram® FOR EDUCATIONAL USE

# अनुक्रमणिका


१. जडणघडण

२. अभ्यासक आणि संशोधक

३. अभ्यासू वकील आणि न्यायाधीश

# काशिनाथ त्र्यंबक तेलंग

## जडणघडण :-

### * बुद्धिमान, प्रतिभावान व कर्ता -

१९१३ मध्ये 'लोकशिक्षण' मासिकात 'महाराष्ट्रातील बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद' करणारा एक लेख इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी लिहिला होता. त्यापूर्वीच्या शंभर वर्षांतील कर्तृत्वान मराठी लोकांची एक यादी राजवाडे यांनी दिली आहे. या यादीमध्ये चिंतामणराव सांगलीकर, जयाजीराव शिंदे, सयाजीराव गायकवाड अशा अनेक संस्थानिकांचा, बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, भाऊ दाजी लाड, कृष्णशास्त्री आणि विष्णूशास्त्री चिपळूणकर, महादेव गोविंद रानडे,

रामकृष्ण गोपाळ भांडारकर, गोपाळ गणेश आगरकर आदी प्रबोधकांचा, बाळ गंगाधर टिळक, सर टी. माधवराव व दिनकरराव राजवाडे यांच्यासारखे मुत्सद्दी, नाना शंकरशेटसारखे द्रष्टे दानशूर, विठ्ठल रामजी शिंदे, नारायण गणेश चंदावरकर, धोंडो केशव कर्वे यांच्यासारखे समाजसुधारक तसेच काही इतिहासकार, वर्तमानपत्रकार, कोशकार आणि ग्रंथकार इत्यादींचा समावेश आहे. ही यादी तयार करण्याचा उद्देश्य आणि त्यासाठी राजवाडे यांनी मनाशी ठरवलेले निकष अगदी स्पष्ट आहेत. "व्यक्ति मात्राची थोरवी व कर्तृत्वशीलता जशी त्याच्या मज्जासामर्थ्यावर सर्वस्वी अवलंबून असते तद्वतच समाजाची थोरवी त्यातील बुद्धिमान, प्रतिभावान आणि कर्त्या माणसावरती असते. अर्थात, अशा यादीची उपयुक्तता समाजचारित्रजिज्ञासूंना अत्यावश्यक आहे, हे जाणून पुढील यादी केली आहे." असे राजवाडे यांनी प्रारंभीच लिहिले आहे. माणसाचे मोठेपण, समाजाला त्याचा किती उपयोग झाला, या मुख्य निकषावर राजवाडे यांनी मोजले आहे. एखादा माणूस मोठा बुद्धिमान किंवा प्रतिभावान असला; परंतु समाजाच्या उपयोगी तो यत्किंचितही पडला नाही, तर त्याची गणना समाजहितेच्छूंच्या मोजदादीत करता येणार नाही, असे त्यांचे मत आहे.

"भौतिक किंवा आत्मिक सृष्टीत शास्त्रीय शोध करून ज्या व्यक्ती समाजाचे हित करतात किंवा समाजातील कोट्यवधी व्यक्तींचे सुयंत्रण करून समाजाला पूर्ण पदाला नेण्याचा प्रयत्न करतात किंवा आपल्या साधुचरिताने समाजातील

सामान्य लोकांना नीतीचे, वर्तणुकीचे व धर्माचे स्वाध्य वळण घालून देतात किंवा श्रेष्ठ ध्येयाने, दूरदृष्टीने व करामतीने समाजाचे आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक शत्रुपासून संरक्षण करून त्याचे संगोपन, संवर्धन व प्रगती साधतात त्या पुढारी, बुद्धिमान व प्रतिभावान व्यक्तींना कर्तृत्ववान ही संज्ञा लावण्याचा सार्वत्रिक प्रघात आहे."

काशिनाथ त्र्यंबक तेलंग यांचा समावेश आहे. 'स्वल्प काम करून विराम पावणाऱ्या 'व्यक्तिंची नावे राजवाडे यांनी यादीमधून वगळली. तेलंग यांना अल्पायुष्य लाभले तरीही तेलंग यांचा समावेश त्यांनी समाजोपयोगी टिकाऊ काम करणाऱ्या लोकांमध्ये केला आहे, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. चिरस्थायी आणि भरीव कामगिरीच्या चाळणीतून गाळतागाळता राहिलेल्या त्रेचाळीस नावांबद्दल राजवाडे यांनी असे म्हटले आहे की," प्रायः ही नावे अशी राहिली आहेत की जगातील कोणत्याही भावी चरित्रकोशात यांपैकी बहुतेकांचा समावेश बिनतक्रार करता येईल."

तेलंग यांचा जन्म १८५० चा आणि १८९३ मध्ये त्यांचे निधन झाले. अवघ्या त्रेचाळीस वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. या छोट्याशा जीवन-काळात हिंदू कायद्याचे एक नामवंत तज्ज्ञ, मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले मराठी कायम न्यायाधीश, वक्ते, निबंधकार, संशोधक, सार्वजनिक संस्थांचे मार्गदर्शक, शिक्षणतज्ज्ञ, मुंबई 'विश्वविद्यालयाचे कुलगुरु आणि मुंबईच्या विधिमंडळाचे सदस्य अशा अनेक भूमिकांमध्ये आपले कर्तृत्व तेलंग यांनी

प्रसिद्ध केले. तेलंग यांचा जन्म होण्यापूर्वी बत्तीस वर्षे महाराष्ट्रातील मराठ्यांचे राज्य लयाला जाऊन इंग्रजी सत्तेचे निशाण - युनियन जॅक - फडकू लागले होते.

## नवे शिक्षण :-

मराठी राजवटीमध्ये ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याची असलेली प्रथा हळूहळू मोडून त्याच निधीतून प्रथम पुण्याला एक पाठशाळा १८२१ मध्ये स्थापन करण्यात आली. या शाळेत परंपरागत ज्ञानाबरोबरच नंतरच्या काळात इंग्रजी शिक्षणाचीही सोय झाली. दक्षिणा वाटण्याचे थांबवून त्या पैशातून उभारलेल्या दक्षिणाफंडातून १८५१ मध्ये 'दक्षिणा प्राईज कमिटी' अस्तित्वात आली. चांगले मराठी ग्रंथ आणि इंग्रजीतून आणि संस्कृतमधून मराठीत केलेले पुस्तकांचे अनुवाद यांना पारितोषिके देण्यात येऊ लागली.

→

* खिस्ती मिशनऱ्यांचे आगमन आणि हिंदू समाजचिकित्सा :-

१८१३ पासून भारतात प्रॉटेस्टन्ट मिशनऱ्यांना धर्मप्रसारासाठी येण्याला ब्रिटिश संसदेने मुभा दिली होती. बहुसंख्य धर्मांतरे हिंदू समाजाने अव्हेरलेल्या दलितांची असली तरी काही उच्चवर्णीय मानल्या जाणाऱ्या जातीतीलही होती. हरी रामचंद्र खिस्ती, नारायण शेषाद्री, रामकृष्ण विनायक मोडक, विष्णू भास्कर करमरकर, धनजीभाई नवरोजी, होरमसजी पेस्तनजी, भागोबा पवार अशा अनेकांची धर्मांतरे झाली.

बाळशास्त्री यांचे १८४६ मध्ये निधन झाले आणि महाराष्ट्रातील पहिला प्रबोधनकार काळाच्या पडद्याआड गेला. बाळशास्त्री यांनी एक उत्तम शिक्षक, संशोधक, धर्मसुधारक आणि पत्रकार म्हणून आपला ठसा उमटवला. त्यांच्याच विद्यार्थ्यांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात पुढे 'स्टुडंट्स लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी' स्थापन केली.

→

* ## काशिनाथपंत तेलंग :-

काशीनाथरावांचा जन्म ३० ऑगस्ट १८५० रोजी कृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी मुंबईमध्ये झाला. काशीनाथरावांच्या जन्मदात्या पित्याचे नाव बापूभाई. काशिनाथचे चुलते त्र्यंबकराव यांना मुलगा नसल्यामुळे त्यांनी काशीनाथला दत्तक घेतले. काशिनाथचे प्राथमिक शिक्षण एका गावठी शाळेत झाले. मराठी शिकत असतानाच त्याच्या असामान्य बुद्धिमतेची ओळख त्याच्या शिक्षकांना झाली होती. या काळात त्याला अनेक बक्षिसे मिळाली. त्यातील काही त्या वेळी शिक्षण- निरीक्षक असलेल्या आणि नंतरच्या काळात तेलंग यांचे ज्येष्ठ स्नेही बनलेल्या रावबहादूर विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या हातूनही मिळाली होती. (कर्नाटकी, १९२१, पृ. १२) वयाच्या नवव्या वर्षी एल्फिन्स्टन हायस्कुलात तेलंग यांनी प्रवेश घेतला. त्यांच्या सहाध्यायांपैकी एक होते श्रीपत बाबाजी ठाकूर. इंडियन सिव्हिल सर्व्हिस या सनदी सेवेसाठी निवड झालेले पहिले भारतीय म्हणून श्रीपत ठाकूर ज्ञात आहेत. ठाकुरांच्या मैत्रीमुळे तेलंग यांच्या मनात संस्कृत भाषेविषयी आवड निर्माण झाली. शाळेत शिकवले जाणारे संस्कृत अपुरे वाटल्यामुळे त्याला जोड देण्यासाठी या उभय मित्रांनी यज्ञेश्वर चिमणाजीशास्त्री सुतरकर यांचे मार्गदर्शन घेतले. त्यानंतर

संस्कृतप्रमाणेच इंग्रजी भाषेमध्येही तेलंग यांनी मिळवलेले प्रावीण्य वाखणण्यासारखे होते. शालेय जीवनातच रेनाल्ड्स, स्कॉट, डिकन्स आणि शेक्सपियर यांच्या वाङ्मयकृतींचे त्यांनी वाचन केले.

होते. १८६४ मध्ये एल्फिन्स्टन हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले.

## वाचनाचा व्यासंग :-

ग्रंथालयाच्या वाचनकक्षात ग्लॅडस्टनची ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्समधील भाषणे तेलंग वाचत असत. त्यांचे एक प्राध्यापक कॅण्डी कधी-कधी ही भाषणे मोठ्याने वाचून दाखवत. त्यांच्या वाचनशैलीचा थोडाफार परिणाम तेलंग यांच्या वक्तृत्वावर झाला असला पाहिजे. मनाची एकाग्रता वाढावी म्हणून भूमिती आणि बीजगणित यातील प्रमेये सोडवण्याचा व्यायाम ते करत. चिलिंगवर्थचे 'रिलिजन ऑफ प्रॉटेस्टन्ट्स' हे द्विखंडात्मक पुस्तक आणि जोवेटने संपादित केलेले प्लेटोचे संवाद त्यांनी विद्यार्थी जीवनात नुसतेच वाचले नाहीत तर यांची विस्तृत टिपणेही लिहून काढली.

→

## * अभ्यासक आणि संशोधक :-

### * संशोधनाचे प्रारंभिक धडे :-

तेलंग यांच्या मनामध्ये असलेली संशोधनाची आवड जोपासली जाण्याला निमित्त झाले ते एल्फिन्स्टन महाविद्यालयामधील एका संस्थेचे. एल्फिन्स्टन महाविद्यालय ही महाराष्ट्रातील नामवंत शिक्षणसंस्था. १८२८ मध्ये मुंबईचे गव्हर्नरपद सोडून देऊन माऊटस्टुअर्ट एल्फिन्स्टन इंग्लंडला परत गेल्यानंतर त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काही निधी गोळा करण्यात आला. त्यातून अगोदर 'एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट' नावाने हायस्कूलचे वर्ग सुरु करण्यात आले. नंतर १८ फेब्रुवारी १८३६ पासून एल्फिन्स्टन महाविद्यालय सुरु झाले.

'स्त्री-शिक्षणाचे महत्त्व' यासारख्या प्रचलित महत्त्वाच्या विषयापासून तो एखाद्या संशोधन पर विषयापर्यंत त्यामध्ये विविध विषय असत. १८६५ मध्ये काशिनाथ त्र्यंबक तेलंग यांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. थोड्याच दिवसात ते लिटररी सोसायटीच्या कार्यक्रमामध्ये नियमित भाग सोसायटीच्या सभेमध्ये निबंध वाचण्याला प्रारंभ केला.

## * शंकराचार्य चरित्र :-

१८८४ मध्ये इंडियन अँण्टीक्वेरी या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका निबंधात तेलंग यांनी शंकराचार्यांना काल निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचीन भारतीय व्यक्ती आणि त्यांच्या वाङ्मयकृती या दोन्हींचा काळ निश्चित करण्याचा प्रयत्न या व पुढील काळात अनेक भारतीय संशोधकांनी केलेला दिसतो. कालनिश्चिती ही त्या व्यक्तीच्या चरित्राच्या आणि वाङ्मयकृतीच्या आकलनासाठी महत्त्वाची गोष्ट तर असतेच शिवाय तिला आणखी एक परिणाम निर्माण झाले होते.

## * रामायणाचा लेखनकाल :-

२ सप्टेंबर १८७२ रोजी तेलंग यांनी स्टुडंटस लिटररी सोसायटीच्या सभेत 'Was the Ramayan Copied from Homer?' या शीर्षकाचा एक दीर्घ निबंध वाचला. होमरची 'इलिअड' आणि ओडीसी ' ही महाकाव्ये इ. स. पूर्व आठव्या शतकात रचली गेल्याचे मानले जाते. डॉ. वेबर या जर्मन संशोधकाने रामायणाचा लेखनकाल खिस्त शतकाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या शतकातील असावा असे मत व्यक्त केले होते.

# अभ्यासू वकील आणि न्यायाधीश :-

## उच्च न्यायालयांच्या स्थापनेपूर्वीची न्यायव्यवस्था :-

काशीनाथपंत तेलंग १८७२ मध्ये ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण होऊन मुंबई उच्च न्यायालयात वकीली करू लागले तेव्हा ते अवघ्या बावीस वर्षांचे तरूण होते. ज्या उच्च न्यायालयात त्यांनी वकीलीला प्रारंभ केला होता ते स्थापन होऊन अवघी दहा वर्षे झाली होती. मुंबईमध्ये ब्रिटीशांनी स्थापन केलेले पहिले न्यायालय ८ ऑगस्ट १८६२ ला सुरु झाले.

→

* ## महत्त्वाचे खटले :-

ज्या खटल्याने तेलंग यांचे नाव सर्वत्र प्रसिद्ध झाले आणि ते न्यायालयात सर्वांचा आदराचा विषय झाले तो खटला म्हणजे 'लल्लूभाई बापूभाई वि. मानकुवरबाई. (इंडियन लॉ रिपोर्ट १८८७, पृ. ३८८), मृत्युपत्राद्वारे आपल्या स्वकष्टार्जित इस्टेटीची विल्हेवाट लावण्याचा अधिकार इंग्लंड-प्रमाणे भारतातील व्यक्तींनाही आहे. परंतु दोन्ही कायद्यामधील तत्त्वे पूर्णपणे समान नाहीत. आपल्या काही इस्टेटीची मृत्युनंतरची व्यवस्था नोंदवली आणि काही बाबतीत मृत्युपत्रात उल्लेखच केला नाही तर उल्लेख न केलेल्या मालमत्तेच्या वारसा-हक्कातून ज्यांना काही संपत्ती दिली त्या उल्लेखित वारसांना वगळले, असा त्याचा अर्थ हिंदू कायद्यात होत नाही.

प्रकाश खराल

द्वितीय वर्ष कला

*==* THE END *==*

Date :

# प्रकाशकीय.

आजच्या आधुनिक महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करणाऱ्या ६१ लोकश्रेणींच्या व्यक्तित्व, चरित्र आणि कर्तृत्वाची गाथा या चरित्र ग्रंथमालेच्या रूपाने जनताजनार्दनाच्या चरणी सादर करताना मनस्वी समाधान वाटते आहे.

श्री गंधर्व-वेद प्रकाशनांची प्रकाशने प्रामुख्याने विद्यार्थी व शिक्षकवर्गाला उपयुक्त ठरतील अशी असतात. संदर्भमूल्य असणारी पुस्तके प्रकाशित करण्याचे वेगळेपण आम्ही सुरुवातीपासूनच शक्यतो जपत आलेलो आहोत. महाराष्ट्र राज्य निर्मितीचा सुवर्ण महोत्सव अभिनव पद्धतीने साजरा करण्यासाठी आगामी पिढ्यांतील विद्यार्थी, शिक्षक तसेच सर्व मराठी भाषक जिज्ञासू वाचकांना उपयुक्त ठरेल असा कोणता एखादा ग्रंथनिर्मिती प्रकल्प आपल्या प्रकाशनातर्फे हाती घ्यावा याबाबतचे विचारचक्र २००५ पासूनच मनात घोळत होते. महाराष्ट्रातील सार्वकालीन महत्त्वाच्या अशा 'बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या' ४३ व्यक्तींची यादी दिलेली आहे. त्या सर्व व्यक्ती इसवी सन १८८३ ते १९१३ या कालखंडातील म्हणजेच एकोणिसाव्या शतकातील आहेत असे लक्षात आले. याच धर्तीवर, १९१४ ते २००५ या कालखंडातील लोकोत्तर व्यक्तिमत्वांची गणना करून ती सूची अद्यावत का बनवू नये, असा विचार मनात चमकून गेला. पटकन आठवणाऱ्या नावांची यादी केली, तेव्हा ८०-९० नावे पुढे आली.

यादी तर तयार झाली. या यादीतील कित्येक नावे आजच्या पिढ्यांच्या केवळ कानावरूनच गेलेली आहेत, हे त्या यादीवर नजर टाकताच प्रकर्षाने जाणवले.

SAMRAT Where Quality Rules

Date :

# चरित्राविषयी थोडे काही.

काही पुस्तके आयुष्यात सोबती म्हणून प्रवेश करतात. आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यांवर ती तुम्हाला जगण्याची ऊर्जा आणि प्रत्येक वेळी वेगळी अनुभूती देत असतात. माझ्या सतत बरोबर राहिलेल्या पुस्तकांपैकी एक म्हणजे रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी.'

लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे' चा विलक्षण ठसा मनावर उमटलेला असताना 'आठवणी' माझ्या हातात आले. स्मृतिचित्रेच्या अगदी विरुद्ध, तरीही हे पुस्तक मनाला खोलवर जाऊन पोचले आणि त्याची पारायणे झाली. वाढते वय, शिक्षण आणि अनुभव यामुळे प्रत्येक वाचनातून हे पुस्तक नव्याने उलगडत गेले.

देशाच्या विविध प्रांतांतून आलेल्या वसतिगृहातील मुलींबरोबर साधलेल्या संवादातून अंगावर शहारे उमटत. घरातून असलेला शिक्षणाला विरोध, जबरदस्तीने लहान वयात लावलेले लग्न, हुंडा, होत असलेली मारहाण, उपासमार आदी गोष्टी विसाव्या शतकातही सहजपणे चाललेल्या होत्या. माझ्याच वयाच्या त्या मुलींच्या कथा ऐकून मी प्रत्येक वेळी रानडे, गोखले, टिळक, आगरकर यांच्यासारख्या समाजसुधारकांनी घडवलेल्या महाराष्ट्रामध्ये जन्माला आल्याबद्दल देवाचे आभार मानत असे.

SAMRAT Where Quality Rules

Date :

नमस्कार - चमत्कार झाल्यानंतर टिकेकरसरांनी, तू रमाबाई रानड्यांचे चरित्र लिहिशील का ? अशी प्रश्नवजा सूचना केली नाही म्हणण्याची इच्छा अथवा संधी दोन्ही गोष्टी शक्य नसल्याने, हो म्हणण्याशिवाय गत्यंतर नव्हते. आणि मग पद्धशीर वाचनाचा प्रवास सुरु झाला. प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर टिकेकरसर होतेच. पुस्तकाच्या आराखड्याची चर्चा करताना, त्याची प्रकरणे ठरवताना त्या कालखंडाबद्दल विचार करताना, संदर्भ शोधताना.... नेहमीप्रमाणे त्यांनी त्यांचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह मला खुला केला. वाचन संपले तरी कागदावर एकही ओळ उमटत नव्हती. अशा वेळी एका अस्वस्थ क्षणी मी पुस्तक सोडण्याचा निर्णय घेतला.

माझी सर्व गाऱ्हाणी टिकेकरसरांनी शांतपणे ऐकून घेतली व "Madhavi, itbe high time that you should have your book in the market." या एका वाक्यात संभाषण संपवलं. पण ते एकच निर्णायक वाक्य मला प्रेरणा देऊन गेले. आणि मग मला मागे वळून पाहावे लागले नाही. त्यांच्या हाती हस्तलिखित सोपवल्यावर, नंतरच्या काही बेचैन दिवसांची सांगता टिकेकरसरांच्या मोजक्या पण सकारात्मक शब्दात झाली आणि हा प्रकल्प हाती घेतल्याचा खरा आनंद मिळाला. हा एक नितांत सुंदर, समाधानी, आनंददायी प्रवास टिकेकरसरांमुळेच घडला.

SAMRAT
Where Quality Rules

# पूर्वायुष्य

कोणत्याही समाजामध्ये स्त्रियांचे स्थान हे त्या समाजाचा झालेला विकास दर्शवित असते. त्यामुळे असे म्हटले जाते की, समाजामध्ये स्त्रियांची जेवढी उन्नती झालेली असते, त्याच प्रमाणात त्या समाजाची प्रगती होते.

हिंदुस्थानावर झालेल्या परकीय आक्रमणांमुळे येथील स्त्रियांचा दर्जा धीम्या गतीने परंतु अधिकाधिक खालवत गेला. त्याचाच परिणाम म्हणजे स्त्री भ्रूणहत्या, बालविवाह, पडदा पद्धत, स्त्री शिक्षणावर बंदी इत्यादी अनिष्ट रुढी, प्रथा समाजात वाढत गेल्या. हळूहळू स्त्रियांचे समाजातील स्थान दुय्यम होत गेले. आणि त्यांचे अधिकार कमी होत गेले. याला महाराष्ट्रही अपवाद नव्हता.

१८१८ मध्ये शेवटचा पेशवा दुसऱ्या बाजीरावाच्या पराभवानंतर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे हिंदुस्थानातील स्थान बळकट झाले. त्यांनी आपल्या राजवटीच्या प्रारंभीच्या काळात आपले संपूर्ण लक्ष सत्ता दृढ करण्याकडे दिले. परिणामी, या कालखंडात कोणत्याही प्रकारच्या सुधारणांचा विचार झाला नाही.

नंतर मात्र मुंबई इलाख्याचा गव्हर्नर माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन याने मुंबई इलाख्यामध्ये

Date :

इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्यात पुढाकार घेतला. १८२१ मध्ये एल्फिन्स्टनने पुण्यामध्ये 'हिंदू कॉलेज' ची स्थापना केली. त्याने मुंबईतील काही प्रतिष्ठित नागरिकांना बॉम्बे नेटिव्ह स्कूल आणि स्कूल बुक्स सोसायटी या दोन स्वतंत्र संस्था स्थापना करण्यास मदत केली. कालांतराने स्कूल बुक्स सोसायटी ही बाम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी या नावाने ओळखली जाऊ लागली.

१ १८२४ मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीने एल्फिन्स्टनच्या अध्यक्षतेखाली मुंबई शहरात इंग्रजी शाळा उघडली; जी पुढे ~~स~~ एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन आणि नंतर एल्फिन्स्टन कॉलेज म्हणून नावारुपाला आली.

१८३५ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने इंग्रजी साहित्य आणि विज्ञान शाखेतील काही विषयांचे ज्ञान इंग्रजी भाषेतून देण्याचा निर्णय घेतला. या अतिशय महत्त्वाच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम दिसून येऊ लागले.

एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात मुंबई इलाख्यात समाजसुधारणेचे वारे वाहू लागले. आणि महाराष्ट्रामध्ये समाजसुधारकांची एक संपूर्ण मांदियाळीच जन्माला आली.

SAMRAT
Where Quality Rules

Date :

# बालपण आणि विवाह

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि रमाबाई या दांपत्याचे नाव एकोणिसाव्या शतकातील आदर्श सहजीवनाचे उदाहरण म्हणून घेतले जाते. रमाबाई यांनी लिहिलेल्या, 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी न्यायमूर्ती रानडे आणि रमाबाई यांच्या सहजीवनाविषयी अत्यंत उत्कट उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "पाश्चात्य समाजात पुष्कळ कुटुंबात पतिपत्नीमध्ये पराकाष्ठेचे प्रेम आढळते.

रमाबाईंचे माहेर सातारा जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील मौजे देवराष्ट्रे. त्यांचा जन्म २५ जानेवारी १८६२ रोजी झाला. त्यांचे माहेरचे नाव यमुना कुर्लेकर

SAMRAT
Where Quality Rules

Date :

कुळेकर घराणे हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील नेवरे गावचे. बाळंभट चिपोळकर हे त्यांचे मूळ पुरुष. परंतु देशावर स्थलांतर केल्यावर ते प्रथम औंधजवळ राजाचे कुळे या गावी राहिल्याने त्यांचे उपनाम कुळेकर पडले. बाळंभटांच्या बाजीपंत व माणकोपंत या दोन्ही मुलांनी पुण्यास स्थलांतर केले आणि पेशव्यांच्या काळात तलवार गाजवून इनामे संपादन केली. दोघेही बंधू लढाईत कामी आल्याने कुळेकर घराणे चारित्र्य, पराक्रम आणि खानदानीपणा आणि प्रसिद्ध झाले.

बंधुद्वयांपैकी वडील बंधू बाजीपंत यांचे पुत्र गणपतरावभाऊ हे रमाबाईंचे सख्खे पणजे. तेही आपल्या वडिलांप्रमाणेच लढवय्ये होते. त्यांच्या आणि सांगलीचे संस्थानिक पटवर्धन यांच्या ऋणानुबंध असल्याने, चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन यांनी आपली बहीण गणपतरावभाऊंना दिली होती. गणपतरावभाऊंचे एकुलते एक पुत्र माणिकरावबाबा यांनी कुळेकर घराण्याच्या पराक्रमात भर घातली नसली तरी इनामे व्यवस्थित सांभाळली होती. त्यांच्या चार पुत्रांपैकी माधवराव ऊर्फ अण्णाभाऊ हे रमाबाईंचे वडील. त्यांना सात अपत्ये होती. पैकी रमाबाई ही त्यांचे सर्वात धाकटे अपत्य.

अण्णासाहेबांच्या पत्नी मिरजचे प्रख्यात राजवैद्य राघोपंत करमरकर यांची कन्या होती. त्यांनी आपल्या वडिलांकडून वैद्यकीय वारसा मिळाला होता.

Date :

त्या स्वत: औषधे तयार करून लोकांना देत. त्यांच्या औषधाला चांगला गुण असल्याने आसपासच्या खेड्यांतील लोक मोठ्या श्रद्धेने त्यांच्याकडे येत. त्या सर्वांना आपल्या खर्चाने औषध करून देत, तसेच अतिशय गरीब रोग्यांना देवडीवर ठेऊन घेऊन त्यांची सेवाही करत. वेळी-अवेळी केव्हाही रोगी आले, तरी त्या त्यांचे औषधपाणी करत असत.

रमाबाई यांची आई मायाळू, सोशिक आणि शिस्त होती. पतीचा तापट, करारी स्वभाव सहन करून त्यांनी आपल्या स्वभावाने आणि वागणुकीने घरातील वातावरण प्रसन्न ठेवले. बायकांच्या देव व गुरू सर्व काही पतीच आहे, अशी त्यांची ठाम समजूत होती.

आपल्या मुलांशीही त्या मोकळेपणाने व मैत्रिणीच्या नात्याने वागत आणि त्यांना पुराणातील देवादिकांच्या कथा सांगत. त्यांच्या या कथा-कहाण्यांची घरात थोडी फार थट्टा होत असे. तरीही रमाबाई यांच्या आईने त्यांचा नेम सोडला नाही. चांगले पेरले, तर चांगले उगवते यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्या या व्यक्तिमहत्त्वाचा मोठाच प्रभाव रमाबाई यांच्यावर होता.

त्या काळातील परिस्थिती लक्षात घेता रमाबाई यांच्या आईला रोग्यांचे औषधपाणी व सेवा करण्याचे स्वातंत्र्य होते. असे असले तरी हेच कर्तेकार घराणे सनातनी प्रकारात मोडणारे होते. घरातील स्त्रिया, मोठ्या मुलींना ओटीवर येण्यास मनाई होती. रमाबाई यांच्या एका आज्याला लिहिणे-वाचणे शिकवले होते. त्या व्यंकटेशस्तोत्र वाचत. पण पुढे त्यांना वैधव्य आल्याने शिक्षणाच्या संबंध या अशुभ गोष्टीशी जोडण्यात आला.

Date :

परिणामी, रमाबाई यांच्या घरामध्येच स्त्रियांकरता लिहिणे-वाचणे जणू निषिद्धच झाले. त्यामुळे त्यांच्या घरामधील सर्व स्त्रियांना लिहिण्या वाचण्याचा गंधही नव्हता. त्यामुळे लग्नाच्या वेळेपर्यंत रमाबाईंना अक्षरओळखही झालेली नव्हती. न्यायमूर्ती रानडे यांचे नाव जरी महादेव असले तरी माधवराव म्हणूनच ते परिचित होते.

रानडे यांचे गाव मोभार पाचेरी ऊर्फ पाचेरिसडा. रत्नागिरी जिल्ह्यात गुहागरनजीक हे गाव आहे. माधवरावांचे आजोबा अमृतरावतात्या हे पुणे व नगर जिल्ह्यातील तालुक्यात मामलेदार होते. त्यांना चार पुत्र होते. थोरले बळवंतराव, दुसरे गोविंदराव म्हणजेच माधवरावांचे वडील, तिसरे गोपाळराव आणि चौथे विष्णुपंत.

माधवरावांचा जन्म १८ जानेवारी १८४२ रोजी नाशिक जिल्ह्यात निफाड येथे झाला. माधवराव जन्माला आले तेव्हा त्यांचे वडील गोविंदराव अहमदनगर जिल्ह्यातील दुय्यम कलेक्टरच्या हाताखाली सामान्य कारकून होते.

१८५४ मध्ये म्हणजेच वयाच्या तेराव्या वर्षी माधव-रावांचा पहिला विवाह मोरोपंत दांडेकर यांच्या मुलीशी, सखूशी झाला. विवाहनंतर सखूचे नाव 'रमा' असे ठेवण्यात आले.

माधवरावांचे बालपण कोल्हापूरला गेले. त्यांचे इंग्रजी शाळेतील शिक्षण कोल्हापूरलाच झाले. १८५६ मध्ये माधवरावांनी इंग्रजी शाळेतील अभ्यास चार वर्षांत पुरा केला. १८५६ मध्ये माधवरावांना शिक्षणासाठी मुंबईस पाठवले

मुंबईला आल्यावर माधवरावांनी एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. एका वर्षामध्ये त्यांनी हायस्कूलचा अभ्यास संपवला आणि १८५८ मध्ये त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. १८५९ मध्ये माधवरावांनी मॅट्रिक्युलेशनची परिक्षा दिली १८६२ मध्ये ते बी.ए. परिक्षा इतिहास व अर्थशास्त्र या विषयांमध्ये प्रथम क्रमांकाने प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. बॉम्बे युनिव्हर्सिटीतून पदवी घेतलेल्या पहिल्या चार मानकऱ्यांमध्ये माधवराव होते. ऑनर्सच्या परीक्षेत ते दुसऱ्या वर्गात पास झाले. त्यांनी एम.ए.ची पदवी ऑनर्ससह अग्रक्रमाने पटकावली. पुढे एलएल.बी. या परिक्षेतही त्यांच्या यशाची पुनरावृत्ती झाली.

१८६८ ते १८७१ या कालखंडात माधवराव एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्रोफेसर झाले. १८७१ मध्ये त्यांची नेमणूक पुण्याला फर्स्टक्लास सबजज्ज म्हणून झाली आणि विद्यादान की न्यायदान हा त्यांचा प्रश्न कायमचा सुटला. त्या वेळी त्यांच्याजवळ त्यांची प्रथम पत्नी रमा, दुर्गाक्का व इतर आप्त राहात होते.

माधवरावांचे अलौकिक कर्तृत्व व वैभव यांचा आनंद त्यांच्या प्रथम पत्नीस फार काळ उपभोगता आला नाही. १८७३ मध्ये तिचे जीर्ण ज्वराने निधन झाले. गोविंदरावांनी माधवरावांचे लग्न एखाद्या कुमारिकेशी करण्यासाठी कंबर कसली. तिथे त्यांनी माधवरावांसाठी दररोज मुली पाहण्याचा सपाटा लावला. याच सुमारास अण्णासाहेब कुर्लेकर आपली मुलगी यमुना हिच्याकरता स्थळ पाहण्यासाठी पुण्यात आले होते. माधवरावांचे वय एकतीस तर यमुना अकरा वर्षांची होती. पण त्या काळी मुलींचे विवाह नवव्या-दहाव्या वर्षीच होत.

अण्णासाहेबांनी आपल्या इतर मुलींचे विवाहही सुप्रसिद्ध आणि सुखवस्तू घरांमध्ये केले होते. त्यामुळे अण्णासाहेबांना आपल्या मुलीसाठी माधवराव यांचे स्थळ आकर्षक वाटले. डिसेंबर १८७३ मध्ये मार्गशीर्ष एकादशीस गोरज मुहूर्तावर माधवराव व यमुना कुर्लेकर यांचा विवाह झाला. विवाह प्रसंगी कोणतेही लौकिक विधी अथवा समारंभाचे आयोजन करण्यात आले नव्हते. इतकेच नव्हे तर लग्नाच्या दिवशी माधवरावांनी रजाही घेतली नव्हती. नेहमीप्रमाणे ते सकाळी कोर्टात गेले. मात्र संध्याकाळी फिरायला किंवा लायबरीत न जाता ते श्वशुरघरी गेले. लग्न आटोपल्यावर सासुरवाडीस जेवणखाण न घेता माधवराव आपल्या द्वितीय पत्नीसह पायी चालत घरी आले. लग्नानंतर माधवरावांनी आपल्या द्वितीय पत्नीचे नावही 'रमा' असेच ठेवले.

# वैवाहिक जीवन

लग्नानंतर पहिल्या भेटीतच माधवरावांचे संपूर्ण नाव, हुद्दा वगैरे माहिती न लाजता माधवरावांना सांगितली. त्यामुळे रमाबाई तरतरीत व धीट आहेत, हे माधवरावांच्या लक्षात आले. रमाबाईंना लिहिता-वाचता येते का अशी चौकशी केली असता त्यांना अजिबातच अक्षरओळख नाही, हे माधवरावांना समजले. त्या वेळी माधवराव आणि रमाबाई यांचे शिक्षण तसेच सामाजिक-राजकीय जाणिवेत महदंतर होते. माधवराव त्या संध्याकाळी निरक्षर रमाबाई उभ्या होत्या. तरीही माधवराव डगमगले नाहीत. त्यांनी आपल्या अक्षरशून्य पत्नीस शिकवण्याचा निश्चय केला. १८७५ पर्यंत रमाबाईंनी पाचव्या इयत्तेच्या अभ्यासापर्यंत मजल मारली. त्यानंतर रमाबाई यांच्या पुढील अभ्यासाची जबाबदारी पुनःश्च माधवरावांनी घेतली.

रमाबाईंच्या पाचव्या इयत्तेपर्यंतचा अभ्यास पुरा झाल्यावर माधवराव रमाबाईंकडून रोजची वर्तमानपत्रेही वाचून घेत. माधवरावांचा व्यासंग बहुत विविध विषयांवरील. दक्षिणा प्राइझ कमिटीची पुस्तके अभि= प्रायाकरता त्यांच्याकडे येत. रमाबाईंना इतरही विषयांचे ज्ञान व्हावे म्हणून माधवराव ती पुस्तके रमाबाईंकडून वाचून घेत. वाचन सुरु असताना मजकुरात आवश्यक त्या दुरुस्त्या सुचवत.

Date :

पुस्तकांचे मूल्यमापन करत आणि आपल्या अभिप्रायासह सरकारकडे पाठवत या प्रक्रियेमुळे रमाबाईंना पुस्तकाचा विषय व त्यावरील माधवरावांचे विचार समजून येत. माधवराव रमाबाईंनाही त्या विषयावर विचार करायला सुचवत. विविध अहवाल व नियतकालिकांचे वाचनही रमाबाईंकडून करून घेण्यात येत असे.

अशा प्रकारे रमाबाईंचा विविधांगी विकास होत होता. एका अद्वितीय पुरुषाची पत्नी व शिष्या होण्याचे भाग्य लाभल्याने रमाबाई यांच्या मूळच्या तल्लख बुद्धीला खतपाणी मिळाले आणि त्यांचे कर्तृत्व फुलू लागले. रमाबाईंना आपणही इंग्रजी शिकावे असे वाटू लागले. रमाबाई यांच्या धिटाईचे माधवरावांना अतिशय कौतुक वाटले आणि त्यांनी रमाबाईंना इंग्रजी शिकवण्याची जबाबदारी घेतली. रोज रात्री रमाबाईंची इंग्रजीची शिकवणी सुरु झाली. सासरी कितीही जाच असला तरी तो सहन करून सासरच्या मंडळींशी जुळवून घेतली पाहिजे असे प्रत्येक मुलीच्या आईवडिलांना वाटे. त्यामुळे कितीही त्रास झाला तरी तो सोसणे व कुरतडरे न करणे तसेच नवऱ्यास चहाडी न सांगणे हे तत्त्व रमाबाईंनी निष्ठेने पाळले. पुण्यात असताना स्वयंपाक करण्याची सवय रमाबाईंना नसल्याने त्यांची अतिशय धांदल उडे व मनाचा गोंधळ होई. त्यामुळे स्वयंपाकात उणिवा राहून जात. जेवण अळणी वा खारट होई.

घरातील व्यवस्था सुरळीत लागल्यावर माधवरावांनी रमाबाईंना दररोज होणाऱ्या घरखर्चाचा हिशोब मांडून ठेवण्यास सांगितले. घरातील व्यवस्था सुरळीत लागल्यावर माधवरावांनी रमाबाईंना दररोज होणाऱ्या घरखर्चाचा हिशोब मांडून ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे रमाबाई रोजच्या रोज खर्च लिहून ठेवीत. परंतु बेरीज-वजाबाकी यात चूक होत असल्याने शिलकीत मेळ बसत नसे. हिशोब जुळवताना रमाबाईंचा बराच वेळ खर्च होत असे आणि रोजचा नेमून दिलेला अभ्यास होत नसे. हे माधवरावांच्या लक्षात आल्यावर त्यांनी रोज रात्री रमाबाईंनी लिहिलेली जमाखर्चाची वही पाहण्यास सुरुवात केली. त्यातील झालेली चूक ते रमाबाईंना नीट समजावून देत. रमाबाईंना जमाखर्च लिहिणे नीट जमू लागल्यावर मग ते महिनाअखेरीस कीर्दवहीची पाहणी करत.

Date :

# वैवाहिक जीवनाची अखेर

मुंबईला आल्यावर रानडे दांपत्याचा पहिला महिना सर्व नव्या-जुन्या मित्रमंडळींना भेटण्यात आणि घराची व्यवस्था लावण्यात गेला. दहा-बारा दिवस केलेल्या अतिश्रमामुळे त्या रात्री नित्याची स्पैझम जास्त जोरात आली व फार वेळ टिकली. अतिशय थकवा येऊनही माधवरावांना झोप लागली नाही. प्रकारकी माधवरावांच्या छातीतून कळा येऊ लागल्या. त्या कमी व्हाव्यात म्हणून रमाबाईंनी घरगुती उपाय करून पाहिले, तरी रात्रभर माधवरावांना उतार पडला नाही. शेवटी पहाटे कळा बंद होऊन त्यांना झोप लागली. सकाळी रमाबाईंनी डॉ. भालचंद्र भाटवडेकरांना बोलावणे पाठवले.

माधवराव लोणावळ्याला राहून आले. या खेपेला लोणावळ्याला त्यांच्या मुक्काम अवघ्या दहा दिवसांचा होता. दिवसेंदिवस त्यांच्या आजाराची तीव्रता वाढत होती. माधवरावांच्या दुखण्याची भीती उभयतांना वाटत होती. बाहेरून उसना धीर आणून आपल्याला काळजी वाटत नाही.

Page No.
Date

रात्री सव्वापहाटच्या सुमारास माधवरावांच्या छातीमध्ये दुखायला आले. रमाबाईंनी आबांना सांगून तातडीने डॉ. भालचंद्र भाटवडेकरांना तसेच शेजारी राहणाऱ्या डॉक्टराला बोलावले. रमाबाई आपले मन स्थिर ठेवून तेल चोळणे, ऊन पाण्याने छाती शेकणे औषधाच्या गोळीचा वास देणे, वैगेरे उपाय करत होत्या तेवढ्यात शेजारचे डॉक्टर आले. माधवरावांचा मृत्यू जवळ आलेला आहे, हे त्यांनी ओळखले. इतक्यात रक्ताची वांती होऊन माधवरावांचे प्राणोत्क्रमण झाले.

माधवरावांच्या घरात एकच हाहाकार उडाला. घरातील सर्वांवर आभाळ कोसळले. सर्व हिंदुस्थानावर पसरलेले माधवरावांचे आप्त, स्नेही, सहकारी अनुयायी या सर्वांना तारा गेल्या. १७ जानेवारी १९०१ रोजी सकाळी वैदिक धर्म व प्रार्थना समाजाच्या रीतीनुसार अंत्यविधी करण्यात आला. त्यानंतर तीन दिवसांनी प्रयाग येथे त्रिवेणी संगमावर अस्थिविसर्जन करण्यात आल. हिंदुस्थानातील कानाकोपऱ्यातून दुखवट्याच्या तारा धाडण्यात आल्या. हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यामधून असंख्य शोकसंदेश आले आणि शोकसभा भरवण्यात आल्या. अशा प्रकारे माधवराव आणि रमाबाईंचे २७ वर्षांचे अतिशय समृद्ध वैवाहिक जीवन १६ जानेवारी १९०१ रोजी माधवरावांच्या निधनाने संपुष्टात आले.

# समाजकारणास प्रारंभ.

माधवरावांचे १६ जानेवारी १९०१ला निधन झाल्यावर रानडे कुटुंबीय मुंबईतील बिऱ्हाड मोडून पुण्याला राहायला गेले. सुरुवातीचा बराच काळ रमाबाई माडीवर आपल्या खोलीतच असत. रमाबाईंचे कार्य आणि कर्तृत्व यांना खऱ्या अर्थाने गती मिळाली, ती माधवरावांच्या निधनानंतर. या एका वर्षाचे एकाएकीपणाने रमाबाईंनी एक महत्त्वाचे काम केले. ते म्हणजे माधवरावांनी निरनिराळ्या वर्षी प्रार्थना समाजात जे धर्मसंबंधी उपदेश केले होते आणि जी व्याख्याने दिली होती. ती त्यांनी एकत्र केली. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांच्या साहाय्याने रमाबाईंनी सर्व साहित्य जमवले; स्वतः वाचले; तपासले आणि 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची धर्मपर व्याख्याने' या नावाने हा संग्रह त्यांनी माधवरावांच्या प्रथम वर्षश्राद्धाच्या तिथीस ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला.

माधवराव यांच्या निधनानंतर, रमाबाई यांनी आपल्या उर्वरित आयुष्यात माधवराव यांच्या विचारांस कार्यास आणि यांच्या ध्येयास अनुसरुन, समाज-सुधारणेच्या कार्यास वाहून घेतले. समाजसुधारणेच्या प्रारंभ रमाबाईंनी स्वत: पासूनच केला आणि तो म्हणजे माधवराव यांच्या निधनानंतर, रमाबाई यांनी केशवपन केले नाही. त्या वेळी समाजात सर्वत्र चालत आलेल्या, तसेच त्यांच्या सासरी व माहेरी पाळल्या जाणाऱ्या या अनिष्ट रुढीचा रमाबाईंनी धैर्याने आणि निर्धाराने त्याग केला.

मध्ये रमाबाईंनी पुण्यातील आपल्या वाड्यात
'हिंदू १९०२ लेडीज सोशल क्लब' ही हिंदू स्त्रियांची
संस्था स्थापन केली. यात त्यांना आनंदीबाई
भट यांचे सहकार्य लाभले. या संस्थेचा उद्देश
स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसार करून, सामाजिक कर्तव्याची
जाणीव उत्पन्न करणे हा होता. भिन्नभिन्न जातीधर्मांच्या
स्त्रिया एकत्र जमत असत. क्लबमध्ये धार्मिक, ग्रंथवाचन
शिवणकाम, फर्स्ट-एड यांचे वर्गही सुरु करण्यात आले.
मृत्यूपत्रात माधवरावांनी आपल्या सावत्र भावाचा-नीलकंठचा
-मुलगा नारायण ऊर्फ नानू याला दत्तक घेण्याबाबतही
लिहून ठेवले होते. त्याला दत्तक जन्मापासून त्याला रमाबाई-
नीच आपल्या मुलाप्रमाणे सांभाळले होते. तो एकवीस
वर्षांचा होईपर्यंत त्याचे पालकत्व रमाबाईंनी स्वीकारले,
या संदर्भात रमाबाई यांच्या हितचिंतकांनी जरी
त्यांना वेगळा सल्ला देण्याचा प्रयत्न केला, तरी माधवरावांच्या
इच्छेला मान देऊन रमाबाईंनी नानूला १९ मार्च १९०२
रोजी दत्तक घेतले आणि त्याच दिवशी त्यांची मंजुरी केली.
मनुष्याने केलेले कायदे - नियम यांपेक्षाही श्रेष्ठ एक
शाश्वत धर्म आहे. त्याचे अधिष्ठान न्याय, समता, दया
व अनुकंपा आहे. त्या न्यायमूर्तींच्या विचारांशी
रमाबाई पूर्णपणे एकरूप झाल्या होत्या. त्यामुळे १९०४
पासून आयुष्याच्या अखेरपर्यंत वीस वर्षे रमाबाईंनी
या भेटी कायम ठेवल्या. माधवरावांच्या निधनानंतर
पाहिल्यांदाच रमाबाई लोकांच्या समोर येत.
रमाबाईंनी मुंबईत हिंदू लेडिज सोशल क्लबची
स्थापना केली. १९०८ मध्ये मुंबईत 'चंदारामजी
गर्ल्स हायस्कूल'चे उद्घाटन रमाबाई यांच्या हस्ते झाले.

# सेवासदन

१९०४ मध्ये 'आदय भारत महिला परिषदेच्या व्यासपीठा-वरून आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये रमाबाईंनी स्त्रियांनी सुशिक्षित होऊन समाजहिताची व परोपकाराची कार्ये घ्यावी. ११ जुलै १९०८ रोजी सेवासदनची स्थापना मुंबईमध्ये झाली. संस्थेसाठी सल्लागार समिती, एंडॉवमेंट व बिल्डिंग फंडाचे ट्रस्टी, ट्रेनिंग कमिटी, इस्लामिया विभाग व हिंदू-पारशी आश्रम या कमिट्या स्थापन झाल्या. रमाबाई संस्थेचे व सल्लागार समितीचे अध्यक्षपद स्वीकारले. रमाबाईंची नियुक्ती लवकरात अध्यक्षा म्हणून झाली. सेवासदनची सल्लागार समिती अशी सर्वधर्मीय तसेच सर्वजातीय होती. 'सेवासदन' या संस्थेचे उपनाव 'सिस्टर्स ऑफ इंडिया सोसायटी' असे होते.

१९०२ मध्ये रमाबाईंनी पुण्यात हिंदू लेडिज सोशल क्लबची स्थापना केली होती. ही संस्था स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसाराचे काम करत होती. तसेच स्त्रियांकरता कीर्तने, प्रवचने, व्याख्याने, स्नेहसंमेलने भरवली. १९०९ पासून पुणे हिंदू लेडिज सोशल क्लबचे कार्य घडवण्याने सुरु झाले. रमाबाई यांच्या पुढाकाराने क्लबने पद्धतशीरपणे शिवणवर्गाचे आयोजन केले. "रमाबाईंना अभिप्रेत असलेला, सेविका स्त्रीचा आदर्श ह्या शिक्षणाच्या रूपाने, सभासद स्त्रीयांना आणि विद्यार्थिनींना पाहायवयास मिळाला. मुंबई सेवासदनबरोबर पुणे सेवासदनच्या अध्यक्षाही रमाबाई राहतील. १९०७ पासून रमाबाईंनी दर पंधरा दिवसांनी येरवड्याच्या कारागृहात असलेल्या

Date :

स्त्री वैद्यांना भेटण्याचा नेम धरला होता. त्याचबरोबर त्या ससून हॉस्पिटलमध्ये जाऊन तेथील रुग्णांना फळे, पुस्तके देणे, त्यांना धीर देण्याचे कार्य करत. अशा ठिकाणी जाताना रमाबाई आपल्याबरोबर सेवासदनातील स्त्रियांनाही घेऊन जाऊ लागल्या. त्यांच्या या कार्यातून स्फूर्ती घेऊन सेवासदनातील कार्यकर्त्या आपणाहून गोर-गरिबांना औषधे देणे, गरीब स्त्रियांची बाळंतपणे करणे आदी कामे विनामूल्य करू लागल्या. सेवासदनाचे ग्रंथालय हे मुख्यत्वे रमाबाईंनी स्वतः जवळील पुस्तके देऊन सुरु केले होते. विद्यार्थिनींकरता नर्सिंगचा कोर्स तयार करून त्याला जनरल सर्जनची मंजुरी मिळवली. विद्यार्थीनींना ससून हॉस्पिटलमध्ये नर्सिंग आणि प्रवेश मिळाला. रमाबाईंना १९१५ मध्ये रानडे वाडा त्यांचे दत्तकपुत्र नानू यांच्या स्वाधीन करायचा होता. स्वतः रमाबाईही शिवणकाम, विणकाम, जरीचे आणि रेशमाचे भरतकाम सुबकपणे करत.

सुरुवातीच्या पाच वर्षासाठी रमाबाईंनी रानडे वाड्यातील भाग सेवासदनाला मोफत वापरायला दिली होती. रमाबाईंचे मार्गदर्शन, त्यांची प्रेरणा ही सेवासदन बरोबर होतीच. १९०८ ते १९२० पर्यंत सेवासदनच्या बांधणी आणि उभारणी-करता रमाबाईंनी अपार कष्ट केले. संस्थेला वेळोवेळी आर्थिक व इतरही अनेक प्रकारचे साहाय्य केले. आपल्या निधनानंतर रमाबाईंनी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या आपल्या आत्मचरित्राचे सर्व हक्क सेवासदनला दिले. तसेच संस्थेच्या जागेवर बांधलेले सुमारे दहा हजार रुपये किमतीचे स्वतःचे घरही सेवासदनला मिळाले. हीच त्यांची सेवासदनला दिलेली अखेरची देणगी.

प्रिया राजगुरु
द्वितीय वर्ष कला

# अनुक्रमणिका


१. भावे घराणे

२. बालपण

३. तारुण्याच्या उंबरठ्यावर

४. गृहत्याग

५. मुक्काम पोस्ट वाई

६. महाराष्ट्र धर्म


Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# आचार्य विनोबा भावे

## भावे घराणे :-

आधुनिक महाराष्ट्र आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये भावे घराण्याचा विशेषत: विनोबांचा वाटा आहे. विनोबा एका इतिहाससंपन्न अशा घराण्यातून पुढे आलेले प्रसिद्ध पुरुष होत. भावे घराण्यातील विनोबा, बाळकोबा आणि शिवाजीराव या तीनही बंधूंनी स्वातंत्र्यचळवळीमध्ये आपला वाटा उचलला.

अठराव्या शतकाचा पूर्वार्ध मराठ्यांचा भारतभरच्या सत्ताविस्ताराचा कालखंड होय. अलिबाग या महाराष्ट्राच्या विशेषत: कोकणाचा भाग असणाऱ्या परिसरामध्ये आंग्रे स्वत:चे प्रभावक्षेत्र राखून होते. सातारचे छत्रपती आणि पुण्याचे

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

पेशवे आंग्रे सरकारांचे महत्त्व आणि सामर्थ्य ओळखून होते. सरदार भावे यांच्या कामगिरीवर प्रसन्न होऊन बाबूराव आंग्रे यांनी पेण तालुक्यातील 'गागोदे' गाव सरदार भावे यांना इनाम दिले. १८०७ मध्ये हे इनाम मिळाले. परंतु भावे घराण्याला इनाम मिळाले ही काही नवी गोष्ट नव्हती. १७८० मध्ये भावे घराण्याचे एक ज्ञात सरदार शिवाजी नारायण यांना चिपळूण तालुक्यातील 'अडूर' गाव पेशव्यांकडून इनाम मिळाले होतेच.

सरदार नरसिंगराव यांना इनाम मिळाले खरे; पण हा सारा कालखंड म्हणजे अस्ताला चाललेल्या पेशवाईचा कालखंड. १८१८ ला पेशवाईचा अवतार संपला आणि ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल या देशावर सुरु झाला. बदलत्या काळाची पावले ओळखून नरसिंगरावांनी इंग्रजाचे ५० रुपयांचे 'पोलिटिकल पेन्शन' स्वीकारले आणि ते सक्रिय जीवनामधून निवृत्त झाले. १८४४ मध्ये आंग्रे यांची उरलीसुरली सत्ता संपुष्टात आली. नरसिंगराव भावे यांच्या मृत्युनंतर शिवाजीराव ऊर्फ बाबासाहेब भावे यांना वडिलांच्या निम्मे पेन्शन म्हणजे २५ रुपयांचे पोलिटिकल पेन्शन 'दयाळू कंपनी सरकारकडून' मिळू लागले.

→

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## तपस्वी आजोबा :-

दत्तक गेले तरी मागील २६ वर्षांचे संस्कार पुसणे कोणालाही शक्य नसते. शंभुरावांच्या मूळ घरी धार्मिक वातावरणाची परंपरा होती. शंभुरावांचे जनक वडील कृष्णाराव वाईजवळील ~~लिंग~~ लिंबगोवा येथील कोटेश्वर या स्वयंभू देवस्थानचे भक्त होते. वडिलांचा हा वारसा त्यांच्यामध्ये उतरला होता. दत्तक गेल्यानंतर कामामध्ये बदल झाला.

## योगी वडील :-

शंभुरावांच्या मृत्युनंतर भावे घराण्यातील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे नरहर भावे होत. वाईमध्ये ४ एप्रिल १८७५ रोजी जन्मलेल्या नरहर भावे यांचा विवाह २७ फेब्रुवारी १८८६ रोजी 'वेणू' या बळवंतराव वैद्य यांच्या मुलीशी झाला. नरहररावांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण वाईला झाले. १८९५ मध्ये नरहरराव मॅट्रिक झाले. ते वर्ष त्यांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे ठरले, कारण याच वर्षात म्हणजे ११ सप्टेंबर ~~१८९५~~ १८९५ रोजी त्यांना पुत्ररत्न झाले. त्याचे नाव विनायक उर्फ विनोबा. त्याच वर्षी नरहररावांचे सासरे बळवंतराव वैद्य वारले.

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

विनोबांच्या नंतर नरहररावांना बाळकोबा, शिवाजीराव, शांता, दत्तात्रेय ही अपत्ये झाली. १९१८ च्या इनफ्ल्युएंझाच्या साथीमध्ये भाऊ दत्तात्रेय आणि आई रुक्मिणी यांचा मृत्यु झाला.

## आई

विनोबांच्या मातोश्री वेणूताई उर्फ रुक्मिणीदेवी मूळच्या कर्नाटकमधील हावनूर गावच्या. त्यांचे मामा उत्तम कीर्तनकार होते. त्यामुळे बालपणापासून त्यांच्या मनावर भजन-कीर्तनाचा संस्कार आणि वडिलांमुळे गळ्यावर गायनाचा संस्कार झाला होता. त्यांचे औपचारिक किंवा पाठशाळेत जाऊन शिक्षण असे झाले नाही; परंतु या दोन व्यक्तींकडून त्या जे काही शिकल्या ते त्यांना आयुष्यभर पुरले. त्या देवासमोर बसून भजने म्हणत असत. त्यांच्या चालींचा विनोबांच्या अभंगावर प्रभाव पडला.

अशी ही विनोबांची आई २० ऑक्टोबर १९१८ रोजी निजधामास गेली. तिच्या शेवटच्या आजारात विनोबा तिच्या जवळच होते. अंतिम क्षणी आईला त्यांनी विचारले, 'समाधान आहे का?" ती म्हणाली, "पूर्ण समाधान आहे. तू आता मोठा झाला आहेस. तुझी चिंता नाही आणि तू आपल्या भावंडांना सांभाळशील म्हणून तीही चिंता नाही." आईच्या मृत्युनंतर विनोबांनी

तिच्या दोन वस्तु स्वत:बरोबर घेतल्या. आईची साडी आणि नित्यपूजेतील अन्नपूर्णेची मूर्ती. आईच्या साडीचा खादीची नसल्याने, त्यांनी खादीचे व्रत घेतल्यावर ती साबरमतीच्या पाण्यात सोडून दिली. पुढे काशीबेन गांधी यांनी नित्यपूजेचे आश्वासन दिल्याने, अन्नपूर्णेची मूर्ती त्यांना विनोबांनी दिली.

## बालपण :-

कोकण म्हणजे नररत्नांची खाण. आधुनिक भारतात 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब मिळविणाऱ्यामध्ये कोकणातील लोकांची संख्या जास्त आहे. अशा कोकणाचा एक भाग असणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गागोदे गावी विनोबांचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ रोजी झाला. आपल्या जन्मभूमीला प्रत्येकाच्या मनात महत्त्वाचे स्थान असते. विनोबा तरी त्याला अपवाद कसे असणार ? बालपणीचे गागोदे विनोबांच्या स्मृतीत कायमच होते. विनायकच्या आयुष्यातील पहिली नऊ वर्षे गागोद्यामध्ये गेली. या कालखंडाचा परिणाम त्यांच्या जीवनावरही दिसतो. विनोबांचे बंधू शिवाजीराव भावे यांनी गागोद्याचे अप्रतिम चित्र 'विनोबा-जीवनदर्शन' या ग्रंथात रेखाटले आहे.

→

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

गागोद्याहून कधी कुणाच्या मृत्यूची बातमी आली की आई आम्हा मुलांना आंघोळ घालीत असे आणि स्वतःही आंघोळ करीत असे. परंतु या वेळी सुतकाचे स्नान झाले नाही. मी आईला विचारले की आई, आंधळे काका गेल्याची बातमी आली तरी आपण स्नान का केले नाही? आई म्हणाली, "बेटा, ते आपले नातलग नव्हते. फार अडचणीत होते आणि त्यांना सांभाळणारे कोणी नव्हते. म्हणून ते आपल्याकडे राहात असत." अनेक वर्षे सोबत राहणाऱ्या आंधळे काकांशी आमचे रक्ताचे नाते नव्हते, ही गोष्ट आम्हाला त्यांच्या मृत्युनंतर कळली.

आंधळे कांकाच्या जोडीला घरात गडी कामाला होतेच. मुलांना सांभाळण्यापासून ते शेतीच्या कामापर्यंत सारी कामे ते करत असत. गडीमाणसे कमी म्हणून की काय 'वाघ्या' नावाचा काळा कुत्रा नेहमी पहाऱ्याला असे. तो कधीच घरात प्रवेश करायचा नाही; पण सगळ्यांची जेवणे झाल्यावर त्याला हक्कांची भाकर मिळायची. त्या बदल्यात घराची राखण तो करत असे. त्याच्या जोडीला 'पांड्या' कोंबडा पहाटे मुलांना जागे करण्याचे काम करायचा. परगावी जायचे झाले की, मंगळ्या आणि मोत्या बैल हजर असायचे.

वयाच्या नवव्या वर्षापासूनचे 'केसरी' चे वाचन, रोज स्टेट लायब्ररीतून पुस्तके आणून एकसारखे वाचन केल्याने विनायकचे डोळे बिघडले. वाचता वाचता सूर्यप्रकाश कमी झाला.

सूर्यास्त होऊन संधिप्रकाश आला तरी तसेच वाचल्याने व्हायचा तोच परिणाम झाला. डोळे अधू झाले ते कायमचेच!

# तारुण्याच्या उंबरठ्यावर

विनोबांना १९१० मध्ये बडोद्याच्या माध्यमिक शाळेत घालण्यात आले. परीक्षेचा निकाल काय लागणार यात कोणालाच शंका नव्हती. १९१३ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी बडोदा कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. विनोबांना गागोद्यापासूनच फिरण्याची सवय होती. व्यायामशाळेकडे कधी त्यांची पावले वळली नाहीत; पण बडोद्यातील एकही रस्ता त्यांच्या पायाखाली यायचा राहिला नव्हता.

विनोबांनी फ्रेंच भाषेचा अभ्यास सुरू केल्यावर आई म्हणाली, "तू संस्कृत शिकणार नाहीस का?" विनोबा उत्तरले, "संस्कृत तर मी शिकणारच. पण ते शाळेत जाऊन शिकले पाहिजे असे थोडेच आहे?"

एकदा गणिताचे शिक्षक वर्गात काही लिहून देत होते तर विनोबांची स्वारी दुसऱ्या विद्यार्थ्यांना अत्यंत अवघड गणिते सोडवून देण्यात मग्न होती. शिक्षकांनी हे पाहून विनोबांना त्यांची

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

वही वाचायला सांगितली. विनोबांनी वही समोर धरून शिक्षक जे सांगत होते ते वाचून दाखवले. शिक्षकांनी वही मागितली तर त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. वही चक्क कोरी होती. हे कसे काय झाले? या शिक्षकांच्या आश्चर्यचकित मुद्रेला उत्तर देताना विनोबा उद्‌गारले, "मी लिहिलेले तुम्हाला वाचता येणार नाही".

## जडणघडण :-

कॉलेजमध्ये शिकत असतानाच शाळेतील प्रशास्तिपत्रके जाळून टाकली. आईने विचारले की का जाळलीस? तर विनोबा उत्तरले, "मला त्याचा काही उपयोग नाही. मी नोकरी करणार नाही." त्यामुळे आपला मुलगा चाकोरीबद्ध वाटचाल करणार नाही, हे आईल आईवडिलांच्या लक्षात आले होतेच. वाचनाच्या आवडीपायी अन्य सर्व गोष्टी केव्हाच दूर ढकलल्या होत्या. येथवरच्या आयुष्यात एकमेव नाटक 'पानपतचा मोबदला' पाहिले होते. सिनेमा बघितल्याने डोळ्याला त्रास होतो. म्हणून सिनेमा केव्हाच बंद झालेला. अंतर्यामी वेगळीच खदखद सुरु होती. फक्त दिशा सापडत ~~नव्हत~~ नव्हती.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# गृहत्याग :-

विनोबांच्या मित्रमंडळींमध्ये एकदा चर्चा चालली होती की, महाराष्ट्रातील कोकणस्थ ब्राह्मणामध्ये कोणीही संत झाला नाही. विनोबांना त्यांचे मित्र बाबाजी मोघे यांचे हे मत पटत नव्हते. विनोबांनी स्वतःच्या पद्धतीनुसार संशोध-नास सुरुवात केली.

विनोबांनी दहा वर्षांचे असतानाच ब्रह्मचर्याचा संकल्प केला होता. घर सोडण्याची प्रेरणा त्यांनी गौतम बुद्ध, शंकराचार्य आणि संत रामदास यांच्याकडून घेतली होती. या तिघांनीही ब्रह्मजिज्ञासेसाठी घर सोडले होते. गौतम बुद्ध विवाहित होते तर शंकराचार्य अविवाहित आणि संत रामदास विवाहवेदीवरून पळालेले. त्यातही शंकराचार्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच घर सोडण्याचा संकल्प केला होता. विनोबांना लहानपणापासूनच असे वाटत होते की, आपण घर सोडणार आणि तसेच घडले. १९१२ मध्येच घर सोडण्याचा त्यांचा निर्णय झाला होता आणि तसेच घडले. १९१२ मध्येच घर सोडण्याचा त्यांचा निर्णय झाला होता आणि अमलात आला २५ मार्च १९१६ रोजी!

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## काशीवास :-

आजवर ज्या क्षणाची विनोबा उत्कटतेने वाट पाहात होते, तो क्षण येऊन ठेपला. काशीला येऊन तर पोचले. काशीमध्ये संत महंतांची जशी रेलचेल होती, तशीच क्रांतिकारकांचीही होती. काशीमध्ये ते दुर्गाघाटावरच्या एका घरात तिसऱ्या मजल्यावर राहू लागले. त्या घराचे मालक होते खुर्देकर, म्हणजे १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील तात्या टोपे यांचे मेहुणे. श्रीमती खुर्देकर या त्या घरात वृद्धापकाळ कंठत होत्या. या घरात विनोबा, तगारे आणि बेडकर यांच्या पथाऱ्या पडल्या.

## देशभक्त गांधी यांची भेट :

बॅ. मोहनदास करमचंद गांधी हे महात्मा गांधी होण्याअगोदरची गोष्ट. ते भारतात आले गुरुवर्य गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सूचनेवरून. भारतभ्रमण केलेल्या गांधी यांचे बनारस येथे एक भाषण झाले. या भाषणाने प्रस्थापितांचे धाबे दणाणले. भारतातल्या विचारवंतांचे लक्ष गांधींकडे गेले आणि त्यांना विनोबा सापडले. त्याचे असे झाले की, बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ४ फेब्रुवारी

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

१९१६ रोजी गांधीजींनी आपले भाषण केले. पं. मदनमोहन मालवीय यांनी हे संयोजन केले होते. या भाषणात गांधीजी म्हणाले की, "मला माझ्या देशबांधवांशी, या पवित्र नगरीत, या महान विद्यापीठाच्या छायेखाली मला परक्या असणाऱ्या भाषेतून बोलावे लागत आहे, ही अत्यंत लज्जेची व अपमानास्पद गोष्ट आहे....

"राष्ट्राच्या गळ्यात हे लोढणे कशाला?.... गेली ५० वर्षे आपल्याला देशी भाषातून शिक्षण मिळाले असते तर आपल्याला आज काय मिळाले असते? गरिबातल्या गरीब लोकांबरोबर त्यांनी काम केले असते आणि गेल्या ५० वर्षांत त्यांनी जे जे संपादन केले ते ते या राष्ट्राचा वारसा ठरले असते.

## मुक्काम पोस्ट वाई :-

१४ जानेवारी १९१७ रोजी विनोबा कोचरब आश्रमातून देशभक्त गांधीजींच्या आज्ञेने वाईला जाण्यास निघाले. वाईला येताना पुण्यात लोकमान्य टिळकांची भेट घेतली; परंतु या भेटीत विनोबांचे समाधान झाले नाही. त्यांना अध्यात्माच्या क्षेत्रात जे मार्गदर्शन टिळकांकडून हवे होते ते मिळाले नसावे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

विनोबांच्या आयुष्यात १९१८ मध्ये एक अत्यंत दु:खद घटना घडली. इन्फ्ल्यूएन्झाच्या साथीत त्यांच्या सर्वात धाकटा भाऊ दत्तात्रेय याचे निधन झाले. हा धक्का सहन न झाल्याने, २४ ऑक्टो ऑक्टोबर १९१८ रोजी मातोश्री रुक्मिणीदेवींचे पहाटे अडीच-तीन वाजता निधन झाले.

विनोबांच्या दृष्टीने आश्रम म्हणजे प्रयोगशाळाच होती. प्रयोगांती सार काढायचे. साधकभाव जोपासत स्वत:च्या कार्यात आधिकाधिक संशोधन करत जायचे. सेवा करायूची. त्यायोगे सत्त्वगुण वाढवायचा. देहाचे आरोग्य वाढवणे आणि दया, क्षमा, शांतीचा भाव सतत जागा ठेवायचा.

आश्रमाचे मुख्य संचालक म्हणून रमणिकलाल मोदी यांची नियुक्ती झाली. साबरमतीचे मुख्य व्यवस्थापक मगनलालभाई, विनोबा, काही साहाय्यक मंडळी घेऊन रमणिकलाल वर्धा येथे आले. वर्ध्याचे पाणी मानवले नाही म्हणून रमणिकलाल मोदी २-३ महिन्यात साबरमती आश्रमात परतले आणि बापुजींनी विनोबाची नेमणूक वर्ध्याला केली. सत्याग्रहाश्रमाचे संचालक म्हणून विनोबा ८ एप्रिल १९२१ रोजी आश्रमात आले.

→

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# महाराष्ट्र धर्म :-

जानेवारी १९२३ मध्ये ४८ पृष्ठांचा पहिला अंक निघाला. पहिल्याच अंकात 'उपनिषदांचा अभ्यास' ही लेखमाला विनोबांनी लिहायला सुरुवात केली. त्या अंकामध्ये 'आत्मनिवेदन' या लेखात विनोबा लिहितात.

'महाराष्ट्र धर्म' या नावासंबंधीचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे. "महाराष्ट्र धर्म हा प्रथमदर्शनी जरी वामनासारखा दिसला तरी वस्तुत: तो दोन्ही पावलांमध्ये विराट विश्व व्यापून टाकणाऱ्या त्रिविक्रमासारखा आहे, असे दिसून येईल. या त्रिविक्रमाचे एक पाऊल महाराष्ट्रातील, दुसरे राष्ट्रीय आणि तिसरे आंतिराष्ट्रीय आहे. यशोदेचा बाळकृष्ण एका अर्थाने विश्वरूपाच्या मुखात असला तरी दुसऱ्या अर्थाने त्याच्याही मुखात विश्वरूप येते. हा अनुभव जसा यशोदेच्या यशस्वी दृष्टीला आला त्याचप्रमाणे 'महाराष्ट्र धर्म' हा संकुचित अर्थाने सबंध भारतीय धर्माला पोटात घालून 'दहा अंगुळे' वर उरण्यासारखा आहे, असेच ~~सर्व~~ ऐतिहासिक प्रज्ञेच्या विचारी दृष्टीस दिसून येईल."

ईश्वरनिष्ठा, राजकारण, सर्व सावधकर्ता या त्रिविध धोरणा प्रमाणे 'उपनिषदांचा अभ्यास' ही महत्त्वाची लेखमाला मासिकात सुरू करण्यात आली.



Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## झेंडा सत्याग्रह :-

राष्ट्रीय झेंडा घेऊन ११ एप्रिल १९२१ रोजी नागपुरला मिरवणूक निघाली; परंतु ब्रिटिश सरकारच्या मते ती बेकायदेशीर होती. पोलिसांनी मिरवणुका काढण्यावर बंदी घालताच जमनालाल बजाज यांनी कायदेभंग करून मिरवणूक काढून स्वतःस अटक करवून घेतली. याच वेळी पंडित जवाहरलाल नेहरू नागपूरमध्ये होते. त्यांनी देश-भरच्या कार्यकर्त्यांना या सत्याग्रहात भाग घेण्याचे आवाहन केले. नेहरूंच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन, देशभरातून कार्यकर्ते गोळा होऊ लागले. जमनालाल बजाज यांनी सत्याग्रहाला स्थानीक स्वयंसैनिक हवेत, असा निरोप आश्रमात विनोबांकडे पाठवला.

## विचार-पोथी :-

महाराष्ट्र धर्मनंतर विचार-पोथी ही विनोबांची महत्त्वाची साहित्यकृती होय. "विचार-पोथी" त्यांना कशी सुचली?

चिंतनातून प्रयोग आणि प्रयोगातून चिंतन अशी माझी जीवनाची घडण बसली आहे. हिलाच मी निदिध्यास म्हणतो. निदिध्यासातून

विचार स्फुरत राहतात. ते टाचुन ठेवण्याची वृत्ती सामान्यत : मला होत नाही; पण मनाच्या एका विशिष्ट अवस्थेत एकदा अशी वृत्ती उगवली होती. सारेच विचार लिहीत नव्हतो. थोडे लिहीत होतो. त्यांची 'विचार-पोथी' झाली." (कालिंदी, (संपा०), २०००, पृ०२००).

स्नेहा लावलादार
द्वितीय वर्ष कला

== * == THE END == * ==

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# डॉ भाऊ दाजी लाड

## मूळ गाव आणि जन्म

उत्तर पेशवाईच्या काळापर्यंत आपल्या नावाबरोबर फक्त वडिलांचे नाव लावण्याची पद्धत असल्याने सार्वजनिक जीवनातसुद्धा त्यांचा उल्लेख डॉ. भाऊ दाजी असाच केला जात असे. आडनाव लावण्याची पद्धत नसल्याने वेगळी ओळख देण्यासाठी कधी कधी जातीचाही उल्लेख केला जाई. गीतार्थबोधिनी या पुस्तकासाठी आगाऊ नोंद करणाऱ्या ग्राहकांच्या यादीत डॉक्टरांचे नाव भाऊ दाजी शनाय असे नोंदण्यात आले. त्यांनी स्वतः ते तसे नोंदविण्यास निश्चितच सांगितले नसावे. सारस्वत ब्राम्हणांच्या शेणवी असा उल्लेख केला जात असे. त्याला अनुलक्षून त्यांचा शनाय असा उल्लेख करण्यात आला असावा. भाऊ दाजींच्या वडिलांचा लाड पार्सेकर म्हणून ओळखत असेही दिसते. या संबंधात आपणास अधिक माहिती मिळते ते भाऊ दाजींविषयी नेटिव्ह ओपिनियन समाचारपत्रात (दि. ७ जून १८७४) वाहिलेल्या श्रद्धांजलीच्या लेखातून. सावंतवाडी आणि गोव्याच्या सरहद्दीवर असलेल्या मांजरे या गावात त्यांचा जन्म झालेला असून तिथून जवळ असलेल्या पार्से गावात लाड कुटुंब राहत असे. दुसऱ्या एका अशाच लेखात सावंतवाडीतून त्यांच्या कुटुंबाने स्थलांतर केले असा उल्लेख असल्यामुळे बॉम्बे गॅझेटच्या दुसऱ्या दिवशीच्या अंकात (२ जून १८७४) त्याविषयीची दुरुस्ती सुचविणारे गोवानीज म्हणून सहीने एक पत्र प्रसिद्ध झाले. त्यात मंदारे (म्हणजे मांजरे) हा गाव गोव्याच्या पेडणे

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

तालुक्यात असल्याने भाऊ दाजी हे मूळचे गोव्यातीलच असे ठाम प्रतिपादन केले होते. श्रीयुत प्रियोळकर यांनी दाखवून दिल्याप्रमाणे मांजरे) ल व भव पार्से ही दोन्ही गावे एकमेकांच्या जवळ पेडणे तालुक्यात असून भाऊ दाजींच्या जन्माअगोदर जवळजवळ ७५ वर्षे सावंतवाडीच्या भोसल्यांनी, युद्धात मदत केल्याबद्दल पोर्तुगीजांना हा भाग नवाचा भाग म्हणून दिला.

बालपण :-

गोव्याच्या पेडणे तालुक्यातील मूळ गाव पार्से येथून १८२८ किंवा १८३१ मध्ये भाऊंचे वडील रामकृष्ण लाड (मुंबईनो बहार. पृ. १६०) हे आपल्या कुटुंबासह मुंबईस स्थलांतरित झाले हे आपण बघितले आहे. ते शेतीच्या जोडीला मातीची चित्रे बनवून उपजीविका करत; म्हणूनच त्यांचा चित्रकार म्हणूनही उल्लेख येतो. (प्रियोळकर, १९७१, पृ. ७) मुंबईनो बहार कर्ते वाच्छा ते उत्तम कविताही करत अशी माहिती देतात. (मुंबईनो बहार, पृ. १६०-६१) आणि त्यामुळे आसपासच्या राजे-राजवाड्यातही त्यांना मान होता.

याअगोदर सांगितल्याप्रमाणे मांजरे येथे भाऊंचे आजोळ होते. प्रियोळकरांनी पार्से व मांजरे या दोन्ही गावांना भेटी देऊन विठ्ठल रामकृष्ण लाड राहत त्या घराची वास्तु शोधून काढली, त्याचप्रमाणे त्यांचे मामा जिवू नाडकर्णी होते हे त्यांच्या इतर नातेवाईकांमार्फत शोधून काढले. (प्रियोळकर, १९७१, पृ. ४१६-१९) घनश्याम नीळकंठ नाडकर्णी ह्यांनां भाऊंनी त्यांचे बी. ए. चे शिक्षण होईपर्यंत मदत केली. वकिलीची

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

परीक्षा देऊन त्यांनी धंद्यात चांगलाच जम बसवला व प्रतिष्ठा मिळवली. त्यांना रावसाहेब हा किताबही मिळाला व ते बॉम्बे युनिव्हर्सिटीचे फेलोही होते

## शालेय आणि कॉलेजचे शिक्षण :-

'मुंबईनो बहार' या ग्रंथावरून त्यांच्या शिक्षणाला सुरुवात केव्हा झाली आणि त्यांचे एल्फिन्स्टन कॉलेजमधले शिक्षण केव्हा पूर्ण झाले याविषयी काही निश्चित अंदाज बांधता येतो. वाच्छा यांनी नमूद केल्याप्रमाणे संवत १८८९ (अथवा शके १७५४ मध्ये) म्हणजेच १८३२ मध्ये भाऊंना मराठी शाळेत संवत १८९२ अथवा शके १७५७ पौष वद्य अष्टमी सोमवार रोजी म्हणजे ११ जानेवारी १८३६ ला इंग्रजी शाळेत दाखल करण्यात आले. (तत्रैव. पृ ९४-९८) पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की भाऊ दाजींना संवत १८९६ (इ. स. १८४०) मध्ये रौप्य पदक आणि संवत १८९९ (इ. स. १८४३) सुवर्ण पदक देण्यात आले. यावरून १८३२ ते १८४३ या आदर्श वर्षात त्या काळात उपलब्ध होऊ शकणारे मराठीतले - इंग्रजी माध्यमातले शाळेचे व नंतर १८४० ते १८४३ पर्यंत एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिकत असताना ते एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्ये विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कामही करत होते.

त्या काळच्या शिक्षणपद्धतीबद्दल या संदर्भात थोडे जाणून घेणे आवश्यक ठरेल. पेशव्यांची सत्ता कमजोर होऊन कंपनी सरकार येण्याचे ते दिवस होते. १८१६ मध्ये 'दि बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' नावाची संस्था अँग्लो - इंडियन मुलांकरिता स्थापण्यात

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

आली. तिची एक शाखा १८२० मध्ये निघाली ती देशी मुलांना त्यांच्या मातृभाषेचे शिक्षण द्यावे या उद्देशाने. १८२२ पासून तिचे 'द बॉम्बे नेटिव्ह स्कूलबुक अँड सोसायटी' असे नामांतर झाले. मराठीत तिचा हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी असा उल्लेख केला जाई. अर्थात या सरकारी शाळेव्यतिरिक्त इतर अनेक पंतोजींच्या मराठी व मिशनरी इंग्रजी शाळा होत्या. (दादोबा पांडुरंग, १९४७, पृ.८२-८९ वयाच्या वेळी मुलाच्या शिक्षणाची सुरुवात वडिलांनी बाराखडी शिकवण्यापासून होत असे. दादोबा पांडुरंग यांचा जन्म १८१४ चा; त्यांचे लहान भाऊ आत्माराम पांडुरंग हे भाऊ दाजींचे मेडिकल कॉलेजमधील सहाध्यायी. त्यांनी आपल्या शाळेच्या दिवसांचे खास तपशीलात जाऊन आत्मचरित्रात वर्णन केले आहे.

## वैद्यकीय शिक्षण, सहाध्यायी व्यवसाय आणि संशोधन :-

भाऊ दाजी आणि इतर सात विद्यार्थ्यांनी १८५१ मध्ये पाच वर्षांचा वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करून मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून ग्रॅज्युएट ऑफ ग्रँट मेडिकल कॉलेज ही पदवी घेतली. आंग्ल वैद्यकाच्या मुंबई इलाख्यातील ते पहिले पदवीधर; आणि त्यांच्या मार्फत आंग्ल वैद्यकीय शिक्षणाचा पाया या इलाख्यात पक्का झाला. भाऊंच्या वैद्यकीय शिक्षणाची माहिती घेण्याअगोदर आंग्ल वैद्यकीचा मुंबई शहरात रुजवात व प्रसार कसा झाला हे जाणून घेणे आवश्यक ठरते.

Sundaram® FOR EDUCATIONAL USE

आंग्ल वैद्यकीय शिक्षणाचा पाया भारतात अगदी प्रथम गोव्यात १८०१ मध्ये पोर्तुगिजांनी एका वैद्यकीय शिक्षणक्रमास सुरुवात करून घातला. त्याचेच रूपांतर १८४२ मध्ये एस्कोला मेडिको सिरुर्जिका मध्ये झाले आणि अगदी आताआतापर्यंत मुंबई विद्यापीठास संलग्न होते. (प्रियोळकर, १९७१, पृ.२८-२९) इंग्रजी अमलाखाली १९ व्या शतकाच्या सुरुवातीला हिंदू कॉलेज व मदरसा यांना जोडून आयुर्वेद व युनानी वैद्यक शिकविले जात असे ते एतद्देशीय विद्यार्थ्यांना पारंपरिक वैद्य व हकिमांकडून. त्याचबरोबर १८१२ मध्ये कलकत्ता आणि मद्रास येथे फक्त युरोपीयन विद्यार्थ्यांसाठी आंग्ल वैद्यक शिकवण्याची सोय करण्यात आली.

## राजकीय आकांक्षा :-

" यापासून आम्ही एकदा धडा घ्यावयाचा आहे की हिंदी साम्राज्य आमच्या ताब्यात शाश्वत राहील ही गोष्ट आम्ही स्वप्नातही मनात आणता कामा नये. ज्यामुळे आमच्या, त्यांच्या व जगाच्याही हितसंबंधांस बाधा येणार नाही अशा रितीने एतद्देशीय लोक आपला कारभार पाहू लागतील अशी परिस्थिती घडवून आणण्याकडे आम्ही लक्ष पुरवले पाहिजे; व त्याच बरोबर एतद्देशीयांस कर्तबगार बनवून आम्ही आमचे कर्तव्यपालन केले पाहिजे व हेच आमच्या खटाटोपांचे मोठ्यात मोठे पारितोषिक होय असे आम्ही समजले पाहिजे." १८५४ मध्ये चीनमध्ये घडलेल्या राज्यक्रांतीविषयी प्रतिक्रिया सर टी.ई. कोलब्रुक यांना पत्राद्वारे कळवताना माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने सर भारतातील इंग्रजी कारभाराचे धोरण काय असावे

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

याबद्दल आपले मत वरीलप्रमाणे प्रकट केले. (कुलकर्णी, पु. मा. १९५८, पृ ३४-३८) माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन, सर एर्स्किन पेरी, जस्टिस सर रेमंड वेस्ट, चीफ जस्टिस सर मायकेल वेस्ट्रोप, न्यायमूर्ती सर जेम्स गिब्ज, न्यायमूर्ती हेन्री न्यूटन, डॉ. बर्डवुड, सर बार्टल फ्रियर यांसारख्या निरनिराळ्या क्षेत्रांत उच्च पदावर असणाऱ्या सुशीक्षित व विद्वान इंग्रजांचे भारतीयांबाबत फार उदार धोरण होते. एवढेच नाही तर एतद्देशीयांनी युरोपीय साहित्य, शास्त्रे व संस्कृती आपल्या ठिकाणी बिंबवून समृद्धी व प्रगती साधावी असेच त्यांना वाटत असे.

## देशी - विदेशी संस्था व असोसिएशनचे कार्य :-

४ मार्च १८५३ रोजी लॉर्ड मॉंटिगल यांनी हाउस ऑफ लॉर्ड्‌समध्ये पहिले निवेदन सादर केले. त्याचे इतिवृत्तही ५ मार्चच्या लंडन टाइम्सच्या अंकात प्रसिद्ध झाले. त्याअगोदर निवेदनाच्या शेकडो प्रती काढून निरनिराळ्या वृत्तपत्रांकडे पाठवण्यात आल्या. इंग्लंडमधील हिंदुस्थानच्या काही हितचिंतकांनी हिंदुस्थानच्या कारभाराविषयक काही पुस्तिका तयार करून वाटल्या. बॉम्बे असोसिएशनेही अशा पुस्तिका तयार करून वाटण्यासाठी हप्त्याहप्त्याने एकूण दहा हजार रुपये द इंडिया रिफॉर्म सोसायटीकडे पाठविले. ही रक्कम वर्गणीच्या रूपाने गोळा करण्यासाठी स्वतः भाऊ दाजींनी बरेच कष्ट घेतले होते. (प्रियोळकर १९७१, पृ.८४-८५) या संदर्भात द इंडिया रिफॉर्म सोसायटीची थोडी

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

माहिती घेणे आवश्यक आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटचे सदस्य डॉ. हेन्री सेमूर यांनी भारतातील कंपनी कारभार व जनतेच्या हालअपेष्टा व स्थिती यांची प्रत्यक्ष माहिती करून देण्यासाठी मार्च १८५२ मध्ये या सोसायटीची स्थापना केली. सोसायटीने भाऊ दाजी, नवरोजी फर्दुनजी, बॉम्बे टाइम्सचे संपादक ब्युस्ट, मद्रासचे बॅरिस्टर घेऊन दिलेले भाषणे, तयार केलेली पत्रके आणि पुस्तिका लंडनमध्ये छापून घेऊन वाटण्याची सोय केली. (प्रियोळकर १९७१, पृ. ८५; पु. बा. कुळकर्णी, १९५९, पृ. २१३-१४) याही पूर्वी १८३९ मध्ये ॲडाम नावाच्या एका इंग्रजाने ब्रिटिश इंडिया सोसायटी भाऊ दाजी, नवरोजी फर्दुनजी, बॉम्बे टाइम्सचे संपादक ब्युस्ट, मद्रासचे बॅरिस्टर यांनी ६ जुलै १८३९ ला लॉर्ड ब्रूम आणि इतर भारतप्रेमी इंग्रजांच्या साहाय्याने संस्था स्थापना करण्यापूर्वी स्वतः भारतीय जनतेची गाऱ्हाणी जाणून घेण्यासाठी भारतयात्रा केली होती.

## धार्मिक मत आणि सामाजिक जाणिवा :-

हिंदुस्थानात युरोपीय व्यापाऱ्यांचे आगमन होण्यापूर्वी पश्चिम हिंदुस्थानातील हिंदूंना माहिती असलेल्या परदेशी धर्मपरंपरा म्हणजे इस्लाम आणि पारशी / जरथुष्ट्री धर्म. पारशी ८-९ व्या शतकात तर मध्य आशिया आणि इराण अफगाणिस्तान मधून इस्लामचे अनुयायी १०-११ व्या शतकात उत्तर हिंदुस्थानातून मोठ्या प्रमाणावर येण्यासाठी सुरुवात.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

आली आणि या दोन्ही परंपरा हिंदुस्थानातील इतर प्रदेशांच्या रुळून गेल्या. मात्र जेव्हा युरोपीय व्यापारी आपला जम बसवून शासक बनले त्या वेळी ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी हिंदुस्थानात जम बसवण्यास सुरुवात केली. हिंदुस्थानातील इतर प्रदेशांच्या मानाने कोकण आणि गोव्यात मिशनऱ्यांचा शिरकाव बराच अगोदर झाला; आणि मुंबईचे बेट गोव्याप्रमाणे पोर्तुगीजांच्या स्वामित्वाखाली असल्याने मुंबईत मिशनरी आले. कंपनी सरकारचे धर्मप्रसाराचे धोरण अगदी स्पष्ट होते.

## शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य :-

भाऊ दाजी वक्तव्यात आणि लिखाणात ज्ञान आणि प्रगती यांच्या अविभाज्य जोडीचा नेहमीच उल्लेख असे. बॉम्बे असोसिएशनच्या सरकारकडे केलेल्या मागण्यात शिक्षणप्रसारावर व त्याच्या आधाराने मिळणाऱ्या प्रगतीवर भर असे. नेहमीच्या कॉलेज शिक्षणाबरोबर वैद्यकीय शिक्षणाची सोय झाल्यानंतर कायद्याच्या शिक्षणावर व सरतेशेवटी युनिव्हर्सिटीतून शिक्षण मिळावे या मागण्यांवर भर होता. स्वतः च्या आयुष्यात एल्फिन्स्टनमधील उच्च शिक्षण संपल्यानंतर व अध्यापनाचा अनुभव घेतल्यानंतर संधी मिळाल्याबरोबर वैद्यकीय शिक्षण घेतले. तेथेही न थांबता त्या विषयातील व प्राच्यविद्येतील संशोधनाकडे आपले लक्ष वळवले; इतर वैद्यांप्रमाणे यशस्वी औषधोपचार व शस्त्रक्रिया यावर समाधान न मानता, महारोगावरील व वनस्पतीवरील संशोधन व संशोधनात्मक लेखन चालू ठेवले; ग्रँट मेडिकल सोसायटीमध्ये निबंध वाचले. अध्यापनामार्फत मिळणाऱ्या वा दिल्या जाणाऱ्या ज्ञानापुरती आपली लालसा

FOR EDUCATIONAL USE

सीमित न ठेवता वाचनालये, संग्रहालये आणि नाट्यगृह-द्वारा लोकांचे रंजन, ज्ञानसंपादन करणे अधिक सुलभ होईल याचा विचार केला. १८५० ते अगदी मरणकाळ समीप येईपर्यंत म्हणजे १८७४ पर्यंत या सर्व प्रकारच्या कार्यात, क्वचित प्रसंगी अगदी पुढाकार घेऊन, धडाडीने भाग घेतला.

## समारोप :-

भाऊ दाजी यांचा जन्म १८२१ मध्ये झाला आणि ते १८७४ मध्ये निवर्तले. लाभलेल्या ५२-५३ वर्षांच्या आयुष्यामध्ये त्यांनी अनेक गोष्टी केल्या. एक शिक्षण, डॉक्टर, राजकीय चळवळीतील पुढारी, ग्रंथालय, स्त्रीशिक्षणाच्या शाळा, म्युझियम, बॉटनिकल गार्डन यांचे संस्थापक, बोर्ड ऑफ एज्युकेशन, एल्फिन्स्टन ट्रस्ट, रॉयल एशियाटिक सोसायटी मुंबई, बॉम्बे असोसिएशन, ग्रँट मेडिकल कॉलेज सोसायटी, फोर्ब्स सोसायटी, बॉम्बे युनिव्हर्सिटी यांसारख्या सार्वजनिक संस्थांचे माननीय सदस्य, औषधी वनस्पती, महारोगावर आयुर्वेद पद्धतीने उपचारासाठी प्रयोग, निष्णात शल्यचिकित्सक आणि प्राच्यविद्येतील असामान्य संशोधन असे बहुरंगी जीवन जगले. आपल्या वैयक्तिक आयुष्यात कुटुंबीयांसाठी आनंद निर्माण केला, सामाजिक जीवन अधिक सुसह्य आणि कल्याणकारी करण्याचा प्रयत्न केला आणि सार्वजनिक - राजकीय जीवनात उत्साह संचारेल अशा रीतीने पुढारीपण केले.

ओमकार कडू
द्वितीय वर्ष कला

FOR EDUCATIONAL USE

# अनुक्रमणिका


| | विषय-घटक |
|---|---|
| 1) | महात्मा जोतीराव फुले |
| 2) | जोतिरावांच्या व्यक्तित्वाची जडण घडण |
| 3) | सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ |
| 4) | ज्ञान व शिक्षणातून समाजपरिवर्तन |
| 5) | सत्यशोधक समाजाची स्थापना |


Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# 'महात्मा'
# जोतीराव फुले

जोतीराव फुले यांचे कुलपुरुष सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावी राहत होते. जोतीरावांचे पणजोबा ह्या गावचे चौगुले होते. कुलकर्णी व पाटील या गावअधिकाऱ्यांना महसूलाच्या कामात मदत करणे, हे चौगुल्याचे काम होते. जोतीरावांचे घराणे माळी जातीचे होते. व त्यांचे आडनाव गोऱ्हे होते. कुलकर्णी हा गावातील महसुलांची नोंद ठेवणारा अधिकारी जात परंपरेतून आलेल्या लबाडी कपट गुणांच्या आधारे श्रमिक जातींची लूट करत असे. त्याचा जोतीरावांच्या पणजोबांशी संघर्ष झाला. संतापाने कुलकर्ण्याला त्यांनी कठस्नान घातले. व आपल्या कुटुंबासहित कटगुण सोडले.

त्यानंतर चौगुले यांचे कुटुंब पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील खानवडी या गावी नांदू लागले तेव्हा त्यांना एक मुलगा झाला त्याचे नाव शेटीबा- एकुलता एक असल्याने शेटीबा लाडावला व चैनी बनला. खेड्यातील कमाईवर त्याचा गुजारा होईना म्हणून त्याने पुण्याला स्थलांतर केले. शेटीबाला राणोजी, कृष्णा, गोविंद असे तीन मुले झाले. वडिलांच्या गरिबीमुळे या मुलांना लहान वयातच कष्ट सोसावे लागले. एक पैसा रोजावर त्यांनी एका सावकाराकडे शेळ्या राखण्याचे काम केले. शेळ्या राखण्याचे काम करून ती मुले धन्याची इतर कामही करत. मुलांचा उद्योगी स्वभाव धन्यास आवडल्याने त्याने फुलांच्या धंद्यात नोकरीस ठेवले त्याने त्यास फुलांचे शेले, पागोटे, गाद्या, उश्या व लोड वगैरे शिकवून पेशवे दरबारात फुले देण्याची नोकरी

लावून दिली. धंद्यातील खूबी व कसब यामुळे या तिन्ही बंधूंचा लौकिक वाढला. पेशव्यांनी खूष होऊन त्यांना पस्तीस एकर जमीन इनाम दिली. त्यांचे मुळचे गोऱ्हे आडनाव मागे पडून लोक त्यांना फुले असे संबोधू लागले.

शेटीबाचा थोरला मुलगा राणोजी स्वार्थी व धूर्त होता. त्याने सर्व संपत्ती आपल्या नावावर करून, कृष्णा व गोविंद या आपल्या भावांना घराबाहेर काढले. ह्या दोन्ही बंधूंनी मात्र एक जुटीने व बंधुभावाने आपला धंदा सुरू ठेवला. गोविंद पुण्याजवळील एका खेड्यातील मळ्यात काम करी. भाजीपाला विकण्यासाठी त्याने पुण्यात एका भाजीपाल्याचे दुकान घेतले पुढे त्यावरच तो योगक्षेम करू लागला. गोविंदरावांचा विवाह चिमणाबाई यांच्याशी झाला. चिमणाबाईंना राजाराम व जोती असे दोन पुत्र झाले. जोतीचा जन्म शनिवार वाडा जळाला, त्या दिवशी १८२७ मध्ये झाला. जोतीला जन्म दिल्यावर चिमणाबाई लगेचच वारल्या. गोविंदरावांनी दुसरे लग्न न करता दाईला जोतीच्या पालन पोषणासाठी नेमले. या दाईने मोठ्या प्रेमाने जोतीरावांचा सांभाळ केला.

## जोतीरावांच्या व्यक्तित्वाची जडण-घडण

गोविंदरावांनी सात वर्षे वयाच्या जोतीरावांना गावठी मराठी शाळेत टाकले. पुढील चार वर्षामध्ये शिक्षण घेतल्यावर ब्राम्हण कारकुनाच्या सल्ल्यावरून गोविंदरावांनी जोतीला शाळेतून काढून टाकले. ब्राम्हणवर्चस्वासाठी शूद्र जातींवर लादलेली ज्ञानबंदी टिकवणे ब्राम्हणांना आवश्यक वाटत होते. त्यामुळे ब्राम्हण कारकुनाने गोविंद रावांना हा बदसल्ला दिला असावा. जातीव्यवस्थेच्या कर्मठ नियमांचे कसोशीने पालन करणे ब्राम्हणांना वैद्य हितकर व पवित्र वाटत होते. वसाहतवादाच्या काळात सुरु झालेल्या बदलांना थोपवण्यासाठी ब्राम्हण जातिसमुदायाने कर्मठ व सनातनी भूमिका घेतली होती. ब्राम्हण कारकुनाचा सल्ला हे त्याचेच प्रत्यंतर होते. हिंदु कॉलेज मध्ये फक्त ब्राम्हणांनाच प्रवेश मिळे. वेद, धर्मशास्त्र, पुराणे असे ब्राम्हणी ज्ञान दिले जाई. वसाहतवादी शिक्षण पद्धती विलक्षण ब्राम्हणधार्जिणी होती. केवळ ब्राम्हण जातीच्या मुलांनाच शिक्षण व शिष्यवृत्ती दिली जात असे.

शिक्षणावरती अत्यल्प तरतुद आणि उच्चभ्रु जातींच्या अनुनयाच्या भूमिकेमुळे ब्रिटीश काळात ब्राम्हण, प्रभु, सोनार पारशी अशा उच्चभ्रु जातीच शिक्षण घेत असत. ब्राम्हणेत्तर शूद्र जातींनी शिक्षण घेणे त्यांना अशिष्ट व धर्मबाह्य वाटत होते. दादाजी धाकजी यांनी कुणबी, भंडारी, कोळी अशा शूद्र जातीच्या मुलांना उच्चभ्रु जातीच्या मुलांबरोबर शिक्षण घेण्यास मनाई केली. ब्राम्हण जातीचे पारंपारीक हक्क व हितसंबंध वसाहतिक राज्यातही अबाधित ठेवण्यासाठी ब्राम्हण सर्वदा सज्ज असत. शूद्र ब्राम्हणेतरांचे थोडेसे जरी त्यांना ज्ञान प्राप्त झाले. तरी त्यांना सहन होत नसे. फारवादा मराठी

किंवा इतर जातीच्या कारकुन, ब्राम्हणांनी पाहिला म्हणजे त्यांच्या अंगाचा तिळपापड होई. ब्राम्हण व तत्सम उच्च जातींची ही परंपरागत संकुचित मनोवृत्ती शूद्र अति जातींच्या शिक्षणाच्या सातत्याने आड येत होती.

लहानपणी जोतीराव श्रमिक जातींच्या व काही मुसलमान धर्माच्या सवंगड्यांबरोबर खेळत असत. हिंदू धर्मातील विवेकहीन श्रद्धा व जातिव्यवस्थेचा अन्याय मुसलमान सवंगड्यांच्या सान्निध्यातुन त्यांना जाणवू लागला. स्वधर्माचे आंतरिक स्वरूप न्याय निष्ठुरतेने तपासून पाहण्याची त्यांना गरज भासु लागली. 'मी लहान असताना माझे आसपासचे मुसलमान खेळगडी यांच्या संगतीने मतलबी हिंदु धर्माविषयी व त्यातील जातिभेद वगैरे कित्येक खोट्या मतांविषयी माझ्या मनात खरे विचार येऊ लागले. त्याबद्दल त्यांचे उपकार स्मरतो.' असे खुद्द फुले यांनीच नमुद करून ठेवले आहे. मुस्लीम सवंगड्यांच्या सान्निध्यातुन जोतिरावांना प्राप्त झालेली दृष्टी सुफी संप्रदायाचा प्रभाव असलेल्या निम्नवर्गीय श्रमिक मुसलमानांच्याकडून आलेली होती. भारतात सत्तेच्या परिघात वावरणारे उच्चकुलीन मुसलमान जातिव्यवस्थेची उच्च नीचतेही कल्पनाही अंगीकारत असत. कुलीन अश्रफ मुसलमान म्हणून अबूल फझल निम्न जातीयांविषयी ब्राम्हणांप्रमाणेच तुच्छता बाळगताना दिसतो. याउलट मानवी बंधुता व समतेचा प्रसार करणाऱ्या सुफी संप्रदायाचा श्रमिक मुसलमानांवर, निम्न जातीय हिंदुवरही प्रभाव असे. सर्व धर्मसंबंधातला सलोखा सामाजिक शोषण व विषमतेचा निषेध यामुळे सुफी संप्रदाय मध्ययुगीन जातिविद्रोहाच्या चळवळीचा स्त्रोत बनला होता. जोतीरावांचे इंग्रजी शिक्षण प्रथम स्कॉटिश व नंतर सरकारी शाळेत झाले. इंग्रजी शिक्षणाने व संस्काराने मनुष्याच्या विचारांमध्ये बदल घडतो.

## सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ

सावित्रीबाईचे जोतीरावांशी १८४४ मध्ये लग्न झाले. सावित्रीबाई या सातारा जिल्ह्यातील नायगाव येथील खंडोजी नेवसे पाटील यांच्या जेष्ठ कन्या होत्या. लग्नाच्या वेळी त्या अवघ्या नऊ वर्षाच्या होत्या. तर जोतिराव तेरा वर्षाचे होते. संस्कारशील वयात दोघांचे सहजीवन सुरू झाल्याने दोघांच्या व्यक्तिमत्त्वाच्या व विचारांच्या जडणघडणीसाठी समान वातावरण लाभले. जोतीरावांच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या घटना व विचार सावित्रीबाईच्या जीवनाला वळण देत होत्या. लोकमोकांविषयीची आत्मीयता आदर व परस्परांना समजून घेण्याची उत्कटता यामुळे जोतीरावांच्या लोकविलक्षण ध्येयवादाला साथ देण्यास सावित्रीबाई उत्सुक झाल्या होत्या. सर्व मानव मात्रांबाबतच्या जोतीरावांचा कळवळा, अन्याय व शोषणा विरुद्धची मनस्वी चीड, मानवी अधिकाराच्या प्राप्तीसाठी संघर्ष करण्याचा जाज्वल्य ध्यास आणि जातीविरोधी विवेक निष्ठेतून निष्पन्न झालेली चिकित्सापद्धती सावित्रीबाईच्या व्यक्तित्वाचा व जाणिवेचा भाग बनत होती. त्यामुळे एक दम्पती म्हणुन जोतीराव व सावित्रीबाई यांनी एकात्मतेने सार्वजनिक जीवनाला आरंभ केला तत्कालीन कर्मठ पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या पार्श्वभुमीवर ही विलक्षण क्रांतीकारी घटना होती.

ज्ञान व शिक्षण समाजपरिवर्तनाच्या प्रेरक शक्ति असल्याच्या निष्ठेतुन जोतीराव व सावित्रीबाई यांनी शिक्षणाचे प्रसार कार्य हाती घेतले. मानवी अधिकार नाकारलेल्या समाजघटकांबाबत दोघांना विलक्षण कळवळा वाटत होता. सर्वाधिक दडपल्या गेलेल्या

समाज घटकांचे दुःखहरण शिक्षणप्रसारातून होईल याबाबत त्यांना विश्वास वाटत होता. त्यांनी स्त्रीयांना व अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे ठरवले. सदाशिवराव गोवंडे बरोबर अहमदनगरला जाऊन फारार मॅडमच्या कन्याशाळा जोतीराव व सावित्री बाई यांनी जवळून पाहिल्या व पुण्याला परत आल्यावर पुरुषप्रधानता व जातिव्यवस्थेच्या दुहेरी दडपणुकीत अडकलेल्या मुलींसाठी १८४८ मध्ये पहिली शाळा भिडेवाड्यामध्ये काढली मुलींची शाळा काढण्यामागच्या उद्देश त्यांनी 'ज्ञानोदय' ला लिहीलेल्या पत्रात व्यक्त केला आहे. जोतिराव लिहीतात. 'प्रथम मनात आले कि आईच्या योगाने मुलांची जी सुधारणूक होते. ती फार चांगली असते. स्त्रीयांना शिक्षण देण्यास कर्मठ ब्राम्हणी परंपरा कडाडून विरोध करत होती. तेव्हा जोतीराव व सावित्रीबाईनी स्त्री शिक्षणाचे पाऊल उचलले. शाळेत शिकवण्यासाठी शिक्षीका मिळाली तर बरे म्हणून जोतीरावांनी सावित्रीबाईना घरी शिक्षण देऊन शिक्षीका बनवले. सावित्रीबाईच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी जोतीरावांचे मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर यांनी घेतली. अहमदनगर येथे. फारारबाईच्या व पुण्यात मिचेल बाईच्या नॉर्मल स्कूलमध्ये सावित्रीबाईनी अध्यापनाचे प्रशिक्षणही घेतले. स्त्रीयांना व अस्पृश्यांना शिकवण्यासाठी सावित्रीबाईनी घराचा उंबरठा ओलांडला त्यामुळे भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरवात करणाऱ्या आद्य शिक्षिका सावित्री बाईच ठरतात.

मुलींच्या शिक्षणाला आपल्या धर्माची अनुज्ञा नाही. अशी सनातनी ब्रह्मवृंदाची भूमिका होती. धर्मशास्त्रे.

रूढी परंपरा यांचा हवाला देऊन ते आपल्या प्रतिगामी भूमिकांचे समर्थन करत असत. स्त्रियांनी पुरुषांच्या आज्ञेत राहिले पाहिजे त्यांना ज्ञान देता कामा नये. त्यांनी धर्माची गुह्ये जाणू नयेत. पुरुषांच्या सान्निध्यात वावरू नये अशा खुळचट समजुतींच्या समर्थनार्थ ते धर्मशास्त्राचे दाखले देत. थोर ऋषी मुनींनी लिहीलेल्या धर्मशास्त्रांमध्ये काहीच असत्य नाही. असा त्यांचा युक्तिवाद असे. अर्थातच त्या कर्मठ, सनातनी ब्राम्हणांनी जोतीराव-सावित्री बाई यांनी सुरु केलेल्या मुलींच्या शिक्षणाच्या उपक्रमाला त्यामध्ये अंत्यजांच्या मुली शिक्षण घेत असल्यामुळे तीव्र संतापाने व कडवेपणाने विरोध केला.

हिंदु समाज रूढिपुजक असल्याने स्वभावतःच हा उपक्रम धर्मबाह्य वाटु लागला. आपल्या जातीतील स्त्रीने पायरी सोडून ज्ञानदानाचे ब्राम्हण जातीचे कार्य हाती घेणे माळी जातिसमुदयालाही पसंत पडले नाही. त्यांनी जोतिरावांच्या वडिलांवर दडपण आणले. गोविंदरावांनी जोतिराव व सावित्रीबाईंना घराबाहेर काढले. मात्र अशा प्रसंगी किंचीतही न डगमगता पती-पत्नी यांनी अढळ ध्येय निष्ठेने आपले कार्य सुरु ठेवले.

मानवी आधीकार नसलेल्या अस्पृश्यांना समानतेचे आधिकार मिळावेत व त्यांच्या दुःखाचे निराकरण व्हावे. यासाठी शिक्षणप्रसाराची आवश्यकता जोतीरावांनी व्यक्त जातिभेदाने अनिवार्य दुःखे महार-मांग यांस सोसावी लागतात. याकरता त्यांची विद्याधारनेच दाद लागेल. यास्तव त्यासाठीच प्रथम काम सुरु केले. असे जोतीराव सांगतात. अस्पृश्यांना शिक्षण देण्याबाबत जनमत विलक्षण विरोधी होते. कर्मठ ब्राम्हणांच्या दबावाखाली ब्रिटीश सरकारसुद्धा अस्पृश्यांना शिक्षण देण्यास धजावत नव्हते. १८५६ मध्ये धारवाडमध्ये महार मुलाला शाळेत प्रवेश देण्यास ब्रिटीश सरकारने मनाई केली होती.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# ज्ञान व शिक्षणातून समाजपरिवर्तन

प्रबोधनयुगातील सर्व सुधारकांचा ज्ञान व शिक्षणातून समाज बदलेल. यावर प्रबळ विश्वास होता. जोतीरावसुद्धा ज्ञान व शिक्षण यांना समाजपरिवर्तनाची शक्ती मानत होते. माणसाच्या मनुष्यपणाचे निर्णायक वैशिष्ट्ये म्हणजे माणसाचे बुद्धि सामर्थ्य व ज्ञानसामर्थ्य आहे. म्हणून माणसाला त्याचे मनुष्यत्व प्राप्त होण्यासाठी ज्ञान व शिक्षण देणे जोतीराव आवश्यक मानत होते. पाश्चिम देशांमध्ये सार्वत्रिक शिक्षणाने जशी क्रांती झाली. तशी भारतातही सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रसारातून क्रांती होईल. यावर त्यांचा विश्वास होता.

जोतीराव फुले यांनी ज्ञान व सत्ता यामधील जवळचा अनुबंध ओळखला होता. जातिव्यवस्थेचे शोषण व वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी ज्ञानाच्या विषमतेचे तत्व पायाभूत राहिले असल्याचे त्यांनी जाणले होते. ब्राम्हणी व्यवस्थेने स्त्री शुद्रातिशुद्रांवर ज्ञानबंदी लादुन त्यांना घोर अज्ञानामध्ये ठेवल्यामुळे त्यांच्यावर शोषण व वर्चस्व लादणे अधिक सुलभ झाले. अज्ञानामुळे स्त्री शुद्रातिशुद्रांना आपल्या गुलामाची व अन्यायाची जाणीव झाली नाही. जातिव्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या ज्ञानसत्तेच्या विषम संबंधाला जोतिरावांनी आपल्या हल्ल्याचे लक्ष केले. आणि सार्वत्रिक शिक्षणाद्वारे समाजपरिवर्तनाची योजना बाळगली.

ज्ञान व सत्तेच्या व्यवहाराला दुहेरी अंग असते. एका बाजूला ज्ञानाची व एक विशिष्ट प्रकारची कल्पना प्रस्तुत करून सामाजिक सत्तासंबंधाची घडण केली जाते वा तिला अबाधित ठेवली जाते. दुसऱ्या बाजूला ज्ञानाच्या एकांगुवर्ती कल्पनेला आव्हान देऊन सामाजिक सत्तासंबंधामध्ये परिवर्तन करण्यासाठी संघर्ष केला जात असतो.

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

## सत्यशोधक समाजाची स्थापना

'गुलामगिरी' ग्रंथामधून शूद्रातिशूद्रांच्या दास्यमुक्तीचा इतिहास व तत्वविचार मांडल्यावर जातिनिषेधासाठी ब्राम्हणी धर्माच्या विरोधात त्या सार्वजनिक रित्या व संघटितपणे लढण्याच्या संकल्पाकडे जोतिराव वळले. ब्राम्हणी धर्माच्या प्रभावाखाली. मनःपूत व स्वयंप्रेरणेने गुलामी भोगणाऱ्या शूद्रातिशूद्रांचे. प्रबोधन करून त्यांना जातिव्यवस्थे विरोधात संघटित करण्यासाठी संस्थात्मक पाया देण्याची गरज होती. ब्राम्हण स्वतःचे वर्चस्व आणि हितसंबंध स्वतःहून सोडून देणार नव्हते. त्याविरोधात अविरतपणे व संघटितपणे संघर्ष करण्यासाठी संघटनेची आवश्यकता होती. याचा विचार करून जोतीरावांनी आपल्या सार्वजनीक कार्यातून वैचारिक सख्य निर्माण झालेल्या. स्नेह्यांना संघटनेचे प्रयोजन सांगणारे विनंतीपत्र देऊन पुणे येथे सभा बोलावली. पुणे, मुंबई व अन्य ठिकाणावरून ५०।६० मंडळी सभेसाठी जमा झाली. जोतीरावांनी त्यांच्यापुढे एक परिणामकारक भाषण करून आपल्या चळवळीसाठी मध्यवर्ती संस्थेची कशी आवश्यकता आहे. हे पटवून दिले. त्या विषयावर अनेक भाषणे झाली. आणि त्यानंतर झालेल्या ऊहापोहानंतर एकमताने २४ सप्टेंबर १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजाची' स्थापना झाली.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष म्हणून जोतिरावांची निवड झाली. नारायण गोविंदराव कडलक यांची सेक्रेटरी म्हणून निवड झाली. त्या सभेला जमलेले अनेक जण समाजाचे सभासद बनले. सभेत समाजाचे नियम व पोटनियम तयार करण्यात आले.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

सत्यशोधक समाजाची पहिली कामगिरी म्हणजे ब्राम्हण दलालाशिवाय घरातील किंवा अन्य कुठलीही विधी करण्याचे मनोधैर्य लोकांच्या अंगी यावे. यासाठी जोतीरावांनी स्वतःच्या घरी कुळकर्णीचे लग्न लावले. जोतीरावांच्या मागे सर्वजण मंगलाष्टका म्हणत होते. जोतीरावांच्या नंतर रा. रामशेट उरवणे आणि कृष्णाबा माळी यांच्या घरी कुळकर्णीची लग्ने ब्राम्हण उपाध्याशिवाय लावण्यात आली. ब्राम्हणांशिवाय कुळकर्णीच लग्न लावण्याचा त्यामुळे प्राधान्य निर्माण झाला. प्रतिगामी शक्तींचा व विचारांचा प्रभाव असलेल्या त्या काळात जोतिरावांनी प्रतिगाम्यांविरोधात उघड सामना स्वीकारला. त्यांच्या दुकानात काम करणाऱ्या सीताराम आल्हाट याचे ब्राम्हणांशिवाय सत्यशोधक पद्धतीने लग्न करण्याचे त्यांनी योजले. त्यामुळे ब्राम्हणवर्ग भडकला. त्यांनी मोठी आडकाठी सुरु केली. ब्राम्हणांशिवाय लग्न करणे अमंगल व धर्मद्रोही कृत्य आहे. इतकेच नव्हे तर कुळाला व जातीला काळिमा फासणारे आहे. असे सांगुन मुलीच्या वडिलांना बिथरवले परंतु मुलीची आई सावित्रीबाईची मैत्रिण असल्याने ती निर्धारापासून ढळली नाही. २५ डिसेंबर १८६३ मध्ये हा पहिला सत्यशोधक विवाह साजरा झाला. हा समारंभ विलक्षण साधा व सुटसुटीत होता. वधु-वरांनी एकमेकांशी निष्ठेने वागण्याच्या फुलोचरित शपथा सर्वांच्या देखत घेतल्या. सत्यशोधक मताच्या पंचांनी आशीर्वादाचा श्लोक म्हणुन ह्याद्वारे वधु-वरास सदुपदेश केला. सत्यशोधक समाजाचे सभासद बहुसंख्येने या विवाहसमारंभास उपस्थित होते. वधु-वरांस देणग्यांचा वर्षाव झाला.

गौतम पवार
द्वितीय वर्ष कला

FOR EDUCATIONAL USE

# लोकहितवादी

## ( गोपाळ हरी देशमुख )

अव्वल ब्रिटिश कालखंडात १८४८ ते १८५० दरम्यान 'ज्ञानप्रकाश' या पत्रातून 'लोकहितवादी' या नावाने जी 'शतपत्रे' प्रसिद्ध झाली, ती गोपाळ हरी देशमुख या पंचविशीतील तरुणाने लिहिली होती. आपला गतानुगतिक समाज, अन्यायग्रस्त चालीरीती, समाजातील दंभ व कर्मकांड यांच्या विरोधात लोकहितवादींनी शतपत्रांतून केलेले शाब्दिक हल्लेही त्या काळातील मोठी धाडसाची व तत्कालीन समाजाला हलवून सोडणारी कृती होती. नंतरच्या काळातही त्यांनी स्वकीयांवर तर शाब्दिक हल्ले चढवलेच, पण इंग्रजी राज्य व त्यांची व्यापारी धोरणे यांचा कठोर भाषेत समाचार घेतला. राजकारण, समाजकारण, धर्मकारण, व अर्थकारण या विषयावर त्यांनी जवळपास चाळीस पुस्तके लिहली. मुलींच्या शाळा, सार्वजनिक ग्रंथालये, विधवा पुनर्विवाह मंडळे व इतर अनेक सामाजिक संस्थांची पायाभरणी करण्यात त्यांचा पुढाकार होता. नंतरच्या काळात आर्यसमाज, प्रार्थनासमाज व थिऑसॉफिकल सोसायटी यांच्या कार्यात सहभागी झाल्यावर त्यांचे विचार सौम्य होत गेले. तरीही ब्रिटिश काळातील पहिल्या पिढीतील अव्वल समाजसुधारक हे त्यांचे स्थान अबाधित आहे.

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राला समाज सुधारकांची एक महान परंपरा लाभली होती. आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांच्यापासून महात्मा ज्योतिराव फुले यांच्यापर्यंत अनेकांचा त्यामध्ये समावेश होतो. 'लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख हे त्या परंपरेतील एक आद्य समाजसुधारक.

लोकहितवादी आणि समकालीन अन्य समाजसुधारक यांच्यातील एक मुख्य फरक चटकन लक्षात येतो. बहुतांश समाजसुधारकांनी त्यांना त्यांना प्रकर्षाने भावलेली एखाद-दुसरी सामाजिक समस्या डोळ्यांसमोर ठेवून आपापल्या शक्तीनुसार आणि कल्पनांनुसार ती समस्या सोडवण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. या उलट सर्व सामाजिक वैगुण्ये लवकरात लवकर नाहीशी व्हावीत, असे लोकहित-वादींना वाटत असावे. शेकडो अनेक वर्षे निद्रावस्थेत राहिलेल्या हिंदू समाजाला जगाच्या बरोबरीला येण्यासाठी वेगाने दौड केली पाहिजे, हे त्यांच्या विचाराचे सूत्र होते.

परंपरागत दिले जाणारे शिक्षण, आर्थिक दारिद्र्य, वेडगळ समजुती व धर्मकल्पना, विधवाविवाह प्रतिबंध, बालविवाहाची प्रथा, जरठकुमारी विवाह, बहुपत्नीत्वाची चाल, जातिभेद अशा अनेक समस्या तत्कालीन महाराष्ट्राला भेडसावत होत्या. या सर्व समस्यांचे गांभीर्य लोकहितवादी यांना तीव्रतेने जाणवले. म्हणूनच त्यांनी समाजाच्या सर्वांगीण सुधारणेचा ध्यास घेतला होता. उपरोक्त सर्व विषयांबाबतचे आपले विचार शतपत्रे आणि सुरुवातीच्या अन्य स्फुट लेखनाद्वारे त्यांनी तत्काळ समाजापुढे मांडले.

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे जीवनसंपादन:

सरदार गोपाळ हरी देशमुख जन्म फेब्रुवारी १८, इ.स १८२३ मृत्यू पुणे ऑक्टोबर ९. इ.स. १८९२. त्यांचे घराणे मूळचे कोकणातले वतनदार होते. घराण्याचे मूळचे आडनाव सिद्धये. त्यांच्या देशमुखी वतनामुळे देशमुख नाव पडले. गोपाळराव देशमुखांचे वडील हरीपंत देशमुख हे पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस म्हणून काम करीत होते. गोपाळराव देशमुखांना ग्रंथ संग्रहाची व वाचनाची विलक्षण आवड होती. इतिहास हा त्यांचा आवडीचा विषय होता. त्यांनी त्या विषयावर सुमारे दहा पुस्तके लिहली.

इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातील काळात इंग्रजी शिक्षणामुळे घडलेल्या पहिल्या काही नवशिक्षितांपैकी एक म्हणजे गोपाळ हरी होते. त्यांनी मराठी शाळेत शिक्षण घेत असतानाच इंग्रजीचा अभ्यास केला. त्यांच्या वयाच्या २३ व्या वर्षी ते न्यायालयात भाषांतरकार झाले. 'सदर अदालती' ची मुन्सिफीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १८६२ पासून ते मुंबई सरकारच्या न्यायखात्यात न्यायाधीश झाले. त्या पदावर त्यांनी अहमदाबाद, नाशिक व सातारा येथल्या कोर्टात काम केले.

श्रमातून संपत्ती निर्माण होते या सूत्रातून गोपाळराव देशमुखांना दारिद्र्य निर्मूलनासाठी काय करायला पाहिजे याची दिशा समजली. हिंदुस्थानात ज्ञानाबरोबर तंत्रज्ञान व नाना प्रकारचे उद्योगधंदे वाढावेत ही त्यांची तळमळ होती. स्वदेशात विद्यावृद्धी होऊन स्वभाषेत नवे ज्ञान त्यांनी लोकांना दिले.

लेखनसंपादन.

रेव्हरंड जी.आर. ग्लीन यान्च्या 'हिस्टरी ऑफ द ब्रिटिश एम्पायर इन इंडिया' या पुस्तकाच्या आधारे गोपाळराव देशमुखांनी इ.स. १८४२ मध्ये म्हणजे वयान्च्या एकोणिसाव्या वर्षी हिंदुस्तानाचा इतिहास हे पुस्तक लिहिले. पुस्तकाचे प्रकाशन मात्र इ.स. १८७८ मध्ये झाले. इ.स. १८४८ पासून त्यांनी मुंबईहून निघणाऱ्या प्रभाकर या साप्ताहिकात लोकहितवादी या नावाने लोकहितार्थ लेखन सुरु केले. त्या नावाने त्या नावाने त्यांचा पहिला लेख त्या वर्षी १२ मार्च रोजी प्रसिद्ध झाला. लेखाचा विषय होता. 'इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुती'. या शिवाय, लोकहितवादीनी एक ब्राम्हण या नावानेही लिखान केले. त्या काळी लहान वयातच लग्न करुन द्यायची प्रथा होती. लहान वयातच लग्न करुन द्यायची प्रथा होती. लहान वयातील लग्नामुळे काय अडचणी होतात हे त्यांनी प्रभाकरमध्ये पत्र लिहून लोकांच्या नजरेस आणले. पुढील काळात त्यांनी अनेक समस्यांबाबत, विविध विषयांवर पत्रद्वारा लेखन केले.

इ.स. १८४८ ते इ.स १८५० या काळात त्यांनी १०८ छोटे छोटे निबंध होते, हेच निबंध लोकहितवादीची शतपत्रे नावाने ओळखले जातात. या शतपत्रांच्या माध्यमापासून त्यांनी समाजसुधारणा विषयक विचार समाजासमोर मांडले. ही शतपत्रे प्रभाकर या साप्ताहिकातून प्रसिद्ध झाली. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, वाङ्मयीन, ऐतिहासिक इत्यादी विषयावर त्यांनी लहानमोठे असे सुमारे ३९ ग्रंथ लिहिले. दोन नियतकालिके चालविली.

लोकहितवादींनी अनेक उत्कृष्ट असे इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर केले. त्यांच्या लेखनातून लोकांच्या सर्वांगीण उन्नतीची तळमळ दिसून येते. जातिसंस्था हा देशाच्या उन्नती होण्याच्या मार्गातील मोठा अडसर आहे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या लेखनातून केले. लोकहितवादी हे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील, म्हणजे रानडे पूर्व पिढीतील हिंदुस्थानातील अर्थशास्त्रज्ञ होते. मराठी लेखन करणारेही ते पहिलेच अर्थतज्ञ. लक्ष्मीज्ञान या ग्रंथाद्वारे त्यांनी ॲडम स्मिथ प्रणीत अर्थशास्त्र वाचकासमोर आणले. मातृभाषेतून शिक्षण या तत्वाचाही त्यांनी प्रसार केला.

लोकहितवादींचे ग्रंथसाहित्यसंपादन.

* इतिहास :- (एकूण १० पुस्तके)

१) भरतखंडपर्व (हिंदुस्थानाच्या संक्षिप्त इतिहास १८५१).
२) पानिपतची लढाई (काशिराज पंडित यांच्या मूळ फार्सी ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतरावरुन १८७७).
३) ऐतिहासिक गोष्टी भाग १ (१८७७)
४) ऐतिहासिक गोष्टी भाग २ (१९७८)
५) ऐतिहासिक गोष्टी भाग ३ (१९८०)
६) हिंदुस्थानच्या इतिहास - पूर्वार्ध (१८७८)
७) गुजरात देशाच्या इतिहास (१८८१)
८) लंकेचा इतिहास (१८८८)
९) सुराष्ट्र देशाच्या संक्षिप्त इतिहास (१८९१)
१०) उदेपूरच्या इतिहास १८९३

* चरित्रे :- (एकूण २ पुस्तके)

१) पृथ्वीराज चव्हाण यांचा इतिहास (चांद बारदाई यांच्या पृथ्वीराज रासो नावाच्या इ.स ११९१ मध्ये मूळ प्राकृत भाषेत लिहिल्या गेलेल्या काव्यावर आधारित १८८३)
२) पंडित स्वामी श्रीमदयानंद सरस्वती १८८३)

* धार्मिक नैतिक :- (एकूण ७ पुस्तके)

१) खोटी साक्ष आणि खोटी शपथ यांचा निषेध (१८५१)
२) गीतातत्व (१८७८)
३) सुभाषित अथवा सुबोध वचने (१८७८)
४) स्वाध्यायप्राचीन आर्यविद्यांचा क्रम, विचार (१८८०)
५) आश्वलायन गृह्यसूत्र (१८८०)
६) आगमप्रकाश (१८८४)
७) निगमप्रकाश (१८८४)

* राज्यशास्त्र : अर्थशास्त्र :- (एकूण ५ पुस्तके)

१) लक्ष्मीज्ञान (क्लिफ्टच्या पॉलिटिकल इकॉनॉमी या पुस्तकाचे मराठी रूपांतर, १८४९)

२) हिंदुस्थानात दरिद्रता येण्याची कारणे आणि त्याचा परिहार व व्यापारविषयी विचार (दादाभाई नौरोजी यांच्या 'पॉव्हर्टी इन इंडिया' या निबंधाच्या आधारे १८७६)

३) ग्रामीण स्वराज्य व्यवस्था (१८८३)

४) ग्रामरचना त्यातील व्यवस्था आणि त्याची हल्लीची स्थिती (१८८३)

५) स्वदेशी राज्ये व संस्थाने १८८३

* समाजचिंतन :- (एकूण ५ पुस्तके)

१) जातिभेद (१८८७)

२) भिक्षुक (१८७७)

३) प्राचीन आर्यविद्या व रीती (१८७७)

४) कलियुग (१८७७)

५) निबंधसंग्रह (१८६६)

* संकीर्ण :- (एकूण ७ पुस्तके)

१) होळीविषयी उपदेश (१८४८)

२) महाराष्ट्र देशातील कामगार (१८४८)

३) सरकारचे चाकर व सुखवस्तू हिंदुस्थानातील साहेब लोकांशी संभाषण (१८५०)

४) यंत्रज्ञान (१८५०)

५) पदनामा (१८५०)

६) पुष्पयन (१८५१)

७) शब्दलंकार (१८५१)

* हस्तलिखित न सापडल्याने प्रसिद्ध न करता आलेली पुस्तके :- (एकूण ४ पुस्तके)

१) आत्मचरित्रमका दिवसात लिहीलेले पुस्तक
२) विचारलहरी
३) हिंदुस्थानातील बालविवाह.

* नियतकालिके :- (एकूण २ पुस्तके)

१) लोकहितवादी (डेमी आकारमानाचे वीस पृष्ठांचे मासिक, (१८८२ पासून १८८७ पर्यंत)
२) लोकहितवादी (ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशित करणारे त्रैमासिक एप्रिल १८८३ पासून ते १८८७ पर्यंत.

* इतर संपादन.

अध्यक्ष . आर्य समाज मुंबई अध्यक्ष .
थिऑसॉफिकल सोसायटी ऑफ बॉम्बे अध्यक्ष
गुजराती बुद्धिवर्धक सभा १९७८ मध्ये ते मुंबई विद्यापीठाचे
फेलो झाले
सन १८८० मध्ये गोपाळराव देशमुख मुंबई कायदे
कौन्सिलचे सदस्य झाले.

* पुरस्कार वगैरे

ब्रिटिशांनी गोपाळराव देशमुखांना 'जस्टिस ऑफ पीस'
या पदवीने आणि १८७७ मध्ये 'रावबहादूर' या पदवीने
सन्मानले.

~ पूजा पाडवे

# अनुक्रमणिका *



| Sr. No. | Subject | Page. No. | Sign |
|---|---|---|---|
| 1. | बालपण व संगोपन * | | |
| 2. | विल्सन कॉलेज * | | |
| 3. | सांसारिक जबाबदाऱ्या * | | |
| 4. | उलगडत गेलेले डांगे * | | |
| 5. | कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचे विचार * | | |
| 6. | डांगे : एक माणूस * | | |



Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या समाजावर ज्यांनी स्वतःची अमीट छाप सोडली त्यापैकी एक म्हणजे **श्रीपाद अमृत डांगे!** कामगार चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ या काळात ज्यांनी ज्यांनी त्यांची भाषणे ऐकली, त्या अनेकांनी त्यांच्या भाषणांच्या परिणामकतेवर भाष्य केलेले आहे. महाराष्ट्रात डांगे यांचे नाव ऐकले नाही अशी चाळीशीच्या पुढली व्यक्ति नसेल. व त्यांच्या भाषणाच्या आठवणी सांगणारी पिढीही अजून आहे. डांगे यांच्या विचारांशी सहमत नसले तरी त्यांचे भाषणे ऐकणारे अनेक. त्यांच्या विचारांचे मनन नकळत करत असणार. समाजाला सुसंस्कृत व आणि सहिष्णू बनवण्यात नेहमी अशा वेगवेगळ्या विचारांचा मोठा हातभार असतो. कारण परंपरागत विचारापेक्षा काहीतरी निराळे ऐकणे व त्यावर विचार करणे महत्वाचे असते. त्यावर अंमल केला अथवा न केला तरीही अशा तऱ्हेनेही विचार केला जाऊ शकतो. ही जाणीव माणसाला सहिष्णू आणि प्रगल्भ बनवते. शिवाय त्यांचे वाचन त्यांच्या वेगवेगळ्या विषयांचा आवाका त्यांच्या पुस्तकाच्या रुपाने आजही उपलब्ध आहे. विविध विचारांचे चाललेले मंथन व ते ऐकून घेण्याची सवय त्या कालीन महाराष्ट्राला प्रागतिक व आधुनिक बनवून गेली. श्रीपाद अमृत डांगे यांनाही बनविण्यात त्यांच्या वाणीच्या वयात अशाच अनेक गोष्टींचा हात होता.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# बालपण व संगोपन

१० ऑक्टोबर १८९९ जन्मलेल्या डांगे यांची आई ते २ वर्षांचे होण्याअधिच दगावली. घरात दुसरे बाईमाणूस नव्हते. त्यामुळे त्यांचे संगोपण त्यांच्या काकांची पत्नी म्हणावी अशा दगुबाई यांनी केले. (उषा डांगे, १९९९, पृ० ४ व राहूल सांकृत्यायन, १९४४, पृ० ६) यांच्यासाठी बग्या म्हणजे जिव की प्राण होता. व डांगे यांच्यासाठीही दगुबाई आईच होती. काही कारणाने लहान डांगे यांना घेऊन दगुबाई नाशिक येथे स्थायिक झाल्या. तिथेच त्यांचे शालेय शिक्षण सुरु झाले. डांगे हे लहानपणापासूनच प्रकृतीने नाजूक आणि दगुबाईचे अतिशय लाडके, त्यामुळे अतिकाळजी पोटी त्या त्यांना बाहेर मैदानी खेळ खेळण्यास, पोहण्यास अथवा सायकल चालवण्यास जाऊ देत नसत. त्यामुळे त्यांचे विरंगुळयाचे साधन होते वाचन, त्याकाळी नाशिकचे वातावरण क्रांतिकारी विचारांनी भारलेले होते. सावरकर कान्हेरे या सर्वांविषयी लहान मुलांच्या मनात साहजिकच कुतूहल मिश्रित आदर असे. डांगे यांनिही आपल्या बालमित्रांच्या सहाय्याने काधि देवाच्या शोधात प्रवास सुरु केला, तर कधी आजन्म देशसेवा करण्याची शपथ घेतली. १९०७ साली डांगे ४ वर्षांचे होताच त्यांची मुंज करण्यात आली. आपण ब्राह्मणांच्या मुलाचा धर्म भ्रष्ट केला असे कुणी म्हणूनये म्हणून मराठा जातीच्या दगुबाईनी डांगे यांच्या जेवणाची व्यवस्था जवळच्या एका ब्राह्मण कुटूंबात केली; परंतू डांगे यांच्या ते फारसे मनात येईना !

त्यांना ते ब्राह्मणी, मिळमिळीत व सवयीचे नसलेले जेवण आवडे ना! शिवाय आईच्या हातचे खाणे अचानक निषिद्ध का व्हावे हेही त्यांच्या बालमनाला उलगडेना! खळखळ कुरकुर करत कसाबसा हा 'अन्याय' त्यांनी काही वर्षे सहन केला आणि साधारण चौदाव्या वर्षी बंड पुकारून दगुबाईच्या स्वयंपाकघरात शिरून व्यवस्थित जेवले. त्यामुळे घरात व आजूबाजूला थोडासा गोंधळ माजला असावा; परंतु पुढे दगुबाईच्या अंतापर्यंत ते त्यांच्या हातचेच जेवले. हा प्रसंग इथे उद्धृत करण्याचे कारण म्हणजे जातिश्रेष्ठत्वाचा अहंकार ब्राह्मणांना जो घरातून नकळत मिळतो तो डांग्यांना मिळाला नाहीच; परंतू त्या काळी सामाजिक रूढींच्या भीतीने (जी दगुबाईच्या मनात होती) पंक्तिभेद केला जायचा त्यावरही आईच्या प्रेमामुळे त्यांनी मात केली. त्यांच्या जडणघडणीत बंडखोरपणा येण्यास कदाचित ही बाब महत्त्वाची ठरली असावी. त्या काळी ब्राह्मणाच्या मुलाने संस्कृत शिकणे ही अगदी सहज बाब होती. त्यांच्या संस्कृत वरील प्रभुत्वाच्या उगमही त्यांच्या नाशिकमधील बालपणातच शोधता येईल.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# विल्सन कॉलेज

1917 मध्ये मॅट्रिकची परिक्षा पास होऊन डांगे यांनी चौपाटिवरील विलसन कॉलेजमध्ये प्रवेश केला. हे कॉलेज तेव्हा ॲंग्लीकन चर्चच्या प्रोस्टेंटंट मिशनरींनी चालवलेले होते. आज मराठी मिशन ते कॉलेज चालवते. गोरे मिशनरी ते चालवायला व शिकवायला असल्यामुळे व राज्यही त्यांचेच असल्याने बायबलचा, धर्मप्रसार हाही एक हेतूच होताच. याच मिशनच्या पाद्र्यांनी हिंदू पंडितांबरोबर, हिंदु धर्मातील त्रुटी दाखवून देण्यासाठी धर्मविषयी जाहिर वादविवाद केले होते. डांगे यांनी सर्व विद्यार्थ्यांना गोळा करुन बायबलच्या तासावर बहिष्कार घातला. त्याच वेळी त्यांचे वडिल आजारी होते. परंतू एकदा लढा हाती घेतल्यावर बहिष्कार, चळवळ, चर्चा, मिटिंग वगैरे मार्गाने त्यांनी तो तडिस नेला. त्यानंतर ख्रिश्चन नसलेल्या विद्यार्थ्यांना सक्तीच्या बायबल तासापासून मुक्ती मिळाली. विल्सन कॉलेजात त्यांनी 'यंग कॉलेजिएट' नावाचे एक मासिकही काढले. त्यात लोकमान्यांनी आशिर्वाद देणारा एक लेख लिहिला होता. त्यात डांगे यांनी गडकऱ्यांच्या दोन-तिन कवितांचे इंग्रजी भाषांतर करुन छापले होते. त्यांना गडकरी यांचे लेखन अतिशय आवडायचे. (अत्रे 1988, पृ० 10) व त्यांच्या मते मराठी काव्य इंग्रजीतून लोकांपर्यंत पोचल्यास त्यांनी नोबल पारितोषक मिळण्यास हरकत नाही. उषाताई डांगे ही आपल्या आत्मचरित्रात म्हणतात (उषाकाल, 1999 पृ० 32, लालजी पेंडसे, 1988, पृ० 35) की, चांगल्या मूडमध्ये असले की डांगे गडकऱ्यांच्या कविता गुणगुणत.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# सांसारिक जबाबदाऱ्या

डोंगे यांचे वडिल व चार वर्षांची सावत्र बहीण यांचा १९१८-१९ च्या इन्फ्लुएंझाच्या साथीत मृत्यू झाला. सावत्र आई माहेरी निघून गेली. घरात मोठी बहिण व डोंगे हे दोघेच होते. त्यांच्या घराजवळ वरसईचे पेण तालुका - भावे म्हणून कुटुंब राही. डोंगे यांचे वडिल असल्यापासूनच या दोन्ही कुटुंबाचा घरोबा होता. त्या घरचे नाना भावे त्यांची पुतणी सोनु विसाव्या वर्षी विधवा झाली होती. तिला सासरी अतिशय छळ व माहेरी कोरडी वागणूक मिळे. तरिही सासरपेक्षा माहेर बरे म्हणून ती जास्तच माहेरिच असायची. तीची व डोंगे यांची बहिण छबूताई यांची मैत्री होती. एका वेळी डोंगे व छबुताई हे दोघेही आजारी असताना छबुताईला एक मराठे म्हणून गृहस्थ घरी घेऊन गेले व डोंगे भावे यांच्या घराजवळ राहायला आले. या आजारपणात सोनुताई व त्यांच्या आईने डोंगे यांची शुश्रुषा व पथ्यपाणी केले. यातून दोघे मनाने जवळ आले; परंतु सोनुताई अतिशय पारंपारिक व सनातनी घरात वाढल्या होत्या, विधवा होत्या, वयाने मोठ्या होत्या. या सर्व कारणांमुळे स्वत: त्या विशेष काही वेगळा विचार करणे शक्य नव्हते. मोठी बहीण छबुताई क्षयामुळे लवकरच वारली. डोंगे यांना जवळचे असे फक्त भावे कुटुंब. छबुताई वारण्यापुर्वीच टिळक यांचा मृत्यू झाला होता. उमाताई उर्फ सोनुताई लिहितात की डोंगे त्या दिवशी खुप रडले होते. व त्या दोघींना घेऊन अंत्यदर्शनाला गेले होते. त्यांच्या चितेतील थोडीशी राख भावुक डोंगे यांनी एका डबीत शेवटपर्यंत स्वत: जवळ जपून ठेवली होती.

# उलगडत गेलेले डांगे

आणीबाणीची वर्षे दिल्लीत गेलेल्या व त्या काळातले धास्तावलेले वातावरण तसेच घडलेली दडपशाही व अत्याचार, तुर्कमान गेटच्या जुन्या वस्तीवर चालवलेले बुलडोझर्स (ती झोपडपट्टी नव्हती), हरियाणा - उत्तर प्रदेशच्या छोट्या गावातून येऊन नुकतीच प्राध्यापकी सुरु केलेल्या अविवाहित तरुणांना नसबंदीच्या केसेस, पगारासाठी, आणण्याची घातलेली अट. लोकांवर धास्ती बसवण्यासाठी खोट्या आरोपांखाली पकडलेली तरुण मुले, ही प्रकरणे नुसती ऐकीव नव्हती तर त्यापैकी काही सक्षम घडलेल्या घटना होत्या, तर काहींना प्रत्यक्ष भेटले होते. त्यामुळे आणीबाणीला पाठिंबा देण्याविषयी एक प्रकारची अढी मनात होती. सतत तुमच्या मागे हेर आहेत अशा बातम्या ऐकुन आम्ही सर्वच जरा जास्तच सावधपणे जगायला शिकलो होतो. त्यातून बाहेर पडायला बराच वेळ जावा लागला. आज इतक्या वर्षांनी पुरेसा तटस्थपणा आल्यावर, परिस्थितीचे आकलन करुन घेताना आणीबाणीची आवश्यकता किंचितशी बुद्धीला पटली असली तरी आणीबाणीच्या परिस्थितीचा, दडपशाहीचा अनुभव पहिल्या दिवसापासून घेतल्यामुळे ती परिस्थिती परत येऊ नये असेच वाटते. ही अढी मनात असली तरी कॉ. डांगे यांना भेटताना त्यांना जाणून घेण्याचे निखळ कुतूहल मनात होते. त्यांना भेटले तो काळ असेल 1987-88 चा. काळापर्यंत त्यांचे राजकीय महत्व जवळजवळ संपले होते. त्यांची प्रकृतीही फारशी चांगली नव्हती, त्यांचा मुड असला म्हणजे जुने किस्से ऐकायला मिळायचे. त्यांच्याकडून थोड्या गप्पा, थोडी माहिती व थोडे घरगुतीपण सगळेच मिळत होते.

Sundaram®

# डॉ० श्रीपाद अमृत डांगे यांचे विचार *

डांगे यांचे विविध विषयांवरील लेखन वाचताना त्यांचे लेखन कधी माहितीपूर्ण वाटले, तर कधी विरोधकांवर टीका करताना त्यांची शैली बोचरी जरी असली, तरी त्यातील उदाहरणे चपखल व माहितीपूर्ण आहेत, हेही जाणवले. चरित्रलेखनात त्यातील उतारे किती मोठे असावेत, याबद्दल संभ्रम निर्माण झाला, कारण प्रत्येक वाचकाला त्यात नवडाच रस येईल असे नसते. त्यामुळे त्याचे एक वेगळेच प्रकरण लिहावे, असे वाटले. हे उतारे अनेक पुस्तकांतून विखुरलेले आहेत व ज्यांना अधिक उत्सुकता वाटेल, ते मूळ पुस्तकांकडे वळतीलच.

डांगे यांना इतिहासात रस प्रथमपासून होता, असे त्यांच्या उद्योगांवरून वाटते. जरी त्या काळी मार्क्सवादी वाङ्मय सहज उपलब्ध नव्हते, तरी ऐतिहासिक द्वंद्ववाद, या पद्धतीने लिहिलेले 'युरोपीयन इतिहासाचे विश्लेषण' एंगल्सचे 'कुटुंबसंस्था' 'खासगी मालमत्ता' आणि 'शासनसंस्था यांचा उगम' हे त्यांनी वाचले होते, असे म्हणता येईल. हे म्हणण्याचे कारण म्हणजे वि० का० राजवाडे यांचे 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' हे पुस्तक जेव्हा त्यांनी स्वतःच्या 'सोशालिस्ट' या नियतकालिकातून छापण्याचे ठरवले, त्या वेळी डांगे म्हणतात, 'एक दिवस शुभ्रवेषधारी तापसीवत दिसणारे दोन धिप्पाड पुरुष माझ्यासमोर येऊन उभे राहिले. एक वि० का० राजवाडे व दुसरे शं० का० राजवाडे.'

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# डांगे : एक माणूस

## इतरांच्या नजरेतून

आचार्य अत्रे डांगे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील साथीदार, ते डांगे यांना चाळीस वर्षांपासून ओळखत होते. डांगे यांनी 'बायबल' च्या क्लासवर बहिष्कार टाकून मुंबई शहरात खळबळ उडवून दिली होती, असे त्यांचे म्हणणे. त्यानंतर 'यंग कॉलेजिएट' या त्यांच्या मासिकात त्यांनी गडकऱ्यांची 'एखादयाचे नशीब' ही कविता भाषांतर करुण छापली होती. ते भाषांतर अत्रे यांच्या मते 'फारच उत्तम वठले होते' व म्हणून त्यांनी डांगे यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले होते; परंतू त्यांचा जास्त परिचय संयुक्त महाराष्ट्र चळवळीत झाला व चळवळींमुळे दोघांनाही ठाण्याच्या तुरुंगात शेजार शेजारच्या कोठडीत दोन महिने घालवावे लागले. ~~त्यावेळ~~ त्यावेळच्या काही आठवणी त्यांनी लिहित्या आहेत.

'ह्या दोन महिन्यात अहोरात्र आम्ही एकमेकांचे सोबती होतो. रात्री आमच्या कोठड्यांची दारे बंद झाली, तरी आम्ही एकमेकांशी आपआपल्या कोठड्यांतून बोलत होतो. ह्या दोन महिन्यात मध्यंतरीच्या तीसपस्तीस वर्षांच्या काळातील अनेक घडामोडींवर आम्ही मनसोक्त गप्पागोष्टी केल्या, राजकरणावरच सर्वांत कमी बोलली असू.

शुभांगी उबाळे
द्वितीय वर्ष कला

## प्रस्तावीक

देशाच्या दैन्यावस्थेचे मुख्य कारण ब्रिटीश राजवट हेच आहे. सनदशीर मवाळ राजकारण आणि समाजसुधारकांना प्रोत्साहन देणे हा ब्रिटीशांचा कावा आहे. अशी मांडणी करुन, राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करणे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत म्हणून विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे नाव घ्यावे लागेल. लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर. शिं० म० परांजपे. वि.दा. सावरकर यांसारख्या अनेक तरुणांना आणि तत्कालिन सुशिक्षित वर्गाला त्यांनी प्रभावित केले होते.

त्यांना 'मराठी भाषेचे शिवाजी' असे म्हटले जाते. वक्रोक्ति, आजोकती, उपहास हे त्यांच्या भाषेचे विशेष होते. याच भाषेचा शस्त्रासारखा उपयोग त्यांनी आपल्या लिखानामध्ये केला होता. समाजातील निराशा, हतबलता झटकून टाकण्याचे आणि समाजामध्ये राष्ट्राभिमान जागृत करण्याचे काम त्यांनी केले. बंगालमध्ये बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी जशी भूमिका घेतली तशी, महाराष्ट्रमध्ये विष्णुशास्त्री यांनी घेतली. व्हॉल्टरलने फ्रान्समध्ये जशी क्रांतीपूर्व विचार जागृती केली. तशी विष्णूशास्त्री यांनी महाराष्ट्रामध्ये केली.

देशासाठी वीरगती प्राप्त करणारा स्वातंत्र्यवीर जितका महत्वाचा आहे. तितकाच विचारांचा शस्त्र म्हणून उपयोग करुन ध्येयवादी पिढी घडवणारा विचारवंतही महत्वाचा आहे. विष्णुशास्त्री चिपळूनकर यांची 'निबंधमाला' महाराष्ट्राच्या वैचारिक इतिहासातील एक महत्वाचा एक ~~टप्पा~~ टप्पा होय. महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी त्यांनी आपल्या विचारांच्या महत्त्वपूर्ण हातभार लावला. आपल्या विचारांद्वारे त्यांनी एक ध्येयवादी पिढी महाराष्ट्रात घडवली होती. त्यांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करणारे आहेत. अशा व्यक्तीच्या आयुष्यातील विविध पर्व पुढील प्रमाणे..

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## जन्म आणि बालपण :-

प्रखर राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करणारे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत म्हणून विष्णूशास्त्री यांचे नाव घ्यावे लागेल. अवघे बत्तीस वर्षांचे आयुर्मान लाभलेल्या विष्णुशास्त्री चिपळूनकर यांचा जन्म २० मे १८५० रोजी पुणे येथे झाला. सतराव्या शतकाच्या प्रारंभित स्वराज्यामध्ये आपले नशीब काढण्याच्या उद्देशाने चित्पावनांची अनेक घरे कोकणातून देशावर आली. त्यांपैकी चिपळूनकरांचे घर एक होते. मूळचे चिपळूनकर कुटुंब रत्नागिरी जिल्ह्यातील पावस या गावचे होते. मूळचे चिपळूणकर कुटुंब पावसहून विष्णूशास्त्री यांचे आजोबा सतराव्या शतकाच्या आरंभीच नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर येऊन राहिले. त्र्यंबकेश्वर जवळ त्रीरष्म म्हणून जो किल्ला आहे, त्याची फडणविशी त्यांनी पशवाईत प्रवेश केला. तेथे ते नाईक यानावाने प्रसिद्ध होते. नाईक हा पेशवाईत सावकारीचा हुद्दा होता. नंतर त्यांनी पुण्याकडे प्रस्तावर केले.

कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४ ते १८७८) हे विष्णूशास्त्रींचे वडील. लहानपनापासून ते अतिबुद्धीमान होते. कृष्णशास्त्रींची बुद्धीमत्ता तर चांगली होतीच. पण जबरदस्त चिकाटीमुळे त्यांनी लवकरच इंग्रजी व संस्कृत विद्येत प्राविण्य मिळवीले. त्यांना 'ट्रान्सलेटर एक्सीबिटर' ची जागा ही मिळाली होती.

कृष्णशास्त्री चिपळूनकर यांना रावजबाबदारी प्राप्त झाली होती. बऱ्याचदा पुण्यातील संभाचे नेतृत्व त्यांच्याकडे होते.

अशाप्रकारे कृष्णशास्त्री विष्णुशास्त्रींचे वडील हे आधुनिक आणि नव्या विचारांचे होते. त्यांनी आपल्या मुलाला मिशनरी स्कूलमध्ये घालायचे ठरवले. मिशनरी स्कूलमध्ये बालपणात बायबल शिकवणी विष्णूशास्त्रींना पटत नसे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

त्यामुळे विष्णुशास्त्रींना 'पुना हायस्कूल' मध्ये चौथ्या इयत्तेमध्ये त्यांचा प्रवेश करवून दीला. त्यांचे प्राथमिक शिक्षण फारसे शिस्तीत झाले नाही. त्यात मोडी अक्षर, वाचन, तोंडी हिशेब इत्यादी शिकवण मिळाली. त्यांची शिकवण चांगलीच झाली. चिमणाजी महादेव, नारायण कृष्ण गोखले, वामन आबाजी मोडक हे त्यांचे शिक्षक होते.

तरतरीतपणा, मेहनतीपणा आणि शिकवण्याच्या रेखीव आणि निमीत्तपणाचा त्यांच्यावर चांगलाच जम बसला होता. कृष्णशास्त्री सुद्धा विष्णुशास्त्रींचा कधी काळी अभ्यास घेत असत.

कृष्णशास्त्री अगदी हौलमानाने राहत; पण विष्णूला हौलमानाचा तिरकारा होता. त्यांची राहणी अगदी सोपी साधी होती. त्यांचे वेष म्हणजे धोतर, बाराबंदी, डोक्यावर पगडी, पायात पुणेरी जोडा असा साधाच असायचा. त्यांचा रंग काळा-सावळा, भव्य कपाळ, जाड ओठ, कोळभोर डोळे स्तिमीत दृष्टी मोठ्या भुवया आणि शरिरयष्टी धिप्पाड होती. पंचविशीच्या वयात असतानाही ते वयाच्या मानाने अधिक वयस्कर दिसत. डिसेंबर १८६५ मध्ये विष्णूशास्त्री मॅट्रीक झाले.

त्याचवर्षी त्यांचा विवाह नारायण भिकाजी भोकाटे यांची कन्या काशीबाई हिच्याबरोबर झाला. त्याचवेळी त्यांचे वय सोळा वर्ष होते. डिसेंबर मध्ये लग्न झाले. आणि १८६६ मध्ये जानेवारी महिन्यात विष्णुशास्त्री यांनी पुढील शिक्षणासाठी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश केला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## महाविद्यालयीन दिवस:-

विष्णुशास्त्री यांच्या मनाचा आणि विचारांचा विकास, महाविद्यालयीन जीवनातील अनेक घटकांच्या प्रभावानून झाला होता. डेक्कन कॉलेजमध्ये आपले महाविद्यालयीन जीवन त्यांनी घालवले.

वर्डस्वर्थ हे त्यावेळील डेक्कनचे प्रिन्सीपल होते. प्रसिद्ध कवी वर्डस्वर्थ ह्यांचे ते नातू. विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन आणि ज्ञान, हे तितके तितकाच तो विद्यार्थी खरा जिज्ञासू आणि पात्र अशी त्यांची भावना होती. परीक्ष्यार्थी मुलांविषयी त्यांना अगदी तिरस्कार होता. त्यामुळे ते ठराविक पुस्तकांरा व्यतिरीक्त इतर अवांतर ग्रंथाविषयी माहिती विद्यार्थ्यांना देत असत. आणि हेच गोष्ट विष्णुशास्त्र्यांना आवडत असत.

अनंतशास्त्री पेंढारकर हे डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृत व्याकरण शिकवत असत. पेंढारकरांना संस्कृत व्याकरण तोंडपाठ होते. तरिही कॉलेजमध्ये त्यांना अपरीक्षकाचा दर्जा होता. त्यामुळे ते असंतुष्ट असत. चिपळूणकरांच्या शास्त्रींना खूप फायदा झाला संस्कृत ज्ञान मिळवण्यासाठी.

प्रो. केरुनाना छत्रे हे विष्णुशास्त्री यांना गणित आणि संख्याशास्त्र हे विषय शिकवत हे दोन्ही विषय शास्त्रींचे नावडते होते. परंतु त्यांची शिकवण्याची पद्धत विष्णुशास्त्रींना फार आवडत असत जी पद्धत अतिशय सोपी आणि खुबीदार असे. शंका विचारणे हा ज्ञानाचा खरा मार्ग आहे, अशी वाट ज्ञानाची विष्णुपंजाना केरुनानांकडूनच भेटली. ते विष्णुशास्त्रींचे वडील सुद्धा होते. बी.ए च्या शेवटच्या वर्षी गणितात नापास झालेल्या विष्णुशास्त्रींना मराठी संस्कृत, इंग्रजीमध्ये प्राविण्यबद्दल शिष्यवृत्ती मिळालेली.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

विष्णुशास्त्रींना वाचनांची खूप आवड होती. ह्यांच वृत्तींचा त्यांना भविष्यातील हालचाली व कार्यासाठी प्रोत्साहन मिळाले होते. त्यांच्या वाचनाच्या आवडीचे रुपांतर हे एका व्यसनात झाले होते. त्यांना वाचता येऊ लागल्यापासून, शाळेचा अभ्यास झाल्यावर जो वेळ मिळेल त्यामध्ये मराठी भाषेमध्ये तेव्हा नुकतीच जी गोष्टींची, नाटकांची पुस्तके प्रसिद्ध होते. त्या त्यांनी वाचली. जोपर्यंत पुस्तक वाचून होत नसे. तोपर्यंत त्यांना दुसऱ्या कोणत्याही गोष्टी सुचत नसतं. जो कुणी पुण्याहून मुंबईला जाणार असेल, त्याच्याकडे त्यांची पुस्तकाची ऑर्डर नेहमी असायची. रविवारी पुस्तकांच्या बाजारातसुद्धा त्यांचा फेरफटका असायचाच.

ह्याच काळात अनेक विचारवंत आणि ग्रंथकारांचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. जसे. सॅम्युअल जॉन्सन (१७०९-१७८४) या इंग्रज ग्रंथकाराच्या व्यक्तिमत्वाचा आणि वृत्तीचा विष्णुशास्त्री. यांच्या स्वभाववृत्तीवर प्रभाव पदोपदी जाणवतो.

मॅकॉले (१८००-१८५९) हा इंग्लंडमधील पहिल्या प्रतीचा गद्यलेखक होय. मेकॉले आणि विष्णुशास्त्री यांचा गुरुशिष्य संबंध होता. ज्युनिअस (७६६९-१७७२) या ग्रंथकाराची सर्व पत्रे महाविद्यालयीन जीवनात विष्णुशास्त्री यांनी होती. जोसेफ ॲडीसन (१६७२-१७१९) या ब्रिटीश लेखकाच्या लेखनशैलीचा विष्णुशास्त्री यांच्या लेखनशैलीवर खूप प्रभाव दिसून येतो.

महाविद्यालयीन काळानंतर धर्मबुद्धी, ईश्वरप्रार्थना म्हणजेच देशाभिमान असतो. हे त्यांच्या मनी बसले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपले जीवनकार्य त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातच निश्चित केले होते. जीवनकार्य म्हणजेच 'जीवनाचे ध्येय' होय. एकदा जीवनध्येय निश्चित केल्यानंतर त्याकडे जाणारे विविध मार्ग त्यांनी शोधले. त्याप्रमाणे त्या त्या कार्य आणि उपक्रमाला त्यांनी सुरुवात केली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

विविध उपक्रम आणि जिवनकार्यास प्रारंभ.

विष्णुशास्त्री यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षापासूनच आपल्या आयुष्याचे प्रत्येक वर्ष जणू एका एका उपक्रमाच्या सांगतेला अर्पण केले. देनशोलतीला पोषक अशी निरानिराळी कार्ये आणि उपक्रम त्यांनी अंगावर घेतले. नाकासमोर चालणाऱ्या या सरळ, संकोची आणि मितभाषी दिसणाऱ्या शाळामास्तरांनी आपल्या उपक्रमांनी राष्ट्रभक्ती प्रेरित करणारी एक तरुण पिढी घडवली.

विष्णुशास्त्री यांनी अध्यापनाचे कार्य पत्करले होते. ते हाती रिकामा वेळ होता म्हणून नाही, तर ते राडाचेच शिक्षक होते म्हणून. १८७६ मध्ये ते पुण्यातील बाबा गोखले त्यांच्या शाळेत शिकवण्यास जाऊ लागले व तेथूनच त्यांच्या आयुष्याला अध्ययनाचा कालखंड संपून अध्यपनाच्या कालखंडाची सुरुवात झाली. विष्णुशास्त्रींना शिकवण्याची मनापासून आवड होती. लहानपणी शाळेत असताना ते आपल्या धाकट्या भावंडांना धड्याचे अर्थ समजावून सांगत आणि मोठेपणीही त्यांचे धाकटे भाऊ लक्ष्मणराव यांना संस्कृत काव्यातील आणि इंग्रजीतील साहित्यातील मर्मस्थाने मोठ्या आस्थेने समजावून देते. शिक्षकाला जरुरी असलेले परिपूर्ण ज्ञान "त्यांना होते.

तरुण वयात प्रत्येक व्यक्ती ध्येयवादी असते. त्याप्रमाणे विष्णुशास्त्री सुद्धा ध्येयवादी होते. कॉलेजमधील जिवनात त्यांनी जॉन्सन, मेकॉले, ज्युनिअस, ॲडिसन या पाश्चात्य लेखकांचे ग्रंथ वाचले होते. त्यांचे मनन, चिंतन त्यांनी केले होते. त्यांचा अतिप्रभाव शास्त्रींवर होता.

विष्णुशास्त्रींनी बी.ए केले. 'शालाकापत्राचे' काम सुद्धा त्यांनी केले. लखनकलेचे धडे, एकप्रकारे लखनकलेचे प्रशिक्षण विष्णुशास्त्री यांना मिळाले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

विष्णुशास्त्रींनी संस्कृत कविपंचाक लिहण्यास सुरुवात केली. जेणेकरुन आपल्या लोकांमध्ये पारतंत्र्याच्या काळात संस्कृत विषयी जी विस्मृती आली होती ती दूर करुन आपल्या देशाच्या सांस्कृतिक वारश्याची लोकांना आठवण करुन देणे. वेद, प्राचीन ग्रंथ यांविषयी लोकांमध्ये जे औदासिन्य पसरले होते त्यामुळे निर्माण झालेली अनास्था पसरली होती. ती अनस्था घालवण्यासाठी कालिदासांसारख्या कविंची बुद्धीमत्ता सामान्य लोकांपर्यंत पोह्चवणे हे त्यांचे उद्दीष्ट होते. संस्कृत कविपंचाकाने त्यावेळी नविन पिढ्यांमध्ये प्राचीन सांस्कृतिक कवितेविषयीची आवड, जिज्ञासा आणि संशोधक दृष्टी निर्माण केली. जागतिक वाङ्मय तौलनिक अभ्यासात संस्कृत कवी आणि त्यांच्या कवितांना असणाऱ्या महत्वही त्यांनी विशद करुण सांगितले.

१८७३ मध्ये विष्णुशास्त्री ह्यांना जानेवारीमध्ये पूना हायस्कूल मध्ये उपशिक्षकाची जागा मिळाली. अशाप्रकारे त्यांना पुण्यात पहिल्या दर्जाच्या सरकारी शाळेत नोकरी मिळाली.

पुस्तकांप्रमाणे फुलझाडांचाही त्यांना फार नाद होता. त्यांच्या घरची बाग मोठी होती. तिच्यासाठी फुलझाडे विकत आणण्यात ते पुष्कळ पैसे खर्च करत असत. साहित्याच्या सौंदर्याप्रमाणे सृष्टीच्या सौंदर्याचे आणि समान विचारांच्या मित्रांची संगतीचे विष्णुशास्त्री भोक्ते होते. फावला वेळ असला की मित्रांसोबत ते चिंचवडसारख्या जवळच्या खेड्यात सहलीला जात असत. रमतगमत आणि गप्पाटप्पा करत पायी सहल काढणे आणि वाटेल लागलेल्या नदीत तासनतास डुंबत राहणे ही त्यांची ठरलेली करमणूक असे. त्यांचे तारुण्यातील जीवनही अगदी समाधानी होते. पण देशसेवेचा विचार त्यांनी नेहमीच केला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

त्यांचा स्वभाव मनातले विचार चटकन बोलून दाखवणारा नव्हता पण जांभेकर त्यांच्या मित्राच्या युक्तीयुक्त कल्पनेने त्यांच्या मनाने मूळ धरले. त्यांनी 'निबंधमाला' मासिक काढण्याचे ठरले (पुराणिक १९९२). त्यांच्या देशकार्याला, समाजकार्याला इथूनच सुरूवात झाली. निबंधमाला या मासिकाची जाहिरात त्यांनी 'ज्ञानप्रकाश' या साप्ताहिकामध्ये दिली.

२५ जानेवारी १८७४ मध्ये त्यांनी निबंधमालेचा पहिला अंक प्रसिद्ध केला. १८७४ ते १८८२ म्हणजे विष्णूशास्त्री यांच्या मृत्यूपर्यंत अनेक अंक म्हणजे एकूण आठ अंक वर्षात ८४ अंक त्यांनी काढले. या आठ वर्षांच्या काळात त्यांनी महाराष्ट्रात संस्कृतिनिष्ठ आणि प्रखर राष्ट्रवादी विचारांनी प्रेरणा दिली. लोकांमध्ये तीव्र स्वातंत्र्येच्छा निर्माण केली. मालेची वार्षिक वर्गणी अडीच रुपये होती. त्यावेळीच्या वाचकवर्गाच्या मानाने मालेला प्रारंभापासूनच लोकाश्रय चांगला मिळाला. संपूर्ण निबंधमालेचे विचार हे एकट्या विष्णूशास्त्रींचेच होते. देशाच्या गुलामीतील स्थितीत सरळ आणि उघड लिहण्याची सोय नव्हती म्हणून विष्णूशास्त्रींनी मेकॉले आणि ॲडिसन या प्राश्चात ग्रंथकाराप्रमाणे उपहास व विक्रोक्ति या अलंकारयुक्त, प्रक्षोभक व भडक भाषाशैलीचा लिहण्यासाठी आधार घेतला. ज्युनिअरसप्रमाणे प्रखर विचारांची पेरणी केली. जॉन्सनप्रमाणे संस्कृतीचा अभिमान त्यांनी आपल्या साहित्यात पेरला. आणि महाराष्ट्रामध्ये स्वसंस्कृतिनिष्ठ लढाऊ राष्ट्रवादाचा पाया घातला.

निबंधमालेचे वाङ्मयस्वरूप अत्यंत रमणीय आहे. विविध विषयांच्या सुबोध विवेचनाने आणि नाना प्रकारच्या विपुल माहितीने भरलेला इतका उद्बोधक निबंधसंग्रह मराठीत त्याकाळी झाला नव्हता, त्यामुळेच मालेने त्याकाळी आपली जनमनावर छाप सोडली.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

सरकारी नोकरी सोडल्यानंतर एक खासगी इंग्रजी शाळा काढून विद्यार्थ्यांना कमी खर्चात आणि सरकारी शाळांप्रमाणे काही निराळ्या तऱ्हेने शिक्षण देण्याचा विष्णुशास्त्रींचा संकल्प होता. टिळक व आगरकर हे सुद्धा त्यांच्या लेखनाने आकर्षित झाले होते. त्यांच्यामदतीने त्यांनी १५ डिसेंबर १८७९ रोजी विष्णुशास्त्री यांनी शाळेची जाहिरात वर्तमानपत्रातून केली. त्यात २ जानेवारी १८८० रोजी शाळा सुरू करण्यात येईल असे सांगितले. नाना फडणविसांचा भाऊ मोरोबादादा यांच्या वाड्यात शाळा सुरू करण्यात आली. शाळेचे उद्घाटन झाले तेव्हा सत्तावीस मुले होते व बघता बघता चार महिन्यात ती पाचशे पर्यंत गेली. पंडित वासुदेवशास्त्री खरे हे शाळेत संस्कृत शिकवत असत, या शाळेतील बहुतेक शिक्षक हे स्वार्थत्यागाने शाळेला येऊन मिळाले होते. आगरकर, टिळक आणि विष्णुशास्त्री हे तिघेही विनामूल्य शिकवणी देत असत.

+ किताबखाना सुरू करून पुस्तकांचे नवीन दुकान काढण्याचा उपक्रमही विष्णुशास्त्रींनी सुरू केला होता. छापखाना काढणे हे सुद्धा त्यांचे एक उद्दीष्ट होते. शाळेच्या आवारात शिक्षक फार फारतर हजार मुलांशी बोलू शकेल. आणि त्यांची मने उद्दीपत करू शकेल; पण शाळेच्या बाहेर जे लक्षावधी लोक अज्ञानी आहेत. त्यांना शिकवणे हे त्यामध्ये मूळ उद्दिष्ट त्यांना वाटत असे. म्हणून त्यांना छापखानाही घेतलाच आणि विचारक्रांती घडवून आणण्याच्या कामाला पूरक असा उपक्रम त्यांनी हाती घेतला.

मोठमोठे समाज आणि सभा स्थापन करणे, मोठमोठ्या सुधारणेच्या गप्पा मारणे असल्या अस्मानभारामांपेक्षा आणि दिखाऊपणापेक्षा विष्णुशास्त्री यांनी नेटमीच आपल्या शक्तीप्रमाणे देशसेवा आणि देशाचे स्वातंत्र्य याकडे जाणारे अनेक उद्योग आणि उपक्रम केले होते.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

सामाजिक आणि राजकीय विचार:-

मराठी वाङ्मय व साहित्याचा इतिहासामध्ये महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय विचारांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमालेचा' निर्देश केला जातो.

त्यांच्या विचारसरणीची मुख्य उद्दीष्टे ही सहसा.
- सांस्कृतिक वारशाचे जतन आणि जुन्या संस्थाचे संरक्षण
- समाजातिल विशीष्ट वर्गाच्या नेतृत्वाचे समर्थन
- विवेकवादी विचारसरणी, समता, न्याय, व्यक्ती स्वातंत्र्य, मानवता आणि त्यावर आधारित सुधारणा अमान्य करण्याची भूमी
- आपल्या सामाजिक आणि धार्मिक व्यवस्थेचे संरक्षण करने.
- उपयोगीता आणि आवश्यकता असेल, तरच सुधारणा करावी ही उद्दीष्टे होती.

सामजिक आणि धार्मिक व्यवस्थेच्या बाबतीत ते 'जैसेथे' परिस्थितीचे होते. त्यांनी त्याचे समर्थन केले. ब्रिटीशांनी आपली सामाजिक, धार्मिक व्यवस्था आणि संस्कृतीवर हल्ले सुधारकांच्या स्वरुपात केले आहेत. असे त्यांना वाटत असे. स्वसंस्कृतीचे संरक्षण करने आणि स्वसंस्कृतनिष्ठ राष्ट्रवादाला प्रोत्साहन देणे, ही कारणे विष्णुशास्त्री यांच्या सामाजिक परंपरावादामागे होती. त्यांनी ब्रिटीश सरकार विरोधात अनेक अग्रलेख प्रसिद्ध केले होते. 'केसरी' या साप्ताहिकातही विष्णुशास्त्री यांनी लेखन केले होते. जातिव्यवस्थेला विरोध आणि धार्मिक आणि सामाजिक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याचे अनेक उद्देश त्यांनी केले.

बुद्धीला खाद्य पुरवणारे साधे साधे विषयही विष्णुशास्त्रींच्या निबंधमालेमध्ये आहेत. सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने विष्णुशास्त्री यांनी त्या विषयांच्या माध्यमातून जो संदेश आणि ज्ञान दिले आहे. ते आजही बोधप्रद आणि मार्गदर्शनपर आहे.

अशा त्या बुद्धीमान, प्रतिभावान ज्यांनी देशासाठी, जनमतासाठी व संस्कृति साहित्यासाठी अत्यंत मोलाची देण देऊन जाणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा १७ मार्च १८८२ मध्ये गुरुवारी सकाळी साडेपाच वाजता मृत्यू झाला.

विष्णुशास्त्री चिपळूणकर त्यांची आपल्या देशाला व सांस्कृतिक साहित्याला अपार अशी देण आहे. त्यामुळेच त्यांचे चरित्र हे अगदी प्रभावित व उत्स्फूर्तपणाचे धडे देणारे आहे.

भाग्यश्री राजेश सोनकर
द्वितीय वर्ष कला

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

Date :

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## अनुक्रमणिका


क्र.

१) प्रकाशकीय

२) बालपण आणि शिक्षण

३) समाजकारण

४) धर्मकारण


pus

SAMRAT Where Quality Rules

# प्रकाशकीय

आजच्या आधुनिक महाराष्ट्राचा व्यक्तिमत्वाची जडणघडण करणाऱ्या ६१ लोकाग्रणींच्या व्यक्तित्व, चरित्र आणि कर्तृत्वाची गाथा या चरित्र ग्रंथमालेच्या रूपाने जनताजनार्दनाच्या चरणी सादर करताना मनस्वी समाधान वाटते आहे.

'श्री गंधर्व-वेद प्रकाशनाची प्रकाशने प्रामुख्याने विद्यार्थी व शिक्षकवर्गाला उपयुक्त ठरतील अशी असतात महाराष्ट्रराज्य निर्मितीचा सुवर्ण महोत्सव अभिनव पद्धतीने साजरा करण्यासाठी आगामी पिढ्यांतील विद्यार्थी, शिक्षक तसेच सर्व मराठि भाषक जिज्ञासू वाचकांना उपयुक्त ठरेल असा कोणता मुबादा ग्रंथनिर्मिती प्रकल्प आपल्या प्रकाशनातर्फे हाती घ्यावा याबाबतचे विचारचक्र २००५ पासून मनात घोळत होते त्याच दरम्यान इतिहासाचार्य वि. का. राजवाडे लेखसंग्रह भाग २ संकीर्ण निबंध' हे पुस्तक वाचताना 'महाराष्ट्रातील बुद्धिमान, प्रतिभावन व कर्त्या लोकांची मोजदाद' हा निबंध विशेष आवडला त्या लेखात वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्रातील सर्वकालीन महत्वाच्या अशा 'बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या, ८३ व्यक्तींची यादि दिलेली आहे. या काळातील कित्येक २ नावे आजच्या पिढ्यांच्या केवळ कानावरूनच गेलेली आहेत, हे त्या यादिवर नजर टाकताच प्रकर्षाने जाणवले. आजच्या २० व्या शतकातील प्रगत महाराष्ट्रात नांदणाऱ्या प्रगल्भ पिढिला पूर्वसुरींच्या कर्तृत्वाचे ही जाणीव करून देते.

undaram
FOR EDUCATIONAL USE

# बालपण आणि शिक्षण

डॉ. आंबेडकर यांची आई भीमाबाई मुरबाडकर आणि वडील रामजी (मालोजी) संकपाल यांचा विवाह १८६५ मध्ये झाला. रामजी यांचे वडील मालोजी संकपाळ हे ब्रिटिश लष्करामध्ये शिपाई होते. रामजी यांच्या भावंडापैकी मीराबाई यांचाच उल्लेख मिळतो. वडिलाप्रमाणे रामजीसुध्दा लष्करी सेवेत रुजु झाले. ते लष्करी छावणीत शिक्षक होते. रामजी सेवानिवृत्त होण्यापुर्वी त्यांना 'सुभेदार' हे पद देण्यात आले होते.

भीमराव आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ या दिवशी झाला. नाव भीमराव जरी असले, तरी कुटुंबामध्ये व मित्रामध्ये व मित्रामध्ये त्यांना 'भिवा' असे नाव पडले त्या वेळेस आंबेडकर यांचे कुटुंब मध्यप्रदेशातील महू येथे राहत होते. १८९४ मध्ये रामजी सेवानिवृत्त होऊन त्यांनी आपले बिऱ्हाड कोकनातील दापोली येथे हलवले.

त्या दापोलीहून रामजी लवकरच मुंबईला व नंतर साताऱ्याला आले. तेथे त्यांनी सरकारी सार्वजनिक विभागामधे भांडारपाल म्हणून नोकरी पत्करली. सातारा येथील वास्तव्यात त्यांची पत्नी भीमाबाई यांचा आजाराने मृत्यू झाला. तेव्हा भिवा पाच वर्षाचा होता. रामजी यांनी पत्नीच्या मृत्यूनंतर मुलांचे हाल होऊ नयेत म्हणून दुसरे लग्न जिजाबाई नावाच्या मुका विधवेशी केले. परंतु लहान भिवाला आपल्या आईची जागा दुसऱ्या कोणी घ्यावी, हे मान्य नव्हते. ते आपल्या मीरा आत्याजवळच असत.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

आंबेडकर स्वतःच्या बालपणीच्या आठवणी सांगताना आपला स्वभाव खूप धाडसी व हट्टी होता असे म्हणतात. कोणतीही गोष्ट मित्रांनी कक नकोस असे सांगितले, तर त्या विरोधाला न जुमानता छोटा भिवा मुद्दाम ती गोष्ट करत असे त्यामुळे लहानपणी त्यांची ओळख एक हट्टी व जिद्दी मुलगा अशी होती. भीवामधील चिकाटी हा गुण ओळखुन काही शिक्षक मंडळीही त्यांस मदत करत असत. त्यामुळे शाळा परिसरातील जातिभेदाचे अनुभव फुवढे दाहक नव्हते. अर्थात, याच सातान्यामधील माध्यमिक शाळेत एका शिक्षकाने मोठे बंधू आनंदराव व भिवाला ते अस्पृश्य असल्यामुळे संस्कृत शिकवण्यास नकार दिला होता.

सुरवातीच्या काळात भिवाचे अभ्यासामध्ये कमी लक्ष असे. खेळणे, बागकाम करणे, रानात फिरणे यामध्ये तो व्यस्त असे. उयत्ता दुसरी-तिसरी नंतर तो अभ्यासात रममाण होऊ लागला. डिसेंबर १९०४ मध्ये रामजी यांची सातारा येथील नोकरी सुटल्यावर अर्थार्जनासाठी मुंबईस सहकुटुंब यावे लागले.

मुंबईमध्ये परळ परिसरात गिरणी कामगारांच्या डबक चाळीमध्ये त्यांनी बस्तान मांडले. पैशांची चणचण असुनसुध्दा मुलांना महागड्या एल्फिन्स्टन हायस्कुलसारख्या दर्जेदार व नावाजलेल्या शाळेत घातले. डबक चाळीतील संपूर्ण वस्ती कोकणातून आलेल्या महार जातिच्या लोकांची होती. येथे जी कुटुबे लष्कराची पार्श्वभूमी लाभलेली होती, ती तुलनात्मकदृष्ट्या चांगली राहणी व आर्थिक स्थिती बरी असलेली होती

तेथे जातिपंचायतीतर्फे सर्व प्रकारचे जातिनिहाय निर्णय घेतले जात असत. या जातीपंचायतीवर बिनलष्करी गट लोकांचे वर्चस्व होते. बऱ्याच वेळेस लष्करी विरुध्द बिनलष्करी यांच्यामध्ये संघर्ष होई. लहान मुलांच्या भांडणात भिवा लष्करी मुलांचे नेतृत्व करत असे.

भिवा रोजच्या प्रवासखर्चाला दिलेले पैसे वाचवत असे त्यातून तो पुस्तके विकत घेवून वाचत असे. त्यामुळे त्याचे स्मरणशक्ती व बुध्दी तल्लख व्हायला लागली. अनेक शिक्षकाणकडून त्याला नेहमीच शाबासकी मिळत असे. भिवाला पुस्तके पुरवण्यासाठी रामजी नेहमी प्रयत्नशील होते. भिवाच्या पुस्तकासाठी प्रकादी दागिना गहाण ठेवुन पेन्शन मिळाल्यावर सोडवणे, हा तर रामजी यांच्यासाठी नियमितमच आला होता.

भिवा इंग्रजी पाचवीमध्ये असताना म्हणजे १४ वर्षाचा असताना त्याचे लग्न ९-१० वर्षाच्या रमाबाई-बरोबर झाले. रमाबाई दापोलीत मोलमजुरी करणाऱ्या भिकु मामाच्या वलगाकर यांची मुलगी. लहाणपणी आई वडिल वारल्यामुळे मुंबईला काका व मामाच्या देखरेखीखाली रमाबाई सहित तिघाही भावडांना ठेवले होते. भिवा एल्फिन्स्टन शाळेत एक हुशार विद्यार्थी म्हणून नावाजला जात होता अर्थात या शाळेमध्ये स्पृश्य - अस्पृश्य असा भेदाभेद पाळला जात होता. वडिलांची शिस्त व देखरेख, यासोबत केळुसकर यांचे मार्गदर्शन यामुळे भिवाने मॅट्रिकपर्यंत मजल मारली मारली. महत्प्रयासाअंती भिवा मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाला. रामजी यांना खूप आनंद झाला संपूर्ण डबक चाळीमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले,

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

कारण महार जातीतील मॅट्रीक उत्तीर्ण होणारा भिवा ही पहिलीच व्यक्ती होती. भिवाचे सत्कार करण्यासाठी डबक चाळीतील लोक मुकल येवुन जाहिर सभेचे अयोजन करण्यात आले. ही सभा १९०८ मधील जानेवारी महिन्यात झाली.

मॅट्रिक नंतरच्या शिक्षणाकरता आर्थिक मदतीसाठी केळुसकर गुरुजी यांनी सर नारायण चंदावरकर यांच्या मध्यस्थीने बडोदा नरेश श्रीमंत सयाजी महाराज गायकवाड यांची भेट घालून दिली. महाराज भिवाच्या शिक्षणाच्या हुशारीवर खुश होवून दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती दिली. नोव्हेंबर १९१२ मध्ये बी. ए. ची परिक्षा झाली आणि तिचा निकाल जानेवारी १९१३ मध्ये लागला. भीमराव बी. ए ची परिक्षा पास झाला. १४ एप्रिल १९२३ रोजी मुंबईस पोहोचले व दिवस-रात्र बसुन प्रबंधाचे पुनर्लेखन केले आणि तो प्रबंध ऑगस्ट महिन्यात लंडन विद्यापिठाला पाठवला त्यांना १९२३ च्या नोव्हेंबर महिन्यात लंडन विद्यापिठाची 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल करण्यात आली. तशी तार मिळाल्यानंतर आंबेडकर यांना लंडनमधील सहन कराव्या लागणाऱ्या हाल अपेष्टांची आठवण झाली आणि ते ढसढसा रडले. या प्रबंधाचे ग्रंथरुपी प्रकाशन लंडनच्या 'पी. एस. किंग अँड सन्स लिमिटेड' या प्रकाशन संस्थेने केले. सदर ग्रंथ डिसेंबर १९३० मध्ये प्रसिद्ध झाला. या ग्रंथाची प्रस्तावना प्रा. कॅनन यांनी लिहिली. प्रस्तावनेमध्ये कॅनन यांनी भीमराव आंबेडकर यांच्या असामान्य बुद्धिमत्तेविषयी व त्यांच्या ठायी असणाऱ्या संतुलित संशोधन कार्याबद्दल लिहिले आहे.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# समाजकारण

भीमराव आंबेडकर यांनी लंडनला जाण्यापूर्वी छत्रपती शाहूंच्या मदतीने 'मूकनायक' हे पाक्षिक पत्र सुरु केले होते, त्यांनी संपादक म्हणून पांडुरंग नंदराम भटकर यांच्यावर जबाबदारी सोपावली होती. लंडनला जाण्यापूर्वी आंबेडकर यांनी पहिल्या अंकातील 'मनोगत' या लेखाव्यतिरिक्त तेरा लेख लिहिले होते. या लेखांमध्ये त्यांनी अस्पृश्यांची स्थिति, त्यांच्या उन्नतीचे खुंटलेले मार्ग आणि त्यावर उपाय, यावर विवेचन केले होते. तेराव्या अंकापासून म्हणजे 31 जुलै 1920 अंकापासुन ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांनी संपादकाची सुत्रे सांभाळली. त्यानंतर काही दिवसामध्ये 'मुकनायक' बंद पडला, याचे आंबेडकर यांना अत्यंत दुःख झाले.

मुंबईमध्ये आल्यानंतर वरिष्ठ न्यायालयात ते कामासाठी जाऊ लागले. पण कोर्टातील काम न मिळण्यामागे एकमेव कारण त्यांची जात आणि मित्रपरिवाराचा अभाव हे होते. दरम्यानच्या काळामध्ये मुंबईच्या विधिमंडळात ब्राम्हणेतर समाज प्रतिनिधिनि एक क्रांतिकारक ठराव दिनांक 4 ऑगस्ट 1923 रोजी मांडला. या ठरावामध्ये मुख्यत: अस्पृश्यासाठी सार्वजनिक पाणवठे मोकळे करणे आणि धर्मशाळा, विद्यालये व न्यायालये अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त संचार असावा, असे म्हटले होते. 9 मार्च 1924 रोजी मुंबईतील परळ भागातील दामोदर ठाकरसी सभागृहामध्ये कार्यकर्त्यांची एक बैठक घेतली.

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

या प्रसंगी अस्पृश्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना संघटनात्मक रूप द्यावे, असे जमलेल्या कार्यकर्त्यांना वाटले, बऱ्याच चर्चेनंतर या संघटनात्मक रूप द्यावे, असे जमलेल्या कार्यकर्त्यांना वाटले, बऱ्याच चर्चेनंतर या संघटनेला 'बहिष्कृत हितकारणी सभा' हे नाव द्यावे. असे आंबेडकर यांनी सुचवले आणि त्यासोबत त्यांनी या सभेचे ब्रीदवाक्यही ठरवले' ते होते ' शिका, संघर्ष करा व संघटित करा' बहिष्कृत हितकारणी सभेच्या पदाधिकाऱ्यांच्या नावावरुन बराच वाद- प्रतिवाद झाला.

समाज जागृतीचे कार्य सुरू असतानाच १५ जुन १९२४ रोजी रमाबाई यांनी राजाराम या नावाच्या मुका मुलाला जन्म दिला दोन तीन वर्षापर्यंत त्यांचे खुशालीने संगोपन केले पण मृत्यू पावले आंबेडकर हे खुप दुःखात असले तरी त्यांनी त्यांचा १९२५ नंतरचा पुर्ण काळ स्वतःला समाजकार्यात झोकून दिले असे दिसुन येते नंतर त्यांची वकीली थोडीबहुत सुरू झाली, त्यातही गोरगरिबांच्या खटल्यासाठी ते पैसे घेत नसे. प्रत्येकाला ते स्वाभिमानाने जगा आणि स्वावलंबन हाच आत्मउन्नतीचा मार्ग आहे असे सांगत.

२५ नोव्हेंबर १९२७ च्या' बहिष्कृत भारताच्या अंकामध्ये 'अस्पृश्यता' व 'सत्याग्रहाची सिध्दी' या मथळ्याखाली लेख लिहून आपली भूमिका स्पष्ट केली. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाच्या मागणीवर असा तोडगा निघाला की, त्यांच्यासाठी वेगळीच देवालये बांधावी; परंतु आंबेडकर यांना ते मान्य नव्हते. कारण वेगळी मंदिरे बांधण्यामागे अस्पृश्यता निवारण्याचा मार्ग नव्हता. त्यांच्या मते स्पृश्य - अस्पृश्य या दोघासाठी एकच मंदिर व समाजीक व सार्वजनिक जागा हवी.

Date :

## धर्मकारण

आंबेडकर यांचे लहानपणासूनच धर्म म्हणजे काय, धर्माची जीवनात काय भूमिका असते माणसाला कशासाठी गरज असते, धर्म हे शोषण व पिळवणुकीचे साधन कशा प्रकारे होऊ शकते धर्म आणि नैतिकता यांचा संबंध काय अशा अनेक प्रश्नांवर घरातील वातावरणामुळे आणि वाचनामुळे विचारमंथन होत होते. आंबेडकर यांचे वडिल सतत भजन-किर्तन व धार्मिक, आध्यात्मिक व दार्शनिक चर्चा व वाचनामध्ये ~~व्यस्त~~ असत. त्यांच्या कुटुंबावर भारतातील मध्ययुगीन मुक्तिदायी भक्ती चळवळीचा चांगलाच प्रभाव होता १९२०च्या दशकातल्या समाज - जीवनातील चळवळी व अनुभव यामुळे याची खात्री होऊ लागली की, हिंदू धर्माच्या जीवन चौकटीमध्ये राहून अस्पृश्यांचा कधीच उद्धार होणार नाही. जर हिंदू धर्माच्या इतर सदस्यांसारखे हक्क व अधिकार मिळत नसतील, तर त्या धर्माचे सदस्यत्व काय कामाचे? मंदिर प्रवेश सत्याग्रहामध्ये सनातन्यांची व कॉंग्रेसजनांची भूमिका व मानसिकता पाहून त्यांना वेळोवेळी जाणीव होत होती की, ते हिंदू धर्मासाठी अस्पृश्य व्यक्ती प्राण्यापेक्षाही हीन आहे. याच काळात धर्मांतराच्या विचाराचे बीज त्यांच्या मनात मूळ धरू लागले. मे १९२४ मध्ये बार्शी येथे भाषणात ते म्हणतात, .... जो धर्म त्याच्या अनुयायांना ऐहिक आणि पारलौकिक सुखाची द्वारे मोकळी करण्याऐवजी ती बंद करूनच त्यांना अधोगतीत खितपत पडावयास लावतो. त्या धर्माला चिकटून राहण्यात काय अर्थ आहे? तसेच पाण्यासाठी तासन्तास तिष्ठत बसणे व अस्पृश्यांना स्थानिक धर्मदास तळ्यातून पाणी घेण्यास मनाई करण्यात आली होती. येवल्यात दोन

Date :

मोठे महारवाडे होते व त्या गावात मोठ्या प्रमाणात देवाळे - मंदिरे होती. या प्रसंगी सुमारे दहा हजार अनुयायी उपस्थित होते. या परिषदेसाठी मध्य प्रांत व हैदराबाद संस्थान येथूनही प्रतिनिधी आले होते. या परिषदेसाठी मध्य प्रांत व हैदराबाद संस्थान येथूनही स्वागताध्यक्ष अमृत धोंडिबा रणखांबे यांनी प्रास्ताविकामध्ये अधःपात आलेल्या हिंदू धर्माला 'ब्राह्मण धर्म' संबोधले. त्यानंतर आंबेडकर यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये भावनाविवश होऊन अस्पृश्यांच्या सामाजिक अस्तित्वाबद्दल व भविष्याबद्दल कथन केले. याच परिषदेत त्यांनी त्यांचे प्रसिद्ध वाक्य 'मी अपृश्य जातीत जन्मास आलो आहे, हा काही माझा अपराध नाही. पण मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाहि' प्रथमच उच्चारले' पहिले पाऊल म्हणुनच - हिंदू देवदेवतांची पुजा करणे सोडून देऊ. हिंदू धर्मंदिरात प्रवेश करणार नाहि.

२५ ऑक्टोबरला हिंदूचे शिष्टमंडळ जेव्हा आंबेडकर यांना भेटावयास आले, तेव्हा आंबेडकर यांनी स्पष्ट केले की, 'भारत देशाच्या हिताला धोका होईल अशा प्रकारचे धर्मांतर मी करणार नाही.' वृत्तपत्रांमध्येही धर्मांतराच्या घोषणेची बातमी वाचून तत्कालीन बौद्ध वाङ्मय व तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक धर्मानंद कोसंबी हे आंबेडकर यांना २८ ऑक्टोबर १९३५ ला राजगृहात भेटायला आले, दोघामध्ये बौद्ध धर्मावर चर्चा झाली. त्यांना आंबेडकर यांचा बौद्ध धम्माकडे ओढा दिसला.

आंबेडकर यांनी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेमुळे एक नवक्रांतीची पहाट उगवत आहे, अशा गोष्टी घडू लागल्या. १० नोव्हेंबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील महार समाजसेवकांनी धर्मांतराला सामुदायिक पाठिंबा म्हणुन

Date :

घरातील देवदेवता यांच्या मूर्ती व धार्मिक ग्रंथांची होळी केली, तसेच पुरोहित, भटजी व जत्रा यावर बहिष्काराची घोषणा केली.

गांधीजींना दिलेल्या आश्वासनानुसार कमीत-कमी हानिकारक मार्ग स्वीकारून एक प्रकारे आपण हिंदू समाजाच्या दृष्टीने एक उपकारक कृत्यच करत आहोत कारण बौध्द धर्म हा हिंदू समाजाच्या भारतीय संस्कृतीचे एक अंग आहे.

दिक्षा समारंभ रविवार, १४ ऑक्टोबर रोजी सकाळि ९ वाजून ३० मिं. सुरू झाला, बौध्द धर्म दिक्षा समारंभात ज्यांनी भाग घेतला, त्यात प्रामुख्याने आंबेडकर यांनी बौध्द दिक्षेच्या 22 प्रतिज्ञा तयार केल्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे १) मी ब्रह्म, विष्णू, महेश याना देव मानणार नाहि किंवा त्याची उपासना करणार नाही २) मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाहि किंवा त्यांची उपासना करणार नाही ३) मी गौरी - गणपती इत्यादी हिंदू धर्मातिल कोणत्याही देवदेवतेस मानणार नाहि किंवा त्यांची उपासना करणार नाही. ४) देवाने कधी काही अवतार घेतला, यावर माझा विश्वास नाही. ५) बुध्द हा विष्णूचा अवतार होय, हा खोडसाळ व खोटा प्रचार आहे. ६) मी श्राध्दपक्ष करणार नाही, पिंडदान करणार नाहि. ७) बौध्द धर्माच्या विरूध्द विसंगत कोणतेच आचार करणार नाही. ८) कोणतेही क्रियाकर्म ब्राम्हणाच्या हातून करणार नाही. ९) सर्व मनुष्यमात्र समान आहेत. असे मी मानतो. १०) मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करेल ११) मी. ११) भगवान बुध्दाने सांगितलेल्या दहा परिमिता मी पाळीन १२) भगवान बुध्दाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करेन १३) सर्व प्राणीमात्राबाबर दया दाखवून त्यांचे पालन करेन.

Date :

१४) मी चोरी करणार नाहि १५) मी खोटे बोलणार नाही
१६) मी व्यभिचार करणार नाहि १७) मी दारु पिणार नाही.
१८) प्रज्ञा, शिल आणि करुणा या बौध्द धर्माच्या तीन
तत्वांची सांगड घालुन मी माझे जीवन चालवीन. १९) माझ्या
जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि
मनुष्यस्वभावाला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू
धर्माचा मी त्याग करतो आणि बुध्दाच्या धर्माचा
स्वीकार करतो. २०) तो सद्धर्म आहे. अशी माझी खात्री
पटलेली आहे २१) माझा पुनर्जन्म होत आहे, असे मी मानतो
२२) इत:पर बुध्दाच्या शिकवणीप्रमाणे वागणे मी मान्य
करतो तसेच मी प्रतिज्ञा करतो.

निकीता गजरे
द्वितीय वर्ष कला

SAMRAT
Where Quality Rules

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे विषय |
|---|---|
| १] | 'प्रस्तावना' |
| २] | प्रो. कर्वे यांचे 'बालपण' व 'शिक्षण' |
| ३] | प्रो. कर्वे यांचे 'विचार व कार्य' |
| ४] | 'शतायुषी अण्णा' [प्रो. धोंडो केशव कर्वे] |
| ५] | प्रो. कर्वे यांचे 'देहावसान' |
| ६] | प्रो. कर्वे यांचे 'उपसंहार' |


Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# 'प्रस्तावना'

'आजच्या आधुनिक महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणाऱ्या ६१ लोकमणींच्या व्यक्तित्व, चरित्र आणि कर्तृत्वाची गाथा या चरित्र ग्रंथमालेच्या रूपाने जनताजनार्दनाच्या चरणी सादर करताना मनस्वी समाधान वाटते आहे.

महर्षी धोंडो केशव कर्वे हे भारतातील थोर शिक्षणतज्ज्ञ होते. पूर्ण एकशे चार वर्षांचे आयुष्य लाभलेल्या कर्वे यांच्या जीवनकालात नानाविध घटना देशात आणि महाराष्ट्रात घडल्या. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धापासून ते १९४७ पर्यंतच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळामध्ये ज्या बहुविध घटना घडल्या त्या सर्व घटनांना कर्वे साक्षी होते.

मुरुड हे दक्षिण कोकणात समुद्रकाठी वसलेले चांगल्या हवेचे गाव असून गावाची रचना व्यवस्थितपणे केली गेली होती. गावाच्या रचनेची हकीकत एका जुन्या बखरीत दिली आहे तिच्या आधारे विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी मुरुड गावाचा जो इतिहास सांगितला आहे तो कर्वे यांनी आपल्या 'आत्मवृत्तात' 'जन्मभूमी' या पहिल्याच प्रकरणात दिला आहे. मुरुड गावाचे मूळ नाव 'मूळवटग्राम' असे असावे. मूळवट याचा अपभ्रंश मुरुड असा झाला असावा.

आता कर्वे यांच्या पूर्वजांची हकीकत पाहिली म्हणजे त्यांचा मुरुड गावाशी संबंध केव्हा व कशा प्रकारे आला त्याचा उलगडा होऊ शकेल. पेशवाईच्या काळात कोकणातली पुष्कळ धाडसी आणि कर्तबगार माणसे आपले नशीब अजमावण्याकरिता पुण्याला येत. अशा मंडळींत कर्वे यांचे चुलत पणजे केशवभट कर्वे अग्निहोत्री व त्यांचे धाकटे बंधू म्हणजे धोंडो केशव कर्वे यांचे पणजे रघुनाथभट यांचा समावेश होतो. यांचे गोत्र गार्ग्य, कुलस्वामी हरिहरेश्वर व कुलस्वामीनी जोगेश्वरी. हे मूळचे दापोली तालुक्यातील पंचनदी गावी राहणारे. यांच्याकडे काही गावचे उपाध्येपण

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

होते. केशवभट अग्नीहोत्री असून धार्मिक व तेजस्वी ब्राम्हण होते. यांच्या गुणांच्या गौरव करण्यासाठी श्रीमंतांनी यांना 'हातनोर' गाव इनाम दिला होता. धारपांच्या वंशाच्या 'वर्तक' हा किताब कर्वे यांच्या वंशाला मिळाला.

कर्वे श्रीमंतांचे उपाध्ये होते. केशवभट व रघुनाथभट यांच्या कुटूंबातील मंडळींचाही श्रीमंतांच्या कुटूंबातील मंडळींशी परिचय होता, व तो पुढील पिढीतही तसाच राहिला.

आपल्या पूर्वजांच्या अंगची ही कमालीची स्थितीशीलता ध्यानात घेतल्यामुळेच की काय धोंडोपंत कर्वे यांनी आपल्या 'आत्मवृत्तात' "सुवृत्त व उद्यमशील मातापितरांच्या पोटी जन्माला येणे, यासारखे दुसरे भाग्य नाही ! हे भाग्य मला पूर्वपुण्याईने लाधले" असे धन्यतेचे उद्गार काढले आहेत.

# प्रो. कर्वे यांचे बालपण व शिक्षण

केशव कर्वे यांचे शिक्षण मुरूड येथील मराठी शाळेत झाले. शाळेतील हुषार विद्यार्थ्यांत त्यांची गणना होत असे. तथापि मराठी शाळेतील शिक्षण पुरे झाल्यावर पुढे विद्याभ्यास करीत राहावे अशी परिस्थिती नसल्यामुळे नाइलाजास्तव त्यांनी आपल्या पायांवर उभे राहाण्याचा निश्चय केला. मुरूड गावातील बर्वे नावाच्या सुखवस्तू गृहस्थांच्या शेरवलीपासून दोन कोसांवर कोरेगाव नावाचा खोतीचा गाव होता. त्या गावात राहून तेथील वसूलबाकी करण्यासाठी बर्वे यांना कारकून पाहिजे होता. केशवरावांनी हे पत्करले.

कर्व्यांचा वाडा आणि बाहेरचा डामडौल पाहून असल्या घराण्यात आपली मुलगी पडते, याबद्दल धन्यता वाटून शेरवलीच्या ~~परांप~~ परांजपे यांनी आपली मुलगी लक्ष्मीबाई कर्व्यांच्या घरात केसोपंतांना दिली. लक्ष्मीबाई ही परांजपे घराण्यातील होत्या. केसोपंत परांजपे सुमारे साठ वर्षांचे असताना जमिनीसंबंधीच्या तंट्यात जिंकल्यामुळे प्रतिपक्षीयांनी त्यांचा खून केला.

केसोपंतांना एकूण सहा मुले व तीन मुली झाल्या. यांपैकी एक मुलगा अल्पायुषी ठरला व एक मुलगी पन्नास वर्षांची होऊन वारली. तथापि उरलेली सर्व भांवडे दीर्घायुषी ठरली. लक्ष्मीबाई म्हणजे धोंडोपंत कर्वे यांची आई ऐंशी ~~ब~~ वर्षे जगली. देहान्त विपरीत स्वरुपात झाला असला तरी केसोपंत परांजपे हे पुण्यवान व भाग्यशाली पुरुष म्हणायला हवेत. त्यांची मुले कुळाला भूषण झाली. ती सर्व धार्मिक, सद्गुणी आणि संसारदक्ष निघाली.

केशव कर्वे यांचा - केसोपंतांचा स्वभाव अतिशय शांत होता. ते हरहुन्नरी गृहस्थ होते. काथ्याच्या पिळवा काढून त्याचे सुंभ तयार करणे, गुरांची दावी तयार करणे, ~~सात~~ रहाटाच्या माळा वळणे, यात ते कुशल होते. ते पागोटी चांगली बांधीत. लक्ष्मीबाई व केसोपंत ही दोघे धार्मिक वृत्तीची होती. धोंडू, भिकू, अंबाताई यांना सोशीक, सत्प्रवृत्त, समजूतदार आई मिळाली, हे त्यांचे परम भाग्यच!

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

या संदर्भात धोंडूच्या लहानपणी घडलेली एक घटना मुद्दाम नमूद करण्याजोगी आहे. बडोद्याच्या महाराजांनी ठिकठिकाणच्या गावी ब्राम्हणांना गोप्रदाने देवविली. मुंज झालेल्या प्रत्येक मुलाला व ब्राम्हणाला दहा रुपये मिळाले. भिकूची मुंज झालेली असल्यामुळे त्याने आईला विचारले, "मी जाऊन दहा रुपये घेऊन येऊ का?" त्यावर आई त्याला म्हणाली, "बाबारे, दक्षिणेसाठी हात पसरणाऱ्यांच्या वंशात तुम्ही जन्माला आला नाही. तुमचे मामा दशग्रंथी ब्राम्हण आहेत. पण त्यांनी कधी कोणत्या प्रकारचे दान घेतले नाही. तुमचे पूर्वज मोठ्या नावलौकिकाचे होते. तुमचे वडील गरीब असले तरी ते कुलाभिमान विसरले नाहीत. हे आधी मरतिकाचे दान! आणि ज्यांच्याकडे तुमचे लाखो रुपये येणे आहे त्या बडोदे सरकारचे! तेव्हा ही गोष्ट तू स्वप्नातही आणू नको." ही सगळी हकीकत जेव्हा केसोपंतांना कळली, तेव्हा त्यांना अतिशय आनंद झाला.

धोंडू हा १८७० मध्ये विनायक लक्ष्मण सोमण नावाच्या मास्तरांचा अगदी आवडता विद्यार्थी होता. धोंडू कर्वे यांचा आवडता विषय गणित होता. त्याचबरोबर कर्व्यांनी वैश्वदेव, पुरुषसूक्त, सौरसूक्त व पवमान सूक्त यांचा काही भाग शिकले. पंधराव्या वर्षी धोंडूचे लग्न झाले.

लाकडाच्या तारांचे अष्टकोनी सांगाडे तयार करून रंगीत कागद त्याच्यावर चिकटवून दिवाळीसाठी कंदील तयार करण्याचा धोंडूला छंद होता. पुढे पुढे पांढऱ्या स्वच्छ जाड कागदावर जाळी खोदून सिलिंडरच्या आकाराचे पायलीचे कंदील तो तयार करीत असे. कंदिलात पणती लावली म्हणजे बाहेरून चित्रे लावलेली कागदाची पायली त्यात फिरत असे. छत्रीचे अभ्रे शिवायलाही ते शिकले. लोखंडी सांगाडा असला, म्हणजे मेण व बिरुदा यांच्या मिश्रणाने पावसाळ्यात उपयोगी पडणाऱ्या मेणकापडी छत्र्या तो घरच्या मंडळींसाठी करीत असे. धोंडू यांच्या लहानपणाच्या आणखी एक उद्योग म्हणजे चातीवर कापसाचे सूत काढून त्याची जानवी बनविणे. गावातले आळशी लोक जानवीजोड विकत घेत. सोमण मास्तर आणि धोंडू यांच्या परस्परसंबंधाकडे पाहून गावातील अनेक जण गमतीने त्या दोघांना 'रामदास' व 'कल्याण' असे म्हणत.

undaram
FOR EDUCATIONAL USE

# 'विचार व कार्य'

धोंडोपंतांचे वैवाहिक जीवन खऱ्या अर्थाने विसाव्याविसाव्या वर्षी सुरू झाले. मुरूड गावात इंग्लिश शिक्षण व स्त्री शिक्षण यांना उत्तेजन मिळावे असे धोंडोपंतांना वाटत होते. धोंडोपंतांची समाजविषयक कर्तव्यांची जाणीव सदैव जागी होती. ते केवळ कर्तव्यतत्पर नव्हते, समाजहितोपयोगी कामे ते स्वतःहून शोधत किंवा निर्माण करत. आणि ती पार पाडण्याच्या सर्वतोपरी प्रयत्न करीत. पहिले कार्य 'मुरूडफंडा'च्या उभारणीचे केले. धोंडोपंतांचा पुढाकार असणारी आणखी एक संस्था म्हणजे 'शिक्षणोत्तेजक मंडळी' या संस्थेचे मूळ नाव 'दापोली तालुक्यातील मास्तर लोकांची सभा' असे होते.

धोंडोपंतांनी पुनर्विवाह केला या हकीकतीपूर्वी विधवा पुनर्विवाहाच्या महाराष्ट्रातील इतिहास लक्षात घेणे उद्बोधक ठरू शकेल. २५ जुलै १८५६ रोजी हिंदू विधवांच्या पुनर्विवाहाच्या मार्गातील अडथळे दूर करणारा ऐतिहासिक महत्त्वाचा कायदा सरकारने पास केला होता. १४ नोव्हेंबर १८६५ रोजी 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी' ही संस्था स्थापन झाली. धोंडोपंतांना पुनर्विवाहास प्रवृत्त करणाऱ्या एकदोन गोष्टींचा उल्लेख येथे अपरिहार्य आहे. धोंडोपंत पुनर्विवाहाकडे वळले, याला सामान्यतः स्त्रीजातीविषयी सहानुभूती हेही एक कारण होते. स्त्रीपुरुषसंबंधातून होणाऱ्या अपत्य संभवाचे मुख्य कर्तृत्व पुरुषाकडे असते, शेकडा नव्वद घटनांमध्ये या संबंधाला पुरुषच कारण असतो आणि तरीही अपत्य जन्मानंतर पुरुष निसटून जातो व स्त्रीला त्याचे शासन भोगावे लागते. वस्तुतः विधवा स्त्रीच्या दुःखाने धोंडोपंतांचे मन नेहमी कळवळत असे, कारण कुटुंब कोणतेही असो, विधवा स्त्रीचे फार हाल होत. या स्त्रियांच्या भीषण परिस्थितीचे वर्णन आनंदीबाई कर्वे यांनी 'माझे पुराण' या आपल्या आत्मचरित्रात स्वानुभवाने केले आहे. प्रोफेसर कर्वे यांच्या या पुनर्विवाहासंबंधी तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अभिप्राय

undaram
FOR EDUCATIONAL USE

प्रसिद्ध झाले - इंदुप्रकाश, सुधारक, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका, वैदर्भ [अकोला], ज्ञानचक्षू [पुणे], वेंगुर्लेवृत्त [वेंगुर्ले], प्रमोदसिंधु [अमरावती] या पत्रांचे अभिप्राय सर्वस्वी अनुकूल होते.

कर्वे यांच्या हातून भारतीय स्त्रियांची स्थिती सुधारण्याचे जे काही कार्य घडले त्याचे मूळ कारण त्यांनी स्वतः केलेला पुनर्विवाह हे होय. परंतु स्वढ्यावर ते समाधानी राहिले नाहीत. हा केवळ कार्यारंभ आहे, असे त्यांनी मानले. 'विधवा - विवाह - प्रतिबंध - निवारक मंडळी' या संस्थेला स्थैर्य येण्यासाठी १८९८ च्या ऑक्टोबर महिन्यामध्ये या संस्थेची कायदेशीर नोंदणी कर्वे यांनी केली. विधवा शिक्षणाचे काम विधवाविवाहाचे काम परस्परापासून वेगळे केले तर विधवाशिक्षणाच्या कामाला विशेष जोर येईल, असे कर्वे यांना वाटू लागले. आणि काही दिवसांनी कर्वे मनाची ओढ लक्षात घेऊन विधवाशिक्षणाच्या कार्याकडे वळले. द्रव्याभावी आश्रमाची स्वतंत्र स्थापना करण्याच्या भानगडीत न पडता, ज्या विधवा मदतीसाठी अर्ज करतील, त्यांची राहण्याची व शिकण्याची सोय फीमेल हायस्कूलच्या बोर्डिंगमध्ये करून नियोजित कार्यासाठी अर्थसाहाय्य मिळवण्याचे प्रयत्न कर्वे यांनी सुरु केले होते.

कोणी सुशिक्षित स्त्री आपल्या कार्याच्या उपयोगी पडण्यासारखी आहे, असे दिसले, की तिला मिळविण्याचा प्रयत्न सुरु करावा, असा प्रो. कर्वे यांचा दृष्टिकोन असे. आश्रम सुस्थित होण्यापूर्वी बनुताई देशपांडे, आनंदीबाई मराठे, दुर्गाबाई किर्लोस्कर या तीन स्त्रियांनी आश्रमाला फार मदत केली. विधवा स्त्रियांच्या विचारांमध्ये व मनोवृत्तीत असा सकारात्मक बदल घडण्याच्या दृष्टीने आश्रमाचे कार्य विशेष फलदायी ठरले. महिला विद्यालय हे झाडावर रुजलेले झाड म्हणता येईल. अनाथ - बालिकाश्रमाच्या कुंडीत घालून त्याला पुण्यात नेण्यात आले व तेथे त्याने चांगला जीव धरल्यावर, ते आश्रमाशेजारी आणून लावण्यात आले. जर मुली घराबाहेर अविवाहित राहून विद्याभ्यास करतील तर ही अडचण किमान दोन वर्षे तरी संबंधित कुटुंबांना भासणार नाही, असा विचार कर्वे यांनी केला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

धर्मकार्य, राष्ट्रकार्य व स्त्रीशिक्षणाचे कार्य कर्वे एकाच पातळीवरील मानत होते, त्यांच्या मनात याविषयी कोणताही संभ्रम नव्हता, हेच कर्वांच्या आत्मकथनावरून सिध्द होते. आश्रमाची स्थापना करताना किंवा मठाची उभारणी करताना कर्वे यांची अशा स्वरूपाची धारणा होती.

"आश्रमाचे, विद्यालयाचे व अशांसारख्या इतर लोकोपयोगी संस्थांचे काम करण्यासाठी जे 'इंडियन लेडीज मिशन' स्थापावयाचे आहे, त्या कामी मी आपले जीवित या विश्वाचा चालक जो परमात्मा त्याला स्मरून अर्पण करीत आहे. माझ्या जीवितावर आता माझा हक्क नाही. त्याचा उपयोग संस्थेने वाटेल तसा करून घ्यावा. माझ्या व माझ्या स्वतःच्या कुटुंबाच्या खर्चासंबंधाने संस्था जे ठरवील, ते मला मान्य आहे." ही प्रतिज्ञा वाचली म्हणजे कर्वे यांच्या नावामागे लागलेले 'महर्षी' हे गौरववाचक विशेषण किती सार्थ होते, ते ध्यानात येते. संस्थेला वाहून घेणाऱ्या व्यक्तींच्या सभा वर्षातून दोनतीन वेळा आयोजित करून, त्या वेळी कोणी नवीन सदस्य संस्थेला येऊन मिळू इच्छित असल्यास त्यांच्याकडूनही प्रतिज्ञा करून घ्यावा, असा उपक्रम कर्वे यांनी सुरू केला.

'जीवन वाहणे' या शब्दात फार मोठा अर्थ भरला आहे. आपण देवावर फुले वाहतो. ती ताजी, टवटवीत, सुगंधी असतात. संध्याकाळी कोमेजतात पण देवाजवळून हालत नाहीत. त्यांचे निर्माल्य होते. दुसरे दिवशी ताजी फुले देवाला वाहिली जातात. तसेच ध्येयासाठी धडपडणे, आपले सर्वस्व त्याच कामी लावणे, त्याच त्यातच देहाचा अंत होणे, अशी नितांत एकनिष्ठेची कल्पना 'जीवन वाहणे' या शब्दात आहे. त्याग, समर्पणशीलता व वैराग्य, हे कर्वे यांच्या मनोवृत्तीचे प्रमुख गुणविशेष होते. शैक्षणिक कार्य व सामाजिक कार्य राष्ट्रसेवेच्या भूमिकेमधून करणाऱ्या या तत्कालीन संस्थांची ध्येयधोरणे व व्यवहार कर्वे यांच्या जीवनकार्यास प्रेरक व साहाय्यक ठरले.

भारतवर्षीय महिला विद्यापीठ [श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ] हे कर्वे यांच्या स्त्रीविषयक कार्याचे चिरस्थायी

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

स्वरुपाचे स्मारक आहे. ज्या स्त्रीशिक्षणाच्या त्यांनी जन्मभर ध्यास घेतला त्या कार्याचा सर्वोच्च आविष्कार महिला विद्यापीठाच्या रूपाने झाला. भारतातील पहिले आणि प्रदीर्घ काळ एकमेव असे स्थान असणारे हे विद्यापीठ स्थापून त्यांनी ऐतिहासिक महत्त्वाचे ~~शैक्ष~~ शैक्षणिक कार्य पार पाडले. सामाजिक जीवनात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे जे स्थान आज प्राप्त होऊ लागले आहे आणि शैक्षणिक क्षेत्रात स्त्रीने पुरुषांच्या बरोबरीचे जे स्थान आज निर्विवाद प्रस्थापित केले आहे, ते स्थान तिला लाभण्याजोगी परिस्थिती उत्पन्न होण्यासाठी महर्षी कर्वे यांचे कार्य पायाभूत स्वरुपाचे ठरले आहे, हे विसरता येणार नाही.

'आधी केले मग सांगितले' या न्यायाने कर्वे कायम वागत आले. स्त्रीशिक्षणाच्या आपल्या जीवनकार्यासाठी इतरांकडे आर्थिक मदत मागण्यापूर्वी आत्यंतिक काटकसरीने आपला प्रपंच चालवून शक्य तितके द्रव्य त्यांनी अंगीकृत कार्यासाठी उपयोगात आणले.

सर्व विचारांचा सुस्पष्ट मथितार्थ कर्वे यांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे -

"१] आपण जबाबदार मानवी व्यक्ती आहो, ही भावना व आपल्या सामर्थ्याविषयी आत्मविश्वास ज्याच्या योगाने उत्पन्न होईल, असे पुरुष-सामान्य शिक्षण स्त्रियांना देणे.

२] आपल्या देहाचे घटक ज्याप्रमाणे भिन्न भिन्न पेशी, त्याप्रमाणे समाज किंवा राष्ट्ररूप देहाचे घटक जी कुटुंबे, ती जोमदार व मनोहर बनविणे मुख्यतः कुटुंबाच्या सूत्रधार ज्या स्त्रिया त्यांजवर अवलंबून आहे... तेव्हा कुटुंबे, इंग्रजीत Home या शब्दांत किंवा 'गृहिणी गृहमुच्यते' या वाक्यात जो गर्भित अर्थ साठविला आहे तशी बनविण्याचे सामर्थ्य ज्या शिक्षणाच्या योगाने स्त्रियांमध्ये उत्पन्न होईल, असे शिक्षण त्यांना देणे.

३] "आपण राष्ट्राचा घटक आहो ही भावना ज्या शिक्षणाने उत्पन्न होईल असे शिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे. त्याचप्रमाणे मुलामुलींच्या कोवळ्या अंतःकरणात, राष्ट्रीय भावनांचे बीज पेरणे, राष्ट्रातील साधु संतांविषयी पूज्यबुद्धी व पराक्रमी पुरुष आणि तेजस्वी स्त्रिया यांच्याबद्दल आदर उत्पन्न करणे हे... पवित्र कर्तव्य राष्ट्रातील आयांचे आहे. हे कर्तव्य

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

उत्कृष्ट रीतीने बजावण्याचे सामर्थ्य ज्या शिक्षणाने अंगी येईल, असे शिक्षण त्यांना देणे.
४) काही कारणांनी आपण संसारात पडू नये, असे ज्या स्त्रियांना वाटत असेल त्यांनी आपापली ध्येये ठरवून, ती ध्येये साध्य होण्याला ज्या शिक्षणाची जरूर असेल, ते शिक्षण त्यांनी अवश्य घ्यावे व आपली कर्तव्याची दिशा ठरवावी... ह्या संबंधात पुरुषांचे व स्त्रियांचे हक्क समान असावेत. कोणत्याही स्त्रीला अमुक विद्या आपण शिकावी किंवा अमुक उद्योग आपण करावा असे वाटेल तर कायद्याची अगर समाजाची बंधने तिच्या मार्गात आडवी येऊ नयेत. तथापि समाज स्थैर्यासाठी किंवा त्यांच्या शारीरिक व मानसिक घटनेचा विचार करिता सामान्यतः स्त्रियांनी कोणते शिक्षण घ्यावे व कोणते उद्योग करावे याविषयीचा विचार होणे, अत्यंत जरूरीचे आहे."

इंग्लिश भाषेला फाजील महत्त्व न देता कमी श्रमाने मातृभाषेतून स्त्रियांना ज्ञानसाधने उपलब्ध करून द्यावी या दृष्टीने विद्यापीठाने जोराचे प्रयत्न करावे अशी प्रो. कर्वे यांची ईच्छा होती. प्रो. कर्वे यांच्या कामाची शिस्तच अशी ही की, नियमाला सोडून काही घडूच नये, परंतु सिनेटमध्ये आश्रमाशी संबंधित व पुण्यातील व्यक्ती बऱ्याच होत्या. त्यामुळे पैसा आपला परंतु सल्ला त्यांची, असे विचार ~~अक्स~~ ठाकरसीसंबंधितांच्या मनात घर करू लागले आणि अंतरात धुमसणाऱ्या या असंतोषाचा स्फोट १९32 मध्ये झाला. 'लुकिंग बॅक' या आत्मवृतात कर्वे यांनी या प्रकारचे वर्णन 'बोल्ट फ्रॉम द ब्लू' या शब्दात केले आहे.

ठाकरसी विश्वस्तांनी उत्पन्न केलेल्या व विद्यापीठाच्या सेवकांना मनस्ताप आणि प्रो. कर्वे यांना सत्तरीनंतरच्या वयात तीनसाडेतीन वर्षे काळजी व धावपळ उत्पन्न केलेल्या प्रकरणाचा अन्वयार्थ लक्षात घेतला म्हणजे कर्वे यांचे मोठेपण यथार्थपणे समजून येते. कर्वे यांनी 'हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षण' या विषयावर व्याख्यान दिले. त्यात महिला विद्यापीठाची मूलतत्वे व कार्य संबंधी तपशीलवार विवेचन केले. नंतर पुष्कळ उलटसुलट चर्चा झाली. या सभेचा वृतान्त स्थानिक व भारतीय

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

वर्तमानमध्ये आला होता. फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन, पिट्सबर्ग, शिकागो, लॉस एन्जलीस, सॅनफ्रान्सिस्को इत्यादी शहरांमध्ये कर्वे यांनी व्याख्याने दिली. आपल्या कार्याचे स्फूर्तिस्थान असणारे टोकियोतील महिला विद्यापीठ पाहताना, कर्वे यांचे ऊर भरून आले.

प्रो. धोंडो केशव कर्वे यांच्या वयाला ८ एप्रिल १९१८ या दिवशी साठ वर्षे पुरी झाली. स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रो. कर्वे यांनी जे जे प्रयत्न केले त्या सर्वांचा गौरवपूर्वक उल्लेख मानपत्रात करण्यात आला होता. प्रो. कर्वे यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवशी चिरस्थायी स्मारक म्हणून 'कर्वे ज्युबिली फंड' नावाचा फंड उभारण्यात आला. एखादी व्यक्ती आपल्या आयुष्यात जास्तीत जास्त जे काही करू शकते त्याहून अधिक कार्य धोंडो केशव कर्वे यांनी केले. त्यांना लाभलेल्या दिर्घायुष्याचा उपयोग त्यांनी समाजसेवेसाठी केला. समाजातील कोणत्याही एका घटकाचा किंवा एखाद्याच अंगाचा विचार त्यात प्रस्तुत नव्हता. तसेच केवळ शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा आर्थिक अशा एकाच बाजूचाही विचार ते करीत नव्हते. माणसांमाणसांमध्ये कृत्रिमरीत्या उत्पन्न झालेले भेदभाव नाहीसे करून त्यांच्यात समता प्रस्थापित करण्याचा विचार प्रो. कर्वे यांच्या मनात पक्का झाला. आणि त्यांनी समतासंघाची स्थापना केली.

कर्वे यांच्या बहुतेक कल्पनांमागे कोणती ना कोणती तरी बाह्य प्रेरणा कारणीभूत झाली होती. मिल, बेन्थम, स्पेन्सर, लोकहितवादी, राजारामशास्त्री भागवत, विष्णूशास्त्री पंडित, गोपाळ गणेश आगरकर यांसारख्या सुधारकांकडून विधवाविवाहासाठी कार्य करण्याची व स्त्रियांना शिक्षण देऊन पुरूषांच्या बरोबरीला आणण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली होती. १ जानेवारी १९४४ रोजी कर्वे व बोवडे यांनी 'समता संघाची' रूपरेषा सांगणारे निवेदन प्रसिध्द केले. दरवर्षी एक रूपया देऊन लोकांनी संघाचे सदस्य व्हावे, असे आवाहन कर्व्यांनी केले. कर्वे यांचा दृष्टीकोन त्यांचे कार्य आणि कामगिरी खरोखरच अशा प्रकारची होती की, समता संघाची स्थापना करण्यास ते सर्वस्वी पात्र होते. सर्व प्रकारचे भेदाभेद मिटवावे, सर्व प्रकारचे विशेषाधिकार संपवावेत आणि सर्व स्त्रीपुरूषांच्या

सरसकट कल्याणाच्या पुरस्कार करावा, असे या संघटनेचे ध्येय होते. समा समता संघाने आपले कार्य सुमारे दहा वर्षे स्वतंत्रपणे चालविले व नंतर तो 'जातिनिर्मूलन' संस्थेत अंतर्भूत झाला.

# 'शतायुषी अण्णा [प्रो. धोंडो केशव कर्वे]

'१९४६ मध्ये अनाथबालिकाश्रम संस्थेला पन्नास वर्षे पूर्ण झाली. एव्हाना संस्थेच्या कार्यात खूप परिवर्तने झाली होती. संस्थेच्या नावातील 'अनाथ' शब्द बऱ्याच मंडळींना अप्रिय वाटू लागला होता. म्हणून १४ जून या संस्थेच्या वाढदिवशी लहानसा समारंभ करून संस्थेचे नाव 'हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था', असे ठेवण्यात आले. राजेंद्र प्रसादांनी सर्व देशातर्फे महर्षी कर्वे यांचे अभिनंदन केले. पुढे ते म्हणाले की, आपल्या दर्शनाने आम्हाला उत्साह वाटतो. हिंदुस्थानात माणूस पन्नास साठ वर्षे जगला की, तो म्हातारा समजला जातो. परंतु आपल्याकडे पाहिले म्हणजे आम्हा तरुणांचा उत्साह वाढतो या सत्काराला उत्तर देताना अण्णासाहेब म्हणाले हा सत्कार माझा म्हणजे एका व्यक्तीचा नसून सर्व संस्थांचा व त्या संस्थांना ज्यांनी सहाय्य केले, त्यांचा सत्कार आहे.

अण्णांचे चाहते १८ एप्रिल १९५८ या दिवसाची वाट बरीच काळ पाहात होते. या दिवशी अण्णासाहेब शंभर वर्षांचे होणार याचा विलक्षण आनंद सर्वांनाच झाला होता. २६ जानेवारी रोजी भारत सरकारने अण्णासाहेब कर्वे यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब जाहीर करून आपली गुणग्राहकता व समयज्ञता व्यक्त केली. अण्णासाहेब कर्वे यांच्याबद्दल सर्वांनी आदर व्यक्त केला. या प्रसंगी तुमची शेवटची इच्छा काय, असे त्यांना विचारता त्यांनी 'महाराष्ट्र वेगळा झालेला मला पाहायला मिळावा' असे सांगितले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# प्रो. कर्वे यांचे देहावसान

७ नोव्हेंबर १९६२ रोजी रात्री अण्णांच्या पोटात दुखू लागले आणि त्याच आजारात ९ नोव्हेंबर १९६२ ला पहाटे एक घोटभर चहा घ्यायल्यानंतर अण्णासाहेब कर्वे अनंतात विलीन झाले. एका व्यक्तीच्या महान त्यागाचे ते सादर कौतुक होते. ते दुःखाचे रडणे नव्हते. कारण ते दुःख नव्हतेच मुळी. सर्व प्रकारचे कृतकृत्य झाल्यावर शांत मनाने काही कष्ट न होता, शेवटपर्यंत शुध्दीवर असून एखाद्या-ल्याच नशिबाने लाभणारे भाग्याचे मरण होते ते. अण्णा नेहमी म्हणत, 'अनायासेन मरणं, विना दैन्येन जीवनम, असे मिळावे माणसाला'. त्यांच्या इच्छेप्रमाणे देवाने त्यांना दोन्ही वर दिले. गाठी पैसा नसला तरी जीवनात त्यांना कधी काही कमी पडले नाही. विधवेशी विवाह केला म्हणून काही दिवस त्यांना त्रास, छळ, बहिष्कार सोसावा लागला. पण त्यांचे अबोल व अखंड कार्य पाहून समाजाने व सरकारनेही त्यांचे कौतुकही भरपूर केले. त्यांचा त्याग, त्यांची निर्लोभ वृत्ती व सेवापरायणता पाहून देवाने त्यांच्या जीवनाच्या शेवटही अनायासे केला. स्वतः लावलेल्या रोपट्याची वाढ अण्णांना ६५ वर्षे पाहता आली. हे भाग्य व समाधान अपवादभूत म्हणावे लागेल. अण्णांना १०५ वे वर्ष चालू होते. इतके दीर्घायुष्य त्यांना लाभले आणि निरामय राहून विनासायास मरण आले, हे सर्वांचेच महत्भाग्य होते.

आधुनिक भारतामधला 'अण्णा' हे एक अद्भुत चमत्कार होते. 'शतायुषी' अण्णांसारखा समाधानी, कृतकृत्य आणि भाग्यशाली पुरुष कालपर्यंत तरी भारतात दुसरा कोणीच नव्हता. अण्णा ज्या काळात जन्माला आले तो काळ निदान महाराष्ट्रात तरी अल्पायुषी महापुरुषांचा होता. खरोखरच, अण्णा म्हणजे भारताच्या इतिहासातील एका क्रांतीकारक शतकाचे शेवटचे साक्षीदारच होते. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे तर ते महान शिल्पकारच होते. पासष्ट वर्षांपूर्वी अनाथ स्त्रियांच्या उध्दाराचे जे एक लहानसे रोपटे अण्णांनी 'रंडवना' मध्ये लावले, त्याचे रुपांतर हजारो महिलांच्या उध्दार करणाऱ्या एका विराट वटवृक्षामध्ये झालेले 'त्याच

Sundaram®

देही अन् ह्याच डोळां' बघण्याचे भाग्य अण्णांना लाभले ही अण्णांची केवढी पुण्याई म्हटली पाहिजे ! अण्णांनी आपल्या जीवनात जे जे म्हणून मनोरथ रचलेले होते, ते ते सारे यथासांग पूर्ण होऊन त्यांची संपूर्ण प्रगती आणि समृध्दी झालेली बघण्याइतके निरामय आणि निरपघात जीवन अण्णांना लाभावे, हा केवढा चमत्कार !

"अण्णा ज्या काळात जन्माला आले तो काळ भारताच्या इतिहासामधला अत्यंत बिकट आणि भयानक असा होता. गेलेले स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी भारताने केलेला 'सत्तावनी संग्रामा'च्या पहिला अत्याट प्रयत्न पराभूत होऊन धुळीत मिळालेला होता. त्यामुळे देशात सर्वत्र निराशेचे आणि भीतीचे दाबले वातावरण पसरले होते. अशा काळी भारताला राजकीय दास्यांतून मुक्त करणारा लोकमान्यांसारखा क्रांतीकारक वीर जसा जन्माला आला, तसा हिंदुसमाजातील शक्षरी रूढींविरुध्द बंड करणारा अण्णासारखा धाडसी सुधाकरही जन्माला यावा हा एक मोठा योगायोगच म्हटला पाहिजे." त्यांच्या वयाला जेव्हा शंभर वर्षे पूर्ण झाली, तेव्हा महाराष्ट्रात आजपर्यंत कधी कोणाला प्राप्त न झालेली 'भारतरत्न' ही पदवी राष्ट्रपतींनी प्रो. कर्वे यांना समर्पण केली.

१८ एप्रिल १९६३ ला अण्णांना १०५ वर्षे पुरी व्हायची होती. त्या दिवशी अण्णांच्या पुतळ्याचे अनावरण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कन्नमवार यांच्या हस्ते झाले. अण्णांच्या मृत्यूनंतर त्यांची आठवण म्हणून गुलटेकडीजवळच्या वसाहतीला 'महर्षीनगर' व हिंगण्याला 'कर्वेनगर' हे नाव देण्यात आले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# 'उपसंहार'

महर्षी धोंडो केशव कर्वे यांना १०४ पूर्ण वर्षांचे आयुष्य लाभले. आणखी पाच महिने ते जगते तर ते १०५ वर्षांचे झाले असते. एवढे दीर्घ आयुष्य आणि तेही क्रियाशील स्वरूपाचे आयुष्य लाभणे हा भाग्ययोगच म्हणावयास हवा. हे भाग्य जसे कर्वे यांच्या वाट्याला आले त्याचप्रमाणे कर्वे महाराष्ट्रात जन्माला आले आणि त्यांचे कार्यही येथेच घडले हे महाराष्ट्राचे भाग्य होय. शंभर वर्षाचा रोमहर्षक कालखंड कर्वे यांना अनुभवता आला. ते जन्माला आले तेव्हा १८५७ मधील स्वातंत्र्ययुध्द होऊन, जेमतेम वर्ष होत आले होते. त्यांच्या जन्माला सहा महिने उलटून गेल्यानंतर 'राणीचा जाहिरनामा' प्रसिध्द झाला.

कर्वे यांच्या कार्याचे एक अंग जसे शैक्षणिक स्वरूपाचे तसे दुसरे अंग सामाजिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या कार्यामुळे आरंभकालात जरी ब्राम्हण स्त्रियांना शिक्षणाची वा विवाहाची संधी मिळाली असली तरी कालांतराने सर्व जातींच्या स्त्रियांना कर्वे यांच्या कार्याचा लाभ घडला. ब्राम्हण विद्यार्थिनींपेक्षा वा त्यांच्या इतक्याच विद्यार्थिनी अन्य जातीजमातींच्या होत्या असे पुढील काळातील चित्र होते.

आज एकविसाव्या शतकातही विधवा स्त्रियांचा जो छळ होतो, त्यांचे सर्व पातळ्यांवर जे शोषण होते त्यासंबंधी वारंवार प्रसिध्द होणारे राष्ट्रीय व जागतिक अहवाल पाहिले म्हणजे ज्या काळात अण्णा-साहेब कर्वे यांनी विधवा स्त्रियांसाठी जे कार्य सुरू केले व नेटाने चालवले त्याचे मोल व महत्व पटते.

स्त्रीशिक्षणविषयक कार्य प्रदीर्घ काळ केल्यानंतर धोंडो केशव कर्वे अन्य अधिक व्यापक कार्याकडे वळले. त्यासाठी महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक-शिक्षण-मंडळ ही संस्था त्यांनी काढली व बारा वर्षे तिच्यामार्फत ग्रामशिक्षणाचे कार्य केले. एवढ्यावर न थांबता वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षी त्यांनी 'समतासंघ' स्थापन केला. जातीजातीं मधील भेदाभेद दूर व्हावेत इतकेच नव्हे, तर सर्व मानव एकच आहोत ही भावना समाजात रुजावी असा प्रयत्न आपल्या मर्यादित शक्तीच्या साहाय्याने त्यांनी केला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

महर्षी धोंडो केशव कर्वे ज्या कर्वेकुलात जन्माला आले त्या कुलाचा पूर्वेतिहास वैभवशाली असला तरी त्यांच्या वडिलांच्या बालपणापासून कर्वे यांच्या घरात दारिद्र्य व आर्थिक अडचणी होत्या. कर्वे यांचे आई वडिल शीलवान होते परंतु धोंडोपंत कर्वे यांचा जीवनमार्ग सुखकर व श्रेयस्कर होईल अशी कोणतीही स्थिती नव्हती. प्रतिकूल परिस्थितीशी झगडतच कर्वे यांना आपले ध्येय गाठावे लागले. कर्वे यांचा स्वभाव भिडस्त व मध्यममार्गी होता. शक्यतोवर कोणाला न दुखावता इष्ट ते करावे अशी त्यांची पद्धती होती.

आज कर्वे यांना एकेकाळी ज्या समस्यांना तोंड द्यावे लागले व ज्या समस्यांचे निराकरण व्हावे म्हणून धडपडावे लागले ती समाज-स्थिती म्हणजे विधवाविवाह, प्रौढविवाह, स्त्रीशिक्षण, सामाजिक समता इत्यादींनी ग्रासलेली समाजस्थिती आज राहिली नाही. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत व एकंदर स्त्रीविषयक प्रश्नांच्या बाबतीत कर्वे यांचा काळ आणि आजचा काळ यात महदंतर आहे. हे महदंतर उत्पन्न होण्यास ज्या ज्या लोकांनी प्रयत्न केले त्यांत महर्षी कर्वे यांचा क्रमांक पहिला आहे. आज समाजात स्त्रियांसंबंधीचे वेगवेगळे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे मार्ग शोधत असताना कर्वे यांच्या जीवनपद्धतीचे व कार्यपद्धतीचे स्मरण निःसंशय उपयुक्त ठरु शकेल. इच्छाशक्तीच्या बळावर माणूस केवढे प्रचंड कार्य करु शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे कर्वे यांचे 'जीवनचरित्र' होय.

— समाप्त —

स्नेहल रमेश लोणकर

द्वितीय वर्ष कला

| नंबर | अनुक्रमणिका | पृष्ठ. क्रं |
|---|---|---|
| 1) | परिचय - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | 1-2 |
| 2) | धर्मसुधारणांपासून हिंदू धर्माच्या समीक्षेपर्यंत | 3-4 |
| 3) | तर्कतीर्थ त्यांच्या जीवनातील गांधीपर्व | 5-6 |
| 4) | साम्यवादाच्या पुढे नवमानवतावादाकडे | 7-8 |
| 5) | मराठी विश्वकोशाचे संपादन | 9 |
| 6) | तत्वज्ञानाची वाटचाल | 10 |
| 7) | संदर्भ- ग्रंथ -सूची | 11 |
| 8) | अध्यक्षीय भाषणे | 11 |

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(१९०१ - १९९४)

प्राचीन धर्मशास्त्रे आणि तत्त्वदर्शनांच्या सखोल अभ्यासाला आधुनिक ज्ञानाभ्यासाची, तसेच पाश्चात्य विचारवंतांनी सिद्ध केलेल्या सामाजिक व तत्वज्ञानाच्या प्रांतातील अभिजात वाङ्मयाच्या अध्ययनाची जोड देणारे स्वयंप्रज्ञ पुरोगामी विचारवंत म्हणून तर्कतीर्थ जोशी यांचा लौकिक होता. धर्म इतिहास, तत्वज्ञान, संस्कृती व अन्य मानव्यशास्त्रांच्या प्रदीर्घ व्यासंग असलेले लक्ष्मणशास्त्री नानाविध विचारप्रणालींचा मोकळ्या दृष्टीने साक्षेपी धांडोळा घेत राहिले. मार्क्स एंगल्सप्रणित सिद्धान्तनाच्या अनुषंगाने त्यांनी हिंदुधर्माची चिकीत्सा केली. गांधीप्रणित राजकीय आंदोलनात सहभाग घेतला. पुढे गांधीवादाकडून ते मार्क्सवादाकडे वळले. मार्क्सवादाची निःपक्ष चिकित्सा करीत ते त्याही पलीकडे नवमानवतावादाकडे पोहोचले. 'विश्वकोशा'च्या निर्मितीचे शिवधनुष्य पेलणाऱ्या लक्ष्मणशास्त्री यांनी महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळींना आणि उपक्रमांना प्रबोधनाचे वैचारिक अधिष्ठान पुरवीत आधुनिक मराठी समाजाच्या सामाजिक - सांस्कृतिक वैचारिक विश्वाची जडणघडण करण्यात महत्वाची भूमिका बजावली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जन्म धुळे येथील पिंपळनेर येथे झाला. २८ जाने १९०१ ब्राम्हण कुटुंबात ; त्यांच्या वडिलांचे नाव बाळाजी कृष्ण जोशी तर आईचे नाव चंद्रभागा होते. ते लहान असतानाच त्यांच्या आई निवर्तली. त्यांच्या वडीलबहिणीने त्यांचे संगोपन केले. २ फेब्रु १९१४ रोजी ते त्यांच्या वडिलाबरोबर वाईला गेले पुढील शिक्षणासाठी १९१४ मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी लक्ष्मणशास्त्री जोशी प्राज्ञपाठशाळेमध्ये आले गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे यांच्या हाताखाली परंपरेतील धर्मशास्त्रां चे अध्ययन केले. त्यांनी अवघ्या साडेतीन वर्षाच्या अवधीमध्ये काव्य व्याकरण. श्रुतिस्मृतिपुराणे आस्तिक, नास्तिक, दर्शने त्यावरील भाष्ये व टीका या सर्वांचा सांगोपांग अभ्यास पूर्ण केला. १९२२ मध्ये त्यांनी तर्कतीर्थ पदवी प्राप्त केली व औपचारिक शिक्षण संपवले. गांधीमुळे धर्मशास्त्रांमध्ये पक्की बैठक असलेल्या लक्ष्मणशास्त्री यांना धर्मग्रंथातून बाहेर पडता आले. १९३० मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी झाले. धुळ्याच्या कारागृहात ते बंदीवासात राहिले. गांधीच्या तत्वज्ञानाच्या आकर्षणाने ते चळवळीत उतरले. त्यांनी मार्क्सच्या साहित्याचा सखोल अभ्यासकेला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे धर्मकोश कार्य तर्कतीर्थांना केले. कोशग्रंथाची कल्पना त्यांनी पुढे आणली अनेक लेखक व तज्ज्ञांनी एकत्रित येऊन पहिला व ज्ञानकोश तयार केलेला केला. पस्तीस वर्षे लागली. महाराष्ट्रामध्ये त्या प्रबोधनप्रक्रियेचे एक रुप लक्ष्मणशास्त्री यांनी कार्यान्वित केले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## * धर्मसुधारणांपासून हिंदू धर्मांच्या समीक्षेपर्यंत

महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास लिहिताना वाईच्या प्राज्ञपाठशाळेने त्या दिशेने केलेल्या प्रयत्नांची दाखल घ्यावी लागते. भारतातील प्रबोधनाचा स्रोत बंगालकडून महाराष्ट्रामध्ये पोहोचला. नंतर तो खळखळून वाहत राहिला तो प्राज्ञपाठशाळेच्या परिसरात स्वातंत्र्य, समता, स्वराज्य व राष्ट्रीयत्व हे प्रबोधनाचे काही पैलू होते. त्या सर्वांचा गांभीर्याने विचार करून संस्थेच्या शैक्षणिक कार्यक्रमामध्ये ते उतरावेत याची काळजी संस्थेचे प्रमुख आचार्य नारायणशास्त्री मराठे यांनी घेतली. त्यांचा दृष्टीकोन, ते पारंपरिक विद्यांमध्ये मुरलेले होते, तरीही आश्चर्यकारक-करीत्या आधुनिक राहिला. याचे एक महत्वाचे कारण म्हणजे. त्यांच्या संस्थेमध्ये रुजू झालेले बहुतेक प्रौढ विद्यार्थी तळेगाव - दाभाडे येथील समर्थ विद्यालयातून आलेले होते. त्या विद्यालयाच्या संस्थापकांना - विष्णुपंत विजापूरकर प्रखर ध्येयवादाने भारले होते. अध्ययनाव्यतिरिक्त त्यांच्या नारायण शास्त्री यांच्याबरोबर अनौपचारिक चर्चा होत राहिल्या त्या भारतीय स्वातंत्र्यावर आपला देश कोठे कमी पडला, भारताला अस्मिता देणाऱ्या परंपरेला पुन्हा तेजस्विता कशी आणून द्यावयाची आणि गेलेले स्वातंत्र्य कसे मिळवावयाचे या प्रश्नांवर त्यांची विचारसभे नेहमीच भरत. त्या चर्चेमध्ये नारायणशास्त्री स्वतः भाग घेत. त्या विद्यार्थ्यांमध्ये दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर सोहनीशास्त्री. मिरजेचे दत्तुशास्त्री देवधर, पेणचे

Sundaram FOR EDUCATIONAL USE

विष्णू परांजपे, टेंभूचे आठल्ये, नेनेशास्त्री व आणखी काही होते. त्यांच्यामध्ये भारतात नवीन राजकीय आणि सामाजिक विचार आले पाहिजेत आणि एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे, अशी भावना तीव्रपणे नांदत होती. नारायणशास्त्री विरागी आणि तर्कतीर्थांनी म्हटल्याप्रमाणे, त्यांनी स्वतःचा संसार मांडला नाही; परंतु संस्थेतील विद्यार्थ्यांची सर्व प्रकारची काळजी घेतली. संन्यस्त वृत्तीचे असतानाही नारायणशास्त्री त्या विद्यार्थ्यांच्या आधुनिक विचारधारेमध्ये सामील झाले. त्या आध्यात्मिक गुरुने भारताच्या परिस्थितीवर विचारविनिमय करत पुरोगामी विचार आपल्या सर्व शिष्यांमध्ये रुजावेत म्हणून प्रयत्न सुरु ठेवले. तर्कतीर्थ त्यांच्याभोवती रेंगाळत असत. त्यामुळे त्यांचा नवीन विचारांशी परिचय होत गेला. महाराष्ट्रामध्ये प्राज्ञपाठशाळेचे नाव धार्मिक व सामाजिक सुधारणांचे पुरस्कार करणारे केंद्र म्हणून पुढे येत होते. तेथील प्रौढ विद्यार्थ्यांवर क्रांतिकारकांचा प्रभाव होता. राजा राममोहन रॉय, जोतीराव फुले, आगरकर यांचे विचार तेथे पोहोचले होते आणि परंपरेच्या अभिमानाच्या बरोबरीने देश स्वतंत्र होण्यासाठी सामाजिक स्थित्यंतराची गरज त्या वातावरणात ओळखली गेली होती. भारतातील वर्णजातियुक्त समाजामध्ये उच्च-नीच भाव शेकडो वर्षे मुरलेला होता. परकीय सत्तेशी लढावयाचे तर सामाजिक एकोपा निर्माण होऊन सामाजिक परिवर्तन होणे आवश्यक होते. त्याची पायाभरणी, त्यासाठी तात्त्विक अधिष्ठान कसे करावे यावर बरीच चर्चा प्राज्ञपाठशाळेमध्ये सुरु होती.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

* तर्कतीर्थ यांच्या जीवनातील गांधीपर्व

एखादी घटना वा एखाद्या व्यक्तीची गाठभेट जीवनात निर्णायक ठरते. १९२१ मध्ये तर्कतीर्थ एक महिनाभर बडोद्याला हस्तलिखितांचा संग्रह असलेल्या एका ग्रंथालयासाठी राहिले होते. तेथे काही संदर्भ शोधावयाचे होते. नव्यन्यायाची हस्तलिखित प्रत त्यांना चाळावयास मिळाली होती. ती व्यवस्थित पाहून घेतल्यावर, तेथून ते कलकत्त्याला तर्कतीर्थ ही पदवी परीक्षा देण्यासाठी सुरत - जळगाव रेल्वेने निघाले. वाटेत बार्डोली गाव लागते. त्या ठिकाणाहून वल्लभभाई पटेल शेतकऱ्यांच्या करबंदीच्या निमित्ताने सत्याग्रह सुरु करणार होते. बार्डोली स्टेशनवर रेल्वे थांबली तेव्हा स्टेशनच्या परिसरात लोकांची खूप गर्दी झालेली तर्कतीर्थ यांना दिसली. ते कसली गडबड आहे, ते पाहण्यासाठी डब्यातून खाली उतरले. त्यांनी आजूबाजूच्या लोकांकडे थोडीफार चौकशी केली. तेव्हा त्यांना कळले की जवळच बार्डोलीला आश्रमात महात्मा गांधीजींनी मुक्काम केला आहे. चौरीचौरा येथे मारामारी झाल्यामुळे गांधींनी असहकारितेची चळवळ स्थगित करून बार्डोलीला पाच दिवसांचे उपोषण सुरु केले होते. आणि तो दिवस गांधींच्या उपोषणाचा अखेरचा दिवस असल्यामुळे देशभरातील लोक त्या ठिकाणी जमण्यास सुरुवात झाली होती. तर्कतीर्थांनीदेखील उत्सुकतेपोटी आपला प्रवास मध्येच थांबला थांबवला. त्यांनी पुढील प्रवासाला आणखी दोन दिवसांनी निघावयाचे ठरवले.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

महात्मा गांधी यांना प्रत्यक्ष भेटण्याची ही संधी त्यांना कसेही करुन घ्यावयाची होती.

तर्कतीर्थ आश्रमाकडे गेले व तेथे गांधींचे एक शिष्य मगनभाई यांच्याशी त्यांची गाठ पडली. त्यांच्याकडे चौकशी करत आश्रमात राहण्याची त्यांनी परवानगी घेतली. दुसऱ्या दिवशी पहाटे गांधींच्या प्रार्थनासभेला तर्कतीर्थ मगनभाई यांच्या सांगण्यावरुन हजर राहिले व त्यांच्या विनंतीवरुन त्या समुदायापुढे त्यांनी वेदपठण केले. तर्कतीर्थांनी कठोपनिषदातील काही खंड अस्खलितपणे तेथे म्हटले. गांधींना ते म्हणाले फार आवडले आणि त्यांनी तर्कतीर्थ यांची चौकशी करुन त्यांना भेटावयास बोलावून घेतले. गांधी तर्कतीर्थ यांना म्हणाले की, "तुम्हाला पदवी वगैरे कशासाठी हवी. इकडेच राहून जा." गांधींची ती विनंती अव्हेरणे तर्कतीर्थ यांना शक्य झाले नाही. ते बार्डोलीच्या आश्रमामध्ये तब्बल दोन महिने राहिले त्यांची कल्पना महत्वाची परीक्षा चुकली होती. त्यानंतर गांधींना ब्रिटीश सरकारने अटक केल्यावरही पुढे तर्कतीर्थ पंधरा दिवस तेथे थांबले बार्डोलीच्या आश्रमातील मुक्कामामध्ये गांधीचे राष्ट्रजीवनात किती महत्त्व आहे, याची तर्कतीर्थ यांना चांगली कल्पना आली होती. देशातील व बाहेरील देशांमधील अनेक नेते तेथे गांधींना भेटण्यास येऊन गेले होते. त्यामध्ये विठ्ठलभाई पटेल, राजेंद्र प्रसाद, सरोजिनी नायडू, अंबालाल साराभाई व त्यांच्या भगिनी अनसूयाबेन होत्या. या सर्वांची गांधींसमवेत देशातील अनेक प्रश्नांवर चर्चा होई. चौरीचोरा प्रकरणावरुन करबंदीचा सत्याग्रह स्थगित करण्याचा निर्णय घेतला गेला तो त्या सर्वांच्या

FOR EDUCATIONAL USE

सल्लामसलतीने. काँग्रेसच्या वरिष्ठ कार्यकारी समितीने त्याबाबत तो निर्णय घेतला होता.

## * साम्यवादाच्या पुढे नवमानवतावादाकडे

काँग्रेस पक्षामधून बाहेर पडल्यावर तर्कतीर्थांनी रॉय यांच्या नेतृत्वाखालील नव्याने उभ्या राहिलेल्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षात प्रवेश केला. हे पाऊल त्यांनी अचानक उचलेले नव्हते. तो योगायोगाने घेतलेला निर्णय नव्हता. त्यापूर्वी रॉय यांच्याबरोबर त्यांच्या भेटी होत गेल्या तेव्हा तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीवर त्यांची अनेक वेळा चर्चा झाली होती. रॉय यांचे विचार जाणून ते आपल्या विचारांशी जुळते असल्याचे इतर अनेक समविचारींच्या लक्षात आले. रॉय यांच्याभोवती जमलेल्या लोकांमध्ये मोकळे पणाने विचारांची देवघेव होत होती. वैचारिक स्वातंत्र्याच्या त्या पक्षाच्या वातावरणाच्या-मध्ये तर्कतीर्थ रमू लागले. अशा वैचारिक मोकळेपणाचे धडे तर्कतीर्थ यांना आपल्या अध्ययनकाळामध्ये आपल्या गुरुंकडून मिळाले होते. षड्दर्शनांमधील तात्विक विविधता, अवैदिक दर्शनांवरील पाठ त्यांनी अनुभवले होते. त्या दर्शनांमध्ये असलेले सैध्दान्तिक मतभेदाचे स्वरुप त्यांना आकर्षक वाटले होते म्हणूनच काँग्रेस पक्षाचे राजकीय तत्वज्ञान आणि गांधीभोवतीचे सांस्कृतिक वातावरण त्यांना श्रध्दाजड वाटले. त्याच्याशी जुळवून घेणे तर्कतीर्थ यांना जमले नाही. विचारस्वातंत्र्याचा आदर्श त्यांना एम. एन. रॉय यांच्या रुपाने दिसला.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

येथून त्यांच्या राजकीय जीवनाचा दुसरा अध्याय सुरु झाला.

भारताच्या राष्ट्रीय जीवनात कॉंग्रेस पक्ष तेव्हा आघाडीवर होता. त्या पक्षा-मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस श्रेष्ठींमध्ये विचारविनिमय सुरु झाला होता. म. गांधींच्या मते, ब्रिटीश राजकर्त्यांबरोबर युद्धप्रयत्नात सहकार करता कामा नये. असे होता. म्हणून त्यांनी असहकाराचे धोरण जाहीर केले. एवढेच नव्हे तर ज्या प्रांतांमध्ये कॉंग्रेसची राज्ये होती, त्यांनी राजीनामा द्यावा असा गांधींचा आदेश होता. ब्रिटीशांना गांधींनी 'चले जाव' सांगून फक्त राजकीय खेळी केली. रॉयवादी गटाला गांधींच्या या धोरणाचा धक्काच बसला. तसे करण्यामध्ये फॅसिस्ट हुकुमशाहीचा धोका गांधींच्या या धोरणाचा धक्काच बसला. तसे करण्यामध्ये फॅसिस्ट हुकुमशाहीचा धोका गांधींच्या लक्षात कसा येत नाही याचा रॉयवादींना विस्मय वाटला. पं. नेहरु, राजगोपालाचारी यांनाही त्या धोरणाचा खेद वाटत होता. परंतु ते तसे बोलु शकले नाहीत. गांधींमुळे देशाला मोठे नैतिक नेतृत्व लाभले होते. त्यांच्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या आंदोलनाला भरीव यश मिळाले होते. त्यामुळे त्यांच्याशी मतभेद व्यक्त करणे, त्यांना जमले नाही. तर्कतीर्थ यांना पं. नेहरु तभ्रत्तींची भूमिका स्पिरिच्युअल ऱॅमॅन्टेशनची असावी असे वाटत राहिले. रॉय यांच्याप्रमाणे सुभाषचंद्रांचेदेखील गांधीसमवेत खटके उडाले होते.

# * मराठी विश्वकोशाचे संपादन

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या पाठोपाठ थोड्याच काळानंतर तर्कतीर्थांची राजकीय जीवनातील मुशाफिरी संपली. हा काळ होता १९६० नंतरचा तेव्हा नव्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण नियुक्त झाले होते. हे मराठी राज्य आदर्श व्हावे यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यासंबंधी यशवंतरावांनी तर्कतीर्थांबरोबर अनेक वेळा चर्चा केली. आणि काही योजना तयार केल्या. त्यातील एक म्हणजे 'साहित्य संस्कृति मंडळी'ची स्थापना. मराठी भाषा व साहित्य यांची अभिवृद्धी झाली पाहिजे या दृष्टीने ते मंडळ काही महत्वाची पावले उचलणार होते. 'साहित्य संस्कृति मंडळ' स्थापन झाले आणि मंडळाच्या अध्यक्षपदी यशवंतरावांनी तर्कतीर्थांची निवड केली. इतर कोणत्याही राज्यात या प्रकारचे साहित्याच्या विकासासाठी स्वतंत्र मंडळ नव्हते. असे मंडळ प्रथमच तेही महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण केले गेले. ही अभिमानस्पद घटना आहे.

तर्कतीर्थांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली या मंडळाचे स्वरुप आणि धोरण निश्चित करण्यासाठी एक सल्लागार समिती निवडली. त्यावर अनेक नामांकित साहित्यिकांना त्यांनी आमंत्रित केले. शिवाय शास्त्रीय व वैचारिक विषयांवर सुटसुटीत मराठी ग्रंथ तयार करवून घ्यायचे आणि मराठी बोलीभाषांचा अभ्यास करुन त्यांची माहिती प्रसिद्ध करायची.

* तत्वज्ञानाची वाटचाल

बौद्धिक परंपरेतील अस्सल ज्ञान मिळण्याचे महाराष्ट्रातील जे एक महत्वाचे ठिकाण होते त्या ठिकाणी तर्कतीर्थ यांना परंपरागत दर्शनशास्त्रे म्हणजेच भारतीय तत्वज्ञानाच्या सर्व शाखांचे अध्ययन करता आले. त्यांचे बहुतेक सहाध्यायी साहित्य, व्याकरण इत्यादी विषयांमध्ये पारंगत होते. मात्र तर्कतीर्थांचा ओढा न्यायशास्त्राकडे होता. त्यांच्या गुरुंनी त्यांना त्याचे पाठ दिले खरे, परंतु न्यायदर्शनाला फारसे विद्यार्थी नसल्यामुळे, त्यांच्या अभ्यासासाठी अधिक उत्साहवर्धक वातावरण तेथे नव्हते, पण तसे वातावरण त्यांना वाराणसीमध्ये मिळाले. न्यायाचे पट्टीचे विद्वान लक्ष्मणशास्त्री द्रविड, त्यांचे पुत्र राजेश्वरशास्त्री, ~~भंडशी~~ भंडारीशास्त्री वामाचरण भट्टाचार्य हे वाराणसीत होते व त्यांच्या भोवताली ठिकठिकाणचे शिष्य जमत. यामुळे तेथील विद्याभ्यासाला एक वेगळाच मान होता. तेथील दार्शनिकांच्या उदाहरणार्थ नागोजी भट, कोंडाजी भट, यांच्या भोवताली वावरण्याची संधी तर्कतीर्थांना मिळाली. स्वाभाविकपणे तत्वज्ञानाच्या चर्चेमध्ये त्यांचे मन रमले. त्यात ते भाग घेत आणि आपल्या गुरुंपुढे अवघड प्रश्न उपस्थित करीत. विशेषतः परिणतप्रश्न वाराणसीमधील पंडित हे रूढी-ग्रंथांचे पक्के समर्थक असत. वेदांच्या ~~आप~~ अपौरुषेयत्वावर व ईश्वरावर त्यांचा विश्वास असे. त्यांची भिस्त वेदांच्या अनादीपणावर होती.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## * संदर्भ - ग्रंथ - सूची

* जडवाद अर्थात अनीश्वरवाद - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १९४१.
* हिंदू धर्माची समीक्षा आणि सर्वधर्मसमीक्षा - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १९८४
* जोतिचरित्र - ज्योतिनिबंध १९४० - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १९९२
* आनंदमीमांसा - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १९८८.

## * अध्यक्षीय भाषणे

* मुंबई उपनगर मराठी साहित्यसंमेलन १९४४
* मराठी वाङ्मय परिषद - बडोदे अध्यक्षीय भाषण - १९५३.
* अकरावे गोमंतक मराठी साहित्य संमेलन, पणजी, अध्यक्ष १९६२.
* अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन उद्घाटन, कराड १९७५

अक्षय येरम
द्वितीय वर्ष कला

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

जन्म - सप्टेंबर 22
इ.स. १८८७, कुंभोज महाराष्ट्र

मृत्यु - मे ९ इ.स १९५९

टोपणनाव - कर्मवीर

पेशा - शिक्षणप्रसार

कर्मवीर भाऊराव पाटील

FOR EDUCATIONAL USE

कर्मवीर भाऊराव पाटील

समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणप्रसारक करण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापली. भाऊरावांनी मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे. म्हणून कमवा व शिका हे कल्पना स्वीकारून मोठे काम केले ते जोतिबा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य होते. त्याचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग होता.

चरित्र

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी जैन कुटुंबात झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे बुद्रुक हे त्यांचे मुळ गाव होय.

लहानपणापासून भाऊराव बंडखोर होते. अन्यायाची त्यांना प्रचंड चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात राग होता. अस्पृश्य समाजातील लोकांना पाणी दिले जात नाही म्हणून त्यांनी एका विहीरीचा रहाट्य मोडून टाकला होता. त्यांचे शिक्षण सांगली जिल्ह्यातील विटा या गावी झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना कोल्हापुरच्या राजाराम हायस्कूल मध्ये दाखल करण्यात आले. त्यांची राहण्याची सोय जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आली होती.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# जन्म आणि बालपण

आधुनिक महाराष्ट्राच्या सर्वांगीण जडण-घडणीमध्ये ज्या महापुरुषांचा सिंहाचा वाटा आहे, त्यापैकी बहुसंख्यांच्या जन्मतारखांसंबंधी होणारे वादविवाद आपण नेहमी वाचतो, ऐकतो. अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील या पुरुषाची देखील त्यामधून सुटका झालेली दिसत नाही. परंतु अलीकडे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे एक मानसपुत्र आणि बृहत् इंग्रजी चरित्रकार बॅ. पी. जी. पाटील यांनी प्रत्यक्ष कर्मवीरांच्या मातोश्री गंगूबाई यांची साक्ष काढून आणि दहिवडी येथील कर्मवीर भाऊराव ज्या प्राथमिक शाळेत शिकावयास होते, त्या प्राथमिक शाळेतील कागदपत्रांचा शोध घेऊन त्यांच्या जन्मतारखेचा वाद समाधानकारकरीत्या संपुष्टात आणला आहे.

नोकरीनिमित्त भाऊरावांच्या वडिलांची बदली विटा येथे झाली त्या वेळी भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण चालू होते. त्यांचे शाळेच्या चार भिंतीआड चालणाऱ्या शिक्षणात मन रमत नसे, खेळणे-हुंदडणे यामध्ये त्यांचे अधिक लक्ष असे. उन्हाळ्यातील एका भर दुपारी भाऊराव आणि त्यांचे शाळूसोबती खेळून खेळून अतिशय दमले होते. त्यांना खूप तहान लागली होती. म्हणून ते सर्व जण वाटेत असणाऱ्या एका विहिरीवर पाणी काढले जात होते. भाऊराव आणि आणि त्यांचे इतर काही तथाकथित वरिष्ठ जातीतील मुलांनी रहाटाचा वापर करून आपणास हवे तितके पाणी पिण्यास घेतले.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात वसलेले निसर्गरम्य असे कुंभोज हे गाव कर्मवीर भाऊरावांचे आजोळ होय. याच गावी पायगौंडा पाटील आणि गंगूबाई या पती-पत्नीच्या पोटी शुक्रवार -22 सप्टेंबर १८८७ - म्हणजेच आश्विन शुद्ध ललित पंचमी शके १८०९ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म झाला.

FOR EDUCATIONAL USE

भाऊरावांचे वडील पायगोंडा यांची सातारा-पंढरपूर रोडवरील पिलीव घाटात काही दिवस वसुली कारकून म्हणून बदली झाली होती. हा घाट तसा निर्जन, ओसाड, निर्जल आणि एकदम भकास असा होता. या रस्त्यावर असणाऱ्या एका उजाड जुन्यापुराण्या देवळाजवळ कडब्याच्या पेंढ्यांची छोटीशी झोपडी तयार करून त्यामध्ये पायगोंडा आपल्या पत्नीसह राहत होते. भाऊरावांचे वय त्या वेळी ७-८ महिन्यांचे होते. दिवस मावळून अंधार पडू लागला की, ती झोपडी अधिकच भयाण भासू लागे. त्यांना चिमुकल्या भाऊरावांच्या जीवाची काळजी वाटू लागली. कारण रात्री-अपरात्री अगदी नित्यनेमाने एखाद्या-दुसऱ्या लांडग्याची स्वारी तेथे येऊन झोपडीत शिरण्याचा प्रयत्न करत असे. सकाळी लांडग्याचा हल्ला विसरून त्या दररोजच्या कामात मग्न होऊन जात. अशा या असुरक्षित असणाऱ्या झोपडीत भाऊरावांना जीवाला धोका होता. काळवेळ काही सांगून येत नाही, हे लक्षात घेऊन पाटील पती-पत्नीचे भाऊरावांना काही दिवस कुंभोजला ठेवण्याचा निर्णय घेतला असावा, असे दिसते.

ndaram®
FOR EDUCATIONAL USE

# भयंकर दिव्य

सातार्‍यामध्ये भाऊरावांचा शिकवणीचा व्यवसाय मनासारख्या आकार घेत होता. त्यामधून त्यांना होणाऱ्या आर्थिक प्राप्तीच्या समाधानपेक्षा आपल्या आवडीचा व्यवसाय करावयास मिळतो आहे. याचा आनंद भाऊरावांना अधिक होता. त्यामुळे भाऊरावांना बेकारीमुळे आलेले वैफल्य दुर पळाले होते. अभिजनांच्या केवळ धार्मिकच नव्हेत तर आर्थिक आणि सामाजिक धुल्मगिरीत गेली हजारों वर्षे अडकून पडलेल्या बहुजन समाजाला निदान प्राथमिक शिक्षण शाबवत असे. भाऊराव आपल्या शिकवणीच्या व्यवसायाबरोबर इतरही काही व्यवसाय करत होते.

विमा व्यवसायाच्या निमित्ताने त्यांनी सातारा जिल्हा पालथा घातला. एकीकडे विम्याच्या माध्यमातून अनेक अल्प उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाना त्यांच्या भविष्यकाळातील आर्थिक सुरक्षिततेची तरतुद केल्याचे समाधान त्यांना लाभत होते. सातार्‍या जिल्ह्यातील ग्रामीण दीनदलित भागात बहुजनसमाज साध्या प्राथमिक शिक्षणापासूनदेखील कसा वंचित होता, १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धास सुरुवात झाली. साम्राज्यवादी ब्रिटिशांकडून त्यांच्या लहानमोठ्या वसाहती देशाला स्वातंत्र्य मिळणार या आशेने भारतीय कॉंग्रेस पक्षाने या युद्धात ब्रिटिशांना पाठिंबा देण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे त्यांच्या सैन्यभरतीला अगदी लोकमान्य टिळकापासून ते महात्मा गांधीजींच्या पर्यंत सर्व नेते मनःपूर्वक मदत करीत होते.

याउलट कोल्हापुरमध्ये भाऊरावांचे गुरुवर्य आणि शाहू छत्रपतींच्या आश्रयाला छांदा लावून सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात सहभागी असणारे त्यांचे एक सांगाती प्रो. अण्णासाहेब लठ्ठे यांच्यासमोर उग्र प्रकारच्या स्वरूपाच्या अणू मृत्यू उभा राहिला होता.

FOR EDUCATIONAL USE

रयत

# रयत शिक्षण संस्थेची स्थापना

पुढील काळात भाऊराव पाटील सातान्यात जाऊन शिकवण्या घेऊ लागले. याच काळात त्यांनी मदवानमास्तर, भाऊसाहेब कुदळे नानासाहेब येडेकर आदि मंडळींबरोबर दुधागावात 'दुधगाव शिक्षण मंडळ' स्थापन केले. याच संस्थेमार्फत सर्व जातिधर्मांच्या मुलांसाठी एक वसतिगृहही त्यांनी सुरू केले. रयत शिक्षण संस्थेचे बीज येथेच रोवले गेले. पुढे त्यांनी ओगल्यांच्या काच कारखान्यात व किर्लोस्करांच्या नांगराच्या कारखान्यात काही काळ काम केले. याच काळात त्यांच्या सत्यशोधक समाजाच्या कार्याशी जवळून संबंध आला.

दिनांक ऑक्टोबर ४, इ.स. १९१९ रोजी भाऊराव पाटील यांनी 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना सातारा जिल्ह्यातील काले या गावी केली. डॉक्टर नागनाथ अण्णा नायकवाडी यांनी रयत शिक्षण संस्थेला १,११,१११ रुपयांची देणगी दिली. पुढे या संस्थेचे मुख्यालय सातारा येथे नेण्यात आले. संस्थेची काही उद्दिष्टे होती.

१. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात शिक्षणाची आवड निर्माण करणे व ती वाढवणे.

२. मागासलेल्या वर्गातील गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे.

३. निरनिराळ्या जातिधर्मातील विद्यार्थ्यांत प्रेमभाव निर्माण करणे.

४. स्वावलंबी, उद्योगी, काटकसरीची आवड, उत्साही आणि चारित्र्यसंपन्न अशी असणारी भावी पिढी तयार करणे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

५ समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ठ रुढी, प्रथा इत्यादींचा समूळ नायनाट करणे.

वरील उद्दिष्टानुसार रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याला कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली रीतसर आरंभ झाला. काले येथे सुरु करण्यात आलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या या पहिल्याच वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा जातिधर्मानुसार संख्यात्मक मागोवा घेतला की कर्मवीर भाऊरावांच्या नवसमाज रचनेसंबंधी प्रथमपासून अस्तित्वात असणारा जातिधर्मनिरपेक्ष दृष्टिकोन नजरेत भरतो.

काले येथील या वसतिगृहात १९२२च्या संस्थेच्या अहवाला-प्रमाणे एकूण २० विद्यार्थी होते. त्यामध्ये ८ मराठा, ३ जैन, २ मुसलमान, १ कोष्टी, १ परीट, १ लिंगायत, १ न्हावी आणि १ कुमार असे विविध जातिधर्मांचे विद्यार्थी राहत होते. संस्थेने या मुलांसाठी व्यायाम आणि खेळाचे साहित्यही पुरवले होते. त्याचप्रमाणे मुलांनी क्रमिक पुस्तकांशिवाय बाह्य वाचनही करावे म्हणून एक ग्रंथालय आणि वाचनालयही तेथे उघडण्यात आले होते.

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

## शाहू छत्रपतींच्या सहवासात जडणघडण :-

समाजाच्या कोणत्याही क्षेत्रातील अफाट कर्तृत्व गाजलेल्या व्यक्तींच्या जीवनचरीत्रांचा अभ्यास करत असताना त्यांच्या आयुष्यातील अनेक समान घटना अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतात. महात्मा फुले, महात्मा गांधी आणि शाहू छत्रपती या तीन थोर विभूती कर्मवीर भाऊराव पाटलांचे आदर्श महामानव होते. हे महामानव आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आयुष्यातील अनेक घटना समान असल्याचे पाहावयास मिळते. त्यापैकी महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव यांच्या चरित्रातील एक घटना या ठिकाणी नमुद करणे योग्य ठरेल, असे वाटते.

गोविंदराव फुले यांच्याकडे कारकून म्हणून काम करणाऱ्या अभिजन वर्गातील एका गृहस्थाने गोविंदरावांचे मन शिक्षणाविषयी कलुषित करून जोतिरावांचे प्राथमिक शिक्षणसुध्दा बंद करून टाकले.

शाहू छत्रपतींच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणाऱ्या 'वेदोक्त प्रकरणा'चा आरंभ १८९९ च्या कार्तिक महिन्यात झाला होता. १९०२ मध्ये वेदोक्ताच्या वादाने अधिक पेटला होता. एकीकडे २२ आणि २९ ऑक्टोबर १९०१ च्या 'केसरी' मध्ये 'वेदोक्ताचे खूळ' असे दोन अग्रलेख लिहून लोकमान्य टिळकांनी शाहू छत्रपतींचे वेदोक्ताचे अधिकार नाकारून सनातन्यांची बाजू उचलून धरली होती. तर दुसरीकडे भारताचार्य चि. वि. वैद्यांसारखे इतिहासकार मराठे हे क्षत्रिय असल्याचे शास्त्राधार देऊन शाहू छत्रपतींना पाठिंबा देत होते. वेदोक्त प्रकरणात अपमानित झालेले शाहू छत्रपती खूप अंतर्मुख होऊन या घटनेचा विचार करीत होते. 'क्षत्रिय कुलावतंस' ही ब्रीदावली धारण करून शिवछत्रपतींचे वारस म्हणून अभिमानाने मिरवत असलेल्या राजाचा त्याच्याच आश्रितांनी जाहीर अवमान करून त्याला वेळोवेळी बाहुलाबुवा दाखवून काही काळ माघार घेण्यात भाग पडले होते

## श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस

महात्मा फुले यांचे एक सहकारी 'दीनबंधु'कार कृष्णराव भालेराव यांनी १८ नोव्हेंबर १८८४ रोजी पुण्यातील कसबा पेठेत शेतकऱ्यांना मुलांच्या शिक्षणासाठी 'पुणे सुशिक्षण गृह' नावाचे वसतिगृह सुरू केले होते. त्या वसतिगृहाचा पहिला नियम पुढे दिलेले आहेत. त्या सुशिक्षण गृहात अन्न व्यवहाराच्या सोईकरिता मराठे, माळी, कुणबी अशा आपसात अन्नव्यवहार असणाऱ्यांनी दहा वर्षावरील वयाची मुले घेतली जातात. भालेकरांचे हे वसतिगृह विशिष्ट जातीपुरतेच खुले होते. त्याचप्रमाणे त्यांच्या अनेक व्यापांमुळे हे वसतिगृह वर्षभरातच मोडकळीस आले होते. मुलांचे जेवणाखाण्याचे हाल होऊ लागले होते. म्हणून महात्मा फुले आणि कृष्णराव भालेराव यांच्यामध्ये मतभेद झालेले दिसून येतात.

शाहू छत्रपतींनी १८९६ मध्ये राजाराम कॉलेजला जोडून सर्व जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांना खुले असे वसतिगृह सुरू केले होते. परंतु तथाकथित अभिजन वर्गातील विद्यार्थ्यांना खुले असे वसतिगृह सुरू केले होते. परंतु शेवटी केवळ उच्चवर्णीय विद्यार्थ्यांचेच राहिले होते. म्हणून शाहू छत्रपतींनी १९०१ पासून १९२१ पर्यंत कोल्हापूर शहरात जातवार अशी 22 वसतिगृहे सुरू केली होती. शाहू छत्रपतींची जातवार वसतिगृहे निर्माण करण्यापाठीमागे जी भूमिका होती, ती जातीजातीत असणारी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विषमता नष्ट करण्याची तरीदेखील नलिनी पंडित यांच्यासारख्या नागरी विदुषीने शाहू छत्रपतींच्या जातवार शाहू छत्रपतींच्या संयमी स्वभावानुसार 'आस्ते कदम' हे सामाजिक सुधारणाबाबत त्यांचे धोरण होते. ब्राह्मण जगद्गुरुपदाची निर्मिती हेदेखील शाहू छत्रपतींचे पुरोहितशाही पूर्ण नष्ट करण्याच्या वाटचालीतील पहिले

कोल्हापूरमध्ये अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल जवळ असणाऱ्या त्रिकोणी जागेत महाराणी व्हिक्टोरिया पुतळा बसवण्यात आला होता. त्या पुतळ्याच्या तीन बाजूना असणाऱ्या सहा पुतळ्यांपैकी बादशहा सातवे एडवर्ड आणि महाराणी अलेक्झांड्रा यांच्या पुतळ्यांना २५ फेब्रुवारी १९१४ रोजी कोणी तरी डांबर फासल्याचे तेथील पहारेकऱ्याच्या निदर्शनास आणून दिले. कोणा अज्ञाताच्या ब्रिटिश सरकारशी केलेल्या त्या राजद्रोही कृत्याने देशभर खळबळ उडाली त्यामुळे हा अज्ञात राजद्रोही गुन्हेगार शोधून काढण्यासाठी शाहू छत्रपतींवर ब्रिटिश सरकारचे सतत दडपण येऊ लागले. परिणामी शाहू छत्रपतींनी हा गुन्हेगार शोधून काढण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावलेली दिसून येते.

गौरी कांबळी
द्वितीय वर्ष कला

FOR EDUCATIONAL USE

## * प्रस्तावना *

सयाजीराव गायकवाड जन्म व मृत्यू (1863-1939)
आजच्या आधुनिक महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करणाऱ्या हा लोकगणींच्या व्यक्तित्व-चरित्र आणि कर्तृत्वाची गाथा या चरित्र ग्रंथ मालेच्या रूपाने जनताजनार्दनाच्या चरणी सादर करताना मनस्वी समाधान वाटते आहे. श्री गंधर्व वेद प्रकाशना'ची प्रकाशने प्रामुख्याने विद्यार्थी व शिक्षकवर्गाला उपयुक्त ठरतील अशी असतात. - संदर्भमूल्य असणारी पुस्तके प्रकाशित करण्याचे वेगळेपण आम्ही सुरुवातीपासूनच शक्यतो - जपत आलेलो आहोत त्यामुळेच महाराष्ट्र राज्य निर्मितीचा सुवर्ण महोत्सव अभिनव पद्धतीने साजरा करण्यासाठी आगामी पिढ्यांतील विद्यार्थी शिक्षक तसेच सर्व मराठी भावक जिज्ञासू - वाचकांना उपयुक्त ठरेल असा कोणता तरी ग्रंथनिर्मिती प्रकल्प आपल्या प्रकाशनातर्फे हाती घ्यावा याबाबतचे विचार 2005 पासूनच मनात घोळत होते. त्याच दरम्यान इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे राजवाडे लेखसंग्रह भाग 3 संकीर्ण निबंध हे पुस्तक वाचताना महाराष्ट्रातील बुद्धिमान प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद हा - निबंध विशेष आवडला (मूळ लेख लोकशिक्षण - सातारा शके 1835 इ. स. 1913 पृ. 377 ते 384) त्या लेखात वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्रातील - सार्वकालीन महत्वाच्या अशा बुद्धिमान प्रतिभावान व कर्त्या 43 व्यक्तींची यादी दिलेली आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# * लेखकाचा परिचय *

प्रजाहितदक्षता, पुरोगामी विचारसरणी विशाल सामाजिक दृष्टिकोन यामुळे बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व त्यांच्या समकालीन संस्थानिकांमध्ये आगळेवेगळे दिसते. स्वदेश आणि स्वधर्म यांचा मूलमंत्र मनावर बिंबलेल्या या लोकाभिमुख राजाने लोकसेवेसाठी अवघड असा ज्ञानमार्ग स्वीकारला. त्यासाठी आपल्या संस्थानात सक्तीचे आणि विनामूल्य प्राथमिक शिक्षण सर्वप्रथम सुरू केले. त्यांनी आपल्या राज्यात अस्पृश्यता निवारणाचा कायदा करून अस्पृश्यांच्या शिक्षणाची राहण्या जेवण्यासह सोय केली. स्त्रीशिक्षणाला प्राधान्य देऊन स्त्रियांना प्रशिक्षण देण्यासाठी वेगळे महाविद्यालयही उघडले अनेकविध शैक्षणिक तसेच सामाजिक सुधारणांच्या जोडीनेच साहित्याविषयक आणि प्रशासनसंलग्न सुधारणा घडवून आणण्यातही सयाजीरावांनी पुढाकार घेतला.

मिश्रविवाह, विधवाविवाह, स्त्रियांचा वारसा, पडदा पद्धतीवर बंदी, बालविवाह प्रतिबंध यांसारख्या प्रागतिक सामाजिक सुधारणा राबविणाऱ्या सयाजीरावांना आदर्श राजा म्हणून यथोचित गौरव पंडित मदनमोहन मालवीय यांनी केला आहे.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

कार्य

सयाजीरावांना आमच्या देशाची स्थिती. हा शास्त्रीबुवांचा निबंध तोंडपाठ होता. चिपळूणकरांनी त्यामध्ये लिहिले होते आमच्या सद्यस्थितीच्या दैन्याचे मुख्य कारण काय हे कोणासही सांगावयास नको. ते परकी अंमल हे होय हे उघड आहे...... आमची अगानगता झाली आहे. दुष्काळाचा तडाखा उडाला म्हणजे लाखो लोकांची चांदी उडते आहे. सरकारी देखाखाली रयतेची चुराडा होत आहे ही स्थिती सर्वांच्या डोळ्यासमोर आहे आणि देशोन्नतीचे धुरंधर वरील विपत्तीच्या प्रतिकारार्थ उद्योग कार्य करत आहेत. म्हणाल तर एक आकाशीतल बापास आरोळी देत आहेत दुसरे आपल्या लेडीकरवी कोणी गैरकाय अधिकाऱ्यांचे हस्तपीडित पूर्व स्वागत करत आहेत. कोणी पार्लमेंटच्या गर्दीत गुंग आहेत. कोणी अर्वाचीन सोमरसात तल्लीन होऊन जातिभेदरूपी महान उपशम होऊन या देशास आराम पडावा म्हणून अर्वाचीन ऋषींचा तांडा जुळवून गवालंभाचे अनुष्ठान करत आहेत. कोणी सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिदिवशी उंबरठे पुजून त्यांच्यापुढे निरंतर लांगूलचालन करत आहेत! हा सर्व प्रकार आम्हास तर केवळ लज्जास्पद वाटतो.

सयाजीरावांना शास्त्रीबुवा सैद्धांतिक सम-पार्श्वभूमी पुरवत, तर केसरी आणि मराठा व्यावहारिक व साप्ताहिक केसरी नुकताच सुरू झाला होता. त्यामध्ये मवाळ वाटणाऱ्या आगरकरांनी आग पाखडली होती. पाषाण आणि काळ धातू आणि

मृत्तिका यांचे जसे संमेलन होत नाही त्याप्रमाणे अधिकारी आणि अनाधिकारी, स्वामी आणि सेवक सकांचन आणि निष्कांचन, स्वातंत्र्य आणि परतंत्र्य यांची मैत्री जुळत नाही. समानशीलत्व हे अन्योन्य मैत्रीचे आद्य बीज किंवा आदिकारण असते. वरील वाक्याचे यथार्थ त्यांच्या लक्षात बरोबर उतरेल, त्यांना युरोपियन् आणि नेटिव्ह यांचे परमसख्य कधीच बनायचे नाही असे जे आम्ही आग्रहाने म्हणतो तर त्याचा चमत्कार वाटणार नाही..... कोणते ही राष्ट्र कितीही सामर्थ्यवान असो त्याने अशी घमेंड बाळगू नये अमुक एक देशी मी जिंकला, आहे त्याचे स्वामित्व माझ्याकडे निरंतर राहीलच राहील हिंदुस्थान देशाचे ज्ञान आणि धन प्रतिवर्षी वाढत आहे हे खरे असले तरी इंग्रज आणि नेटिव्ह यांची मैत्री उत्तरोत्तर वाढत जाणार नाही. इतकेच नाही तर दिवसेंदिवस यांच्यात कलागती लागत जाऊन परिणामी हातघाईवर काम येऊन ठेपेल व या रीतीने हिंदुस्थानला आपली मुक्तता करून घेता येईल असे मानण्याखेरीज प्रत्यवाय नाही..... किती जरी झाले तरी हिंदू लोक धनसंपन्न आणि ज्ञानसंपन्न झाले म्हणजे इंग्रज लोक एक दिवशी तरी हिंदू लोक धनसंपन्न आणि ज्ञानसंपन्न झाले म्हणजे इंग्रज लोक एक दिवशी आपले चंबुगबाळे आटोपून चालते होतील असे कोणीही मानू नये.

सयाजीराव कोणत्याही क्षत्रिय राजाप्रमाणे हिंदू धर्माभिमानी होते. आधुनिक शिक्षणामुळे हिंदू धर्ममध्ये आधुनिता शिक्षणामुळे हिंदू धर्ममध्ये शिरलेले काही दोष त्यांनी कटाक्षाने दूर ठेवले आणि धर्ममध्ये आधुनिकता आणण्याचा प्रयत्न - केला. सारे विश्व पाहिल्यावर हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व त्यांना चांगले समजले होते पण इतरांवर धर्म लादण्याच्या ते विरुद्ध होते. इतरांनीही आमच्यावर त्यांचा धर्म लादू नये अशी त्यांची अपेक्षा होती आणि ते त्याबाबत जागरूक होते. आर्यसमाजी लोकांना आमंत्रण देऊन त्यांनी ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी तोंड बंद केली होती. धर्म जतन करणारी - हिंदूची मंदिरे संस्कृती जपणारी संस्कृत भाषा आणि ती देवभाषा जतन करणारे विद्वान ब्राह्मण या - सर्वांचे संरक्षण करणे म्हणजे राजधर्म असे त्यांना शिकवण्यात आली होते.

अ) मंदिरे :-

हिंदू धर्मावर श्रद्धा असल्यामुळे त्यांना - ज्ञान प्राप्त करून घेणे सोपे झाले. आधुनिक ज्ञानाने त्यांना दृष्टी मिळाली. जग पाहिल्यामुळे श्रद्धा आणि तंत्रज्ञान यांच्या जोरावर लोकांच्या राहणीमान बदल - कसा घडवून आणायचा हे त्यांना कळले. हिंदू धर्माच्या एकात्मतेचे रहस्य त्यांच्या मंदिरात आहे म्हणून - मुसलमानांनी मंदिरे तोडली वा त्यांच्या मशिदी केल्या श्रद्धेचे निष्ठेचे आणि भक्तीचे सर्वांत सुंदर सगुण रूप म्हणजे मूर्तिपूजा. वैदिक संस्कृती यज्ञप्रधान - होती पण जस जसा वैदिक संस्कृतीमध्ये हिंदूंच्या अनुभवांचा विकास होत गेला तसतशी मंदिरे आणि मूर्तिपूजा यांचाही विकास झाला.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

निरनिराळ्या लोकांना एकत्र आणण्यासाठी आणि परमेश्वरासमोर तुम्ही सर्व सारखे आहात ही जाणीव निर्माण करण्यासाठी मंदिरांसारखे दुसरे माध्यम नाही असे सयाजीरावांना आढळले ते कोठे? तर युरोपमध्ये जेव्हा त्यांनी विशाल ख्रिस्ती प्रार्थनामंदिरे (चर्च) पाहिली. तेव्हा त्यांना एकदम वाटले अरे ही तर आपल्या हिंदू-बौद्ध मंदिरांची नक्कल आहे तेच गंभीर वातावरण तेच मंत्रघोष करणारे ब्राह्मण तेच स्वर्गीय संगीत आणि त्याच सामाजिक राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक बाजू! लोकशिक्षणासाठी लोककल्याणासाठी किंवा लोकजागृती मंदिरांसारखे दुसरे साधन नाही. कक पुजारी निवडताना त्यांची परीक्षा घेऊन मगच त्यांना कामावर ठेवावे असे त्यांना वाटू लागले. पदवी असलेल्या शास्त्री पंडितांशी चर्चा करून पुजाऱ्यां साठी त्यांनी एक अभ्यासक्रम तयार केला आणि सर्व सरकारी मंदिरांमध्ये त्या अभ्यास क्रमाप्रमाणे पुजाऱ्यांच्या परीक्षा घेतल्यावर त्यांना नोकरीवर ठेवले.

पन्नास वर्षापूर्वीच्या स्त्रियांना कथापुराण श्रवणाने मिळण्यासारखे ज्ञान बरेच असे. लिहिणे-वाचणे आणि हिशोब एखादीसच येत असे. कारण त्याची जरूरीच भासत नसे. चूल आणि मूल यातून स्त्रिया वरच येत नसत. संयुक्त कुटुंबामध्ये नातेवाईक आणि पाहुणे भरपूर. त्यामुळे कावल्या-वेळात गप्पा झोडण्याची आणि माहितीचा-प्रसार करण्याची उत्तम सोय असे.

FOR EDUCATIONAL USE

धर्मकराकर

सयाजीरावांचे संस्कृत प्रेमः-

नेव्हिन या त्यांच्या रीडरला लिहिलेल्या एका पत्राचा शेवट त्यांनी पुढीलप्रमाणे केला आहे हे पत्र मी पुरे करतो. माझे संस्कृत शिक्षक येण्याची वेळ झाली आहे माझ्या घराण्याला आणि मी ज्या-जातीत जन्मलो त्या जातीला एक शाप आहे तो-म्हणजे संस्कृत भाषेचे अज्ञान. मी केलेल्या संस्कृतच्या अभ्यासामुळे धार्मिक बाबतीत डोकावणे-मला शक्य झाले त्यांनी इलियट निवृत्त झाल्यावर त्यांना इंग्लंडमध्ये एक पत्र लिहले त्या पत्रामध्ये ते लिहितात की धार्मिक चालिरीतींमध्ये बरेच-घोटाळ्यांमुळे आणि अपसमज निर्माण झाले आहेत ते दूर करावेत धर्मामध्ये सुधारणा व्हाव्यात असे मला वाटू लागले आहे. हिंदू धार्मिक विधी दोन प्रकारचे आहेत. उच्च स्तरीचे वैदिक आणि कमी समजले-जाणारे किंवा भूए पुराणोक्त आमच्याकडे पुराणोक्त विधी केले जातात. पण पुने कागदपत्र दाखवतात की पूर्वी ते वैदिक पद्धतीने केले जात ते का बदलले गेले याचा मी शोध घेत आहे माझ्या पूर्वजांचे संस्कृतचे अज्ञान त्याला कारणीभूत झाले असावे. भारतामध्ये वेदांचा अधिकार सर्वात जास्त मानला जातो यात संशय नाही. हिंदू धर्मगुरु या रुढी आणि चालीरीती यामध्ये एवढे अडकून पडले आहेत की मुलभुत धार्मिक तत्वांकडे दुर्दैवाने त्यांचे दुर्लक्ष होत आहे ते पुढे ता.क. मध्ये महत्वाचे असे म्हणून लिहतात

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

शिक्षणातून स्वातंत्र्याकडे अशी सयाजीरावांची दृढ समजूत होती. त्यामुळे बडोदे ही प्रयोगशाळा समजून त्यांनी शिक्षणाचे सर्व प्रकारचे प्रयोग आपल्या राज्यामध्ये करून बघितले तो काळ वेगळा होता या प्रयोग करण्यात सयाजीरावांनी किती विरोध सहन केला असेल ते कळके त्यांना ठाऊक होते सर्व संस्थानिकामध्ये ही किंमत कळके सयाजीरावांची होती कारण त्यांना लोकमान्य टिळकांचा पाठिंबा होता तुम्ही इंग्रजांचे मांडलिक असतात तरी शिक्षणासारख्या चांगल्या कार्या मध्ये तुम्ही स्वतंत्र आहात पाच लाखांऐवजी पंधरा लाख तुम्ही स्वतंत्र आहात पाच (१९४५ मध्ये लॉर्ड वॅव्हेलने बडोदे. म्हैसूर आणि त्रावणकोर - संस्थानापुरती ही गोष्ट कबूल केली होती) सयाजीरावांना आमच्या देशाची स्थिती हा शास्त्री बुवांचे निबंध तोंडपाठ होता चिपळूणकरांनी त्यामध्ये लिहिले होते आमच्या प्रस्तुतच्या दैन्याचे मुख्य कारण काय हे कोणासाठी सांगावयास नको. ते परकी असंल हे होय हे उघड आहे आमची अन्नानगात झाली आहे दुष्काळाचा तडाखा उडाला म्हणजे लाखो लोकांची चांदी उडते आहे सरकारी हेव्याखाली रयतेचा चुराडा होत आहे. ही स्थिती सर्वांच्या डोळ्यासमोर आहे आणि देशोन्नतीचे धुरंधर करील - विपत्तीच्या प्रतिकारार्थ उद्योग कार्य करत- आहेत.

ndaram

# विच्यार

सयाजीराव वारंवार युरोपला जात. तेथून ते बरीच पत्रे आपल्या सहकाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना लिहीत असत. दिवाण व्ही. टी. कृष्णमाचार्य तर आठवड्याला एक तरी पत्र असायचेच. त्यामध्ये भारतीयांविषयी तक्रारी असत. विशेषतः युरोपीय लोकांच्या तुलनेत भारतीय कोठे कमी पडतात आणि त्यासाठी काय केले पाहिजे असा मन बेचैन करणारा प्रश्न असे. अशा काही पत्रांमधील बेचैन करणारा काही मजकूर आपल्या लोकांना सर्वसामान्य बुद्धी कमीच त्यामुळे बारीक हुकूम द्यावे लागतात. अधिकारीसुद्धा या हुकुमातील शब्दांना पकडून बसतात त्या मागे काय आशय आहे ते बघतच नाहीत.

"भारतीय मंडळी जबाबदारी घ्यायला केव्हा शिकतील? त्यांना हुकुमाची ताबेदारी करणे पसंत असते. विकास साधायचा असेल तर सामान्य माणसाला प्रशिक्षण द्यावे लागेल आणि त्याचा स्तर उंचवावा लागेल

" चांगले सरकार म्हणजे काय? देशभक्ती न्यायबुद्धी आणि सर्वांना योग्य (केमर) ती वागणूक देणाऱ्या अधिकाऱ्यांचा संघ निर्माण करणे एके काळी सुवर्णभूमी असलेल्या भारत देशाची अशी अवनती का झाली हा प्रश्न त्यांना कारसतावी.

युरोपला जाऊन त्यांच्या तुलनेमध्ये आपली माणसे खूप कमी पडतात असा त्यांचा ग्रह झाला होता. बडोदे राज्याचे शासन चालवणे म्हणजे चांगल्या अधिकाऱ्यांचा एक चमू तयार करून निरनिराळी कामे त्यांना वाटून देणे. चांगले अधिकारी अधिक चांगले कसे तयार होतील? त्यांना जास्त चांगले प्रशिक्षण कसे आणि कोठे द्यावे? या विचारामध्ये करणारा आहे ते शोधून काढण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या युक्त्यांचा उपयोग केला. दुष्काळग्रस्त विभागाची पाहणी करत असताना. ते तंबूमध्ये राहत. एकदा त्यांना प्यायला थंडगार पाणी मिळाले नाही म्हणून ते खूप चिडले तेव्हा खाशेराव जाधव चिडून त्यांना म्हणाले - इथे दुष्काळात हजारो माणसे मरत आहेत एक दिवस थंड पाणी मिळाले नाही तर काय - आभाळ कोसळणार आहे का? महाराज खाशेरावांना म्हणाले हा व्यवस्थापनाचा प्रश्न आहे थंडगार पाण्याचा नाही. जो अधिकारी महाराजांना नित्य लागणाऱ्या गोष्टीविषयी एवढा बेदरकार राहू शकतो तो सामान्य खेडुतांची दुष्काळग्रस्त - कामे किती सचोटीने करत असेल?

राजकारण असो धर्मकारण असो अथवा समाजकारण असो सर्व क्षेत्रांमध्ये मनुष्यबळ - व्यवस्थापना व्यवस्थित बनायला पाहिजे कर्तव्य करत असताना हा माझा नातेवाईक आहे हा माझा जातवाला आहे त्यामुळे त्याला कमी शिक्षा द्या असे करून चालणार नाही.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

राजा झाल्यापासून ते मनुष्यबळ व्यवस्थापनाचे काम सतत करत आहे माणूस महत्त्वाचा केव्हा ठरतो. त्याला चारित्र्य असेल तर

महाराजांच्या मते मुसलमानांच्या आगमना नंतर भारतीयांची विशेषत उत्तर भारतीयांची मने गुलामी वृत्तीची झाली. त्यामुळे धर्माचे बंधन सैल झाले. त्यामुळे माणसाचे स्खलन झाले - आणि भारताचा ऱ्हास झाला! शिवाजी महाराजांमुळे महाराष्ट्रामध्ये ही प्रक्रिया थांबली आणि दीडशे वर्षे महाराष्ट्रामध्ये पुन्हा धर्माचे आगमन झाले. इंग्रज व्यापाऱ्यांच्या मिशाने सत्ता भारतभर घुसू लागले.

**नैसर्गिक वायू** - 1921-22 मध्ये राजमहालच्या हद्दीमधील नवलाखी विहिरीजवळ खोदकाम करत असताना अचानक नैसर्गिक वायूचा फवारा बाहेर आला. इंग्रज तज्ञ सांगणार नाहीत म्हणून तर इतर परदेशी तज्ञांचा सल्ला विचारला. सत्या चाचण्या आणि परीक्षा झाल्या. हा वायू प्रकाश आणि घरामध्ये अन्न शिजवण्यासाठी चालू शकेल असेल त्यातून निष्पन्न झाले पण महाराज तेवढ्या थोडेच संतुष्ट राहणार होते? त्यांनी कलाभवनातून खास बर्नर तयार करून घेतले आणि महाराजा मिलमधील इंजिन काही दिवसांसाठी मागूण ते त्या वायूवर चालते का याची चाचणी - घेतली ते चालले! दुर्दैवाने बडोद्यामधील गिरण्यांना पुरेल एवढा पुरेसा नैसर्गिक वायू त्यांना न मिळाल्यामुळे ती योजना नाइलाजाने सोडून - द्यावी लागली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## संरक्षणाचा आर्थिक पाया :-

आपण आपल्या संरक्षण हितासाठी केलेला खर्च भारताच्या हितासाठी केला आहे असे भासवून तो खर्च भारत सरकारच्या माथी मारण्याचे प्रकार इंग्लंडमधील सरकारने केले. 1885 मध्ये इंग्लंडमधील सरकारला अचानक भारतीय सीमेच्या सुरक्षिततेविषयीची काळजी वाटू लागली कारण मध्य आशियामध्ये रशियाचा प्रभाव वाढत होता आणि वाढलेला रशिया अफगाणिस्तानच्या दिशेने सरकत होता. दुसऱ्या बाजूला फ्रान्सने वसाहती मिळवण्यासाठी जोराचे प्रयत्न सुरू केले होते. खरे पाहता भारताची नैसर्गिक सरहद्द म्हणजे तिन्ही बाजूचे समुद्र आणि उत्तरेस असलेली मोठी हिमालयाची उंचच उंच पहाडांची रांग.

या सरहद्दीच्या पलीकडे होणाऱ्या घडामोडींचा भारताशी संबंध आहे असे मानायचे कारण नाही. वरील दोन देशांपैकी एकाची जर सरशी झाली असती तर मालक बदलला असता पण मालकांची दादागिरी बदलली नसती. इंग्लंडच्या सरकारला काळजी आपली मालकी जाते की काय इतकीच होती.

वरील दोन युरोपीय देशांकडून धोका निर्माण झाल्याचे निमित्ताने वायव्य सीमेच्या रक्षणाची जोरात इंग्लंडने सुरू केली. तिकडे सैन्य रसद इत्यादी जलद गतीने पाठवता यावे म्हणून नवीन रेल्वेचे आणि रस्त्यांचे जाळे वाढवण्यास सुरुवात झाली. त्यासाठी साडेपंधरा कोटी रुपये खर्च झाले.

daram
FOR EDUCATIONAL USE

संरक्षणाची खास सोय व्हावी म्हणून साडे चार कोटी रुपये देण्यात आले. चार कोटी रुपये खर्च करून 29,000 नव्या सैनिकांची भरती करण्यात आली 1886-88 मध्ये काही नवीन भूभाग इंग्रजांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखाली आणले गेले. त्यातील भूभाग इंग्रजांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखाली आणले गेले. त्यातील पहिला बळी ठरला उत्तर ब्रह्मदेश. प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आणले गेले. त्यातील पहिला बळी ठरला उत्तर ब्रह्मदेश. प्रत्यक्ष स्वारीचा खर्च 6,30,000 रुपये आला. पुन्हा तेथील लष्करी आणि प्रशासकीय व्यवस्थापनासाठी जवळ जवळ पंधरा कोटी रुपये लागले. इंग्रजांनी बलुचिस्थानासाठी व्यवस्थापनासाठी जवळ जवळ पंधरा कोटी रुपये लागले. इंग्रजांनी बलुचिस्था साठी जे सैन्य उभे केले त्याकरता दरवर्षी पन्नास लाख रुपयांची सोय करावी लागली.

सुप्रिया सुगदरे

द्वितीय वर्ष कला.

Page No. :
Date : / /



शिवराम महादेव परांजपे

जन्म :- जून २७ इ.स १८६४
महाड, महाराष्ट्र
मृत्यु :- सप्टेंबर २७, इ.स १९२९
राष्ट्रीयत्व :- भारतीय
पेशा :- पत्रकारिता, साहित्य

शिवराम महादेव परांजपे (जन्म : महाड २७ जून इ.स १८६४ - २७ सप्टेंबर, इ.स १९२९) हे मराठी पत्रकार, निबंध लेखक होते. तत्कालीन ब्रिटिश भारतातील ब्रिटिश शासनाच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध काळ या मराठी साप्ताहिकातून त्यांनी केलेली टिकात्मक पत्रकारिता मराठी पत्रकारितेच्या इतिहासातील मानदंड समजली जाते.

Page No. :
Date : / /

# अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय |
|---|---|
| १. | जन्म, बालपण आणि शिक्षण |
| २. | ललित आणि अन्य लेखन |
| ३. | महात्मा गांधींचे अनुयायी |
| ४. | मुळशी सत्याग्रह |
| ५. | अज्ञाताकडे प्रयाण |


FOR EDUCATIONAL USE

EXPERIMENT : No. PAGE No. DATE

# जन्म, बालपण आणि शिक्षण

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील देवाचे गोठणे हे शिवराम महादेव परांजपे यांचे मूळ गाव. शिवरामपंतांचे पणजोबा सदाशिवराव नशीब काढण्यासाठी पेशव्यांच्या पुण्यात आले आणि सवाई माधवांच्या सेवेत दाखल झाले. परंतु सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर दुसऱ्या बाजीरावांच्या कारकीर्दीत अपमानच पदरी येऊ लागल्यामुळे चाकरी व पुणे सोडून ते कोकणात परतले आणि कुलाबा जिल्ह्यात महाड येथे स्थायिक झाले. त्यांच्या मुलाचे नाव शिवराम उर्फ बाबा. हे शि.म. परांजपे यांचे बाबा. आजोबाचे नाव नातवाला ठेवण्याची त्यावेळी प्रथा होती. शिवरामबाबा परांजपे यांच्या पत्नीचे म्हणजे शि. म. परांजपे यांच्या आजीचे - नाव सीता. त्यांना तीन मुली व एक मुलगा होता. मुलाचे नाव महादेव. घरी अतिशय गरीबी. अंघोळीचे पाणी मडक्यात तापवावे लागे. शिवराम बाबांनी वैद्यकीय व गायनकला अवगत होती. वैद्यकी व कीर्तने ही त्यांच्या चरितार्थाची साधने. यातून काही फारशी प्राप्ती नसे. रोगी जे स्वसंतोषाने देईल ते घ्यावयाचे या निःस्पृहपणामुळे दारिद्र्य त्यांची पाठ सोडत नव्हते. महाडाच्या पूर्वेस काकरतळे नावाचे एक तळे होते, त्याच्या शेजारी ही जागा होती. जागा मोठी होती, पण दारिद्र्यामुळे एक खोपटवजा चार खणी घर त्या जागेवर उभे करणे शक्य झाले. पाण्यासाठी दारात विहिर खणून ती त्यांनी डोंगरावरून दगड आणून स्वतः बांधून काढली. घर बांधल्यानंतर थोड्याच दिवसात - १८५४ मध्ये शिवरामबाबा चा मृत्यू झाला.

वडील वारले तेव्हा महादेवराव यांचे वय सुमारे वीस होते. त्यांची ताई ही मोठी बहिण वैधव्यामुळे माहेरी परतली होती.

Sundaram

Teacher's sig.:

शाळेत न जाता पोहणे, झाडावर चढणे, पाय नेतील तिथे भटकणे आणि शाळा सुटायच्या वेळी सालसूदपणे घरी परतणे असा त्यांचा कार्यक्रम होता. एकदा तर पुरात पोहताना थकून तो पाण्यातच गटांगळ्या खाऊ लागला. बरोबर आलेल्या शिवा नावाच्या जुन्या गड्याने त्याला त्यातून बाहेर काढले. एकदा फुले काढण्यासाठी अगस्त्याच्या झाडावर चढलेला शिवराम पाय घसरून खाली आला व त्याच्या अंगाची एक संबंध बाजू खरचटून निघाली. पण माराच्या भीतीने तो धोतर पांघरून वेदना व आग सहन करत झोपून राहिला. धाकटी भावंडे व सोबती यांना स्वतःच रचलेल्या गोष्टी नाटकी ढंगाने मोठा आव आणून तो सांगत असे. प्राथमिक व माध्यमिक शाळेतले त्यांचे एक सहाध्यायी व मित्र बाबा पोतदार यांनी आपल्या आठवणीत लिहिले आहे.

त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे शिवरामचे लग्न लवकर म्हणजे वयाच्या अकराव्या वर्षी सन १८७५ च्या वैशाख महिन्यात झाले. गोरेगावच्या गणेशपंत गोखल्यांची मुलगी बयो ही वधू. तिचे वय त्या वेळी सात वर्षांचे होते. सासरी तिचे नाव जानकी असे ठेवण्यात आले.

या वेळी शिवरामचे वय चौदा होते रत्नागिरीच्या सरकारी हायस्कूलच्या इंग्रजी पहिलीमध्ये शिवरामने प्रवेश घेतला. शिवराम व पोतदार प्रथम काही दिवस पंडितांकडे राहिले. पण लवकरच त्यांनी आपला मुक्काम शाळेतच हलवला. ते सकाळी लवकर उठून आपले अंथरूणपांघरूण आवरून वर्गातच एका कोपऱ्यात ठेवून देत आणि खाणावळीत जेवत. दोघेही तालमीत जात आणि दूध पीत. जोर, बैठका, जोडी असा व्यायाम करत हाच क्रम त्यांनी कॉलेजमध्येही चालू ठेवला होता त्यामुळे त्यांची शरीरप्रकृती पुढेही चांगली राहिली.

कॉलेजच्या पहिल्या विद्यार्थीवर्गामध्ये शिवरामपंतांप्रमाणे गो.स. सरदेसाई महादेव हरी मोडक, वि. कृ. गर्दे, वामन मोरेश्वर पोतदार. ह. ना. आपटे यांचाही समावेश होता. ह. ना. आपटे यांनी वयाच्या १४ व्या वर्षीच आगरकरांच्या 'विकारविलसित' संबंधी

Experiment : ______ Date : ______

तिने महादेवराव यांचा संसार दक्षतेने सांभाळला. त्यांचे लग्न इंदूर येथील मालशांच्या यमूशी झाले होते. यमूचे सासरचे नाव पार्वती. महादेवराव यांना गायनकलेचा वारसा वडिलांकडून मिळाला होता. किर्तनासाठी वडिलांमागे उभे राहण्यामुळे तोही वारसा त्यांना लाभला होता. चित्रकला त्यांनी स्वतः हस्तगत केली होती. कीर्तने करून व मातीची चित्रे बनवून सुरुवातीला ते आपला संसार चालवत. सहाजिकच परिस्थिती ओढाताणीची होती.

वकीलीत मिळालेल्या पैशातून महादेवराव यांनी आसपासची जागा व शेती विकत घेतली. वाढता संसार व व्यवसाय यांसाठी त्यांच्या वडिलांनी बांधलेले घर लहान व गैरसोयीचे वाटू लागल्यामुळे १९०७ मध्ये यांनी राहत्या घराच्या दक्षिणेस सुमारे पन्नास हातांवर स्वतःच्या देखरेखीखाली नवीन घर बांधले. जुनी विहिर रुंद करून नव्याने बांधून काढली. घराला मागेपुढे अंगण, पुढील बाजुस सोपा, ओटी, माजघर, स्त्रियांच्या वापरासाठी मागील बाजूस स्वतंत्र वाट असे हे घर पूर्वाभिमुख होते. आलेली कुळे सोप्यावर बसत. तेथेच भाताचे कणगे असत. पडवीत कारकून व पक्षकारांची बसण्याची सोय असे. माजघरात जेवणाची पंगत बसे. अंगणात, फुलझाडे, भाजीपाला, अळू, नारळ अशी बाग होती. महादेवरावांची बैठक ओटीवर असे. ते भल्या पहाटे उठून स्नानसंध्यादि नित्यकर्मे आटोपीत. आपले कपडे धुऊन टाकत. मग अशिलांची कामे पार पाडून, जेवण उरकून कचेरीत जात. त्यांची वकिलीची पद्धत अतिशय व्यवस्थेची, चोख व सचोटीची होती. आपल्या अशिलाच्या विरुद्ध निकाल लागला तर ते त्यांच्याकडून फी घेत नसत. तेवढच काय, घेतलेली फी परत परत करत असत. खोटीनाटी, लफड्याची किंवा लफंगेगिरीची कामे न घेण्याबद्दल त्यांचा लौकिक होता.

शालेय वयात शिवरामला शाळेत जाण्याचा अगदी कंटाळा होता. पाटि दप्तर घेऊन शाळेत जायला म्हणून बाहेर पडावे, पण

दीर्घ लेख लिहिला होता. केवळेच नव्हे तर ते प्रिव्हियसच्या वर्गात असतानाच वयाच्या १९ व्या वर्षी (म्हणजे १८८५ मध्ये) त्यांची मधली स्थिती, ही पहिली सामाजिक कादंबरी प्रसिद्ध झाली. आपटे प्रिव्हियसच्या परिक्षेत अनुत्तीर्ण झाले आणि त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला. (पुढे १९०८ मध्ये पुणे म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत हे जुने काळचे वर्गबंधू केळकरांसमोर उभे ठाकले आणि त्यात शिवरामपंत विजयी झाले.) शिवरामपंत पुढच्या शिक्षणासाठी डेक्कन कॉलेजमध्ये दाखल झाले.

शिवरामपंतांनी विद्यार्थी म्हणून जवळून २३ वर्षे महाड पुणे व रत्नागिरी येथे व्यतीत केली. वयाच्या आठव्या वर्षापासून १४ व्या वर्षापर्यंत (१८७७ पर्यंत महाडाच्या प्राथमिक शाळेत, १४ ते १८ वर्षे (१८७८-७९) रत्नागिरीच्या सरकारी हायस्कूलमध्ये, १८ ते २२ वर्षे न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेजमध्ये आणि पुढची दहा वर्षे डेक्कन कॉलेजमध्ये असा साधारणपणे हिशेब आहे. यापैकी १८८६ ते ९० ही पाच वर्षे बी. ए. साठी आणि १८९१ ते ९५ ही पाच वर्षे एम. ए. साठी लागली. यापैकी काही काळ (१८८९) ते न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक होते आणि १८९१ व ९२ अशी दोन वर्षे ते डेक्कन कॉलेज मध्ये फेलो होते.

FOR EDUCATIONAL USE

# ललित आणि अन्य लेखन

याकाळात राजकरणातील गुंतवणूक कमी झाली तरी शिवरामपंत स्वस्थ बसतील हे शक्यच नव्हते. कारण कामात बदल म्हणजेच विश्रांती अशी त्यांची तऱ्हा होती. त्यांचा विद्याव्यासंग चालूच होता. काळ बंद पडल्यानंतर वासुदेवराव जोशी यांच्या विनंतीवरुन त्यांनी 'चित्रमय जगत'साठी बरेच लेख लिहिले. साहित्य संग्रहाच्या दोन भागात ग्रथित करण्यात आलेले वेदान्त व साहित्यविषयक व संशोधनात्मक लेख याच काळात लिहिले.

एकोणिसाव्या शतकात इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाल्यानंतर गद्य वाङ्मय लेखनास - निबंध, गोष्टी, कादंबरी इत्यादी प्रारंभ झाला. इंग्रजी राजवटीत विविध विषयांवरील पाठ्यपुस्तकांतून गद्य अवतरले. इंग्रजी ग्रंथांची मराठीत भाषांतरे करण्याला दोन हजारापासून पाच हजार रुपयांपर्यंतची बक्षिसे होती.

भाऊ महाराजांच्या 'प्रभाकर' या साप्ताहिकातून हिंदूचे आर्थिक जीवन, जातीभेद, स्त्रीजीवन, राजकारण अशा विषयांवरील हि पत्रे प्रसिद्ध झाली. त्यांच्यानंतर ३५-३६ वर्षांनी आगरकरांनी मांडलेल्या विचारांची बीजे लोकहितवादींच्या समाजाला उद्देशून लिहिलेल्या पत्रांत आढळतात. त्यातील व्यासंग, तळमळ, निर्भयता, स्वतंत्र्य, विचार, प्रसंगी जहरी, कडवट भाषा, नैतिक धाडस या वैशिष्ट्यामुळे मराठीतील गद्यलेखनाला वजन प्राप्त झाले.

**कादंबऱ्या :-** शिवरामपंतांनी फक्त दोनच कादंबऱ्या लिहिल्या, 'विंध्याचल' आणि 'गोविंदाची गोष्ट' ही त्यांची नावे. दोन्ही कादंबऱ्या नियतकालिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाल्यामुळे क्रमशः प्रकाशनाचा परिणाम त्यांच्या रचनेवर दिसतो. 'विंध्यांचल' या कादंबरीतील प्रकरणांना रंग असे अन्वर्थक नाव दिले आहे. १८०७ ते १८१२ या कालात मध्य हिंदुस्थानात ठग लोकांचा अत्यंत सुळसुळाट झाला होता. विंध्याचल कादंबरीचे कथानक या कालात घडते.

FOR EDUCATIONAL USE

Page No.:
Date: / /

**इतिहासविषयक लेखन** :- शिवरामपंतांच्या अनेक पैलूपैकी इतिहासलेखक हाही एक पैलू महत्वाचा असूनही पुरेशा प्रकाशात आलेला नाही. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखणातून मिळालेली स्वदेशाभिमानाची प्रेरणा आणि डेक्कन कॉलेजमध्ये असताना वाचनासाठी उपलब्ध झालेली ग्रंथसंपदा आणि वेळ यामुळे शिवरामपंत इतिहासाच्या अभ्यासाकडेही वळले. इंग्रजांच्या गुलामगिरीविरोधात मराठ्यांच्या स्वतंत्र राज्यस्थापनेचा आणि राज्यविस्ताराचा स्फूर्तिदायक इतिहास, दुःखदायक इतिहास त्यांना खुणावत होता. डेक्कन कॉलेजातील एका प्राध्यापकांच्या व्याख्यानातून त्यांना हे कळले की इंग्रजांनी मराठ्यांच्या इतिहासाचे विकृतिकरण केलेले आहे. तो इतिहास त्याच्या खऱ्या स्वरूपात लोकांपुढे यावा म्हणून त्यांनी इतिहासासंबंधी लेखन केले. त्यातून 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' हे पुस्तक निर्माण झाले. याशिवाय त्यांचे इतिहासविषयक काही लेख 'साहित्यसंग्रह' मध्येही उपलब्ध आहेत.

शिवरामपंतांनी चर्चा केलेली मराठ्यांच्या पराभवाची कारणे पुढीलप्रमाणे

१. **दुर्गुण** :- मराठ्यांचे पराभव इंग्रजांचे शौर्य जास्त होते म्हणून नव्हे. तर मराठ्यांचे अंगी दुर्गुण जास्त होते म्हणून झाले. अंगी शौर्य होते परंतु त्याच्या उपयोग कसा करावयाचा याचे मात्राज्ञान नव्हते. मराठ्यांमध्ये दुफळी होती आणि म्हणून त्यांचे शौर्य विभागले गेले होते.

२. **रामदासांसारख्या मार्गदर्शकाचा अभाव** :- इंग्रजांचे राज्य हळूहळू विस्तार पावत होते. त्या वेळी त्यातून निर्माण होणाऱ्या संकटांकडे मराठ्यांनी जितके लक्ष द्यावयास पाहिजे होते तितके दिले नाही. त्याचप्रमाणे इंग्रजी मिशनरी लोकांचा धर्मप्रसार शांतकारी निरुपद्रवी दिसत होता तरी आपल्या धर्माची मर्यादा ते ओलांडत आहेत याकडे मराठ्यांनी लक्ष दिले नाही. नाना फडणीस मुत्सद्दी होते आणि महादजी शिंदे योद्धे होते आणि त्यांना पुढचे थोडे बहुत दिसु लागले होते तरी रामदासांनी जितक्या दूरवरचे दिसत होते तितक्या दूरवरचे नाना व महादजी यांना दिसले नाही.

Page No. :
Date : / /

३. उच्च ध्येयाचा अभाव :- या काळातील मराठ्यांच्या पुढे कोणत्याही उच्च ध्येय नव्हते. उच्च ध्येय असेल तर लहान मुलेही पराक्रमी होतात आणि स्त्रियांनाही वीरश्री चढते. पण या काळात ज्यासाठी लढावे आणि जिंकावे किंवा मरावे असे काही ध्येय मराठ्यांसमोर नव्हते.

४. नवीन तत्वज्ञानाचा अभाव :- रामदासांचा उपदेश आणि शिवाजीचे शौर्य यांच्यातील सामर्थ्य आता क्षीण झाले होते. त्यांच्या जागी दुसरे कोणतेही नवीन सामर्थ्य निर्माण झाले नव्हते. कोणत्याही देशाच्या इतिहासामध्ये धार्मिक भावना किंवा स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ यामुळे महान कृत्ये घडून येतात. पण या काळात या दोन्ही गोष्टीचा अभाव होता.

५. क्षुद्र वृत्ती :- आपल्या सौंदर्याचा स्वामी आपला पती आहे; त्याचशिवाय अन्य कोणाचाही त्यावर अधिकार नाही हा जसा पतिव्रतेचा पातिव्रत्य धर्मात्याप्रमाणे आपल्या शौर्याचा स्वामी आपला देश आहे, बाजारात त्याची विक्री कोण्यागोण्याला करता कामा नये याचा लोकांना विसर पडला होता. इंग्रजांकडे चाकरीला राहून देशाच्या राज्यांच्या विरुद्ध लढणे म्हणजे नीचपणा, अधमपणा, नमकहरामपणा आणि गुन्हेगारी आहे हे कोणाच्या लक्षात येत नव्हते. त्यातून फितुरीसारखा भयानक रोग उद्भवला. स्वकीयांकडे नोकरी करतानाही आतून इंग्रजांना फितूर होण्यात आपण बुद्धीची करामत दाखवत असे लोकांना वाटू लागले होते.

# महात्मा गांधींचे अनुयायी :

टिळक इंग्लंडमध्ये असताना गांधींनी रौलेट विधेयकाविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ सुरू केली तेव्हा शिवरामपंत परांजपे, गंगाधरराव देशपांडे, डॉ. दी. धों. साठे यांनी त्या चळवळीचे समर्थन केले होते. बा. शि. मुंजे व खापर्डे यांना ती चळवळ मान्य नव्हती. केसरीची भूमिका संदिग्ध होती. थोडक्यात, टिळकांच्या हयातीतच त्यांच्या अनुयायांमध्ये गांधीविषयी मतभेद होऊ लागले होते. (मोरे २००७पृ० ५७२) १९२० नंतर शिवरामपंतांनी महात्माजींचे अनुयायित्व स्वीकारले याचे त्या काळाचे व त्यांच्या चरित्राचे वरवरचे अवलोकन करणाऱ्या अनेकांना आश्चर्य वाटले. त्यांनी वारा पाहून पाठ फिरवली असे काही समकालिनांना वाटले असावे. शिवरामपंतांच्या विचारांतील परिवर्तन त्यांच्याकडे ओझरती नजर टाकणाऱ्यांनाही कळून येई. या बाबतीत डॉ. बा. शि. मुंजे यांची आठवण बोलकी आहे ते लिहितात.

टिळक व गांधी यांच्यात शिवरामपंतांना कोणता अनुबंध जाणवत होता हे एका प्रसंगातून व्यक्त होते. प्रसंग होता चिरोल खटल्याचा निकाल टिळकांच्या विरुद्ध गेल्यानंतर ३० मे १९१८ रोजी टिळकांच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मुंबईत भरलेल्या सभेचा. या सभेच्या अध्यक्षस्थानी गांधी होते. ते म्हणाले, "टिळकांचे व माझे मार्ग वेगळे आहेत ...... न्याय कोर्टाला मी कंटाळून गेल्यामुळे मला असे वाटते की, टिळक हे केवळ सत्याग्रही असते तर काय बहार झाली असती!" या सभेच्या शेवटी शिवरामपंत ~~मेला~~ म्हणाले "टिळक हे सत्याग्रही आहेत म्हणूनच त्यांनी हा खटला विलायतेपर्यंत नेला. सत्याचा आग्रह केल्या केल्यानेच सुरू झाला असे नाही. तर तो फार पुरातन काळापासूनचा आहे." येथे शिवरामपंत 'सत्याग्रह'चा फक्त शब्दार्थ लक्षात घेत होते, सत्याग्रहामागची संपूर्ण जीवनधारणा ते त्या त्यावेळी लक्षात घेत नव्हते. पण ती त्यांच्या लक्षात आली तसे त्याकडे वळले

Page No. :
Date : / /

# मुळशी सत्याग्रह

मुळशीचा सत्याग्रह हा महाराष्ट्रातील राजकरणाचा महत्वाचा अध्याय होता. धरणग्रस्तांच्या चळवळींचा तो प्रारंभ होता. असे ही म्हणता येईल. पण आपल्या दृष्टीने त्यांचे महत्व असे की, शिवरामपंताची लढाऊ वृत्ती आणि बोलल्याप्रमाणे वागण्याची धमक हे दोन्ही गुण या सत्याग्रहातील त्यांच्या सहभागामध्ये दिसून येतात.

आमच्या स्वराज्यात आम्हाला सर्व काही आर्वाचीन काळाच्या सुधारणा पाहिजे आहेत. फक्त त्या आमच्या अमलाखाली असल्या पाहिजेत...... आगगाड्या, तारायंत्रे, पोस्ट ऑफिसेस वगैरे खाती पुष्कळ असून आम्हाला त्यांचा काय उपयोग?.... ती सर्व आमच्या स्वराज्याकरता आम्हा हिंदुस्थानातील लोकांना पाहिजेच आहेत."

हा सत्याग्रह चालू असताना वसई येथे प्रांतिक परिषदेचे अधिवेशन भरले. त्यात सत्याग्रहींचे अभिनंदन आणि दडपशाही करणाऱ्यांचा निषेध करण्यात आला. या सभेला गांधीही उपस्थित होते आणि त्यांनीही आपल्या भाषणात ठरावाला पाठिंबा दिला. या सभेत सरोजिनी नायडू, शंकराचार्य, मावळ्यांपैकी विठू महार व जानू पळसकर यांचीही भाषणे झाली.

मावळ्यांत फूट पाडण्यासाठी सरकारने आणि टाटा कंपनीने नुकसानभरपाईची रक्कम जाहीर केली. आणि ती मावळ्यांनी स्वीकारावी म्हणून त्यांच्यापैकी काही स्त्री-पुरुषांना एजंट म्हणून नेमले. सत्याग्रहा विषयी ब्राम्हणेतर मंडळी काही वेळा उदासीन व काही वेळा विरोधी होती. हा सत्याग्रह ब्रम्हण सावकारांचे हितसंबंध राखण्यासाठी असल्याचे प्रतिपादन सर्व ब्राम्हणेतर वृत्तपत्रे करत होती. टाटा कंपनीने तर आपल्या गाठीतून सत्यशोधक तपासनीस आणि त्यांच्यामार्फत सत्याग्रहाविरुद्ध प्रचार सुरु केला. सत्याग्रहाच्या विरोधकांना छत्रपती शाहू महाराजांची फूस होती.

FOR EDUCATIONAL USE

Page No. :
Date : / /

# अज्ञाताकडे प्रयाण

शिवरामपंतांना दोन मुलगे व एक धाकटी मुलगी. पैकी मुलीचे सासर पुण्यातच होते. जेष्ठ चिरंजीव कृष्णाजीपंत इंग्लंडला बॅरिस्टरीच्या परिक्षेसाठी गेले. परंतु तेथे गेल्यानंतर ५-६ महिन्यानंतर आजारी पडले. हे कळताच शिवरामपंतांनी तार पाठवून त्यांना परत बोलावले. १९२८ च्या नोव्हेंबर महिन्यात घरी सुखरूप परतले. त्यांनी पुन्हा पुण्यातच आपल्या वकिलीला सुरुवात केली त्या वेळी ते ४३ वर्षांचे होते. १९२२ मध्ये ते पुणे शहर म्युनीसीपालीटित राष्ट्रीय पक्षातर्फे निवडून आले होते. 'काळ' वरील खटल्याचे व मुळशी सत्याग्रहाच्या शिक्षेच्या वेळी कृष्णाजीपंतांनी 'स्वराज्य' पत्राचे संपादक म्हणून काम केले. त्यांनी 'शांतादेवी' या नावाची एक कादंबरी व 'पाणिग्रहण' हे नाटक लिहिले होते. परंतु त्यांचे लक्ष वकिलीकडे अधिक होते. वडिलांच्या सार्वजनिक कामाची आर्थिक बाजू त्यांनी सांभाळली. त्यांची मोटर शिवरापंतांच्या दिमतीला सदैव हजर असे. दुसरे चिरंजीव विनायकराव वकील झाल्यानंतर नोकरीसाठी ग्वाल्हेरला गेले व तेथेच स्थायिक झाले.

पुढच्या वर्षी म्हणजे १९३० मध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलन मडगाव येथे भरले. तेथे आदल्या वर्षी बेळगावी भरलेल्या संमेलनाच्या अध्यक्षांची सर्वांना आठवण होणे साहजिक होते. अध्यक्षपदी कादंबरीकर वा. म. जोशी होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिवरामपंतांना पुढील काव्यमय श्रद्धांजली वाहिली (भोगले, बर्वे, १९३६ : १२२):

ती भव्य मूर्ती गेली, रसिकजनमनो-मोहिनी गेलि वाणी,
गेली ती वक्रभाषा, खलनिरतखलां भेदि जी छद्मवाणी ।
गेला तो देशभक्तिप्रचुरमधुवची, स्फूर्ति दे जो जनाला
संजीवी हास्यकर्णा, परमरस कुंजना, 'काळ' कर्ताहि गेला ॥

ऋतिका खरात
द्वितीय वर्ष कला

FOR EDUCATIONAL USE

# लेखक परिचय

जन्म : मे ९, १८६६ कोल्हट, रत्नागिरी जिल्हा, महाराष्ट्र

मृत्यू : फेब्रुवारी १९, १९१५ मुंबई महाराष्ट्र

चळवळ : भारतीय स्वातंत्र्यलढा, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सुधारणा।

संघटना : भारत सेवक समाज, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, डेक्कन एज्युकेशन सोसायटी

प्रभावित : मोहनदास करमगांधी : करमचंद गांधी

नामदार गोपाळ कृष्ण गोखले (मे ९, १८६६- फेब्रुवारी १९, १९१५) हे भारतामधील ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध कायदेशीर राजकारणाच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याचा पाया घालणाऱ्या राजकीय व सामाजिक व नेत्यांपैकी एक होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस भारत सेवक समाज या संघटनांचे ते आघाडीचे नेते होते.

हे भारतामधील ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध कायदेशीर राजकारणाच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याचा पाया घालणाऱ्या राजकीय व सामाजिक नेत्यांपैकी एक होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस भारत सेवक समाज या संघटनांचे ते आघाडीचे नेते होते.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

जागतिक कीर्तीच्या वक्त्यांमध्ये नामदार गोखले यांचे नाव घेतले जाते. डेक्कन सभेची स्थापना व सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटी मातृकुलाची स्थापना त्यांनी केली. आगरकरांनी चालविलेल्या 'सुधारक' या पत्राचा इंग्लिश विभाग गोखले सांभाळत असत.

या वर्गातील आणखी काही लेख

विनोबा भावे
२६ मार्च दिनविशेष
६ मे दिनविशेष
गोपाळ गणेश आगरकर
तीळाचे लाडू
महालक्ष्मी व्रत - पूजेची मांडणी
अंगारकी चतुर्थी
१९ डिसेंबर दिनविशेष
आली मकर संक्रांत
संकल्प सुरक्षित भारताचा

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# प्रकाशकीय

आजच्या आधुनिक महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण करणाऱ्या ६१ लोकाग्रणींच्या, चरित्र आणि कर्तृत्वाची गाथा या चरित्र ग्रंथमालेच्या रूपाने जनताजनार्दनाच्या चरणी सादर करताना मनस्वी समाधान वाटते आहे.

'श्री गंधर्व-वेद प्रकाशना'ची प्रकाशने प्रामुख्याने विद्यार्थी व शिक्षकवर्गाला उपयुक्त ठरतील अशी असतात. संदर्भमूल्य असणारी पुस्तके प्रकाशित करण्याचे वेगळेपण आम्ही सुरुवातीपासूनच शक्यतो जपत आलेलो आहोत. त्यामुळेच, महाराष्ट्र राज्य निर्मितीचा सुवर्ण महोत्सव अभिनव पद्धतीने साजरा करण्यासाठी आगामी पिढ्यांतील विद्यार्थी, शिक्षक तसेच सर्व मराठी भाषक जिज्ञासू वाचकांना उपयुक्त ठरेल असा कोणता मोठा ग्रंथनिर्मिती प्रकल्प आपल्या प्रकाशनातर्फे हाती घ्यावा, याबाबतचे विचारचक्र २००५ पासूनच मनात घोळत होते. त्याच दरम्यान इतिहासाचार्य वि० का० राजवाडे यांचे 'राजवाडे लेखसंग्रह भाग ३- संकीर्ण निबंध' हे पुस्तक वाचताना 'महाराष्ट्रातील बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद' हा निबंध विशेष आवडला (मूळ लेख लोकशिक्षण (सातारा) शके १८३५ इ० स० १९१३, पृ० ३७७ ते ३८४) त्या लेखात वि० का० राजवाडे यांनी महाराष्ट्रातील सार्वकालीन महत्त्वाच्या अशा 'बुद्धिमान, प्रतिभावान व कर्त्या, ८३ व्यक्तींची यादी दिलेली आहे. त्या सर्व व्यक्ती इसवी सन १८१३ ते १९१३ या कालखंडातील म्हणजेच एकोणिसाव्या शतकातील आहेत असे लक्षात आले. याच धर्तीवर, १९१४ ते २००५ या कालखंडातील लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांची गणना करून ती सूची अद्ययावत का बनवू नये, असा विचार मनात चमकून गेला. पटकन आठवणाऱ्या नावांची यादी केली, तेव्हा ८०-९० नावे पुढे आली.

ndaram®
FOR EDUCATIONAL USE

अशी भूमिका टिकेकर यांनी मांडली. मग त्यांच्या सल्ल्याने द. ना. धनागरे आणि प्र. ना. परांजपे यांच्यासमोर वरील कल्पना मांडून त्यांची सहमती मिळवली. तसेच अभय टिळक, विनोद शिरसाठ आणि आ. श्री. केतकर यांना विचारून त्यांचा साहाय्यक संपादक म्हणून प्रकल्पात सहभाग निश्चित केला.

आता ३२ व्यक्तींची निवड करण्यासाठी प्रमुख संपादक, साहाय्यक संपादक व सल्लागार मंडळ (डॉ. ना. नवलगुंदकर, प्र. ल. गावडे व य. दि. फडके, कै. डॉ. अरविंद लेले व कै. गं. ना. जोगळेकर) आणि वाचनामध्ये रुची असणारे आमचे काही विचक्षण ग्रंथप्रेमी सुहृद त्यांची मते आजमावली. त्या वेळी लक्षात आले की, प्रत्येक यादीत २० नावे समान आहेत. त्यामुळे एकोणिसाव्या शिक्कामोर्तब झाले. त्यानंतर संपादक मंडळ, साहाय्यक संपादक आणि सल्लागार यांच्यांशी सविस्तर चर्चा-विचार विनिमय करून आणखी १३ नावे निश्चित केली. या सगळ्यात चरित्रलेखकांची सुरुवातील संकलित ६० ही संख्या ६१ वर गेली.

हाती घेतलेल्या या प्रकल्पाचे आकारमान, हाताशी उपलब्ध असलेला वेळ व मनुष्यबळ आणि मुख्य म्हणजे या प्रकल्पाची वित्तीय बाजू ध्यानात घेता, चरित्र नायकांची संख्या ६१ पेक्षा अधिक न वाढवण्याचा निर्णय घेतल्याने जीवनाच्या काही क्षेत्रांतील लोकोत्तर व्यक्तींचा अंतर्भाव त्यात करता आलेला नाही, याची आम्हांस पूर्ण जाणीव आहे. समाजकारण, इतिहाससंशोधन, समाजसेवा, पत्रकारिता, साहित्य, तत्त्वज्ञान यांसारख्या क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी गाजवलेल्या बुद्धिमान, प्रतिभावान आणि कर्त्या व्यक्ती अनेक होऊन गेल्या याची आम्हांस कल्पना असूनही काही मर्यादा या घालून घ्याव्याच लागल्या, त्याला पर्याय नव्हता.

यादी तर तयार झाली. या यादीतील कित्येक नावे आजच्या पिढ्यांच्या केवळ कानावरूनच गेलेली आहेत, हे त्या यादीवर नजर टाकताच प्रकर्षाने जाणवले. मग, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आपण आपल्या प्रकाशनातर्फे आजच्या महाराष्ट्राचा सर्वांगीण प्रगती-समृद्धीस आकार देणाऱ्या त्याची जडण-घडण करण्यासाठी हयात वेचून काळाच्या पडद्याआड गेलेल्या या लोकोत्तरांच्या जीवन-कर्तृत्वपट ग्रंथरूपाने समाजासमोर मांडलाच पाहिजे, असे प्रकर्षाने वाटून गेले.

अशा किती लोकोत्तरांची जीवनचरित्रे एकाच वेळी (ग्रंथाच्या स्वरूपात) आपण प्रकाशित करू शकतो याचा विचार मग सुरू झाला. आमच्या आर्थिक क्षमतेचा आणि शक्यतेचा विचार केला, तेव्हा ६० चरित्रे आपण प्रकाशित करू शकू, असा विश्वास वाटू लागला. त्या दृष्टीने मग पुन्हा यादीचा विचार सुरू केला. इतिहासाचार्यांनी तयार केलेल्या ६३ व्यक्तींच्या यादीपैकी, ज्या १५ व्यक्तीसंदर्भातील पुरेसे संदर्भ साहित्य, तपशील, लेखनसाधने, संशोधन सामग्री उपलब्ध होणे आजमितीस दुष्कर असल्याचे ध्यानी आले त्या १५ व्यक्तींचा विचार प्रस्तुत प्रकल्पासंदर्भात बाजूला ठेवावा लागला. म्हणजे एकोणिसाव्या शतकातील २८ आणि आमच्या मनात विसाव्या शतकातील जी ८०-९० नावे आली होती, त्यापैकी ३२ नावे निवडायचे ठरवले. ही निवड करण्याचे काम अतिशय अवघड आहे असे लवकरच लक्षात आले.

महाराष्ट्र चरित्र-ग्रंथमाला (ग्रंथ स्वरूपात) करण्याचे आम्ही निश्चित केले, तेव्हा त्यासाठी तितक्याच तोलामोलाच्या संपादकाचा शोध आम्ही सुरू केला होता. पूर्वीपासूनच परिचय असलेल्या अरुण टिकेकर यांना भेटून आमच्या मनातील चरित्र-ग्रंथमाला संदर्भातील कल्पना त्यांच्यासमोर विस्तृत स्वरूपात सहमती दर्शविली. 'मोठ्या प्रकल्पाचे काम करताना संपादक मंडळ असावे.'

FOR EDUCATIONAL USE

एका परीने बघितले तर, या ग्रंथमालेत अंतर्भूत असलेल्या ६१ लोकोत्तर व्यक्तिमत्वांचे चरित्र आणि कर्तृत्व शब्दबद्ध करणारा हा ११ हजार छापील पानांचा दस्तऐवज म्हणजे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा साधंत आलेखच होय. या संपूर्ण प्रकल्पाची कार्यवाही नेटाने, शिस्तीने आणि शुद्ध संशोधकीय पद्धतीने व्हावी यासाठी या प्रकल्पाचे सुकाणू पेलण्याची जबाबदारी अरुण टिकेकर, द० ना० धनागरे आणि प्र० ना० परांजपे यांच्यासारख्या तज्ञ, व्यासंगी अभ्यासकांनी स्वीकारली याचा अतिशय आनंद आहे. या ग्रंथसंच प्रकल्पात समाविष्ट असणाऱ्या ६१ समाजपुरुषांचे व्यक्तित्व, कर्तृत्व आणि चरित्र संशोधकीय शिस्तीने परंतु वाचनीय व सुबोध शैलीत अक्षरबद्ध करणारे व्यासंगी संशोधक लेखकांचा सक्रिय सहभाग लाभणे, ही प्रस्तुत प्रकल्पाची दुसरी मोठी कमाई म्हणावयास हवी. साहाय्यक ही महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला प्रमुख संपादक, प्रकल्पाचे सल्लागार मंडळ, साहित्यक्षेत्रातील जाणकार मित्र आणि सर्वांत महत्वाचा भाग असलेले आमचे सर्व लेखक, चित्रकार रविमुकुल आणि मोहन स्याने, अक्षररचना व मांडणीकार प्रकाश बालकृष्ण ढवळे, मुद्रितशोधन करणारे विजय सरदेशपांडे, संदीप तापकीर, ज्योती टिळक, मुद्रक सचिन कुलकर्णी व बाहणीकर, सुनील गोविलकर, चित्रा भावे आणि आमच्या कार्यालयीन व्यवस्थापिका शालिनी सुमंत यांच्या निरलस सहकार्यामुळेच आज साकार झालेली आहे, हे आवर्जून नमूद केलेच पाहिजे.

या चरित्रग्रंथ प्रकल्पाचे शिवधनुष्य 'श्री गंधर्व-वेद प्रकाशन' या आमच्या संस्थेने का उचलले, असा प्रश्न कोणाच्याही मनात स्वाभाविकच उमटावा. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा सुवर्ण महोत्सव हे तर

FOR EDUCATIONAL USE

एक मुख्य कारण होतेच. परंतु या मोठ्या यशामागे आणखीही एक भूमिका आहे. मराठेशाही अस्तंगत होऊन ब्रिटिश अंमल येथे स्थिरावणे, ही एक अतिशय मूलगामी आणि बहुआयामी प्रक्रिया होती. ते स्थित्यंतर केवळ राजकीय नव्हते. सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक अशी अनेकानेक परिमाणे त्यास होती. सर्वांगीण बदलांच्या वेगवान प्रवाहात जोराने फेकल्या गेलेल्या मराठी समाजाची नव्याने, कालोचित आणि प्रगल्भ पुनर्रचना करण्याचे जबरदस्त आव्हान तत्कालीन समाजातील तितक्याच कर्तृत्ववान व्यक्तींनी पेलले. मराठी समाजमानसाची जडणघडण नव्याने करण्यासाठी त्यांनी आपली आयुष्ये वेचली. खस्ता खाल्ल्या. समाज-बांधणीच्या त्या कामास संस्थात्मक अधिष्ठान लाभावे यासाठी संस्था स्थापन केल्या, वाढवल्या.

आज जागतिकीकरणाच्या वेगवान प्रवाहात लपेटल्या जात असलेल्या विद्यमान पिढ्यांची अवस्था फारशी निराळी नाही. आजचा मराठी समाजही परिवर्तनाच्या नाना-विध लाटांना सामोरा जातो आहे. परंपरेचा धागा पूर्णपणे तुटलेला नसला तरी परंपरा आणि नवता यांचे संतुलन सांभाळताना आपल्या सर्वांचीच तारांबळ उडते आहे. अशा परिस्थितीत, या समाजपुरुषांची जीवनचरित्रे आपण डोळसपणे न्याहाळावी, आपल्यावरील जबाबदारीचे भान त्यातून आपल्याला येऊ शकेल अशी प्रेरणा मनोमानसी निर्माण झालेल्यांसाठी संदर्भ ठेवा म्हणून हा ग्रंथसंच मार्गदर्शक ठरला तर हे शिवधनुष्य उचलण्यामागील ईप्सित पूर्णपणे साध्य झाले, याचे समाधान लाभेल. आजच्या २१ व्या शतकातील प्रगत महाराष्ट्रात नांदणाऱ्या प्रगल्भ पिढीला पूर्वसु-रींच्या कर्तृत्वाचे दर्शन घडवण्या प्रकल्पास आजचा मराठी सजग उचित असा प्रतिसाद देईल याची खात्री आहे

FOR EDUCATIONAL USE

# बालपण

रत्नागिरी जिल्ह्यातील कोतलूक या खेड्यात जन्मलेल्या गोखले यांचे बालपण कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षणही येथेच झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे वडील बंधू गोविंदराव यांनी स्वतः चे शिक्षण सोडून आणि त्यांच्या प्राथमिक शिक्षणही येथेच वहिनींनी स्वतः चे दागिने दागिने विकून केलेल्या त्यागामुळे त्यांचे उच्च शिक्षण कोल्हापूरचे राजाराम कॉलेज व मुंबईचे एलफिन्स्टन कॉलेज येथे होऊ शकले.

FOR EDUCATIONAL USE

## शिक्षण

१८८४ मध्ये बी. ए. (गणित) पदवी घेऊन जानेवारी, १८८५ मध्ये पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी स्वीकारली. पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्यत्व, फर्ग्युसन कॉलेजमध्ये अध्यापन, १८९५ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर फेलो म्हणून नियुक्ती असा प्रवास सुरू असतानाच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून त्यांचा सार्वजनिक जीवनात प्रवेश झाला. सार्वजनिक सभेचे सचिव म्हणूनही त्यांनी काही काळ कार्य केले. शेतकऱ्यांचे कर्ज, दुष्काळ व सावकारांचा त्रास आदी विषयांचा सखोल अभ्यास करून सरकारकडे निवेदने पाठवणे, त्याबाबत पाठपुरावा करणे. अशा महाराष्ट्रातील शेतकऱ्यां-विषयक करण्यात येणाऱ्या कार्यात त्यांनी शिस्त निर्माण केली. त्यामुळे त्यांच्या निवेदनांना सर्वत्र मान्यता मिळाली.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# राजकीय प्रवास

बाळ गंगाधर टिळक आणि त्यांचा राजकीय प्रवास मुख्यत: व्यासपीठावरून सुरु झाला. लोकमान्यांना जहालवादी राजकारण मान्य होते तर गोखलेंनी मवाळवादाचा मार्ग स्विकारला. त्यांनी लोकशिक्षण, अस्पृश्यता, जातीव्यवस्था निर्मूलन, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य यांच्या माध्यमातून समाजकार्य केले. तत्कालीन इंग्रजी शासकांना समजेल अशाप्रकारे त्यांनी समाज सुधारणा मांडल्या आणि त्या मान्य करून घेतल्या.

इ. स. १९०२ साली त्यांची निवड मध्यवर्ती कायदेमंडळावर झाली. या निवडीचा त्यांनी पुरेपूर उपयोग केला आणि विविध समस्यांना तसेच प्रश्नांना वाचा विवश. मिळवून दिली. या दरम्यान त्यांच्यातील क्षमतेची दखल घेऊन तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो ~~क्षमतेची दखल घेऊन~~ यांनी नामदारांना १९०९ सालच्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याचा मसुदा तयार करण्यास सांगितले. त्यासाठी ते इंग्लंड येथे वास्तव्य करत होते. त्या दरम्यान त्यांनी तेथील पार्लमेंटच्या सदस्यांना भेटून भारतातील समस्या आणि प्रश्न त्यांच्या कानी घातले आणि त्याकामी त्यांचा पाठिंबा मिळविण्यात यशस्वी झाले.

इ. स. १८८९ मध्ये काँग्रेसच्या व्यासपीठावर केलेल्या पहिल्या भाषणापासून त्यांच्या काँग्रेसशी संबंध प्रस्थापित झाला. आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते काँग्रेसशी एकनिष्ठ राहिले. काँग्रेसचे ते राष्ट्रीय पातळीवरील नेते म्हणून गणले जात. विशेषत:, ते १९०५ मध्ये बनारस

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. भारताच्या सेवेसाठी तरुण त्यागी, निष्ठावान कार्यकर्ते घडविण्याच्या उद्देशाने १३ जून, १९०५ रोजी त्यांनी भारत सेवक समाजाची (The servants of India socitely) स्थापना केली. मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे सभासदत्व, सन १९०२ पासून मध्ये केंद्रीय कायदेमंडळाचे सभासदत्व अशी अनेक मानाची पदे त्यांनी भूषविली. ते प्रदीर्घ काळ केंद्रीय कायदे मंडळाचे सभासद होते. सभागृहात अर्थसंकल्पाबद्दल भाषणे गाजविणे हा तर त्यांचा हातखंडा होता. ते भारतातील पहिल्या श्रेणीचे अर्थतज्ज्ञ होते.

संपूर्ण आयुष्य राजकारणात राहूनही 'राजकारण' न करता विशुद्ध सार्वजनिक जीवन जगणाऱ्या हा महाराष्ट्राच्या सुपुत्राचे वयाच्या अवघ्या ४९ व्या वर्षी निधन झाले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# गोखले चरित्राचा बोध

भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करणाऱ्या कुणाही अतिशय प्रकर्षाने जाणवते की, गोखले यांच्या रूपात भारताने मुक्त, बलप्रवृत्त, सरळमार्गी व उदारमतवादी लोकनेत्याचे दर्शन घेतले. दुर्दैव म्हणजे सूत्रसमयी गोखले. त्यांनी यांना अपेक्षित यश न मिळाल्याने काहीसे वैफल्य संत्रस्त करत असावे, असे वाटते.

१४ जुलै १८९५ मध्ये सार्वजनिक सभेवरच्या न्यायमूर्ती रानडे यांच्या नेतृत्वाला अंकुश लागला. अर्थात गुरु गोखले यांचे सार्वजनिक सभेतले सदस्यत्व आणि पद कायम राहिले, पण नेतृत्व लोकमान्य टिळकांच्या हातात गेले आणि सामाजिक सुधार-णांबाबतची पूर्वीची भूमिका संपुष्टात येणार हे सुस्पष्ट झाले. तेव्हा सार्वजनिक सभेचे कार्यवाहपद सोडून, द्यावे, गोखले यांच्या मनाने घेतले. मोठ्या विमनस्क अंतकरणाने ७ सप्टेंबर १८९६ या दिवशी गोखले यांनी दादाभाई नवरोजी यांना एक पत्र लिहिले. त्या पत्रामध्ये सार्वजनिक सभेच्या कारभारातून न्यायमूर्तींचे आणि सामाजिक सुधारणेचे आलेले निष्कासन त्याविषयी विषाद तर होताच, पण एक निष्कर्षिप अश्रुसुद्धा व्यक्त झाले होते, गोखले यांनी पत्रामध्ये "चांगले व लोकोपयोगी कार्य सुरू होण्याचा अवकाश, त्या कामावर पाणी फिरव-ण्यासाठी तेरेबाळे सुरू होतात. आणि आत्मनाश होतो."

दिपाली पाटील
द्वितीय वर्ष कला



Sundaram©

# अणुक्रमाणिका

| Sr. No. | Topic |
|---|---|
| 1) | पांडुरंग महादेव बापट. |
| 2) | बापट यांचा जन्म व विचार. |
| 3) | सेनापती बापट यांची कार्ये. |
| | |

# पांडुरंग महादेव बापट.

१२ नोव्हेंबर १८८० रोजी पांडुरंग महादेव बापट यांचा जन्म 'चित्पावन' किंवा 'कोकणस्थ' म्हणून समजल्या जाणाऱ्या ब्राम्हण कुटुंबात मुंबई प्रांतातील अहमदनगर जिल्ह्यामध्ये पारनेर येथे झाला. इतर अनेक चित्पावन कुटुंबांप्रमाणे बापट कुटुंबही पेशव्यांच्या भरभराटीच्या काळात स्थलांतर करून पश्चिम महाराष्ट्रात आले. पेशवे ब्राम्हणांमधील चित्पावन या पोट-जातीपैकीच होते. पांडुरंग हे त्यांच्या पालकांचे चौथे अपत्य होते. बापट कुटुंब निम्न मध्यम वर्गातील होते आणि त्या कुटुंबातील लोकाना दारिद्रयाला तोंड द्यावे लागत आणि खूप कष्ट करावे लागत होते. अभ्यासाकडे त्यांचे लक्ष फारसे नव्हते ते जास्त खेळण्यातच मग्न असायचे. एकदा आपल्या आपल्या भावांबरोबर खेळताना पांडुरंग एका डबक्यात पडले, तिघांपैकी कोणालाच पोहायला येत नव्हते. आणि जवळपास कोणीही नव्हते यामुळे त्यांच्या मोठ्या भावाने पांडुरंगाची लांब केसांची शेपटी धरून त्यांना डबक्यातून ओढून बाहेर काढले ज्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

शालेय वयातील पांडुरंग अभ्यासू व कठोर परिश्रम करणारे नसले, तरी पारनेरच्या प्राथमिक शाळेमधील शिक्षकांवर त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने व तीक्ष्ण स्मरणशक्तीने प्रभाव पाडला होता. पांडुरंग पुण्यातील 'न्यू इंग्लिश स्कूल' या प्रसिद्ध शाळेत शिकत होते. बापट यांनी आपला पुण्यातील 'न्यु इंग्लिश स्कूलमधला' काळ मजेत घालवला. त्यांनी अनेक वक्तृत्व स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळवली. शालेय परीक्षांमध्येही चांगल्याप्रकारे यश मिळवले. त्यांचा स्वभाव 'मनमिळावू' असल्याने

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

मुळे त्यांचे मित्रही बरेच होते. न्यायमूर्ती 'महादेव गोविंद रानडे' यांचा मवाळ पक्ष आणि 'बाळ गंगाधर टिळक' यांच्या नेतृत्वाखालील जहाल पक्ष यांच्या संघर्षाने बापट प्रभावित झाले होते. वयाच्या सतराव्या वर्षीच बापट यांचा विवाह 'यमुना मोरेश्वर भावे' या नऊ वर्षांच्या मुलीशी झाला. लग्नानंतर त्यांचे नाव रुक्मिणी ठेवले.

जानेवारी १९०० मध्ये बापट पुण्यामधील डेक्कन कॉलजमध्ये दाखल झाले. डेक्कन कॉलेज शहरापासून दूर होते. कॉलेजचा परिसर रम्य होता. दुर्मीळ संस्कृत हस्तलिखितांनी समृद्ध असलेले ग्रंथालय तेथे होते. व प्रशस्त वसतिगृह होते. हिंदुस्थानातील व युरोपातील विद्वान दोघांचाही कॉलेजच्या प्रोफेसरांमध्ये समावेश होता. कॉलेजच्या रजिस्टरवर फक्त १९३ विद्यार्थी होते. बापट यांचे चार वर्षांचे कॉलेजातील वास्तव्य त्यांच्या जीवनाला वेगळे वळण देणारे ठरले. याच कॉलेजमध्ये त्यांना विष्णू सीताराम रणदिवे व महादेव रणदिवे हे दोघे रणदिवे बंधू आणि वासुदेव विठ्ठल दास्ताने भेटले. या तिघांनाही ते गुरुस्थानी मानत होते. बापट कधीच पुस्तकातील किडा बनून राहिले नाहीत. त्यांना क्रिकेट, फुटबॉल आणि टेनिससारखे मैदानी खेळ आवडत असत. त्यांना मुळा नदीत नौकानयन करण्याचीही आवड होती. बापट कठोर व शिस्तपालन करणारे असल्यामुळे त्यांनी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी आखून दिलेल्या नियमांचे कधीच उल्लंघन केले नाही. इंग्रज मठ्ठ आहेत असे ते म्हणत असत. हिंदुस्थानच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ते स्तुती करत असत आणि शिवाजीसारख्या हिंदुस्थानातील नेत्यांबद्दल त्यांना आदर वाटत असे.

* बापट यांचे कार्य :-

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांनी हिंसेचा अवलंब करून ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्याचे शौर्याचे, पण अयशस्वी प्रयत्न केले. परकीय राज्यकर्ते अशा क्रांतिकारकांचा 'दहशतवादी' असा उल्लेख करत असत. 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस' ने शांततापूर्ण व अहिंसक मार्ग निवडला होता. याउलट सशस्त्र लढा केल्याशिवाय हिंदुस्थानला स्वातंत्र्य पुन्हा मिळवता येणार नाही, अशी क्रांतिकारकांची श्रद्धा होती. अशा लढ्यासाठी महाराष्ट्र, बंगाल व पंजाब नेहमीच आघाडीवर असत, तथापि अशा लढ्यासाठी महाराष्ट्रात पहिला धाडसी प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात हाती घेण्यात आला.

१८९४च्या सप्टेंबरमध्ये गणेशोत्सवात हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील तणावामुळे जातीय दंगल उसळली. बापट यांना दारूवाला पुलाजवळ मेळ्याच्या पथकावर हल्ला झाल्याची बातमी समजली, तेव्हा त्यांना घरी स्वस्थ बसवले नाही. बापट यांनी दंगलग्रस्थ भागामध्ये रात्र घालवणे पसंत केले.

पुण्याच्या डेक्कन कॉलेजात शिकत असताना एक महत्वाची घटना घडली. दामोदरपंत चापेकरांच्या नेतृत्वाखालील क्रांतिकार-कांच्या गटाचे सदस्य दामोदर बळवंत भिडे यांच्या संपर्कात बापट आले. १९०२ मध्ये भिडे यांनी महादेवराव रणदिवे व वासुदेव दास्ताने या मित्रांच्या उपस्थितीत बापट यांना क्रांतिकार्याची दीक्षा दिली. या कर्मकांडाचा एक प्रारंभीचा भाग म्हणून बापट यांना नंग्या तलवारीवर तळहात ठेवून 'मातृभूमी स्वतंत्र करण्याची सारे आयुष्य अर्पण करीन', या शपथेचा पुनरुच्चार करायला सांगितले. या दीक्षा समारंभानंतर बापट यांनी भिडे यांचा गंगाधर टिळक यांचा समावेश आपल्या गुरुंमध्ये केला. १९०३ मध्ये बी. ए. ची परिक्षा विशेष सन्मानाने उत्तीर्ण झाल्यावर

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

लगेच त्यांनी मुंबईतील 'आर्यन एज्युकेशन सोसायटी'च्या शाळेमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. आर्यन शाळेत नोकरी करत असताना त्यांनी तिथल्या काही विद्यार्थ्यांना क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळीमध्ये सामील करून घेतले. बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाच्या वेळी त्यांचे एक सहाध्यायी प्री. ग. गो पेंडसे त्यांना भेटले. आपल्या या मित्राच्या सांगण्यावरून त्यांनी हिंदी पदवीधरांना दिल्या जाणाऱ्या 'मंगळदास नथुभाई' शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. हिंदु शिक्षण निधीने बापट यांना प्रवासखर्चासाठी १२०० रुपयांचे अनुदान दिले. स्कॉटलंडमधील एडिंबर्ग येथे मेकॅनिकल इंजिनियरिंगचे शिक्षण घेण्याच्या त्यांनी निश्चय केला व १९ जुलै १९०१ रोजी ते बोटीने इंग्लंडकडे निघाले.

बापट हे ५ ऑगस्ट १९०४ रोजी लंडनला पोहोचले आणि तातडतोब एडिंबर्गमधील हेरियट- वॅट महाविद्यालयात दाखल झाले. तिथे त्यांनी 'किंग्स रायफल क्लब' मध्ये नाव नोंदवले आणि नेमबाजीचे रितसर शिक्षण घेतले. ब्रिटिश राजकीय नेत्यांच्या बैठकीत ते उपस्थित राहात असत. 'स्वराज्याशी अभिलाषा' हा प्रत्येक सुशिक्षित भारतीयाच्या मनाच्या अविभाज्य भाग झाला आहे. इंडियन काँग्रेसच्या सदस्यांचे वर्णन बापट यांनी 'मवाळ अर्जविनंत्या करणारे' असे केले होते. यथावकाश होमरूलच्या स्वीकार हिंदुस्थानची नॅशनल असेंब्ली करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हिंदुस्थानातील ब्रिटिशांची राजवट सर्वात वाईट आहे; तसेच हिंदुस्थानातील लोकांसाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांसाठी आणि संपूर्ण मानव वंशासाठी हे वातावरण घातक आहे. बापट यांच्या पहिल्याच जाहीर यशस्वी निबंध-वाचनाबद्दल त्यांच्या एक इंग्रज प्रोफेसरांनी त्यांचे अभिनंदन केले. बापट यांच्या भाषणाच्या मुद्रित प्रती हिंदुस्थानात पाठवल्या गेल्या.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

डिसेंबर १९०६ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या पूर्वसंध्येला बापट यांनी आपल्या 'व्हॉट शल अवर काँग्रेस डू?' हे शीर्षक असलेल्या लेखाच्या मुद्रणप्रती पाठवल्या होत्या. काँग्रेसच्या अधिवेशनासाठी जमलेल्या प्रतिनीधींमध्ये त्या वाटण्यात आल्या. बापट यांचा हा लेख बंगालमधील तरूण क्रांतिकारकांना आवडला. 'वंदे मातरम्'चे संपादक अरविंद घोष यांनी बापट यांना ब्रिटनमधील घडामोडींचा वृत्तांत पाठवण्याची विनंती केली.

बापट यांच्यासारख्या तरूण क्रांतिकारकांनी अन्य मार्गांचा वापर करण्याचा आधीच निश्चय केला होता. "२००८ सालचा भारत" या विषयावर निबंध वाचण्यासाठी बापट यांना निमंत्रण देण्यात आले होते. आपल्या वतीने आपल्या एखादया मित्राने तो निबंध वाचून दाखवावा, अशी बापट यांची इच्छा होती. पण तसे होऊ शकले नाही. या निबंधात बापट यांनी आपले हिंसेचे तत्वज्ञान स्पष्ट केले आणि न्यायाची हमी देण्यासाठी हिंसेचा अवलंब समर्थनीय असल्याचे म्हटले होते. आपला विचार श्रोत्यांसमोर मांडत असताना त्यांनी अचानक खिशातून रिव्हॉल्वर काढून ते टेबलवर ठेवले. त्यांच्या या कृतीने सभेमध्ये खळबळ उडाली. सभेच्या अध्यक्षांनी रागावून ते रिव्हॉल्वर उचलले. बापटांच्या खळबळजनक भाषणाबद्दल श्रोत्यांमध्ये असलेल्या तीन रशियन तरूणींनी बापट यांचे अभिनंदन केले.

बापट २६ मार्च १९०८ रोजी मुंबईला परतले. लंडनहून येताना त्यांनी कोटामध्ये दोन रिव्हॉल्वर्स लपवून आणली होती. तसेच त्यांच्या ट्रंकेमध्ये बॉम्ब पोथीच्या काही छापील प्रती होत्या. अप्पासाहेब व भाईसाहेब हे दोघे रणदिवे बंधू बापट यांना मुंबईत भेटले. त्या दोघांच्या मदतीने बापट यांनी बॉम्ब पोथीच्या प्रती आणि दोन रिव्हॉल्वर्स रणदिवे बंधूंचे चुलते काशीनाथ आत्माराम रणदिवे यांचे शीवला स्वतःच्या मालकीचे घर होते तेथे सुरक्षित ठेवल्या. मुंबईमध्ये एक आठवडा घालवल्यानंतर बापट यांनी हेमचंद्र दास यांना भेटण्यासाठी कलकत्त्याला जायचे ठरवले. कलकत्त्याला जाताना वाटेत ते धुळ्याला थांबले.

जून १९०९ मध्ये बापट बोटिया सोडून त्यांचे मित्र केशवराव देवळालीकर यांच्याकडे बडवाणीस राहू लागले. तेथे एका छापखान्यामध्ये त्यांनी कंपोझिटरची नोकरी धरली. देवळालीकर यांनी सीताबाई नावाच्या एका विधवेशी विवाह केला होता.

* बापट यांचे पारनेर आणि पुणे येथील कार्य.

बापट मार्च १९१३ मध्ये पारनेरला परतले व दोन वर्षे आईवडील व पत्नी यांच्यासोबत राहिले. सय्यद नावाच्या एका साध्या वेषातील पोलिसाला बापट यांच्यावर नजर ठेवण्याचे काम मुंबई सरकारने दिले होते. त्याला अहमदनगर जिल्ह्याच्या कलेक्टरकडे बापट रोज काय करतात, त्याचा अहवाल पाठवावा लागत. डेक्कन कॉलेजात शिकत असताना बापट अज्ञेयवादी होते. १९११ मध्ये जेव्हा त्यांनी 'ॲट द फीट ऑफ मास्टर' हे पुस्तक वाचले, तेव्हा धर्म आणि ईश्वराबद्दलच्या आपल्या कल्पना तपासून बघण्यास त्यांनी सुरुवात केली. पारनेरला परतल्यानंतर त्यांनी उपनिषदाच्या आणि शंकराचार्यांच्या ग्रंथांचा ~~व~~ अभ्यास केला. अनेक वेळा ते 'भगवद्गीता' वाचत असत. त्यांनी 'बायबल' व 'कुराण' काळजीपुर्वक वाचले. स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ आणि अरविंद घोष यांचे साहित्य वाचले. त्यांनी ज्ञानेश्वर, रामदास व तुकाराम यांच्यासह मध्ययुगीन मराठी संतकवींच्या साहित्याचेही परिशीलन केले.

पारनेरला असताना बापट यांनी झाडूच्या तत्वज्ञानाची शिकवण देण्यास सुरुवात केली. दिवसाचे बरेच तास ते रस्ते व शौचालये साफ करण्यात घालवत असत. तथाकथित अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊनही ते सफाईचे काम करत असत. गांधीजींनी सफाईचा कार्यक्रम हाती घेण्याच्या कितीतरी वर्षे आधी बापट यांनी हे काम सुरु केले होते. आपल्या मुलाचे हे काम बापट यांच्या आईवडीलांना अजिबात आवडत नव्हते, परंतु बापट हे काम म्हणजे परमेश्वराची सेवा आहे म्हणतात.

माई सपर्णांनी पारनेरमधील बापट यांच्या दिनचर्येचे वर्णन केले आहे. पहाटे लवकर, चारलाच उठून ते जवळजवळ सगळा गाव स्वच्छ करायचे, नंतर घरी येऊन स्नान झाले की, कोपऱ्यातल्या खोलीत ते लिहीत बसायचे. या काळात बापट यांचे बरेच काव्य लिहून झाले. दुपारी जेवण झाल्यावर थोडी विश्रांती घेऊन, पुन्हा लेखनास बसायचे ते ५-५.३० पर्यंत. नंतर ते व सौ. मामी बाजारातील चौकात जात. तेथे दगडावर उभे राहून ते दोघे ज्ञानेश्वरीवर प्रवचने करत. संध्याकाळी घरी येऊन जेवण व्हायचे, नाकडतोळ अंगात कोट चढवून वेशीबाहेरील राजवाड्यामध्ये मुलांना शिकवायला निघत.

१९१३ च्या ऑगस्टपासून त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांना शिकवायला सुरुवात केली. बापट यांनी त्या मुलांना पुस्तके दिली व वाचायला आणि लिहायला शिकवले. एक ब्राम्हण नियमितपणे अस्पृश्यांच्या वस्तीला भेट देतो आणि त्यांच्या मुलांना शाळेत पाठवण्यासाठी त्यांची मनधरणी करतो, या सगळ्या गोष्टी पारनेरसारख्या छोट्या शहरातील लोकांना धक्का देणाऱ्या होत्या. बापट यांच्या या कार्यामुळे उच्चवर्णीय हिंदूमध्ये ते अप्रिय होतील, हे चाणाक्ष कलेक्टरने ओळखले होते.

पहिल्या महायुद्धाची सुरुवात आणि लोकमान्य टिळक यांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका यामुळे देशातील राजकीय परिस्थितीचे चित्र बदलत होते. जेव्हा अण्णासाहेब दास्ताने यांनी लोकमान्य टिळक यांची भेट घेतली, तेव्हा बापट यांनी पुण्याला येऊन वासुकाका जोशी यांच्या मालकीच्या चित्रशाळेत काही काळ काम करावे, असे टिळक यांनी सुचवले. बापट पुण्याला आले व एप्रिल ते जुलै १९१५, हे चार महिने चित्रशाळेसाठी त्यांनी काम केले. ऑगस्ट १९१५ पासून 'मराठा' वृत्तपत्रात ते सहसंपादक म्हणून काम करू लागले. 'केसरी' व 'मराठा' या दोन्ही

वृत्तपत्रांचे मालक टिळक असले आणि त्यावर त्यांचेच नियंत्रण असले, तरी न. चिं. केळकर 'केसरी'चे संपादक होते आणि ते 'केसरी'चेच काम मुख्यत: पाहत असत.

१८ मार्च १९१८ रोजी बापट यांनी टिळक यांना एक पत्र लिहिले. आपण आपल्या विम्याच्या दोन हजार रुपयांच्या पॉलिसी सिक्युरिटी म्हणून टिळक यांना स्वेच्छेने देण्यास तयार आहोत, असे त्या पत्राद्वारे त्यांनी टिळक यांना कळवले.

मराठी ज्ञानकोशाच्या कामाच्या संदर्भात बापट यांना अनेक वेळा मुंबईला जावे लागत असे. त्यांच्या पत्नीची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत चालली होती. डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला होता. त्यामुळे रुक्मिणीबाई नांदगावला सब-रजिस्ट्रार असलेल्या आपल्या भावाकडे - कृष्णराव भावे यांच्याकडे गेल्या. बापट यांनी आपल्या पत्नीला व पाच वर्षांच्या मुलाला - वामनला - पाठवलेली पत्रे उपलब्ध आहेत.

बापट जवळजवळ सात वर्षे सिंधमधील हैदराबादच्या तुरुंगात होते. सिंध प्रांत पूर्वी मुंबई इलाख्याचाच एक भाग होता. या तुरुंगवासाच्या काळात त्यांनी 'होली सॉंग' लिहिले. होली सॉंगच्या प्रारंभी बापट यांनी लिहिले:-

माझ्या प्रिय बाळांनो, माझे पवित्र गाणे तुम्हाला आवडो किंवा न आवडो मी प्रयत्नांची शिकस्त करीन आणि बाकी सगळे परमेश्वरावर सोपवून मी ते नक्षत्र गाईन. माझ्याजवळील मशाला मदतीशिवाय पाहणे अशक्य होईल.

१९१३ मध्ये त्यांनी दलितांच्या वस्तीतच बापट यांनी दलितांना साक्षर करण्याचे काम केले होते. त्यानंतर जेव्हा जेव्हा ते पारनेरला जात, तेव्हा तेव्हा या वस्तीत जाऊन तेथील माणसांची विचारपूस करत. त्यांच्या अडीअडचणींच्या वेळी त्यांना धीर देत. १९५२ च्या दुष्काळात त्यांना पहाटे बादल्या भरून पाणी मिळवून देत असत.

तुरुंगात जाण्यासाठी नेहमीच तयारी ठेवलेल्या बापट यांनी पकडवॉरंट घेऊन हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना काहीना काही कारण सांगून कधीच तिष्ठत ठेवले नाही.

वाढत्या वृद्धापकाळानुसार सेनापतींचे शरीर दुर्बळ होत चालले होते, परंतु त्यांची झुंजार वृत्ती तीळभरही कमी झाली नव्हती. १२ नोव्हेंबर १९६७ हा सेनापतींचा ८७ वा वाढदिवस. त्याच दिवशी कार्तिकी एकादशी होती. तारीख व तिथी एकाच दिवशी येण्याचा योग जमून आला होता. या निमित्ताने बापट यांच्या समग्र वाङ्मयाच्या प्रकाशन समारंभ करण्यात आला. २५ नोव्हेंबर रोजी तात्या सकाळी न्हाणीघरात पडले. त्यांच्या मांडीचे हाड मोडले. त्यांना डॉक्टरांकडे नेण्यात आले. हाडावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते, पण अन्य तपासण्या करताना सेनापतींना सौम्यसा हृदयविकाराचा झटका येऊन गेल्याचे डॉ. बावडेकर यांना आढळ्यामुळे, शस्त्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला. २८ नोव्हेंबर १९६७ रोजी बापट यांचे निधन झाले.

यापूर्वी अनेक वेळा त्यांनी न्याय आणि स्वातंत्र्य यासाठी आपले आयुष्य पणाला लावले होते. इस्पितळात अंथरुणावर येणारे मरण त्यांना नको होते. उदात्त हेतूसाठी लढताना मरणाला कवटाळण्याची त्यांची इच्छा होती, पण ती इच्छा मात्र अपुरीच राहिली.

श्रद्धा सातपुते
द्वितीय वर्ष कला

# व्यक्ती आणि परिवार

## असे बालपण, अशी आठवण

एका मध्यमवर्गीय ब्राम्हण कुटुंबांच्या वाट्याला येणारे, आर्थिक दारिद्र्याने गांजलेले जीवन कोकणातील केळकर परिवाराचे होते; पण सुसंस्कारित परिवार स्वकष्टावर आपला भाग्योदय घडवून आणतो. त्यासाठी देशाटन करतो. मिळेल ती नोकरी पत्करून अथक परिश्रम करतो. तात्यासाहेब केळकर यांच्या वडीलांनी तेच केले. तत्कालीन रत्नागिरी (आताच्या सिंधुदुर्ग) जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील वानिवडे येथून गावाचे चिंतामणी केळकर (इ.स. १८४० - १९०७) हे अर्थार्जनासाठी वानिवडे येथून देशावर मिरज येथे गेले. तेथे त्यांना मिरज संस्थानाधिपती श्रीमान बाळासाहेब पटवर्धन यांच्याकडे कारकुनाची नोकरी मिळाली. प्रामाणिकपणे आणि मनःपुर्वक केलेल्या कष्टाच्या बळावर त्यांना बढती मिळाली. पंढरपूर तालुक्यातील मोडलिंब गावी मामलेदार म्हणून बदली झाली. त्याच काळात २४ ऑगस्ट १८७२ रोजी त्यांच्या तिसऱ्या मुलाचा, म्हणजेच नरसिंह चिंतामण केळकर यांचा जन्म झाला.

वडिल चिंतामण केळकर उर्फ दादा हे सेवानिवृत्तीनंतर सातारा येथे स्थायिक झाले. ते रामभक्त होते आणि गोंदवलेकर महाराज यांचे उपासक होते. ते 'ज्ञानेश्वरी'चे नित्यनेमाने वाचन करित असत. त्यांच्या पत्नी यशोदाबाई या माहेरच्या वानिवड्यातील भिडे यांच्याकडच्या. त्या अतिशय कष्टाळू, घरातील सर्व कामे स्वतः करणाऱ्या, प्रेमळ आणि दीर्घायुषी होत्या. त्या अखेरपर्यंत पुण्यात तात्यासाहेबांकडेच राहत होत्या. त्यांचे हृद्य चित्र तात्यासाहेबांनी 'गतगोष्टी' मध्ये (पृ० ७०-७३) शब्दांकित केले आहे. तात्यासाहेबांची कर्तबगारी आणि मानसन्मान पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले. मुलाच्या विविध सत्कार प्रसंगी मिळालेल्या हारांच्या फुलांच्या ढिगारा

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

स्वतःच्या हाताने बाजूस करून तो सारा पसारा आवरल्याने त्यांना धन्यता वाटे!

## वारसा कोकणाचा, घडण कृष्णाकाठची

अशी ही थावंडे लहानपणी काही काळ मिरजेत एकत्र नांदली, खेळली, बागडली; पण लवकरच शिक्षणाच्या निमित्ताने विखुरली. खस्ता खात शिकली, नोकरीला लागली. त्यांचे परस्परांतील प्रेम मात्र कधी ओसरले नाही. उलट, शिक्षणात व नोकरीत परस्परानुकूल भूमिका घेऊनच ती वावरली. आई-वडीलांचे प्रेमळ ममत्व त्यांना लाभले. केळकर यांचा मूळ परिवार जरी कोकणातील असला, तरी या मुलांचे बालपण बहुतांशी देशावर, कृष्णाकाठी मिरज संस्थानात गेले. बेताच्या आर्थिक परिस्थितीत आणि बाळबोधी वळणाच्या संस्कारात ते वाढले. पितृभूमिचा वारसा जरी कोकणचा असला, तरी त्यांची जडणघडण मात्र कृष्णाकाठी झाली. मोठेपणी तात्यासाहेब केळकर अवघ्या महाराष्ट्रात ख्यातकीर्त झाले. दिल्लीच्या राजकारणात पोहोचले; पण कोकणभूमीला मात्र ते विसरले नाहीत.

आपल्या मातीची ओढ किती भावपूर्ण होती, याचे सविस्तर विवेचन त्यांनी 'गतगोष्टी' मध्ये (पृ० ३४-४०) केलेले आहे.

जन्मभूमी जरी सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंब ही असली तरी 'पितृभूमी' वानिवड्याचा त्यांना सार्थ अभिमान होता. 'कोकणची विलायत' तसा आपल्यालाही कोकणाचा आणि तेथील रम्य निसर्गसंपन्नतेचा अभिमान वाटतो. असेच जणू त्यांनी सुचवले आहे. इस्टेटीच्या संबंधात अशी ओढ वाटण्याचा संभवच नव्हता. उलट, स्वकमाईतील पैसाच त्यांनी वानिवड्याच्या घरासाठी खर्च केला होता.

अशी ही तात्यासाहेब यांची पितृभूमीची ओढ बांधले गेले.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

## पदवी मिळाली आणि पगडीही आली।

तात्यासाहेब केळकर यांचे प्राथमिक आणि हायस्कूलचे शिक्षण मिरजेत झाले. वयाच्या आठव्या वर्षी (१८८०) मुंज झाल्यावर ते १८८२ मध्ये इंग्रजी दुसरी आणि १८८८ मध्ये मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाली. गणित आणि व्याकरणासारख्या विषयांत त्यांना विशेष स्वारस्य नव्हते; पण संस्कृत, इंग्लिश भाषा या विषयात त्यांना उत्तम गती होती. त्यांचे शिक्षक आणि ख्यातनाम इतिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे यांच्याकडून त्यांनी अनेकदा शाबासकी मिळवली होती. खरेशास्त्री यांचा इतिहास व्यासंगाचा वारसा केळकर यांनी आपल्यापरीने जोपासला होता. 'मराठे व इंग्रज' या ग्रंथास गुरुवर्यांची प्रशंसापर प्रस्तावना मिळाली आणि त्यांचे गाजलेले नाटक 'तोतयाचे बंड' याबद्दलही खरेशास्त्री यांनी अनुकूल अभिप्राय दिला होता.

मॅट्रिकमध्ये शिकत असतानाच तात्यासाहेबांचे लग्न १८८७ मध्ये झाले. त्यांच्या पत्नी दुर्गाताई या माहेरच्या पेंडसे. दोन्ही घरे शेजारी असल्याने बालपणापासून एकत्र वाढलेले, खेळलेले. आपल्या सासऱ्यांनी त्यांचा जावई लहानपणीच कसा निश्चित करून ठेवला होता, याची हकिकत 'गतगोष्टी' मध्ये तात्यासाहेब यांनी सविस्तर सांगितली आहे. 'माझ्या सर्व जन्म म्हटले तर वरून दोन्ही घराच्या एकोप्याचा नेमका परिचय होतो.

## वाटचाल विद्यार्जनाची.

तात्यासाहेब यांचा हा मोकळेपणाचा सद्गुण त्यांना उभ्या आयुष्यात लाभदायक ठरला. त्यांनी स्वतःला स्वतः पासून कधीच लपवून ठेवले नाहीत. स्वतःला बरोबर ठरवले नाही आणि वडीलधाऱ्यांचा कधी अवमानही केला नाही. १८९१ मध्ये बी.ए.ची पदवी मिळवल्यावर

undaram®

घरच्यांशी सल्लामसलत करून वडीलभाऊ नाना यांच्या सूचनेनुसार एल.एल.बी चा अभ्यास करण्याकरता ते मुंबईला गेले. समानधर्मी मित्रांच्या गोतावळ्यात एकोप्याने राहिले. वाङ्मयादी उपक्रमात सहभागी झाले. वाङ्मयाचा व्यासंग वाढवला. वाचनलेखनाची हौस भागवून घेतली. चर्चावादविवाद रंगले. राजकिय-सामाजिक घडामोडी-बाबत अभिप्राय देऊ लागले. वृत्तपत्रामधून लिहू लागले. त्या काळात लोकमान्य टिळक आणि आगरकर यांच्यातील वाद विकोपास गेला होता. वृत्तपत्रांमधून परस्परांवर शिवराळ भाषेत आगपाखड चालू होती. विद्यार्थीदशेतील केळकर यांना त्या दोन थोर सत्पुरुषांनी खालच्या पातळीवर येऊन असे जाहीर वाग्युद्ध खेळावे, हे रुचले नाही. त्यांनी सुस्पष्ट भाषेत पण आदरपूर्वक एक सविस्तर पत्र 'ज्ञानप्रकाश'च्या (१८९२) अंकात लिहिले. केळकर यांची त्या वयातील सामाजिक समजउमज आणि त्यांची एकंदर प्रगल्भता जाणून घेण्याच्या दृष्टीने ते फार मोलाचे आहे. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणीनुसार भावी काळातील एका विख्यात पत्रकाराच्या पाऊलखुणा त्या पत्रामध्ये आढळतात.

विद्वत्ता आणि प्रतिष्ठा ही पुणेरी पगडीची त्या काळात लक्षणे होते. पुढील आयुष्यात तात्यासाहेब यांनी ती कटाक्षाने सांभाळली; नव्हे, पगडीची प्रतिष्ठा वाढवली!

मूळ कोकणातील केळकर परिवाराच्या नरसिंह चिंतामण यांनी विद्याव्यासंगाची वाटचाल सफलतेने पूर्ण केली. ते मिरजेत लहानाचे मोठे झाले, शिकले आणि सातारयात वकिली करू लागले. मोठ्या समाधानाने घरच्या अंगणातून आता देशाच्या नभांगणाकडे दृष्टी लावून बसले आणि लवकरच त्यांना दिसला 'लोकमान्य' नावाचा ध्येयाचा ध्रुवतारा!

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

लोकमान्य टिळक यांचे संगती

सुखी आणि स्वास्थ्यसंपन्न सांसारिक जीवन साताऱ्यामध्ये राहून जगणाऱ्या तात्यासाहेब केळकर यांचा मार्ग मोकळा झाला होता. कायद्याची पदवी संपादन केली होती. वकिलीच्या व्यवसायाला प्रारंभ झाला होता. मुळात ज्याची मनापासून आवड, त्या वाचनलेखनालाही सुरुवात झाली होती. विद्यार्थी असतानाच श्री. कृ. कोल्हटकर आणि इतर वाङ्मयप्रेमी मित्रांच्यासमवेत पुण्यामुंबईत वाङ्मयाच्या संगतीची चर्चेची, नाट्यकरमणुकीची, भाषांतरांची, वृत्तपत्रीय लेखनाची पार्श्वभूमी तयार झालेली होती. साताऱ्यामध्ये राहून द्रव्यप्राप्तीबरोबर रसविदग्ध वाङ्मयविलासाची आणि साहित्यनिर्मितीची हौस पुरेपूर भागणार होती; पण अंतर्मनात कुठे तरी आणखी काहीतरी घडावे, घडवावे असे रेंगाळत असणार.. सभोवतालचे वातावरणही तसेच होते. वडील सेवानिवृत्त होऊन घरीच 'ज्ञानेश्वरी' वाचन आणि इतर सत्संगात गुंतले होते. वडील बंधू नाना आपली नोकरी सांभाळून 'काव्य-संग्रहा'च्या संपादनकार्यात गुंतले होते. दुसरे बंधू अप्पा आपल्यापरीने सरकारी नोकरीत सुप्रतिष्ठित झाले होते. तात्यासाहेब यांची वकिली बेताचीच चालू होती; पण समव्यावसायिकांच्यात काळ आनंदात जात होता. त्यांच्याच शब्दात सांगायचे, तर 'अंजीर-खडीसाखरे'चा गोडवा होता. टागोरां कुटुंबाकडून बंगाली भाषा शिकणे आणि त्यांच्या मंडळींना मराठी पदे, गाणे शिकवणे तसेच अधूनमधून लॉ-क्लासमध्ये शिकवणे, चालू होते. सुखवस्तू संसाराचा तो आरंभ काळ होता. घराच्या अंगणात बसून देशाचे नभांगण न्याहाळण्यास तात्यासाहेब मोकळे होते.

## 'मराठा' तितुका सांभाळावा, 'केसरी' धर्म वाढवावा

वयाच्या अवघ्या पंचविशीतच तात्यासाहेब केळकर यांना मिळालेल्या या संधीने त्यांनी बुद्धिचापल्य आणि बहुश्रुततेच्या बळावर सोने केले. अंगी असलेल्या लेखनगुणाची आणि चौरसचौरस जिज्ञासेची, तसेच समन्वयशील सौजन्यवृत्तीची भरघोस भरभराट भावी काळात तात्यासाहेब यांनी घडवून आणली. प्रारंभीच्या काळात केवळ 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकाची जबाबदारी सांभाळता सांभाळता त्यांच्या लेखणीला सफाईदार इंग्रजी भाषेची प्रगल्भता लाभली.

महाराष्ट्राबाहेरही त्यांचे लेखण पोहोचू लागले आणि त्यांचे शंयसांग कौतुकही होऊ लागले, पण हे केवळ दैवयोगानेच घडले असे नाही, तर त्यामागे त्याचा आत्मविश्वास होता आणि येईल त्या परिस्थितीला टक्कर देण्याचा निर्धारही होता. या संदर्भात त्यांनी बंधू नाना यांना जे पत्रातून लिहिले आहे, त्यामधून त्यांची मनःस्थिती स्पष्ट होते.

## पुण्यनगरी (लोकमान्य यांच्या संगाती) गुरुचरणी.

या आत्मविश्वाच्या बळावर १८९६च्या मार्चमध्ये तात्यासाहेब पुण्याच्या विंचूरकरवाड्यात दाखल झाले. सुरुवातीस ते टिळक यांच्या घरीच राहायचे. नंतर त्यांनी सदाशिव पेठेत स्वतःचे बिऱ्हाडे केले. टिळक यांच्या जवळच काही काळ राहिल्याने त्यांचा दिनक्रम तात्यांना चांगला परिचित झाला होता. त्यांचे चांगले वागणे-बोलणे, वरच्या आवाजातील गप्पांच्या, वाचनव्यासंग, सल्लामसलतीच्या गाठीभेटी आणि रात्र रात्र कार्यमग्न राहण्याची टिळक यांची जीवनशैली यांचा प्रभाव केळकर यांच्या मनावर पडणे स्वाभाविक होते. पुढील काळातील त्यांची जीवनपद्धती आणि दिनक्रम लक्षात घेतला की, त्या प्रभावाची कल्पना येते.

undaram®
FOR EDUCATIONAL USE

## 'केसरी' रथाचे सारथ्य

असे असूनही 'केसरी'च्या रथावर आरूढ होऊन लोकमान्य यांच्या रथाचे सारथ्य करणे, हे काम सोपे नव्हते, पण केळकर त्यामध्ये यशस्वी झाले. टिळक यांच्या बहुलक्षी व्यापाची त्यांना यथार्थ जाण होती. ते स्वत: कायद्याचे अभ्यासक होते. त्यामुळे कायद्याच्या चौकटीत राहून किती रोखठोक, पण मुद्देसूद लिहावयाचे, याचे तारतम्य त्यांच्याकडे होते. १९१० ते १९१८ आणि १९२० ते १९३० या काळात 'केसरी'ची धुरा त्यांनी यशस्वीपणे संभाळली. एखादा अपवाद वगळता ते लेखनामुळे कायद्याच्या कचाट्यात सापडले नाहीत. टिळक यांच्या माघारी त्यांनी 'केसरी' शिताफीने चालवला. मोठ्या हिकमतीने तो ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या रोषापासून वाचवला. म्हणून टिळक तुरुंगातून सुटून परत येताच त्यांना पाय ठेवायला गायकवाडवाड्यात हक्काची जागा मिळाली. त्या काळात वृत्तपत्र चालवणे, ही पिनलकोडाच्या वस्तऱ्याच्या धारेवर चालवण्यासारखी होती.

टिळक यांना हा विश्वास पुढील काळात केळकर यांनी अनेकदा सार्थक करून दाखविला. जागोजागी आर्थिक अडचणींचे खड्डे आणि शासकीय दडपशाहीचे अड्डे असूनही त्या धकाधकीच्या मामल्यातून 'केसरी'चा रथ त्यांनी शिताफीने मार्गस्थ केला.

## जलदगतीची लेखन ऊर्जा

पण केळकर यांना हे श्रेय कायद्याच्या चौकटीपुरतेच देऊन भागणार नाही. आशयाच्या दृष्टीनेही त्यांची कामगिरी भरभराटीची होती. प्रवाही राजकारणाबद्दलची सविस्तर वार्तापत्रे, खंडनमंडनपर अग्रलेख, राष्ट्रपुरुषांच्या निधनानंतरचे मृत्युलेख, राजकीय आंदोलनात होणाऱ्या अन्यायांबाबत जाब विचारणारे परखड लेख, आपल्या सांस्कृतिक-ऐतिहासिक वैभवाची माहिती देणारे अभ्यासपूर्ण लेख आहे.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

## दुसरे ते राजकारण

न. चि. केळकर यांच्या पत्रकारितेचे एक मुख्य प्रधान अंग म्हणून त्यांच्या सक्रिय राजकारणाचा विचार करावा लागतो. कोणताही पत्रकार हा प्रत्यक्ष राजकारणी असतो असे नाही; पण आलिप्त राहूनही त्याला प्रचलित राजकारणाची बऱ्यापैकी जाण असावी लागते. केळकर तर उघड उघड राजकारणाची लढवय्या सूर्याचे साक्षीशांखाली आले होते. दगदगीच्या राजकारणात पत्रकारितेच्या दैनंदिन कामकाजाकडे पुरेसे लक्ष देण्यास फुरसत होत नव्हती, म्हणून टिळक यांनी केळकर यांना बोलावून घेतले होते. खाजगी ला-क्लास आणि 'मराठा'-'केसरी' चे काम संभाळून टिळक यांच्या राजकारणात त्यांनी सहभाग घेणे अपेक्षित होते. शिवाय, प्रचलित राजकारणाबद्दल केळकरही अगदीच अनभिज्ञ नव्हते. त्यांच्या विद्यार्थिदशेपासून यांची धडपड, त्यांची भूमिका जाणून होते. त्या बाबत त्यांना आत्मीयता होती.

तरी पण केळकर यांच्या मुख्य पिंड राजकारणाचा नव्हे. टिळक यांच्या संगतीत आले नसते, तर त्यांनी सक्रिय राजकारण केलेही नसते. फार तर सातार्यातील एक प्रतिष्ठित वकिल म्हणून राजकारणावर भाष्य करित राहिले असते.

## राजकारणाचे पहिले धडे

टिळक यांचे सहकारी म्हणून १८९६ मध्ये केळकर पुण्यात आले. त्या आधी गोपाळ गणेश आगरकर यांचा मृत्यु झाला होता. (१८९५) प्लेग आणि दुष्काळामुळे पुणे होरपळून निघाले होते. (१८९६) टिळक यांना राजद्रोहाबद्दल शिक्षा होऊन तुरुंगवास पाठवण्यात आले होते. (१८९७) अश्या पार्श्वभूमीवर काहीसा प्रक्षुब्ध होऊन तुरुंगवास वातावरणात 'मराठा' आणि 'केसरी' यांच्या वृत्तपत्रांची जबाबदारी तरुण आणि अनुभवी केळकर यांच्यावर येऊन पडली.

## साहित्य विश्व

माणूस हा संहिताप्रसू प्राणी आहे. तो बोलायला शिकला आणि वर्षांच्या प्रवासात तो लिहावयास शिकला. समाजप्रिय प्राणी झाल्यावर बोलणे, ही त्यांची आंतरिक गरज झाली. बोलणे हे वर्तमानव्यवहारपुरते, समोरासमोर मर्यादित राहते. दुरवरच्या व्यक्तिशी आणि भविष्यातील पिढीशी संवाद साधावयाचा, तर लिहिण्याशिवाय उत्तम पर्याय अन्य नाही. असे लक्षात आल्यावर त्याची बोलण्याची ऊर्मी लेखनात परावर्तित झाली आणि लिहिण्यामधील नेमकेपणाचे आणि अक्षयत्वाचे मोल त्याला उमगले.

लिहिण्याच्या कलेमुळे नेमकेपणाने काही सांगता येऊ लागले, हे जसे ध्यानात आले, तसे त्या लेखनकलेतील क्रीडानंदही माणसाला जाणवू लागले. स्वतःच्या भावभावना, विचारप्रतिपादन नटवून सजवून लिहिण्याने अधिक प्रभावी आणि वेधक होते, हे समजताच संवेदनशील मनांचा आणि बुद्धिजीवींच्या लेखनाचा पसारा वाढला. दिवसेंदिवस माणूस संहिताप्रसू बनला. ज्याच्या त्याच्या मनोधर्मानुसार तो लिहिता झाला. लिहितच राहिला. अशा लिहिणाऱ्यांची मोजदाद करता येणार नाही. प्रत्येक भाषेच्या पाठीवर त्यांची संख्या अगणित आहे. मानवी संस्कृतीचे ते खरेखुरे दरवान आहेत. त्यांच्या लेखनक्षमतेमुळे संस्कृतीचे जतन झाले आहे, संवर्धन झाले आहे आणि मुल्यमापनही झाले आहे.

अशा या श्रीमंत परंपरेत बहुप्रसव लेखक म्हणून आधुनिक मराठी वाङ्मयात जी ठळक नावे सांगता येतात, त्यामध्ये साहित्य-सम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांचे नाव अग्रस्थानी ठेवावे लागते. विविधता आणि वैपुल्य या दृष्टीने त्यांच्या पुढच्या पिढीतील आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचाच निर्देश होऊ शकेल. आणखीनही काही नावे शोधता येतील; पण विविधता आणि सत्यता, तसेच विपुलता आणि क्रीडालोलुपता या दृष्टीने केळकर यांचेच नाव आघाडीवर राहील.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

बेस्ट ऑफ केळकर

केळकर यांचे हे समस्त लेखन गुणवत्तेच्या दृष्टीने सारख्याच तोलामोलाचे नाही, हे स्पष्टच आहे. मुख्यात्त्या बहुप्रसव लेखकाच्याबाबत तशी अपेक्षाही करता येणार नाही. ज्याच्या लेखनाचे प्रयोजन आणि स्वरूप कालमान - परिस्थितीनुसार भिन्न भिन्न असते, त्यांबाबत तशी अपेक्षा रास्त नव्हे; पन नंतरच्या काळातील अभ्यासकाने लक्षपूर्वक वाचन करून, काही मूल्य, कसोट्या लावून केळकर यांच्या समस्त वाङ्मयातून 'टॉप टेन' किंवा 'बेस्ट ऑफ केळकर' निवडायचे ठरवले, तर साधारणेपणे त्यांच्या पुढील पुस्तकांचा समावेश होईल.

1. लोकमान्य टिळक चरित्र (तीन खंड)
2. गतगोष्टी (आत्मवृत्त)
3. तोतयाचे बंड (नाटक)
4. कृष्णार्जुन युद्ध (नाटक)
5. केळकरांची निबंधमाला
6. हास्यविनोदमीमांसा
7. भारतीय तत्त्वज्ञान
8. ज्ञानेश्वरी सर्वस्व (विवेचन)
9. मराठे व इंग्रज
10. सुधारणा सुख व सदाचार

अशा निवडीबाबत मतभिन्नता होईलच; पण एक बहुलेखक म्हणून केळकर यांची ओळख सर्वसामान्य वाचकांना त्यामुळे घडू शकेल.

ऋषिकेश कांबळे
द्वितीय वर्ष कला

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

Date : 2

# गोपाळ गणेश आगरकर

## बालपण आणि शिक्षण

गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी सातारा जिल्ह्यातील टेंभू या गावी झाला. टेंभू हे गाव कऱ्हाडपासून तीन-चार मैल दूर आहे. या गावात आगरकर यांच्या अनेक पिढ्या गेल्या.

आगरकरांचे पणजोबा बच्चाजीपंत यांची आर्थिक स्थिती उत्तम होती त्यांच्यानंतर आगरकर यांचे आजोबा विष्णुपंत कारभार पाहू लागले. विष्णुपंत यांचे धाकटे चिरंजीव गणेशपंत म्हणजे आगरकर यांचे वडील. गणेशपंत आगरकर यांचा विवाह कऱ्हाडच्या विष्णुपंत भागवत यांची थोरली कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाला. कऱ्हाडचे भागवत कुटुंबसुद्धा सुस्थितीत होते. आगरकर यांचा जन्म होईपर्यंत आगरकर कुटुंबाची आर्थिक स्थिती बिघडायला लागली होती. गणेशपंत आगरकर यांना तीन मुली आणि दोन मुले होती. गोपाळराव जवळजवळ असमवयस्क होते

आगरकरांचे मामा सदाशिवराव भागवत यांनी वऱ्हाडातील अकोला येथे वकिली केली आणि चांगला पैसा मिळवला. शिवाय त्यांनी तेलाची गिरणी चालवायला घेतली होती. यातही त्यांना यश मिळाले. आगरकर यांच्या जन्मगावी टेंभू येथे शाळा नव्हती.

Date: 3

त्यामुळे आगरकर यांना प्राथमिक शिक्षणासाठी कऱ्हाडला जावे लागले. हा काळ त्यांच्या आयुष्यातील चांगला काळ होता, असे म्हणावे लागेल. त्यानंतर त्यांच्या आयुष्यात वणवण सुरू झाली. आगरकर बारा-तेरा वर्षांचे असताना त्यांचे कऱ्हाडमधील शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर मात्र त्यांना मरेपर्यंत कष्ट करावे लागले. त्यांना शिक्षणाची मनापासून आवड होती; पण परिस्थिती अनुकूल नसल्याने त्यांना शिक्षण सोडून पाच-सहा वर्षांसाठी मुन्सफ कचेरीत खर्डेघाशी करावी लागली.

या परिस्थितीतून कसा मार्ग काढावा, याचा विचार करत असताना आगरकर यांना आठवले की, वामनराव आगरकर हे त्यांचे दुसरे काका रत्नागिरीला 'डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर' आहेत. मुख्य म्हणजे रत्नागिरीला हायस्कूलसुद्धा होते. तेथे उच्चपदावर असलेले काका आपल्याला नक्कीच मदत करतील, अशी आशा बाळगत गोपाळराव यांनी कऱ्हाड ते रत्नागिरी हे अंतर पायी कापले. हे अंतर जवळजवळ दीडशे मैल आहे; पण त्यांना काकांनी आधार दिला नाही.

आगरकर यांनी इतर मार्ग वापरून पाहिले. पण त्यांना यश आले नाही. त्यांना रत्नागिरीचा निरोप घ्यावा लागला. बालपणात आलेल्या कटू अनुभवामुळे आगरकर यांची लेखणी सडेतोड झाली. त्यांचे चरित्रकार मा.वा. अकोलकर लिहितात, 'हिंदू अंतरंगाचा खडतर अनुभव गोपाळराव यांना रत्नागिरीपासून येऊ लागला. गोपाळराव यांचे थोरले मामा सदाशिवराव भागवत अकोल्याला स्थायिक झालेले होते. त्यांनी धाकटे बंधू दत्तोपंत यांनाही पुण्याहून अकोल्याला नेले. सदाशिवराव यांच्या

पत्नीला अकोल्यात नेण्याची जबाबदारी गोपाळराव यांच्यावर आली. अकोल्याला हायस्कूल होते. तेथे आपल्या शिक्षणाची तजवीज होऊ शकेल, या आशेने गोपाळराव अकोल्याला जायला निघाले. अशा प्रकारे गोपाळराव १८८२ मध्ये अकोल्याला पोहोचले. गोपाळराव १८८५ साली मुंबई युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परिक्षेला बसले आणि पास झाले. त्या आधीच्या वर्षी त्यांच्या मामांनी-दत्तोपंत भागवत यांनी ही परीक्षा पास केली होती. त्या. नंतर दत्तोपंत उच्च शिक्षणासाठी पुण्याच्या डेक्कन कॉलेजात गेले.

सन १८८२-१८८५ ही तीन वर्षे मामांच्या घरी राहून गोपाळराव यांनी अकोल्याला हायस्कूल शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या शिक्षकांचे त्यांच्याबद्दल अनुकूल मत होते. श्रीमती कुसुम देशपांडे लिहितात, 'देवाने वि. मो. महाजनींसारखे विद्वान, प्रेमळ शिक्षक त्यांना लाभले.' स्वत: वि. मो. महाजनी यांनी गोपाळराव यांच्याबद्दल खालील उद्गार काढले आहेत. गोपाळराव यांचे वय त्यावेळी १५-१६ वर्षांचे होते. अंगयष्टी उंच, सडपातळ आणि काटक होती. डोळे पाणीदार होते. भाषण ठसक्याचे आणि आत्मप्रयत्नाने सुधारलेले असे होते..... गोपाळराव नाव काढतील, अशी माझी खात्री होती.

गोपाळराव यांच्या कॉलेज शिक्षणाचा खर्च करण्याची कोणाची ऐपत नव्हती; पण जिद्दी गोपाळराव हार मानणारे नव्हते. त्यांचा निश्चय बघून त्यांच्या शिक्षकांनी वर्गणी करून गोपाळराव यांच्या हाती साठ रुपये ठेवले. या पैशांत कॉलेजच्या सुरुवातीचा तीन महिन्यांचा खर्च भागेल. पुढच्या काळात गोपाळराव ज्युनियर स्कॉलर शिप मिळवतील, अशी खात्री होतीच. शिवाय अकोल्याहून प्रकाशित होणाऱ्या 'वऱ्हाड समाचार' च्या संपादकांनी त्यांना

Date: 5

वृत्तपत्रासाठी लेखन करण्यास सांगितले. या कामासाठी आगरकर यांना दरमहा पाच रुपये मिळणार होते.

गोपाळराव कॉलेजातील विविध स्पर्धेत भाग घेऊन बक्षिसे मिळवत असत. मुंबई तर शहरात झालेल्या वक्तृत्वसभारंभातही त्यांनी भाषण करून पन्नास रुपये मिळवले होते. डेक्कन कॉलेजची फी आणि राहण्याचा खर्च मुक्त केल्यास दरमहा पंचवीस रुपये लागत असत. गोपाळराव यांच्या मनावर सतत या खर्चाची काळजी असायची. त्यांना तरुण वयात सकस आहार मिळाला नाही. त्यामुळे त्यांची प्रकृती सामान्य लागली.

आगरकर यांना पैशांची चणचण नेहमी असायची मुळी की, पहिल्या वर्षी परीक्षेची फी भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते. यासाठी त्यांनी नाटक लिहायला घेतले. त्यांचे नशीब चांगले की, त्यांची आर्थिक अडचण वेळीच प्रा. केरूनाना छत्रे यांना कळली. छत्रे यांनी तातडीने फी भरण्याची व्यवस्था केली आणि गोपाळराव शांत मनःस्थितीत परीक्षा देऊ शकले.

गोपाळराव बी. ए. झाले आणि जानेवारी १८८५ मध्ये न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दाखल झाले. त्यांना अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात काम करायचे होतेच. आता त्यांचे स्वप्न पूर्ण होत होते. शिवाय जोडीला चिपळूणकर, टिळक, आपटे यांच्यासारखे मित्र होते. त्यामुळे आगरकर लवकरच न्यू इंग्लिश स्कूलमध्ये रमले. यासोबत त्यांना नवी पिढी घडवण्याची, त्यांच्यावर राष्ट्रप्रेमाचे संस्कार करण्याची संधी मिळत होती.

## केसरी व मराठाची सुरुवात

कोणत्याही समाजसुधारकास सामाजिक बदल घडवताना काही मुख्य प्रक्रियेतून जावे लागते. यात शाळा, शिक्षणसंस्था सुरू करणे, वृत्तपत्र सुरू करणे आणि त्यानंतर सामाजिक संस्था / राजकीय पक्ष सुरू करणे, वृत्तपत्र वगैरे महत्त्वाच्या पायऱ्या असतात. महात्मा गांधी यांनी 'हरिजन' सुरू केले. 'नई तालिम' चा आग्रह धरला आणि त्यानंतर काँग्रेसचे नेतृत्व केले. असाच प्रकार डॉ. आंबेडकर यांच्याबद्दलही सांगता येतो. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा सुरू केली 'जनता', 'मूकनायक' वगैरे मासिके चालवली. त्यानंतर 'स्वतंत्र मजूर पक्ष' (१९३६) 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' (१९४२) स्थापन केले. आंबेडकर यांनी यथावकाश 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली आणि 'सिद्धार्थ महाविद्यालय' सुरू केले.

ऑक्टोबर १८८० च्या सुमारास टिळक-आगरकर यांना आपल्या हाती स्वतःचे वृत्तपत्र असावे असे वाटू लागले; पण या दोघांना या क्षेत्राचा काहीही अनुभव नव्हता. सुदैवाने त्यांच्या मित्रमंडळीत माधवराव नामजोशी नावाचे सद्गृहस्थ होते. ते न्यू इंग्लिश स्कूलच्या व्यवस्थापनात सक्रिय होते. शाळेच्या कामात येण्यापूर्वी माधवराव नामजोशी यांनी 'किरण' या नावाचे एक मराठी साप्ताहिक चालवले होते.

२ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजेच ४ जानेवारी 'केसरी' प्रकाशित झाला जानेवारी १८८१ मध्ये 'केसरी' च्या अवघ्या पाचशे प्रती छापल्या जात होत्या.

कार्य

## केसरीकार आगरकर

आगरकर यांचे नाव 'सुधारक'शी आणि 'केसरी' नाव टिळक यांच्याशी पुढे जोडलेले आहे की, 'केसरी' सुरू झाला, तेव्हा त्याचे संपादक आगरकर होते, हे चटकन डोळ्यांसमोर येत नाही. ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' चा पहिला अंक निघाला, तेव्हा त्यावर संपादक म्हणून आगरकर यांचे नाव होते. त्यानंतर आगरकर यांनी सुमारे सात वर्षे 'केसरी' चे संपादन केले. 'केसरी' सुरू झाला, तेव्हा त्यात 'तीन लेख, स्फुट सूचना, पत्रव्यवहार वगैरे प्रकाशित होत असे. सुरुवातीच्या काळात 'केसरी' बहुतांशी आगरकर यांनी चालवला. चिपळूणकर अधूनमधून लिहीत असत; पण केसरी सुरू झाल्यापासून सव्वा वर्षातच चिपळूणकर यांचे निधन झाले. याशिवाय आपटे, नामजोशी आदी असत; पण मुख्य जबाबदारी आगरकर यांची होती. आगरकर यांनी 'केसरी'त भरपूर लिहिले; त्याचप्रमाणे अनेक विषयांवर लिहिले. त्यांच्या लेखणीला अर्थशास्त्र, राज्यशास्त्र वगैरे कोणताच विषय निषिद्ध नव्हता'

आगरकर 'केसरी' चालवण्यात सिंहाचा वाटा उचलत होते. हे खरे असले, तरी त्यात व्यक्त होणारी मते / दृष्टीकोन त्यांचे स्वतःचे होते, असे नाही. 'केसरी' मराठी चे संपादकीय धोरण सामूहिकरित्या ठरत असे. आगरकर यांची स्वतःची भूमिका आणि 'केसरी' चे संपादकीय धोरण यात विसंवाद १८८४ साली बालविवाह बंदी कायद्यामुळे वर आला. टिळक-आगरकर यांच्यात सामाजिक सुधारणांबद्दल अगदी सुरुवातीपासून मतभेद

पल्लवी मयेकर
द्वितीय वर्ष कला

होतेच असे असले, तरी हे मतभेद हाताबाहेर जाणार नाहीत, याची कसून काळजी उभयपक्षी घेतली जात होती. म्हणूनच 'केसरी-मराठा' सुरू झाल्यापासून सुरुवातीची पाच सहा वर्षे एकत्र काम करणे शक्य झाले होते. यामागे एक महत्त्वाची, स्वतःवर घालून घेतलेली मर्यादा होती.

आगरकर यांच्या या भूमिकेला डॉ. काशीताई कानिटकर यांनी जाहीर सभेत पाठिंबा दिला होता. त्या सभेत म्हणाल्या होत्या की, 'आपल्या घरी मंडळी चांगल्या होत नसल्या, तर त्यात सुधारणा करण्यासाठी सरकारला हाक मारावी लागेल.

आगरकर यांना याबद्दल मिळणारा पाठिंबा कमी होता, हे मान्य केले, तरी पाठिंबा कमी होता, ~~हे मान्य केले,~~ तरी अजिबात नव्हता, असे नाही स्त्री शिक्षण 'केसरी-मराठ्या'च्या संचालकांना मान्य होते; पण स्त्री शिक्षणाचा आशय काय असावा, याबद्दल वाद होता. दुसरा वादाचा मुद्दा म्हणजे बालविवाह कायद्याने बंदी करावी की नाही? यावर बाबतीत आगरकर आणि टिळकांमध्ये फार गंभीर स्वरूपाचे मतभेद नव्हते. म्हणूनच तर पाच-सहा वर्षे आगरकर यांच्यासारखा जहाल सुधारक 'केसरी'च्या संपादकपदी राहू शकला. पुढेच नव्हे तर जरा काळजीपूर्वक वाचन केले. तर सामाजिक सुधारणांबद्दल 'केसरी'त आगरकर यांनी घेतलेली भूमिका आणि 'सुधारका'तून घेतलेली भूमिका यातील फरक लक्षात येते.

सामाजिक सुधारणांवरून कधी तरी 'केसरी'-'मराठा' संस्थेत वादावादी होईल, याचा अंदाज होताच. याची सुरुवात १८८७ च्या प्रारंभालाच झाली असेच वाद-

FOR EDUCATIONAL USE

वाचो 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ला जून १८८७ च्या 'केसरी' च्या आसपास सुरू झाली. २५ ऑक्टोबर १८८७ च्या 'केसरी' च्या अंकात आगरकर यांच्यावर 'केसरी' पत्राची जबाबदारी राहिली नाही, असे प्रसिद्ध करण्यात आले यांच्यावर 'केसरी' पत्राची जबाबदारी राहिली नाही, असे प्रसिद्ध करण्यात आले. या प्रकारे आगरकर यांचा 'केसरी'शी असलेला संबंध संपला. आगरकर यांना 'केसरी' तून दूर व्हावे लागले, यात एक प्रकारची वैचारिक अपरिहार्यता आहे. हे दूर होणे वैचारिक कारणांसाठी होते. यावर मालिनाशी करताना टिळक यांना १९०२ साली जे महत्त्वाचे आहे.

'केसरी' कार आगरकर त्यामानाने प्रतिगामी होते, तर 'सुधारक' कार आगरकर शुद्ध स्वरूपात सुधारणावादी होते. याचा अर्थ असा की, 'केसरी' कार आगरकरांची सामाजिक सुधारणांबद्दलची भूमिका अजून बाल्यावस्थेत होती. त्यांनी 'केसरी' चे संपादन पाच-सहा वर्षे केल्यानंतर त्यांची भूमिका अधिक रेखीव, अधिक प्रगल्भ होत गेली. म्हणूनच 'केसरी' कार आगरकर आणि 'सुधारक' कार आगरकर यांच्यातील वैचारिक फरक लक्षात घ्यावा लागतो. तो जसा तात्त्विक होता, तसाच व्यावहारिकसुद्धा होता.

Date: / / 10

'सुधारक'चा जन्म

१८८४ च्या शेवटी असे स्पष्ट दिसू लागले की, टिळक-आगरकर यांच्यात बालविवाहाच्या मुद्द्यांवरून पराकोटीचे मतभेद आहेत. १६ डिसेंबर १८८४ च्या अंकात आगरकर यांनी स्वतःच्या नावाने 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या शीर्षकाचा लेख लिहिला. आगरकर 'केसरी'चे मुख्य संपादक असूनही त्यांना स्वतःच्या नावाने लेख लिहिण्याची वेळ येते, यावरून त्यांची किती कुचंबणा व्हायला लागली होती, याचा अंदाज येतो. या लेखात आगरकर म्हणतात, 'पण बालविवाहाच्या निषेध-साधनांविषयी त्यांचे आणि त्यांच्या मित्रांचे विचार जुळेत नसल्यामुळे त्यांना । या मार्गाचे अवलंबन करावे लागत आहे... या बाबतीत (म्हणजे बालविवाह.) माझा सहकाऱ्यांशी विरोध आहे आणि तो असतांनाही फार महत्त्वाचा वाटत आहे' थोडक्यात म्हणजे सव-बारी यांच्या टिपणामुळे टिळक आणि आगरकर यांच्यातील तात्त्विक वाद चव्हाट्यावर आले. याचे पडसाद 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'त उमटू लागले.

FOR EDUCATIONAL USE

Date: / /

# 'सुधारक' कार आगरकर

डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील टिळक यांचा गट आणि आगरकर यांचा गट यांच्यातील वाद विकोपाला गेला होता. गोपाळराव आगरकर आणि गोपाळ कृष्ण गोखले नवे साप्ताहिक काढणार असल्याची कुणकुण सुरू झाली होती. काही मध्यस्थांनी टिळक-आगरकर यांनी एकमेकांत समेट करून घ्यावे या हेतूने समेटासाठी प्रयत्न केले; पण या प्रयत्नांना यश आले नाही. ९ ऑगस्ट १८८८ रोजी 'इंदुप्रकाश' मध्ये १५ ऑक्टोबरपासून 'सुधारक' हे इंग्रजी - मराठी साप्ताहिक सुरू होणार असल्याचे पत्रक प्रसिद्ध झाले. या पत्रकात सुधारक काढण्याचा हेतू स्पष्ट करण्यात आला होता. इंग्रजी राजवटीमुळे आपल्या जागृतीचा आणि विद्याप्रसाराचा परिणाम भारतीय आर्यत्व नष्ट होण्यात होऊ नये आणि जीवनकलहात आपला निभाव लागावा म्हणून चीन-जपानप्रमाणे आपले डोळे आपण नीट उघडावे, यासाठी 'सुधारक' सुरू करणार असल्याचे पत्रकात म्हटले होते. स्त्रियांनी लिहिलेल्या लेखांकरता 'सुधारका'त स्वतंत्र जागा राखून ठेवणार असल्याचेही जाहीर करण्यात आले होते.

पल्लवी मयेकर
द्वितीय वर्ष कला

पंडिता रमाबाई जरी महाराष्ट्रात वाढल्या नसल्या तरी त्यांच्या जीवनाची नाळ पुण्याच्या पेशवाईला जाऊन भिडलेली होती. त्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे कर्नाटकातले. डोंगरे कुटुंब मूळचे महाराष्ट्रीय व चित्पावन ब्राम्हण, परंतु अनेक पिढ्या कर्नाटकात मंगळूरजवळ माळहेरंबी येथे स्थायिक झालेल्या. तरुण अनंता विद्यार्जनासाठी काही वर्षे पुण्यात राहिला होता. वेदशास्त्रसंपन्न रामचंद्रशास्त्री साठे यांच्याजवळ तो शास्त्राध्ययन करत असे. साठे हे पेशव्यांचे गुरू असल्यामुळे त्यांच्याबरोबर पेशव्यांच्या शनिवारवाड्यात जाण्याची संधी त्याला मिळाली. त्या वेळी दुसरे बाजीराव पेशवे यांच्या पत्नी वाराणसीबाई आपल्या सुमधुर वाणीने व स्पष्टपणे अस्खलित संस्कृत श्लोक म्हणून दाखवताना अनंताने ऐकले आणि तो प्रभावित झाला. स्त्रियांना संस्कृत ही 'देववाणी' शिकण्याचा अधिकार नाही, या प्रचलित समजुतीला हा फारच मोठा धक्का होता. आणि त्याचे पडसाद त्याच पुण्यात अनेक दशकांनी ते रमाबाईंच्या रूपाने.

या घटनेनंतर थोड्याच अवधीत पेशवाईचा अस्त होऊन पेशवे ब्रम्हावर्तास गेले आणि रामचंद्रशास्त्री साठेही त्यांच्याबरोबर गेले. पण जाण्यापूर्वी त्यांनी अनंताला त्याचे शिक्षण पूर्ण झाल्याकारणाने 'शास्त्री' ही पदवी बहाल केली. आता 'अनंतशास्त्री' स्वगृही कर्नाटकास परतले आणि त्यांनी आपल्या पत्नीला संस्कृत शिकवण्याचा प्रयत्न केला. परंतु घरच्या वडील मंडळींच्या दबावामुळे तो सफल

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

होऊ शकला नाही. या बाईना बरीच मुले झाली; पण त्यांपैकी फक्त एक मुलगा व एक मुलगी एवढीच वाचली.

पुढे अनंतशास्त्रींनी म्हैसूर दरबारी नोकरी पत्करली. त्यांच्या तिथल्या दहा वर्षांच्या काळात त्यांच्या पांडित्याचा लौकिक बराच पसरला, त्याचबरोबर त्यांना द्रव्यप्राप्तीही बरीच झाली. काही वर्षांनी त्यांनी सहकुटुंब उत्तर भारताची यात्रा करण्याचा संकल्प सोडला आणि म्हैसूरच्या महाराजांचा परवाना व त्यांनी दिलेला हत्ती-घोडे, नोकर-चाकर इत्यादी लवाजमा घेऊन ते निघाले. वाटेत त्यांची पत्नी निवर्तली. यात्रा पूर्ण झाल्यावर आईवडिलांना लवाजम्यासह परत स्वगृही पाठवून ते एकटेच नेपाळास गेले. तेथील राजाने त्यांचा सन्मान करून एक पालखी, दोन हत्तीची पिले, एक कस्तुरी मृग व पुष्कळ द्रव्य देऊन त्यांची रवानगी केली. हत्तीची पिले लवकरच मेली, परंतु त्यांच्या रेशमी झुली व कस्तुरी मृगाचे भुसा आणि गवत भरलेले धड रमाबाई यांनी लहानपणी पाहिले होते.

नंतर अनंतशास्त्री गुजरातेस निघाले. वाटेत वाईला त्यांची गाठ माधवराव अभ्यंकर यांच्याशी पडली. मूळचे वाईचे असलेले अभ्यंकर सहकुटुंब काशीयात्रेला निघाले होते. अनंतशास्त्री हे विधुर आहेत असे समजल्यावरून त्यांच्या मालागावाची विचारपूस अभ्यंकर यांनी केली आणि आपल्या दोन मुलींपैकी एक वर्षांची मोठी मुलगी त्यांना देऊ केली. अभ्यंकर कुटुंब आपल्या मार्गाने गेले आणि ४४ वर्षांचे अनंतशास्त्री आपल्या लहानग्या नववधूला घेऊन, कर्नाटकास परतले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

एखाद्या धूमकेतूप्रमाणे पंडिता रमाबाई १८८३ च्या मार्च महिन्यात पुण्यात अचानकच अवतरल्या व शहरात चांगलीच खळबळ माजली. सुधारकांची उत्सुकता पंडिताबाईंच्याविषयीच्या आदरबद्धीमुळे जागृत झाली होती. रमाबाई रानडे आपल्या आठवणी सांगताना लिहितात, "ही विद्वान बाई असेल तरी कशी, तिला आपण केव्हा पाहू, असे मला होऊन गेले." त्यांच्याविषयी अधिक चौकशी केल्यावर प्रार्थना समाजाच्या मंडळींनी त्यांना सांगितले, पंडिताबाई ही कोणी परकी आहे काय? ती एक आपली कोकणस्थच बाई आहे. आम्ही मंडळींनी तिला बोलवले आहे."

पंडिता बाईंचे पहिले 'पुराण' - पौराणिक गोष्टींच्या आधारे सद्यः परिस्थितीवर केलेले भाष्य व उपदेशवर भाषण - रानडे यांच्या वाड्यात झाले. नंतर दर आठवड्याला त्यांच्या वर्तुळातील एकेकाच्या घरी आळीपाळीने त्यांचे भाषण होत असे. विशेष म्हणजे, या व्याख्यानांचा श्रोतृसमुदाय मिश्र असे, किंबहुना तशी व्यवस्था पंडिताबाईंनी मुद्दामच केली होती. स्त्रियांनी सभेला जाण्याची त्या काळी प्रथाच नव्हती, म्हणूनच नवीन विचार त्यांच्या कानावर पडावेत हा त्यांचा उद्देश.

"पंडिताबाई इकडे आल्या तत्पूर्वीच त्यांच्या विद्वत्तेची व वक्तृत्वाची कीर्ती इकडे वर्तमानपत्रातून आली होती. त्या वेळी स्त्रियांचे वक्तृत्व म्हणजे एक अलौकिक गोष्ट होती. बाईमाणूस बोलते तरी कशी, हे पाहण्याची उत्कंठा प्रत्येक पुरुषाला लागली होती. त्यांना वाटत होते की, पंडिताबाईंची व्याख्याने आपण पुरुष वर्गाला ऐकायला एकावयास मिळतील

कारण युरोपीयन विद्वान स्त्रियांची भाषणे अशी आपणास ऐकावयास मिळतात तसेच हेही घडेल. पण पंडिताबाई कसल्या वस्ताद! त्यांना हा पुरुषांचा कावा पूर्ण माहिती!!

"पंडिताबाईंची व्याख्याने, पुराणे वगैरे जे काय होईल त्याच्या निमंत्रणपत्रिकेत एक अट नेहमी घातलेली असे ती ही की, "जे कोणी पुरुष व्याख्यानाला येतील त्यांनी आपली पत्नी, मुलगी, सून, बहीण, आवजय अशांपैकी खुद्द आपल्या घरची स्त्री बरोबर आणल्याशिवाय त्यांना रांगेत बसता येणार नाही." या त्यांच्या अटीमुळे मला माझ्या श्वशुरांच्या बरोबर पंडिताबाईस व त्याच प्रसंगी रमाबाईस (रानडे) पाहण्याचा योग आला."

त्या काळी स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांनी सभा-व्याख्यान आदिकरता घराबाहेर पडणे या वादग्रस्त बाबी होत्या, त्या काळी ही घटना खळबळजनक होती, यात शंकाच नाही, खुद्द न्यायमूर्ती रानडेंच्या घरात त्यांनी रमाबाईंना मराठी लिहा-वाचायला शिकवले व इंग्रजीसाठी झनाना मिशनच्या हरफर्डबाईची शिकवणी लावली यावरून वादंग माजत असे. मडमेचा विटाळ झाला म्हणून दुपारी सचैल स्नान केल्याशिवाय रमाबाईंना माजघरात किंवा स्वयंपाकघरात प्रवेश नसे. यामुळे त्या वरचेवर तापाने आजारी पडू लागल्यावर न्यायमूर्तींच्या कानावर हे प्रकरण गेले आणि त्यांनी ही प्रथा बंद केली.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

वैद्यकीय शिक्षण घेण्याची मूळची महत्वाकांक्षा पुन्हा प्रबळ होऊन या ध्येयपूर्तीसाठी इंग्लंडला जाण्याचा बेत रमाबाईंनी केला, त्याची पार्श्वभूमी व खुद्द प्रवासाचे वर्णन त्यांनी आपले स्नेही, प्रार्थना समाजाचे सेक्रेटरी सदाशिव पांडुरंग केळकर, यांना एक विस्तृत पत्र लिहून कळवले. ते पत्र प्रार्थना समाजाच्या डॉ० मो० वैद्य यांनी लिहीलेल्या रमाबाईवरच्या चरित्रपर लेखांसकट 'पंडिता रमाबाईंचा इंग्लंडचा प्रवास' या शीर्षकाखाली छापून, छपाईखर्च वजा जाता आलेली रक्कम रमाबाईंना पाठवण्याचा निर्णय प्रार्थना समाजाने घेतला; म्हणूनच आज उपलब्ध आहे.

इंग्लंडला जाण्याच्या रमाबाईंच्या निर्णयाला त्यांचे हितचिंतक व हितशत्रू या दोघांकडून विरोध झाला. त्यातील प्रमुख आक्षेप म्हणजे रमाबाईंची अशक्त प्रकृती, लहान मुलीची त्यांच्यावरील जबाबदारी, इंग्रजी भाषेचे त्यांचे अज्ञान, ख्रिस्ती लोकांच्या सहवासात सतत राहण्यामधील मोकळा धोका, इंग्लंडसारख्या 'चैनबाजीच्या मुलखात' या तरुण वयात जाणे हे अयोग्य, इत्यादी. याला रमाबाईंचे प्रत्युत्तर असेल की, आपण आयुष्यभर खडतर प्रवास सोसला आहे, आणि छोट्या मनोरमेलासुद्धा आतापर्यंत बंगालमधून मद्रास व पुढे पुणे-मुंबई हा प्रवास झेपला आहे; इतर भाषांप्रमाणे इंग्रजीसुद्धा शिकता येईल (अगोदरच रमाबाईंना संस्कृत असल्यामुळे त्यांचा सहवास टाळणे अशक्य आहे; चैनबाजीची प्रवृत्ती असली तर ती कुठल्याही देशात करता येते, नाही तर टाळता येते; इत्यादी.

इंग्लंडच्या बेत फलद्रूप होण्याची पार्श्वभूमी रमाबाई अशी सांगतात की, प्रथम कम्युनिटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन (सी० एस० एम० व्ही०) नावाच्या इंग्लंडमधील अँग्लिकन पंथाच्या ख्रिस्ती संस्थेच्या पुण्यातील 'सेंट मेरीज होम' येथील स्त्रियांनी त्यांना या बाबतीत मदत करण्यास नकार दिला होता; परंतु नंतर त्यांचा असा निरोप आला की त्यांच्या काही 'सिस्टर्स' महाराष्ट्रात येणार असून त्यांना मराठी शिकण्याची गरज आहे. हे काम रमाबाईंनी पत्करल्यास त्यांचा राहण्याचा व जाण्यायेण्याचा खर्च करून सी० एस० एम० व्ही० चे इंग्लंडमधील मुख्य केंद्र त्यांना इंग्रजीसुद्धा शिकवेल. मात्र, या सर्वांच्या मोबदल्यात आपण धर्मांतर करणार नसल्याचे रमाबाईंनी या संस्थेला स्पष्टपणे सांगितले.

वयाच्या पंचविसाव्या वर्षी, २० एप्रिल १८८३ रोजी, दोन वर्षांच्या मनोरमेला घेऊन, आनंदीबाई भगत नावाच्या एका मराठा जातीच्या शिक्षिकेसमवेत रमाबाई मुंबईला बोटीवर चढल्या. इंग्लंडला पोहोचल्यानंतर लगेचच लिहिलेल्या आपल्या प्रवासवर्णनात रमाबाईंनी काही आत्मपर मजकूर, निसर्गवर्णन, समुद्राचे सौम्य तसेच रौद्र स्वरूप, वाटेत लागलेली बंदरे या सर्वांची काहीशा काव्यमय शब्दांत गुंफण केली आहे. "माझ्या जन्मभूमीचा आणि देशबंधू व भगिनींचा दीर्घ वियोग होते वेळेस परमदुःख" झाल्याचा उल्लेख करतानाच, ओघाओघाने त्या आपल्या एकाकीपणाची कबुली देतात. "जर कोणी कुणावर प्रीती करीत नसेल, तर तरी कशाला तिची आशा बाळगायला पाहिजे? असे मी आपल्यालाच विचारत होते.

FOR EDUCATIONAL USE

अमेरिकेहून आलेल्या आमंत्रणामुळे रमाबाईंच्या आयुष्याला पुनश्च एकवार एक वेगळीच दिशा लाभली. हे आमंत्रण म्हणजे त्यांच्या तत्कालीन परिस्थितीत एक आशेचा प्रखर किरणच होता. फिलाडेल्फियातील 'वूमन्स मेडिकल कॉलेज ऑफ पेन्सिल्व्हेनिया' यांच्या डीन डॉ. रेचेल बॉडेल यांच्याकडून हे आमंत्रण आले होते. आनंदीबाई जोशींच्या पदवीदान समारंभात रमाबाईंची उपस्थिती असावी अशी उत्कट इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. १८५० मध्ये स्थापन झालेले हे महाविद्यालय म्हणजे स्त्रियांना वैद्यकिय शिक्षण व पदवी उपलब्ध करून देणारे जगातील पहिलेच महाविद्यालय होते. इतरत्र काही ठिकाणी, उदाहरणार्थ इंग्लंडमध्ये, स्त्रियांनी मोठ्या मिनतवारीने झगडून वैद्यकीय शिक्षणाचा हक्क मिळवला होता, परंतु त्यांना वैद्यकीय पदवी मिळत नव्हती. त्यामुळे फिलाडेल्फियाच्या या महाविद्यालयाचे महत्व अनन्यसाधारण होते. देशोदेशीच्या स्त्रिया तिथे शिक्षणासाठी दाखल होत होत्या.

आनंदीबाईंनी १८८३ मध्ये या महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि चार वर्षांचा अभ्यासक्रम तीनच वर्षात पूर्ण करून, त्या भारतातील सर्वप्रथम महिला ~~वर्षांचा अभ्यासक्रम तीनच वर्षात पूर्ण करून त्या भारतातील सर्वप्रथम महिला~~ झाल्या होत्या. आता त्यावर फक्त शिक्कामोर्तब व्हायचे ते ११ मार्च १८८६ रोजी आयोजित केलेल्या पदवीदान समारंभात.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

परस्पर विरोधी आणि टोकाच्या दृष्टिकोनातून पंडिता रमाबाईंकडे पाहण्याचा परिपाठ त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करतानाही कायम राहिल्यास नवल नाही. एका दृष्टिने पाहता महाराष्ट्रातील धार्मिक द्वंद्वाचा हा परिणाम होता. हे द्वंद्व होते बहुसंख्याक हिंदु समाज आणि अल्पसंख्याक ख्रिस्ती समाज यांच्यामधील. संख्येचे बळ असूनसुद्धा हिंदु समाजाला ख्रिस्तीकरणाच्या बाबतीत असुरक्षितता व हळवेपणा जाणवत होते, कारण त्या धर्माला राजाश्रय तर होताच पण कामसु मिशनऱ्यांचे बळही होते. शिवाय इंग्रजी शिक्षणातून ख्रिस्ती धर्माचा कळतनकळत प्रचार होत होता. तेव्हा आपले लोक त्यांच्यात ओढले जातील याची सतत आशंका आणि भिती होती. हे धार्मिक द्वंद्व रमाबाईंवरच्या मूल्यमापनांमध्ये प्रतिबिंबित होते.

ख्रिस्ती प्रतिक्रिया रमाबाईंचे समाजकार्य अधोरेखित करून त्यांची थोरवी सांगू पाहते. "ह्या बाईंनी जी कामगिरी केली, जे धैर्य व्यक्त केले व जो आत्मपरित्याग केला त्यांचे वर्णन थोडक्यात करणे शक्य नाही. पश्चिम हिंदुस्थानच्या गेल्या तीस वर्षांचा इतिहास लिहिण्यात आल्यास, त्यात पंडिता रमाबाईंस महत्त्वाचे स्थळ देण्यात येईल, याबद्दल मतभेद असण्याचा संभव नाही."

प्रफुल्ल कदम
द्वितीय वर्ष कला.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE